गोवर्धन ब्राह्मणांचा इतिहास

लेखक
महादेवशास्त्री दिवेकर.

॥ श्री ॥

गोवर्धन ब्राह्मणांचा इतिहास



उद्धरेदात्मनात्मानम्--गीता

लेखक

महादेवशास्त्री दिवेकर, मिरज

शके १८५९] **किंमत १। रु.** [इ. स. १९३७

प्रकाशक
रावसाहेब शामराव रामचंद्र महाजन,
रिटायर्ड डे. सु. पोलीस, अकोला
अध्यक्ष
गोवर्धन ब्राह्मण समाज, वऱ्हाड शाखा

मुद्रक
वि. गं. केतकर,
महाराष्ट्र मुद्रणशाळा छापखाना,
६२४ सदाशिव पेठ, पुणें २

प्रस्तावना

ईश्वराच्या कृपेनें आज रोजीं गोवर्धन ब्राह्मणांचा इतिहास वाचकांचे हातीं देण्याचा योग येत आहे, याबद्दल आनंद व अभिमान वाटतो. आनंद याकरितां कीं एका ब्राह्मण जातीवर हिंदु समाजाच्या मनोरचनेप्रमाणें जो अन्याय होत होता, तो दूर करण्याचें श्रेय अंशत: लेखकाला मिळालें, व अभिमान वाटण्याचें कारण एवढेंच कीं, हा इतिहास लिहिण्याचा मान लेखकासच मिळाला. वास्तविक गोवर्धन ब्राह्मणांपैकींच कोणी तरी विद्वानानें हें काम करावयास पाहिजें होतें. पं. पांडुरंगशास्त्री पालये हे हें कार्य करण्यास सर्वस्वी समर्थ होते. परंतु त्यांचें प्रकृतिअस्वास्थ्य व इतर अडचणी यामुळें त्यांना हें जमलें नाहीं. दुसरा कोणी तरी नवा तरुण लेखक हें काम करण्यास पुढें यावयास पाहिजे होता. परंतु हें काम शास्त्रीय चिकित्सेचें असल्यामुळें गोवर्धन ब्राह्मणांतील पुढाऱ्यांनीं हें काम आत्मीयत्वानें लेखकाकडे सोपविलें याबद्दल अभिमान वाटतो.

हा ग्रंथ तयार करण्याचे कामीं ज्या ग्रंथांचें साहच झालें, त्यांची यादी दिलीच आहे. त्या सर्व विद्यमान व अविद्यमान ग्रंथकारांचे आम्ही आभारी आहोंत. प्रो. अण्णासाहेब काणे मुंबई यांनीं गोवर्धन व गोळक शब्दासंबंधीं आपल्या जवळचीं अनेक टांचणें सांगितलीं, उपयुक्त सूचना केल्या, रॉ. ए. सोसायटीमध्यें त्यांच्याच भलावणीमुळें प्रवेश झाला, याबद्दल आम्ही प्रो. अण्णासाहेब काणे यांचे फार आभारी आहोंत.

अनेक ग्रंथ पाहण्यास मिरजेस तर कांहींच साधन नाहीं. त्यामुळें मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय व रॉ. ए. सोसायटी या दोन्ही संस्थांनीं विनामूल्य पाहिजे तेव्हां पाहिजे तितके ग्रंथ उपयोग करण्यास दिले, याबद्दल या दोन्ही संस्थांचे आणि त्यांच्या चालकांचे आम्ही फार ऋणी आहोत. डॉ. केतकर, श्री. केशवराव पाध्ये वकील, श्री. भगवंतराव पाध्ये वकील, यांनींही जुने कागदपत्र दाखविण्याचे कामीं फारच साहच केलें.

गोवर्धन ब्राह्मण समाजांतील रावसाहेब शामराव महाजन, श्री. रेलकर, श्री. शिल्लोडकर, अकोला, श्री. आबासाहेब अलाटे, त्रिपुटी, श्री. भाऊ

रघुनाथ कुलकर्णी व बापुराव नारायण कुलकर्णी वगैरे खानदेशकर मंडळी आणि इतर अनेक गोवर्धन ब्राह्मण यांनीं साहित्य पुरविण्याचे कामीं दक्षतेनें साह्य केलें, याबद्दल तेही स्तुतीस पात्र आहेत.

या ग्रंथाचें साहित्य नोव्हेंबर १९३६ अखेर समग्र जमविलें. संबंध साहित्य काळजीनें वाचण्यास एक महिना लागला. पुण्या–मुंबईस जाऊन आधारभूत अनेक ग्रंथ पाहणें व विचारवानांशीं चर्चा करणें यामध्यें पंधरा दिवस मोडले आणि साक्षात् ग्रंथ लिहिण्याला बरोबर दोन महिने रोज सात आठ तासांप्रमाणें खपावें लागलें. प्रुफें तपासण्यासह या ग्रंथाच्या निमित्तानें नोव्हेंबर ते मेअखेर वेळ चांगला गेला.

येथें एक गोष्ट अवश्य ठांसून सांगितली पाहिजे कीं, आम्ही जें या ग्रंथांत लिहिलें आहे, तें दहा वर्षांपूर्वी संक्षेपतः ब्राह्मण पोटजातींचें एकीकरण पूर्वार्ध व उत्तरार्ध यांत लिहिलेलें होतें. त्याच संक्षिप्त विधानांना अनेक भरीव आधार आणि अनेक प्रमाणें देऊन तोच विषय विस्तारानें मांडला आहे, इतकेंच. गोवर्धन ब्राह्मणांना बरें वाटावें, म्हणून त्यांच्या मुर्वतीस्तव भिडेनें एक अक्षरही लिहिलेलें नाहीं. जे विचार मनापासून पटतात व ज्याबद्दल अंतःकरण साक्ष देतें, तेच योग्य विचार ब्राह्मण संघटण आणि हिंदु संघटण या व्यापक कार्याला पोषक याच भावननें लिहिलेले आहेत.

गोवर्धन ब्राह्मणांचा इतिहास महाराष्ट्रांतील ब्राह्मण समाजापुढें ठेवण्याचा हेतु हा कीं, त्या समाजाविषयीचे विपरीत ग्रह, दूषित ग्रह नष्ट व्हावेत आणि त्या समाजाचें दुःख नाहींसें व्हावें. जें जें वाचक हा ग्रंथ वाचतील त्यांनीं यापुढें ही दृष्टि ठेविली म्हणजे ग्रंथ लिहिण्याचें सार्थक झालें, असें आम्ही समजतों. परमेश्वर करो व हिंदु समाजांतील ही जातींची मारकता नष्ट होवो, व त्यास या ग्रंथाचा अंशतः उपयोग होवो, अशी प्रार्थना करून हें निवेदन संपवितो.

अधिक ज्येष्ठ शु. १५ }
मिरज }

महादेवशास्त्री दिवेकर

प्रकाशकाचे दोन शब्द

सदर्हू ग्रंथाचें प्रकाशन जरी माझेकडून होत आहे तरी त्याचा मी केवळ संचालक आहें. एकंदर ग्रंथ वे. शा. सं. महादेवशास्त्री दिवेकर यांनीं मोठ्या परिश्रमानें संपादिला आहे. व त्याला लागणारा सर्व खर्च गोवर्धन ब्राह्मण समाजाचे फंडांतून झालेला आहे. त्यांत एकंदर समाजाची अंशतः मदत झालेली आहेच. तथापि रा. अनंतराव आबाजी येवलेकर यांचेकडून ५०१ रु. ची व रा. आत्माराम सिताराम डांगे, वाडेगांव यांचेकडून ३०० रुपयांची मदत मिळाली, त्यामुळें हें काम पूर्ण होऊं शकलें. ह्या मदतीबद्दल एकंदर समाजातर्फे मी त्यांचे आभार मानतों.

शामराव रामचंद्र महाजन
पेन्शनर
अध्यक्ष गोवर्धन ब्राह्मण समाज
वऱ्हाड शाखा

आधारभूत ग्रंथांची यादी

(१) ऋग्वेद
(२) यजुर्वेद व दशोपनिषदें
(३) महाभारत
(४) भागवत
(५) रामायण (वाल्मिकी)
(६) वायुपुराण
(७) मत्स्यपुराण
(८) अग्निपुराण
(९) मार्कंडेयपुराण
(१०) विष्णुपुराण
(११) ब्रह्मवैवर्तपुराण
(१२) मुद्गलपुराण
(१३) भविष्यपुराण
(१४) मनु, याज्ञवल्क्य, पराशर इत्यादि अनेक स्मृतिग्रंथ व सूत्रें
(१५) अस्पृश्यतेचा शास्त्रार्थ--पं. पाठकशास्त्री
(१६) धर्मस्वरूपनिर्णय--पं. कोकजेशास्त्री
(१७) धर्मशास्त्रविचार--प्रो. काणे
(१८) धर्मशास्त्रमंथन--श्री. महादेवशास्त्री दिवेकर
(१९) राधामाधव विलास चंपु--इतिहासाचार्य राजवाडे
(२०) चातुर्वर्ण्य--श्री. वा. दा. तळवलकर
(२१) प्रो. घुर्ये, एन्थोवेन, इबटसन्, रिस्ले यांचे जातिसंस्थेसंबंधाचे ग्रंथ
(२२) दख्खनचा इतिहास--डॉ. भांडारकर
(२३) मऱ्हाटयासंबंधानें चार उद्गार--प्रो. रा. कृ. भागवत
(२४) मध्ययुगीन भारत--श्री. चिं. वि. वैद्य
(२५) महाभारताचा उपसंहार ,, ,,

(२६) हिंदुस्थानचा अर्वाचीन इतिहास--सरदेसाई
(२७) प्राचीन महाराष्ट्र--डॉ. केतकर
(२८) ज्ञानकोशाचे भाग ६, ११, १२. डॉ. केतकर
(२९) चाफेकरांचे (ना. गो.) अनेक निबंध
(३०) हिंदूंचें समाजरचनाशास्त्र--जोशी
(३१) बॉम्बे गॅझेटियर व्हॉ. १६, १८
(३२) एपिक्ग्राफिका इंडिया व्हॉ. १, ७, ८
(३३) जर्नल ऑफ दि बॉम्बे ब्रँच ऑफ दि रॉयल एशियाटिक सोसायटी व्हा. ६
(३४) आर्कियालॉजिकेल सर्व्हे ऑफ वेस्टर्न इंडिया ५, ६, ७, १०
(३५) पुरंदरेकृत उत्तर कोंकणचा इतिहास
(३६) हेमाडपंत चरित्र--श्री. के. आ. पाध्ये
(३७) उत्तर कोंकणचा प्राचीन इतिहास--पी. डी. जोशी
(३८) नाशिक-पंचवटी वर्णन--गो. बा. वैद्य
(३९) ब्राह्मण पोटजातींचें एकीकरण पूर्वार्ध व उत्तरार्ध--दिवेकरशास्त्री
(४०) विविधज्ञानविस्तार, विद्यासेवक, संजीवन, ब्राह्मण वगैरे मासिकांचे अनेक अंक.
(४१) अपरार्क, मेधातिथी, कुल्लुकभट, मिताक्षराकार, धर्मसिंधु, निर्णयसिंधु वगैरे अनेक निबंध ग्रंथ.

अनुक्रमणिका

गोवर्धन ब्राह्मणांचा इतिहास

प्रकरण १ लें

विषयप्रवेश व सद्यःस्थिति

इतिहासप्रदीपेन मोहावरणघातिना ॥
लोकगर्भगृहं कृत्स्नं यथावत्संप्रकाशितम् ॥१॥

'मोह नष्ट करणाऱ्या इतिहासरूपी दिव्याच्या प्रकाशानें लोकांच्या अन्तःकरणांतील अज्ञानरूपी अन्धःकार नष्ट होतो व विषयाचें स्वरूप यथातथ्य समजतें.'

इति ह आस म्हणजे असें असें होतें, असें वस्तुतत्त्व सांगण्याकरितां इतिहास लिहावयाचा असतो. इतिहासलेखकाला स्वातंत्र्य फार कमी असतें. त्याला आपल्या पदरचें कांहीं घालतां येत नाहीं. जें वास्तविक होतें, जें तत्त्वतः सत्य होतें तेंच पुढें ठेवून, तें असें असें आहे एवढेंच सांगणें इतकाच लेखकाचा अधिकार असतो. विचार करण्याचीं साधनें वाचकांपुढें ठेवून विचाराला चालना देण्याचें काम इतिहासलेखक करीत असतात. प्रस्तुत ग्रंथही त्याच दृष्टीनें लिहिलेला आहे.

ब्रह्म हें सत्य असलें तरी तें मायेच्या आवरणामुळें प्रतीत होत नाहीं. तसेंच दुराग्रह व विपरीत ग्रह यामुळें सत्याचें आकलनही होईनासें झालें आहे. अलीकडे निरनिराळ्या जातींचे, घराण्यांचे आणि कुलांचे इतिहास लिहिण्याची प्रथा वाढत आहे, ती चांगली आहे. त्यामुळें त्या कुलांतील, घराण्यांतील आणि जातींतील व्यक्तींचा स्वाभिमान जसा वाढतो, तसाच त्यामुळें इतरांचा विपरीत ग्रहही नष्ट होतो. कांहीं इतिहासाच्या पुस्तकांत कांहीं व्यक्तींवर निष्कारण शिंतोडे उडविले जातात, तर कांहीं ठिकाणीं अवास्तव अशी कांहीं व्यक्तींची स्तुति करण्यांत येते; हे दोन्ही मार्गही त्याज्य आहेत. **म्हणून** प्रस्तुत

पुस्तकांत गोवर्धन ब्राह्मण समाजांतील व्यक्तींचा स्वाभिमान वाढून इतरांचा त्यांच्या संबंधाचा निष्कारण असलेला गैरसमज दूर व्हावा एवढाच उद्देश प्रस्तुत ग्रंथ लिहितांना डोळ्यांपुढें ठेवला आहे, तो कितपत सिद्धीस गेला हें परिणामावरूनच अजमावयाचें आहे.

गोवर्धन ब्राह्मणांच्या इतिहासाला प्रारंभ करण्यापूर्वी थोडी सांप्रतची हिंदु समाजाची स्थिति लक्षांत घेतली पाहिजे. कारण गोवर्धन ब्राह्मण समाज हा हिंदु समाजाचा घटक आहे. तसेंच चातुर्वर्ण्याचें मूळ स्वरूप कसें असावें, चातुर्वर्ण्यांतून जाती कशा उत्पन्न झाल्या, जन्मजात उच्चता व नीचता यानें समाजाची कशी हानि केली, ब्राह्मणांनीं संस्कृतीचा विकास कसा केला, याचा थोडासा आढावा घेणें अवश्य वाटतें.

'दुर्लभं भारते जन्म मानुषं तत्र दुर्लभम्'

असें भगवान् व्यासांनीं महाभारतांत या भरत खंडाचें वर्णन केलेलें आहे. प्राचीन काळीं हा भरतखंड सर्व विद्यांचें व कलांचें उगमस्थान, सरस्वतीचें क्रीडा-मंदिर, संपत्तीचें माहेरघर, विद्वान्, तत्त्वज्ञ व पराक्रमी वीर यांचें निवास-स्थान, धर्मसंस्थापकांचें मातृमंदिर अशा स्वरूपानें ज्या वेळीं जगताला तो ललामभूत होता, त्या वेळचेंच हें वरील वर्णन आहे यांत शंका नाहीं.

ज्ञानाच्या दृष्टीनें पाहिल्यास जगांतील अत्यंत प्राचीन वैदिक वाङ्मय या भरत खंडांतच उत्पन्न झालें. सर्वश्रेष्ठ तत्त्वज्ञानाचा उगम याच भूमींत उपनिषदांच्या द्वारें झाला. सर्वज्ञ आणि सर्वश्रेष्ठ असे ग्रंथकार महर्षि व्यास आणि पाणिनी यांचा जन्म येथेंच झाला. सर्व संस्कृतींचा विकास, उच्च तत्त्वज्ञानाचा परिपोष, प्रत्येक मनुष्य साक्षात् ब्रह्म, ईश्वर आहे अशी घोषणा येथेंच झाली! अनेक साम्राज्यें उदयाला आलीं व गेलीं, अनेक राजवंश तळपले आणि लोपले, अनेक लढाया, क्रांत्या व उलाढाली या राष्ट्रांतच घडल्या असल्यामुळें हा देश अनेक चमत्कारांचें, संस्कृतींचें, धर्मांचें, संप्रदायांचें निवासस्थानच होऊन राहिला आहे.

पण भूतकालाचा उज्ज्वलपणा सांगण्यांत मोठेपणा नाहीं. तर भूत-कालाच्या उज्ज्वलतेवरून भविष्यकाळीं मोठेपणा संपादन करण्यांत शहाणपण आहे. म्हणूनच श्रीसमर्थ म्हणतात कीं,

सांगे वडिलांची कीर्ति। तो एक पढत मूर्ख॥

पूर्वी भरतखंड हा जगताला आकर्षणारा असा देश होता व असेल; पण आज तो तसा राहिलेला नाहीं हें खास! पूर्वी सर्व जगांतले लोक येथें येऊन ज्ञान संपादन करीत असतील, पण आज ज्ञानाचें केंद्र हिंदुस्थान राहिलेलें नाहीं. पूर्वी वर्णसंस्था मोठी आदर्शभूत असे, पण आज तशी स्थिति नाहीं. आज जें आहे तें ध्यानांत घेऊन, पूर्वी जें होतें त्याचें आकलन करून, पुढें जें असावें त्याचा विचार करणें अत्यंत अगत्याचें आहे.

हिंदुसमाज हा सांप्रत वर्णयुक्त नसून तो जातियुक्त आहे. म्हणजे समाजांत वर्णसंस्था नसून जातिसंस्था आहे. प्रत्येक मनुष्य हा वर्णानें ओळखला जात नाहीं, तर जातीनेंच ओळखला जातो. वर्णसंस्था जर असती तर पांचवा वर्णच काय पण गट अगर वर्गही दिसला नसता. कारण मनु ठासून सांगतो कीं,

चतुर्थ एक जातिस्तु शूद्रोनास्तीह पंचमः।

चवथा वर्ण शूद्रच होय, पंचम असा कोणीही नाहीं. पण आज वर्ण नष्टप्राय झाले असून जातीला महत्त्व आलेलें आहे. वर्णाश्रम स्वराज्य संघवाले वर्ण आहेत, (ते पोथींत आहेत.) असें म्हणोत! पण खरी स्थिति वर्णसंस्था नष्ट झाली असून जातिसंस्थाच उरलेली आहे. माणसें जातिधर्मच पाळतात. वर्णधर्म, वर्णोचितविद्या, वर्णविहितसंस्कार यांचा लोप झालेला आहे. वर्णत्वाकरितां कोणी कांहीं करीत नाहीं तर जो तो आपल्या जातीकरितां करीत आहे. जातिनिष्ठतेवरच पक्ष व संस्था उभारल्या जात आहेत. इंग्रजांचें राज्यही या आमच्या जातिनिष्ठतेवरच चाललेलें आहे.

हिंदुसमाज हा जातिबद्ध आहे, आणि ही जाति जन्मजात उच्चता आणि नीचता यांवर उभारलेली आहे. हिंदुस्थानांतील प्रत्येक जात स्वतःला उंच समजते व कांहीं जातींना तुच्छ लेखते. (खालीं लाथ व वर हात) ही म्हण सर्वत्र दृष्टीस पडते. हिंदुसमाजाचें मरण जन्मजात उच्चता आणि नीचता यांतच आहे. एका जातींत अनेक पोटजाती व त्या पोटजातींत पुन्हां उच्चनीचपणाची भावना यामुळें हिंदुसमाज विस्कळित झालेला आहे. नुसती ब्राह्मण जातच घेतली तर त्या जातींत पंचद्रविड व पंचगौड हे मुख्य भेद आहेत. पण त्यांत बंगाल, काश्मीर, कर्नाटक, महाराष्ट्र प्रांतांतील ब्राह्मणांमध्यें अनेक पोटजाती आहेत. बृहन्महाराष्ट्रांतील पंचद्राविड ब्राह्मणांत सुमारें २८।३० पोटजाती आहेत. कर्नाटक व मद्रास प्रांतीय ब्राह्मणापेक्षां गुज-

राथेमध्यें ब्राह्मणांच्या जाती पुष्कळ अधिक म्हणजे जवळ जवळ ८४ ते १०० आहेत. हिंदुस्थान देश हा एका मोठ्या खंडासारखा असल्यामुळें आचार-विचार, रीतीभाती, सोवळें ओवळें यामुळें ब्राह्मणामध्यें पुष्कळच पोटभेद झालेले आहेत. उत्तरेकडील ब्राह्मणापेक्षां दक्षिणेकडील ब्राह्मणांत विटाळ, स्पर्शास्पर्श, सोवळें ओवळें यांचे निर्बंध अधिक आहेत. उत्तर हिंदुस्थानांत मुसलमानांच्या संसर्गानें ब्राह्मणांत जें आचारमालिन्य आहे तें दक्षिणेंत नाहीं. कारण दक्षिणेंत मुसलमानांचा प्रवेश फारच उशिरानें झाला. उत्तरेकडील ब्राह्मणांच्यामध्यें पुष्कळ मुसलमानी आचार शिरलेले आहेत, त्याचें कारण म्लेंच्छसंसर्ग होय.

श्रीक्षेत्र काशी येथील गौड ब्राह्मण शूद्रस्पर्शाचा विटाळ धरीत नाहींत. कहाराच्या हातचें पाणी स्वयंपाकालासुद्धां चालतें. कहार म्हणजे शूद्र होय ! वंगीय ब्राह्मण मत्स्यभक्ष्यक आहेत. सोवळें ओवळें बेताचें मानतात. गुजराथी ब्राह्मण कुणब्याच्या हातचें पाणी पितात. जे गौड ब्राह्मण गुजराथेंतील रहिवासी झाले त्यांनीं मांसाहार सोडला आहे. नेपाळी ब्राह्मण शूद्र स्त्रियांशीं विवाह करतात व संततीला क्षत्रिय समजतात. पंजाबांतील ब्राह्मण अनुलोम विवाह करतात; नंबुद्री ब्राह्मण हे इतके सोवळे कीं ते कोणाच्याच हातचें खात नाहींत. गृहस्थ आणि भिक्षुक अशा जातीही ब्राह्मणांत पडलेल्या आहेत.

हिंदुसमाजांत उच्च समजला जाणारा जो ब्राह्मण त्याची जर ही स्थिति तर समाजाच्या इतर थरांमध्यें जातींचें जंजाल किती असेल हें सांगावयासच नको. या सर्व जातींची अभ्यासपूर्वक माहिती मिळवितां मिळवितां विचारवंतांची मति देखील कुंठित होऊन जाते. ब्राह्मणामध्यें जशा अनेक पोटजाती आहेत तशाच त्या मराठे, कुणबी, कोळी, माळी, शिंपी, सुतार, लिंगायत, जैन यांमध्येंही आहेत. अस्पृश्यांतही पुष्कळच पोटजाती आहेत. फार काय हिंदु समाजाशेजारीं जे मुसलमान व ख्रिश्चन समाज आहेत त्यांच्यावरही जातिभेदाची पक्कड चांगलीच बसलेली आहे.

हिंदु समाजांतील जातिसंस्थेला तर्क व विवेक यांचा आधार फारसा नाहीं. आधार असेल तर तो फक्त पोथीचा, आणि याही पोथ्या अर्वाचीन कालांतील होत; हेंही लक्षांत घेण्याजोगें आहे. वैदिक वाङमय, ब्राह्मण ग्रंथ, धर्मसूत्रें, स्मृतिग्रंथ हे मुख्य प्रमाणग्रंथ समजले जातात. पण या ग्रंथांत

आज अस्तित्वांत असलेल्या जातींचा पत्ताही नाहीं. आज विद्यमान असलेल्या जातींना अलीकडील पोथ्यांचाच काय तो आधार! गंमत अशी कीं पोथीचा आधार हा कशाला आणि कोणालाही मिळतो! मराठा, कुणबी, तेली, कोष्टी, वाणी, माळी, कोळी अशा सर्वांच्याजवळ पोथ्या आहेत. अर्थात् त्या संस्कृत पोथ्यांमध्यें अनेक कथा आहेत. त्या कथांचे आधारें न्हावी सकाळीं उठून तेल्याचें तोंड पाहण्यांत अपशकून समजतो, तर दुसरा कोणी सकाळीं उठून न्हावगंडाचें दर्शन घेऊं इच्छित नाहीं. कोष्टी, मराठे, कोळी, आणि ब्राह्मणसुद्धां अर्वाचीन पोथ्यांतील या समजुती पाळतात, एकमेकांच्या उत्पत्तीविषयीं अनेक वेडपट दंतकथा सांगतात आणि म्हणी व वाक्प्रचारही उच्चारतात.

सांप्रत हरिजनांच्या उन्नतीकरितां यत्न चालू आहे, तो उत्तमच आहे. पण त्या हरिजनांतील महारांमध्यें ५०।६० पोटजाती, चांभारांत १०।१२ पोटजाती, आणि ढोर व मांग यामध्येंही पोटजाती आहेत. प्रत्येक जात खालच्या जातीचा विटाळ मानते आणि स्वतःला जन्मजात उच्च समजते.

ही जन्मजात उच्चता आणि नीचता आणि तिच्याशीं संबंध असलेली शिवाशिव ही सर्वत्र थैमान घालीत आहे. हिंदुसमाजांत केवळ अस्पृश्यांचीच अस्पृश्यता आहे असें नसून ब्राह्मणांनासुद्धां अस्पृश्य समजणाऱ्या कित्येक जाती आहेत. ब्राह्मणांना ज्याच्या हातचें अन्नपाणी चालत नाहीं तो अस्पृश्य अशी व्याख्या केल्यास सर्व ब्राह्मणेतर अस्पृश्यांतच मोडतात. कारण कोणाही ब्राह्मणेतराचें अन्न आणि पाणी सनातनी ब्राह्मणाला चालत नाहीं. बरें, ब्राह्मण तरी सर्वांना स्पृश्य आहे असें समजावें तर ब्राह्मणाच्या हातचें अन्नपाणी ज्यांना चालत नाहीं अशा किती तरी जाती हिंदु समाजामध्यें आहेत. जैन, लिंगायत, सोनार, सुतार, कुंभार आणि पंचकळश्यामध्यें मोडणाऱ्या जातींना ब्राह्मणाच्या हातचें अन्नोदक मुळींच चालत नाहीं!

ब्राह्मणाला मराठा अस्पृश्य, मराठ्याला वाणी अस्पृश्य, वाण्याला कोळी अस्पृश्य, असा जिकडे तिकडे अस्पृश्यता व विटाळ यानें हाहाःकार उडविला आहे. ब्राह्मणांना ब्राह्मणांतीलच पोटजातींचा विटाळ होतो व ते पंक्तिव्यवहारही करीत नाहींत, हें आश्चर्य आहे. ब्राह्मण जातींतील बऱ्याच स्त्रिया एकमेकींना सार्वजनिक ठिकाणींही स्पर्श करीत नाहींत,

हळदीकुंकु हातांत देत नाहींत, मग सहभोजनाची गोष्टच नको! देऊळ, घाट, सभा, समाराधना कोठेंही गेलां तर ब्राह्मणांतील ग्रामण्यें दत्त म्हणून उभीं असतातच. स्पर्श व प्रेम यांचें साहचर्य आहे. त्याउलट अस्पृश्यता व दूरीभाव यांचा अनुयोग आहे. ब्राह्मणाब्राह्मणांत, मराठे व इतरांत स्पृश्य आणि अस्पृश्यांमध्यें हें दूरीकरण चाललेलें आहे. सोवळें ओवळें पाळणें यांत वाईट कांहीं नाहीं, तो एक स्वच्छतेचाच भाग आहे. पण त्याचा उपयोग ब्राह्मण आणि इतर हे सर्व दुसऱ्याचा तिरस्कार करण्याकडे करतात. दुसऱ्याला जवळ आणणें, आपल्या बरोबरीचें लेखणें, मान अपमान, सुख दुःख, आकांक्षा व भावना या सर्व आपल्याप्रमाणेंच इतरांतही आहेत हें समजण्याची वृत्ति व दृष्टि पुढारलेल्या ब्राह्मणांतही नाहीं, मग इतरांत कोठून येणार!

अलीकडे या सर्व जाती ईश्वरकृत नाहींत, त्या मनुष्यकृत आहेत, त्या अनादि नसून अलीकडच्या आहेत, ईश्वरानें जन्मजात वैषम्य मुळींच निर्माण केलेलें नाहीं असें थोडें पटूं लागलेलें आहे. पण अद्याप तें कृतीमध्यें मात्र येत नाहीं. समाजाच्या दोन घटकांत नैसर्गिक वैषम्य जर असेल तर त्याबद्दल कोणी कुरकुर करणार नाहीं व त्याचा दोषही कोणावर नाहीं. पण मानवी, कृत्रिम प्रयत्नानें जर वैषम्याचें विष समाजांत प्रसृत होत असेल तर त्याचा प्रतिकार केलाच पाहिजे. हिंदु समाजांतील बुद्धि, पौरुष, कर्तृत्व, प्रज्ञा या सर्वांची जी राखरांगोळी आज होत आहे याचें कारण एका जातीनें दुसरीस तुच्छ समजणें, तिला निंद्य नांवानें संबोधणें, अनेक प्रकारांनीं तिचा समाजांत छळ करणें, हेंच होय! प्रस्तुत ग्रंथामध्यें प्राचीनतम अशी जी गोवर्धन ब्राह्मणांची जात तिचा इतिहास देण्याचा हेतु हाच कीं इतर ब्राह्मणांच्या अज्ञानानें व मत्सरानें ही जाती कशी होरपळून निघाली आहे याची कल्पना यावी, आणि यापुढें हें धोरण इतरांनीं व ब्राह्मणांनीं सोडावें.

आम्ही सन १९२६ सालीं बृहन्महाराष्ट्रांतील पंचद्राविड ब्राह्मणांपैकीं सुमारें २८।३० जातींची माहिती मिळवून ती समाजापुढें मांडली. त्या साक्षेपाचा उपयोग अकोला येथें १९२७ सालीं भरलेल्या बृहन्महाराष्ट्र ब्राह्मण परिषदेनें करून घेतला. ब्राह्मण पोटजातींचें एकीकरण पूर्वार्ध आणि उत्तरार्ध हे ग्रंथ हल्लीं दुर्मिळच झालेले आहेत. त्या ग्रंथांमध्यें प्रत्येक ब्राह्मण पोट-

जातीचा इतिहास दिला असून ब्राह्मण या दृष्टीनें त्या त्या जातींत दशग्रंथी वैदिक, अग्निहोत्री, पुरोहित वगैरे कोणकोण झाले, वृत्तीचा अधिकार कसा मिळविला, अग्रहारे, इनामें, सनदा या कोणत्या जातीजवळ कशा आहेत, आणि देवता, वैदिक संस्कार, उत्सव, सण, व्रतें, व्यवसाय, आचार, आहार, संस्कार अशा सर्व दृष्टीनें प्रत्येक जात पूर्णपणें ब्राह्मण कशी आहे, हें दाखविलें आहे. त्या ग्रंथांत आम्ही गोवर्धन ब्राह्मणाची माहिती संक्षिप्तपणें दिलीच आहे. पण अलीकडे पुष्कळ संशोधन झाल्यामुळें शक्य तितका साद्यंत व विस्तृत इतिहास या होरपळलेल्या जातीचा समाजापुढें येणें अवश्य आहे असें वाटल्यावरून हा ग्रंथ लिहिण्यांत येत आहे.

हिंदु समाजांतील जातिसंस्था कशी उत्पन्न झाली याचा इतिहास तर्कशुद्ध लिहिलेला नाहीं. जुन्या पंडितांना विचारल्यास ते म्हणतात कीं, हें सर्व ईश्वर-निर्मित आहे व अनादि आहे. परंतु अलीकडे जातींचा अभ्यास करण्याची पद्धत शिरगणतीच्या सरकारी अधिकाऱ्यांनीं चांगली पाडलेली आहे. इंग्रजांची राजकीय सत्ता ही शिक्षण व ज्ञानप्रसार या दृष्टीनें फारच हितावह झालेली आहे. शिक्षणाचा सार्वत्रिक प्रसार झाल्यामुळें लोक सुशिक्षित होऊन त्यांच्यामध्यें आपल्या हक्कांची व कर्तव्याची जाणीव उत्पन्न झालेली आहे. शिरगणतीचे अधिकारी साधनांची अनुकूलता, स्वास्थ्य आणि द्रव्य यांच्या साह्यानें प्रत्येक जातीचा इतिहास चांगलाच संग्रहित करतात; आणि त्या-संबंधीं मोठमोठाले ग्रंथ प्रसिद्ध करीत असतात. या ग्रंथांच्या साह्यानें कोण-त्याही जातीचा इतिहास ढोबळ मानानें तरी डोळ्यांपुढें उभा राहतो, हें मान्य करणें भाग आहे.*

---

* सरकारतर्फें प्रसिद्ध झालेल्या गॅझेटिअरमध्यें गोवर्धन ब्राह्मणांचा उल्लेख नाहीं, याचें कारण खालच्या अधिकाऱ्यांचें अज्ञान होय ! त्यांनीं अज्ञानानें 'गोळकां'चीच माहिती दिली आहे. परंतु ज्या भागांतील वरिष्ठ अधिकारी चिकित्सक व संशोधक होते, त्यांनीं मनुस्मृतींतील 'गोळक' शब्दाचा ह्या लोकांशीं संबंध नसून हे लोक गोवर्धन देशांतील मूळचे रहिवासी 'गोवर्धन ब्राह्मणांचे' वंशज आहेत असा उल्लेख आपले गॅझेटियरमध्यें केलेला आहे. ते सर्व दाखले योग्य स्थळीं येतील.

गेलीं कांहीं शतकें बहुजन हिंदु समाज अज्ञान अंधःकारांत जो निमग्न झाला होता तो आतां खडबडून जागा झाला असून प्रत्येक गट आपापले अधिकार व स्थान याचा राष्ट्रीय दृष्ट्या शोध करीत आहे. याचें प्रत्यंतर प्रस्तुत पुस्तक हें एक आहे! असो.

हिंदु समाजांत एका काळीं वर्णव्यवस्था होती, त्या वर्णव्यवस्थेचें विकृत स्वरूप जातिसंस्था होय! म्हणून वर्णसंस्थेचें उज्ज्वल स्वरूप कसें होतें, वर्णविषयक व वर्णोत्कर्षविषयक कल्पना काय होत्या, याचा विचार पुढील प्रकरणावर टाकून हें प्रकरण येथेंच संपवितों.

प्रकरण २ रें

वर्णसंस्थेचा विकास व स्वरूप

सांप्रतचा हिंदु समाज जातिबद्ध असून समाजाला मारक अशी जन्मजात उच्चनीचता व अस्पृश्यता या समाजांत शिरलेली आहे हें आज प्रत्यक्ष दिसतें. पण या जातिसंस्थेचा उगम ज्या वर्णसंस्थेपासून झाला त्या वर्णसंस्थेची स्थिति काय होती, हें अवश्य पाहिलें पाहिजे. कारण सूत्रग्रंथ, स्मार्तवाङ्मय, पुराणें व अलीकडील निबंधग्रंथ यांमध्यें अर्वाचीन चातुर्वर्ण्याचें वर्णन अतिशय आहे, तेव्हां आज समाजांत नसलेलें चातुर्वर्ण्य ग्रंथग्रंथांतरीं कसें होतें हें आतां पाहूं.

परब्रह्म जसें अनेक ग्रंथ व मतें वाचून समजण्यास गहन आहे, तोच प्रकार वर्णसंस्थेचा आहे. चातुर्वर्ण्य हा समाजाचा झालेला स्वाभाविक विकास, कां ईश्वरानें उत्पन्न केलेले हे चार वर्ण याचा पत्ता लागत नाहीं. कोणी म्हणतो हें चातुर्वर्ण्य जन्मावरच होतें, तर दुसरा म्हणतो हें गुणकर्मावर होतें. एक म्हणतो तें अलीकडे झालें तर दुसरा म्हणतो तें वेदपूर्वकालींच झालें. या सर्व मतमतांतरांचा विचार करून आम्हांस जें वाटतें तें असें:–

जगांतील कोणत्याही मनुष्यसमाजामध्यें व्यवस्था म्हणून जी होते, ती फार उशीरानेंच होते. अव्यवस्थेंतून व्यवस्था उत्पन्न होण्याला समाजाचा कांहीं काळ स्वाभाविकच लागतो. त्या दृष्टीनें चातुर्वर्ण्यव्यवस्थेपूर्वी बराच कालपर्यंत हिंदुस्थानांतील वैदिक हिंदु समाज हा संक्रमणावस्थेमध्यें होता हें सिद्ध आहे.

पूर्वी एका काळीं समाजांत वर्ण नव्हते, समाजांत जसजशी आवश्यकता उत्पन्न होत गेली, तसतसे हे वर्ग उत्पन्न झाले यांत शंका नाहीं. ब्र० आ० उं० अ० १ ब्रा० ४ मध्यें पुढील वर्णन आहे.

'ब्रह्म वा इदमग्र आसीदेकमेव तदेकं सन्न व्यभवत् तच्छ्रेयो– रूपमत्यसृजत क्षत्रं यान्येतानि देवत्रा क्षत्राणीन्द्रो वरुणः सोमो रुद्रः पर्जन्यो यमोमृत्युरीशानः। तस्मात्क्षत्रात्परं नास्ति। ११ ॥

स नैव व्यभवत् स विशमसृजत यान्येतानि देवजातानि गणश आख्यायन्ते वसवो रुद्रा आदित्या विश्वदेवा मरुत इति। १२ ॥ स नैव व्यभवत् सशौद्रं वर्णमसृजत पूषणमियं वै पूषेयं हीदं सर्वं पुष्यति यदिदं किं च।१३॥

'पूर्वी हा समाज ब्राह्मण रूपानेंच होता, म्हणजे एकवर्ण होता पण तो प्रभावी होऊं शकला नाहीं. म्हणून त्यानें योग्य निवड करून क्षत्रिय वर्ग बनविला. हे जे इंद्र, वरुण, सोम, रुद्र, पर्जन्य, यम, मृत्यु व ईशान असे देवांचे संरक्षक ते क्षत्रिय होत. म्हणून समाजांत क्षत्रियांपेक्षां कोणीही श्रेष्ट नाहीं.

'क्षत्रिय वर्ण उत्पन्न केला तरी तो समाज पूर्ण बनला नाहीं, म्हणून त्यानें वसु, रुद्र, आदित्य, विश्वेदेव आणि मरुत असे जे देव समूहरूपानें उल्लेखिले जातात, त्याप्रमाणें त्या ब्राह्मणवर्गानें वैश्य वर्ण बनविला. म्हणजे समाजाचें वैगुण्य घालविण्याकरितां ब्रह्म व क्षत्र यांच्या जोडीला वैश्यांचीं संघटित मंडळें स्थापन केलीं.

'त्रैवर्ण्य उत्पन्न झालें तरी समाजाचें पूर्ण सामर्थ्य वाढलें नाहीं असें दिसलें. तें वैगुण्य घालविण्याकरितां त्या समाजानें समाजाचें पोषण करणारा शूद्र वर्ण उत्पन्न केला. कारण ही पृथ्वी म्हणजेच पूषा होय ! म्हणून हें जें कांहीं आहे त्या सर्वांचें ही पृथ्वीच पोषण करते, तसेंच सर्व समाजाचें पोषण करणारा शूद्रवर्ण निर्माण केला.'

वरील वाजसनेयि ब्राह्मणांतील मंत्र आणि त्यांचा आशय ध्यानीं घेतला म्हणजे समाजाचा विकास म्हणजेच चातुर्वर्ण्य होय, हें सिद्ध होतें.

पूर्वीं एका काळीं एकवर्ण समाज होता, एकदम चार वर्ण उत्पन्न झाले नाहींत. त्यासंबंधीं वचनेंही आढळतात. त्यांतील कांहीं वचनें उपलक्षण म्हणून देतों.

एकवर्णमिदं पूर्वं विश्वमासीद्युधिष्ठिर।
कर्मक्रियाविभेदेन चातुर्वर्ण्यं प्रतिष्ठितम् ॥

—म० भा० वनपर्व अ० १८०.

अर्थ:—हे युधिष्ठिरा! पूर्वीं या जगांत एकच वर्ण होता; परंतु पुढें कर्म व क्रिया यांच्या भेदामुळें चार वर्ण निर्माण झाले. तसेंच भागवतांतही आहे.

एक एव पुरा वेदः प्रणवः सर्व वाङ्मयः।
देवो नारायणो नान्यः एकोऽग्निर्वर्ण एव च ॥ ९–१४–४

महाभारतांतच असेंही सांगितलें आहे कीं,

न विशेषोऽस्ति वर्णानां सर्वं ब्राह्ममिदं जगत्।
ब्रह्मणा पूर्वसृष्टं हि कर्मभिर्वर्णतां गतम् ॥

—म० भा० शां० प० अ० १८६ श्लो० १०.

अर्थ:—ब्रह्मदेवानें पूर्वीं हें जग निर्माण केलें त्या वेळीं वर्णभेद नव्हता. सर्व ब्राह्म होते, परंतु कर्माच्या योगानें निरनिराळे वर्ण झाले.

श्रीमद्भागवतामध्येंही असेंच म्हटलें आहे कीं, पूर्वीं हंस नांवाचा एकच वर्ण होता.

आदौ कृतयुगे वर्णो नृणां हंस इतीरितः।
कृतकृत्याः प्रजा जात्या तस्मात्कृतयुगं विदुः ॥

—श्री० भा० स्कं० ११ अ० १७ श्लो० १०.

अर्थ:—प्रथम कृतयुगांत मनुष्यांचा हंस नांवाचा एकच वर्ण होता. त्या युगांत प्रजा जन्मतःच कृतकृत्य होत्या, म्हणजे जन्मसार्थक्याकरितां त्याला कोणत्याही इतर कृत्याची जरूर नव्हती, म्हणून या युगाला कृतयुग म्हणतात.

वाल्मिकी रामायण उत्तरकांड, अध्याय ३०, श्लोक १९ मध्यें पूर्वीं एकवर्ण समाज होता, त्यांची भाषा एक होती, रूपानेंही त्यांत वैलक्षण्य नव्हतें,

असें वर्णन आहे. या अर्थाचीं अनेक वचनें आणखीही देतां येतील, पण तीं विस्तारभयास्तव आम्ही देत नाहीं.

गेल्या पंचवीस वर्षांत हिंदुसमाजांत पूर्वी नसलेले, मोटारीच्या धंद्यामुळें जसे अनेक वर्ग उत्पन्न झाले, तसे यापुढें विमानामुळें, रेडिओमुळें आणि अशाच नव्या यांत्रिक शोधामुळें अनेक वर्ग उत्पन्न होण्याचा संभव आहे. पूर्वींही तेंच झालें असलें पाहिजे; अर्थात् प्रथम एकवर्ण, नंतर द्विवर्ण, पुढें त्रैवर्ण्य आणि शेवटीं चातुर्वर्ण्य असा विकास झाला असला पाहिजे.

ही वर्णसंस्था प्रथम उत्तर कुरु व उत्तर मद्र नांवाचे हिमालयाच्या पलीकडे जे देश होते त्यांत आणि गंगा व यमुना यांच्या दुआबांत स्थापन झाली असावी. या संस्थेचेंच वर्णन पुढें रूपक रूपानें पुरुषसूक्तकारानें ऋग्वेदांत घातलेलें दिसतें.

ब्राह्मण, क्षत्रिय आणि वैश्य हे आर्यांचेच पण स्वतंत्र स्वतंत्र गट होते. ते पुढें एका समाजरचनेंत आले व त्रैवर्णिक बनले! प्रथम एक ब्राह्मणांचा वर्ग असावा, त्याला दुसरा एक वर्ग येऊन मिळाला, त्याला त्यांनीं क्षत्रिय असें म्हटलें व तिसऱ्या वर्गाला वैश्य हें नांव दिलें. वर्ण शब्दाचा अर्थ वर्ग हा जसा आहे, तसाच रंगही आहे. शरिराच्या रंगाचा आणि स्वरूपाचाही संबंध या वर्णभेदामध्यें येतो. या कल्पनांना पोषक अशीं वचनेंही अनेक ठिकाणीं आहेत.

ब्राह्मणानां सितो वर्णः क्षत्रियाणां तु लोहितः।
वैश्यानां पीतको वर्णः शूद्राणामसितस्तथा ॥ ५ ॥

—म० भा० शां० अ० १८८.

अर्थ:—ब्राह्मणांचा रंग गोरा, क्षत्रियांचा वर्ण तांबडा, वैश्यांचा पिवळा व शूद्रांचा काळा होय.

तसेंच शांतिपर्व अ० १८८ मध्यें कामोपभोगप्रिय, तीक्ष्ण व रागीट, साहसप्रिय, लाल रंगाचे ब्राह्मण क्षत्रिय झाले. गोपालनावर राहणारे पिवळ्या रंगाचे ब्राह्मण वैश्य झाले, हिंसा व असत्य ही ज्यांना प्रिय असे लोभी, अशुचि, रंगानें काळे, पाहिजे तें कर्म करणारे ब्राह्मण शूद्र वर्णांत गेले असेंही म्हटलें आहे. या तऱ्हेच्या वचनांवरून रंगाचा व वर्णाचाही संबंध स्पष्ट दिसतो.

ऋग्वेदकालाच्या अगदीं पहिल्याही थराच्या पलीकडील काळांत ब्राह्मण हा एकच वर्ण असावा. त्याचा रंग शुक्लभास्वर, मनोरचना देवधार्मिक आणि आकांक्षा तत्त्वजिज्ञासेची, अशा या आर्ष समाजाची पुढें केव्हां तरी वर्णानें लाल अशा दुसऱ्या लोकांशीं गांठ पडली असावी. हे रक्तवर्ण लोक शौर्यानें सिंहासारखे, क्रौर्यानें लांडग्यासारखे, कजाखीनें कुक्कुटासारखे असे असावेत, कारण ऐतरेय आरण्यकामध्यें या क्षत्राला वाघाची उपमा दिली आहे. ब्रह्म आणि क्षत्रनामक हें द्वंद्व पुढें बरेंच वर्षे गाजलें. कारण तीव्र डोकें आणि कणखर मनगटें या जोरावर या ब्रह्मक्षत्रानें सर्वत्र विजय संपादन केला. पुढें कांहीं कालानें शुक्लवर्ण ब्राह्मण व रक्तवर्ण क्षत्रिय यांचा एका पीतवर्ण टोळीशीं संबंध आला असावा. हे लोक कृषि, पशुपालन आणि व्यापार यांत हुषार होते. पण डावपेंच व प्रतिकार या कामांत पंगु होते. अशा या लोकांना (विश, पणी) हें नांव दिलेलें आढळतें. पणी हे व्यापार करणारे होते व द्रव्यसंग्रही होते, त्यामुळें समाजाचा प्रकर्ष झाला. पुढें या त्रैवर्णिकांची उत्तरकुरु व उत्तरमद्र या प्रांतांमध्यें कुठें तरी शूद्रनामक अर्ध रानटी लोकांशीं प्रथम गांठ पडली असावी. या लोकांना या आर्यांनीं माणसाळवून चातुर्वर्ण्यांत समाविष्ट करून घेतलें !

वरील चौथा वर्ण जो शूद्र तो असंस्कृत होता, अशुचि होता, काळा होता, गलिच्छ होता. तो चोऱ्या करी, हिंसा करी, म्हणजे सर्व रानटी प्रकार करी. पण तो आर्य सहवासांत आल्यापासून त्याची सुधारणा झाली, **आणि** त्याचा कालांतरानें उत्कर्ष होऊन

शूद्रः चतुर्थो वर्णोपि वर्णत्वात् धर्ममर्हति ।

अशी गर्जना झाली.

पुरुषसूक्तांत जें ब्रह्मांडरचनेचें आणि चातुर्वर्ण्याचें मोठें अलंकारयुक्त वर्णन आहे, तें याच कालांतील होय !

चातुर्वर्ण्याचा उल्लेख आणि त्याचे धर्म याचें विस्तृत विवेचन स्मृति, धर्मसूत्रें व पुराणें वगैरे ग्रंथांतच फार आहे. पण मूळ ऋग्वेदसंहिता आणि इतर वैदिक वाङ्मय यांमध्यें वर्णसंस्थेसंबंधानें काय उल्लेख आहेत, हें चिकित्सेला उपयोगी पडावें म्हणून येथें देतों. ग्रंथकाराचें वर्णसंस्थेविषयींचें मत सुस्पष्टतया वर दिलें आहे.

वैदिक वाङ्मय व वर्णसंस्था

ऋग्वेदसंहिता ही सर्वांत प्राचीन समजतात. या संहितेमध्यें पुरुषसूक्ताशिवाय ब्राह्मण, राजन्य, वैश्य आणि शूद्र हे चार शब्द दुसऱ्या कोठेंही आलेले नाहींत. ऋग्वेदांत वरचेवर जो शब्द येतो तो दस्यु किंवा दास हाच होय! हे दास काळ्या वर्णाचे आणि आर्य गौरवर्णी असा यांचा विरोध दिसतो. शिवाय हे दास अव्रती म्हणजे यज्ञ न करणारे असे होते. आर्य आणि दस्यु यांच्यामध्यें चांगलाच विग्रह होता. दासांचा पराभव करून त्यांना हाकून द्यावें अशा कल्पना मंत्रांत दिसतात. 'आर्य आणि दस्यु यांना नीट ओळख आणि अव्रत अशा दस्यूंना शिक्षा करून यज्ञ करणाऱ्या आर्यांच्या स्वाधीन कर' असें एक ऋषी म्हणतो. (ऋ. १।५९।२) तसेंच (ऋ. १।१७४।७, २।११।४) अशा ठिकाणीं आर्य व दस्यु यांचे संबंध दाखविणारे उल्लेख आहेत.

पुरुषसूक्ताची भाषा आणि ऋक्संहितेची भाषा यांत अंतर दिसतें. पुरुषसूक्त हा मागाहूनचा प्रक्षेप आहे असें अनेक विद्वान् मानतात. कारण ब्रह्म व क्षत्र म्हणजे ब्राह्मण आणि क्षत्रिय हे शब्द मात्र ऋग्वेदांत वरचेवर येतात. 'विशः' हा शब्द अनेक ठिकाणीं ऋग्वेदांत येतो. परंतु त्याचा अर्थ सामान्य लोक, जनता असाच आहे. 'दासीः विशः' म्हणजे दास वर्गातील लोक असा अर्थ उघड आहे. याहीपेक्षां स्पष्ट अर्थ पुढील ऋचेंत आहे.

यच्चिद्धि ते विशो यथा प्रदेव वरुणव्रतं मिनीमसि द्यविद्यवि।

—ऋ. १।२५।१.

या ऋचेंत विशः म्हणजे सामान्य लोक असा अर्थ अगदीं स्पष्ट आहे.

क्षत्रिय शब्द ऋग्वेदांत पुष्कळ वेळां येतो. पण त्याचा अर्थ बलवान एवढाच दिसतो. इंद्रालाही क्षत्रिय हें विशेषण लावलेलें आहे. क्षत्रिय म्हणजें विशिष्ट वर्ग असा नसून बलिष्ठ असा अर्थ आहे. पुढील ऋचेंत हा अर्थ अगदीं स्पष्ट आहे.

अग्निरीशे बृहत : क्षत्रियस्य अग्निर्वाजस्य परमस्य रायः। ऋ. ४।१२।३.

यांत तर क्षत्रिय शब्दाचा अर्थ बल असाच आहे. अग्नि हा मोठ्या बलाचा, अन्नाचा व उत्कृष्ट धनाचा स्वामी आहे असें त्यांत म्हटलें आहे.

ब्राह्मण हा शब्द अतिरात्र नांवाच्या यागांत देवांच्या स्तुतीत आलेला आहे. आणि इतरत्रही ब्राह्मण हा शब्द अनेक वेळां स्तुतिसूक्त म्हणून आलेला आहे. पण वैश्य व राजन्य हे शब्द ऋग्वेदांत येत नाहींत हें ध्यानांत ठेवण्यासारखें आहे. ब्रह्म आणि क्षत्र हे शब्दसुद्धां असेच आहेत.

या शब्दांचे अर्थ ब्राह्मण आणि क्षत्रिय असे समजतात. पण ब्रह्म शब्दाचा अर्थ सूक्त, स्तुति, स्तोत्र, अन्न असा अनेक ठिकाणीं आलेला आहे. या सर्व सैलपणाच्या अर्थावरून ऋक्संहिताकालीं वर्णसंस्था दृढ झालेली नव्हती हें निश्चित होय !

पुढें तैत्तीरीय संहिता, तैत्तीरीय ब्राह्मण, व इतर ब्राह्मणें यांच्या कालांत ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य हे तीन पृथक् वर्ण होऊन त्यांचे परस्पर संबंधही ठरून गेलेले दिसतात. शूद्र मात्र त्रैवर्णिकांत न मोडतां त्यांच्या बाहेरचा दिसतो. शूद्रापेक्षां या काळांत निषादांना विशेष अधिकार दिलेले दिसतात. निषाद-स्थपतींना कांहीं विशिष्ट अधिकारही या कालांत दिसतात.

चौथा वर्ण जो शूद्र याचें समावेशन झाल्यावरच चातुर्वर्ण्य ही संस्था घोषित झाली. पण त्यापूर्वी शूद्राबद्दल निराळे विचार होते. शूद्राला यज्ञाचा अधिकार नाहीं, वेदाधिकार नाहींच नाहीं. मनुष्यांत शूद्र व पशूंत घोडा हीं वाहनें होत, अशी शूद्राविषयीं समजूत होती. शतपथ ब्राह्मणांत 'पद्यु वा एतच्छमशानं यच्छूद्रः ।' 'शूद्र हा चालतें (पद्यु) स्मशानच होय' असें म्हटलें असून वसिष्ठ धर्मसूत्रांत (१८, ११–१२) त्याचा अनुवाद करून 'तस्माच्छूद्रसमीपे नाध्येतव्यम्' म्हणजे 'शूद्राच्या संन्निध वेदांचें अध्ययन करूं नये' असा निष्कर्ष काढिला आहे. पण पुढें शूद्राला वर्णत्व येऊन त्याला धर्मत्वही आलें, असें व्यासस्मृतीवरून दिसतें.

तैत्तीरीय संहिता आणि ब्राह्मणें या कालीं त्रैवर्णिकांत उच्चनीच भाव नव्हता. पण पुढें उच्चनीचत्वाच्या कल्पना आढळतात. विश्वामित्र, वसिष्ठ, कार्तवीर्य आणि जमदग्नि यांच्यामधील लढा हेंच सांगतो. वैश्य हा दोन वर्णांहून कमी. तो 'आद्य' म्हणजे खाण्यास योग्य असेंच समजण्यांत येऊं लागलें होतें. तांड्य ब्रांह्मणांत वैश्य हे ब्राह्मणांचें व क्षत्रियांचें अन्न होत असें म्हटलें आहे. ब्राह्मण हा राज्य करण्याला योग्य नाहीं, त्यांनीं तोंडानें शौर्य दाखवावें, असें वर्णन तांड्य ब्राह्मणांत आहे. क्षत्रियापेक्षां ब्राह्मण दुबळा

व तो दरिद्री म्हणून क्षत्रियावलंबी असे. विद्वान् ब्राह्मण व राजा यांची योग्यता सारखी असे उल्लेख पुढें गौतम धर्मसूत्रांत आले आहेत. तथापि त्यापूर्वी राजाला श्रेष्ठ व ब्राह्मणाला कमी असें समजत असत. ब्रह्म आणि क्षत्र यांची परस्पर आवश्यकता आहे, त्यांनीं गुण्यागोविंदानें वागावें, दोघांचेंही कार्य आहे, एकटयानें कांहीं होत नाहीं, अशा कल्पनाही तैत्तीरीय ब्राह्मणांत (३, ९, १४, १२) अश्वमेध प्रकरणांत सांगितल्या आहेत. 'यदा खलु वै पुरुषः श्रियमश्नुते वीणास्मै वाद्यते ... न वै ब्राह्मणे श्री रमते इति ब्राह्मणोऽन्यो गायेद्राजन्योऽन्यः' 'न वै ब्राह्मणे राष्ट्र रमते' लक्ष्मी ब्राह्मणाच्या ठायीं रमत नाहीं; राष्ट्रही एकटया ब्राह्मणामुळें रमत नाहीं. संपत्ति असेल तरच त्या पुरुषाजवळ कोणी वीणा वाजवील. म्हणून दोघांनीं सहकार्य करून गावें, या उल्लेखावरून उच्चनीचता प्रतीत होते.

एकंदरींत वैदिक वाङमयावरून सामान्यतः असें दिसतें कीं पुष्कळ कालपर्यंत त्रैवर्ण्य होतें, तेंही शिथिल होतें. जन्म व धंदा यांनीं तें दृढ झालें नव्हतें. पुढें शूद्र समावेशनानंतर जन्म, वृत्ति, संस्कार यामुळें त्याला दार्ढ्यं आलें, आणि धर्मसूत्रें आणि स्मृति यांच्या कालांत चातुर्वर्ण्य हें जन्मावलंबी ठरलें. गुणकर्मानुरूप चातुर्वर्ण्य हें उत्पन्न केलें, कर्मविपाक याच्या बुडाशीं आहे. सत्त्व, रज, तम, या गुणानुसार ही व्यवस्था झाली वगैरे सर्व कल्पना पुढें त्याला चिकटविल्या गेल्या.

प्राचीन काळीं वर्ण शिथिल होते. जन्मानें त्यांना दृढ केलेले नव्हते. वंशपरंपराप्राप्त संस्कार उपयोगी पडतो आणि बापाचा धंदा मुलगा लौकर ग्रहण करूं शकतो हें बरोबर आहे. पण ब्राह्मणाचाच मुलगा ब्राह्मण, क्षत्रियाचाच मुलगा क्षत्रिय हा ग्रह प्राचीन काळीं नव्हता. हा आग्रह फार पुढें पडला. पूर्वी क्षत्रियांचे ब्राह्मण व ब्राह्मणांचे क्षत्रिय होत असत, हें अगदीं उघड उघड दिसतें. कल्पना यावी म्हणून कांहीं उतारे सादर करतों:—

वायुपुराणे—

विश्वामित्रो नरपतिर्मान्धाता संस्कृतिः कपिः।
वार्धश्वः पुरुकुत्सश्च भास्वान् गृत्समदः प्रभुः॥
आर्ष्टिषेणोऽजमीढश्च छागो गार्ग्यस्तथैव च।
कक्षीवांश्च विरूपश्च मुद्‌गलो हरितस्तथा॥

रथीतरश्च कण्वश्च विष्णुवृद्धादयो नृपाः।
क्षत्रोपेता द्विजा ह्येते तपसा र्षिपतां गताः॥

यावरून मूळचे क्षत्रिय असून तपश्चर्येनें त्याच जन्मीं ब्राह्मण बनले, हें सुस्पष्ट होत आहे.

महाभारते—

इन्द्रो वै ब्रह्मणः पुत्रः क्षत्रियः कर्मणाऽभवत्।
ज्ञातीनां पापवृत्तीनां जघान नवतीर्नव॥

—म० भा० शां० प० अ० २२ श्लो० ११.

अर्थः—ब्रह्मदेवाचा पुत्र इंद्र कर्मानें क्षत्रिय बनला व त्यानें नव्याण्णव पापकर्मी ज्ञातींचा वध केला.

याचप्रमाणें क्षत्रियांचे ब्राह्मण झाले असें दाखविणारे श्लोक वायुपुराण अ. ६६ मध्यें आहेत :—

दायादश्चापि गर्गस्य शिनिवद्धाद् बभूवह।
स्मृताश्च ते ततो गार्ग्याः क्षत्रोपेता द्विजातयः॥
मुद्गलस्यापि मौद्गल्याः क्षत्रोपेता द्विजातयः।
एते ह्यङ्गिरसः पक्षे संश्रिताः कण्वमुद्गलाः॥
तस्यामुत्पादयामास मान्धाता त्रीन् सुतान् प्रभुः।
पुरुकुत्समम्बरीषं मुचुकुन्दं च विश्रुतम्॥
अम्बरीषस्य दायादो यौवनाश्व परः स्मृतः।
हरीतो युवनाश्वस्य हारिताः शूरयः स्मृताः॥
एते ह्यङ्गिरसः पुत्राः क्षत्रोपेता द्विजातयः॥ इति।

वरील उताऱ्यांत 'क्षेत्रोपेता द्विजातयः' ॥ या पदाकडे वाचकांचें लक्ष्य आम्ही वेधूं इच्छितों.

(१) **विष्णुपुराणे—**

आङ्गिरसाम्बरीषयौवनाश्वा इति प्रवरपाठः। वि. पु. अं. ४ अ. ३

अंबरीष वगैरे नांवें क्षत्रियांचीं प्रसिद्ध आहेत व ते ब्राह्मण कुलांतील प्रवर झाले म्हणजे त्या अंबरीषादिकांच्यापुढें ब्राह्मण निर्माण झाले. तसेंच,

(२) **विष्णुपुराणे—**

क्षत्रवृद्धात् सुहोत्रगृत्समदादिर्ब्राह्मणवंशकृज्जातः।

तस्मादेव प्रतिक्षत्रः क्षत्रवंशकृज्जातः ॥ वि. पु. अं. ४

यावरून एकाच क्षत्रियापासून ब्राह्मणकुल व क्षत्रियकुल निर्माण करणारे झाले.

(३) **श्रीमद्भागवते--**

पुरोर्वंशं प्रवक्ष्यामि यत्र जातोऽसि भारत ।
यत्र राजर्षयो वंश्या ब्रह्मवंश्याश्च जज्ञिरे ॥ स्कं० ९ अ० २०

केवळ ब्राह्मण क्षत्रियच नव्हेत तर चारही वर्णांचे लोक एकाच वंशांत उत्पन्न झाल्याचे दाखले आहेत ते खालीं दिले आहेत.

(४) **वायुपुराणे--**

पुत्रा गृत्समदस्यापि शुनको यस्य शौनकः ।
ब्राह्मणाः क्षत्रियाश्चैव वैश्याः शूद्रास्तथैवच ॥
एतस्य वंशे संभूता विचित्रैः कर्मभिर्द्विजाः ॥

—वायु पु० अ० ३० श्लो० ४

(हाच श्लोक ब्रह्मपुराण अ० ९ मध्येंही आला आहे).

याच पुराणामध्यें ऋषभाच्या शंभर पुत्रांपैकीं नव्वद क्षत्रिय व दहा ब्राह्मण झाल्याचा उल्लेख आहे. आतां अग्नि व ब्रह्मांड पुराणांत आणखी कांहीं आधार मिळतात ते देतों.

(५) **अग्निपुराणे**--(सूर्यवंशकथायाम्)

नाभागस्य च पुत्रौ द्वौ वैश्यौ ब्राह्मणतां गतौ ॥

अर्थः--नाभागाचे दोन वैश्य जातीचे सुपुत्र कर्मानें ब्राह्मण झाले.

(६) **अग्निपुराणे**--(चन्द्रवंशकथायाम्)

कौशिकं च गृत्सपतिं तथा गृत्सपतेः सुताः ॥ १० ॥
ब्राह्मणाः क्षत्रिया वैश्याः काशेर्दीर्घतमाः सुताः ॥
ततो धन्वन्तरिश्चासीत्तत्सुतोऽमुच्च केतुमान् ॥ ११ ॥
मुकुलस्य तु मौकुल्याः क्षत्रोपेता द्विजातयः ॥

ब्राह्मणापासून चारी वर्ण झाल्याचा उल्लेखः--

(७) **महाभारते--**

तदा निःक्षत्रिये लोके ब्राह्मणेन कृते सति ।

ब्राह्मणान् क्षत्रिया राजन् सुतार्थिन्योऽभिचक्रमु: ॥ ५ ॥
चत्वारोऽपि ततो वर्णा बभूवुर्ब्राह्मणोत्तरा: ॥ शां० प० अ० ६४

(८) **वायुपुराणे**—

गार्ग्यस्य गर्गभूमिस्तु वास्त्यो वत्सस्य धीमत: ।
ब्राह्मणा: क्षत्रियाश्चैव तयो: पुत्रा: सुधार्मिका: ॥
—अ० ३० श्लो० ७४

(९) **ब्रह्माण्डपुराणे**—

निषादवंशकर्तासौ बभूवान्तविक्रम ।
धीवरानसृजच्चापि वेन: कल्मषसंभवान् ॥ १४४ ॥
ये चान्ये विन्ध्यनिलयास्तम्बुरातुम्बुरा: खसा: ।
अधर्मरुचयश्चापि विद्धि तान्वेनकल्मषान् ॥ १४५ ॥ अ. ३६

श्रीमद्‌भागवत स्कंद ९ अ. १७ मध्यें चंद्रवंशीय राजा पुरुरवा याचें वर्णन आहे. तें वाचलें म्हणजे क्षत्रियाचे ब्राह्मण कसे होत असत याची कल्पना येते. म्हणून ते आतां सादर करतों.

य: पुरुरवस: पुत्र आयुस्तस्याभवत्सुता:
नहुष: क्षत्रवृद्धश्च रजी रम्भश्च वीर्यवान् ॥ १ ॥
अनेना इति.................... ॥

चंद्रवंशांतील राजा पुरुरवा याचा पुत्र आयु, यास पांच पुत्र झाले. नहुष, क्षत्रवृद्ध, रजी, रम्भ व अनेना.

क्षत्रवृद्धसुतस्यासन् सुहोत्रस्यात्मजास्त्रय: ॥ २ ॥
काश्य: कुशो गृत्समद इति गृत्समदादभूत ॥
शुनक: शौनको यस्य बह्वृचप्रवरो मुनि: ॥ ३ ॥

क्षत्रवृद्धाचा पुत्र सुहोत्र ऊर्फ शुनहोत्र, यास तीन पुत्र झाले; ते काश्य, कुश व गृत्समद.

गृत्समद हा अंगिरा ऋषींचा शिष्य होऊन ब्राह्मण झाला. हा गृत्समद–आंगिरस ऋग्वेदांतील दुसऱ्या मंडलाचा मंत्रद्रष्टा आहे. गृत्समदाचा पुत्र शुनक, त्याचा पुत्र शौनक हा भृगुऋषींचा शिष्य म्हणून भार्गवगोत्री झाला; यानें आश्वलायन गृह्यसूत्रावर कारिका लिहिल्या आहेत. याच्याबद्दल

सायणाचार्यांनीं ऋग्वेदभाष्यांत सर्वानुक्रमणिकेंतील उतारा दिला आहे,

य आंगिरस शौनहोत्रो भूत्वा भार्गवः
शौनकोऽभवत् स गृत्समदो द्वितीयं मंडलमपश्यत्
रम्भस्य रभसः पुत्रो गम्भीरश्चाक्रियस्ततः ॥ १० ॥
तस्य क्षेत्रे ब्रह्म जज्ञे श्रृणु वंशमनेनसः ॥

राजा पुरूरवा याच्या आयुनामक पुत्राचा रम्भ नांवाचा पुत्र त्याचा रभस, त्यास अक्रिय नामें पुत्र झाला. त्यांचा सर्व वंश ब्राह्मण झाला. आयूचा ज्येष्ठ पुत्र नहुष, यास ययाति नामक पुत्र झाला. ययातीची पट्टराणी देवयानी ही शुक्राचार्य नामें ब्राह्मणाची मुलगी होती. ययातीला यदु, तुर्वसु, द्रुह्यु, अनु आणि पुरु असे पांच पुत्र होते.

पुरोर्वंशं प्रवक्ष्यामि यत्र जातोऽसि भारत ।
यत्र राजर्षयोवंशा ब्रह्मवंशाश्च जज्ञिरे ॥ अ० २०।१ ॥

पट्टराणी देवयानी हिची दासी शर्मिष्ठा ही ययातीची दुसरी राणी होती. हिचा कनिष्ठ पुत्र पुरु हा बापाच्या कृपेनें राज्यावर बसला. ह्या पुरूच्या वंशांतच भरत नांवाचा विख्यात राजा होऊन गेला. त्याच्या नांवानें भारत वंश प्रसिद्धीस आला. राजा पुरूचे वंशांत ब्राह्मण व क्षत्रिय असे दोन्ही उत्पन्न झाले.

ऋतेयो रन्ति भारोऽभूत्त्रयस्तस्यात्मजा नृप ॥
सुमतिर्ध्रुवोऽप्रतिरथः कण्वः प्रतिरथात्मजः ॥ २०।६ ॥
तस्य मेधातिथिस्तस्मात्प्रस्कण्वाद्या द्विजातयः ॥

राजा पुरूपासून दहावा ऋतेयु नांवाचा राजा झाला; त्याचा पुत्र रन्तिभार, त्याला तीन पुत्र होते. सुमति, ध्रुव व अप्रतिरथ. अप्रतिरथाचा पुत्र कण्व, हा ब्राह्मण झाला. कण्वाचा पुत्र मेधातिथि, त्याचा पुत्र प्रस्कण्व, याचे वंशज कण्व किंवा काण्वायन या नांवाचे ब्राह्मण आहेत.

विष्णुपुराणांत म्हटलें आहे :—

अप्रतिरथः कण्वः, तस्यापि मेधातिथिः,
यतः काण्वायना द्विजा बभूवुः ॥ ४।६।१९।२ ॥

अप्रतिरथाचा पुत्र कण्व, त्याचा पुत्र मेधातिथि त्याच्या वंशजांस काण्वायन ब्राह्मण म्हणतात.

अप्रतिरथाचा ज्येष्ठ बंधु सुमति, याचा पुत्र रैभ्य, त्याचा पुत्र दुष्यन्त यास भरत नामें महाविख्यात पुत्र झाला. भरताचा पुत्र वितथ नामें होता.

वितथस्य सुतो मन्युर्बृहत्क्षत्रो जयस्ततः ॥
महावीर्यो नरो गर्गः संस्कृतिस्तुरात्मजः ॥

—श्री० भा० स्कं० ९।२१।१

वितथाचा पुत्र मन्यु, त्याचा बृहत्क्षत्र, त्याचा जय. जयास तीन पुत्र महावीर्य, नर आणि गर्ग.

गर्गाच्छिनिस्ततो गार्ग्यः क्षत्राद् ब्रह्महचवर्तत ॥
उरुक्षयो महावीर्यात्तस्य त्रय्यारुणिः कविः ॥ १९ ॥
पुष्करारुणिरित्यत्र ये ब्राह्मण गतिं गताः ॥

—श्री० भा० स्कं० ९।२१

गर्गाचा पुत्र शिनी, याचे वंशास गार्ग्य म्हणतात. हे गार्ग्य क्षत्रियकुळांत उत्पन्न होऊन ब्राह्मण झाले. गर्गाचा भाऊ महावीर्य, त्याचा पुत्र ऊरुक्षय, त्यास तीन पुत्र; त्रय्यारुणि, कवि व पुष्करारुणि. हे सर्व ब्राह्मण झाले. मत्स्यपुराणांत सांगितलें आहे,

गर्गाः संस्कृतयः काव्याः क्षत्रोपेता द्विजातयः ॥
ऊरुक्षय सुता ह्येते सर्वे ब्राह्मणतां गताः ॥

—मत्स्यपुराण

गर्ग, संस्कृति आणि काव्य हे क्षत्रियाचे मुलगे ब्राह्मण झाले, तसेंच ऊरुक्षयाचे पुत्र क्षत्रियाचे ब्राह्मण झाले.

बृहत्क्षत्रस्य पुत्रोऽभूद्धस्ती यद्धस्तिनापुरम् ॥ २० ॥
अजमीडो द्विमीढश्च पुरुमीढश्च हस्तिनः ॥
अजमीढस्य वंश्याः स्युः प्रियमेधादयो द्विजाः ॥ २१ ॥

—श्री० भा० स्कं० ९ अ० २१

बृहत्क्षत्राचा पुत्र हस्ती यानें हस्तिनापुर वसविलें. हस्तीचे तीन पुत्र अजमीढ, द्विमीढ व पुरुमीढ. अजमीढाचे वंशज प्रियमेधादिक हे ब्राह्मण झाले. अजमीढाचा पुत्र नील यापासून सातवा पुरुष मुद्गल ब्राह्मण झाला.

मुद्गलाद्ब्रह्मनिवृतं गोत्रं मौदगल्यसंज्ञितम् ।

—श्री० भा० स्कं० ९।२१।३३

मुद्‌गलस्यापि मौद्‌गल्यः क्षत्रोपेतो द्विजातयः
—मत्स्यपुराण

मुद्‌गलापासून मौद्‌गल्य नांवाचें गोत्र प्रचलित झालें.

वेणुहोत्रसुतश्चापि गार्ग्यो नामा प्रजेश्वरः ॥
गार्ग्यस्य गर्गभूमिस्तु वत्सो वत्सस्य धीमतः ॥
ब्राह्मणाः क्षत्रियाश्चैव तयोः पुत्रास्तु धार्मिक ः॥
—ब्रह्मांडपुराण

वेणुहोत्राचा पुत्र राजा गार्ग्य, त्याचे पुत्र गर्गभूमि आणि वत्स; या दोघांचेही पुत्र धार्मिक ब्राह्मण व क्षत्रिय झाले.

हरितो युवनाश्वश्च हारितायत आत्मजाः ॥
एते अंगिरसः पक्षे क्षत्रोपेता द्विजातयः ॥
—लिंगपुराण

युवनाश्व राजाचा पुत्र हरित, त्यापासून हारितायत नांवाचें आंगिरस गणांतील गोत्र प्रचलित झालें.

यतो हरिताद्धारिता आंगिरसो द्विजा हरितगोत्र प्रवराः
—विष्णुपुराण अं० ४ अ० ३।५

हरितापासून हारित गोत्र झालें; हें आंगिरस गणांतील आहे.

चंद्रवंशीय राजा पुरुरवा याच्या वंशांतील प्रतीपाचा ज्येष्ठ पुत्र व शंतनूचा वडील भाऊ म्हणजे भीष्माचार्यांचा चुलता देवापि हा क्षत्रियाचा धंदा सोडून देऊन वनांत जाऊन तपश्चर्या करूं लागला, व त्यानें एक सूक्तही प्रगट केलें आहे. ऋग्वेदाच्या दहाव्या मण्डलांतील ९८ वें सूक्त देवापीचें आहे. तसेंच, वर उल्लेखिलेला रन्तिभार याच्या वंशांतील कण्व, मेधातिथी व प्रस्कण्व यांचीं सूक्तें, ऋग्वेदाच्या पहिल्या व आठव्या मंडलांत अनेक आहेत. त्यावरून हे मंत्रद्रष्टे ऋषी झाले हें उघड होतें.

याप्रमाणें पूर्वी ब्राह्मण व क्षत्रिय हे जे दोन वर्ण होते ते इतर निर्बंधांनीं अभेद्य नव्हते. क्षत्रियाचा ब्राह्मण व ब्राह्मणाचा क्षत्रिय होत असे. इंद्रियजयानें व तपानें शांतिसंपन्न होऊन पुष्कळ क्षत्रिय ब्राह्मणत्वाप्रत गेले. विश्वामित्र हा क्षत्रियाचा ब्राह्मण झाल्यावर त्याच्या मुलांचीं अशीं अनेक गोत्रें ब्राह्मणांत आलीं आहेत. कित्येक ब्राह्मण हे चंद्रवंशीय क्षत्रिय कुलांतूनच

म्हणजे क्षत्रियांचे ब्राह्मण झालेले आहेत. म्हणजे इच्छा व सामर्थ्य असतां पूर्वी खालचा मनुष्य वर जाई. विश्वामित्र, कौशिक, काण्व, आंगिरस, शौनक, सांकृत्य, वत्स, गार्ग्य, हारितस, वात्स्यायन, गर्ग व मुद्‌गल या गोत्रांचे मूळ पुरुष क्षत्रियापासून उत्पन्न झालेले ब्राह्मण आहेत.

क्षत्रियांचे ब्राह्मण झाल्याचीं उदाहरणें जशीं वर दिलीं आहेत, त्याचप्रमाणें कांहीं क्षत्रिय स्वधर्माचरण सोडल्यानें वैश्य झाले, अशीं उदाहरणें आहेत. कांहीं वैश्य तर उत्कृष्ट आचरण करून ब्राह्मण झाल्याचींही प्रमाणें आहेत. म्हणजे एकाच वंशांत कांहीं ब्राह्मण झाले, कांहीं क्षत्रिय झाले व कांहीं वैश्य झाले, असें साधार म्हणतां येतें.

मनुर्विवस्वतः पुत्रः श्राद्धदेव इति स्मृतः ॥
सप्तमो वर्तमानो यस्तदपत्यानि वै शृणु ॥ १ ॥
इक्ष्वाकु नभगश्चैव धृष्टः शर्यातिरेवच ॥
नारिष्यन्तोऽथ नाभागो सप्तमो दिष्ट उच्यते ॥ २ ॥
करूषश्च पृषध्रश्च दशमो वसुमानकः ॥

—श्री० भा० स्कं० ८ अ० १३

विवस्वानाचा पुत्र श्राद्धदेव म्हणजे चालू असलेला सातवा वैवस्वत मनु होय. त्याला दहा पुत्र झाले. त्यांचीं नांवें:—इक्ष्वाकु, नभग, धृष्ट, शर्याति, नारिष्यंत, नाभाग, दिष्ट, करूष, पृषध्र आणि वसुमान.

करूषान्मान वादासन् कारूषाः क्षत्रजातयः ॥
उत्तरा पथ गोप्तारो ब्रह्मण्यो धर्मवत्सलः ॥ १६ ॥
धृष्टाद्धार्ष्टमभूत्क्षत्रं ब्रह्मभूयं गतं क्षितौ ॥ १० ॥

—श्री० भा० स्कं० ९ अ० २

मनूच्या करूष नांवाच्या पुत्राचे वंशज कारुष हे क्षत्रिय झाले; व त्यांनीं उत्तरेकडील प्रदेशावर राज्य केलें. हे ब्राह्मणांचें व धर्माचें रक्षण करण्यांत तत्पर होते. मनूच्या धृष्ट नांवाच्या पुत्राचे वंशज धार्ष्ट्र हे क्षत्रियाचे मुलगे ब्राह्मण झाले.

चित्रसेनो नरिष्यन्ताद्दक्षस्तस्य सुतोऽभवत् ॥
तस्य मीढ्‌वाँस्ततः कूर्च इंद्रसेनस्तु तत्सुतः ॥ १९ ॥
वीतिहोत्रस्त्विंद्रसेना तस्य सत्यश्रवा अभूत् ॥

ऊरुश्रवा सुतस्तस्य देवदत्तस्ततोऽभवत् ॥ २० ॥
ततो अग्निवेश्यो भगवानग्निः स्वयमभूत्सुतः
कानीन इति विख्यातो जातूकर्ष्यो महानृषिः ॥ २१ ॥
ततो ब्रह्मकुलं जातमग्निवेश्यायनं नृप ॥ '

—श्री० भा० स्कं० ९ अ० २

मनूचा पुत्र नरिष्यन्त. त्याला चित्रसेन झाला. त्याचा पुत्र दक्ष, त्याचा मीढवान्, त्याचा कूर्च, त्याचा पुत्र इंद्रसेन, त्याचा वीतिहोत्र, त्याचा सत्यश्रवा, त्यापासून उरुश्रवा झाला. त्याला देवदत्त नामें पुत्र झाला. ह्या देवदत्ताला कुमारीपासून प्रत्यक्ष अग्निनारायणाचा अवतार असा, अग्निवेश्यनामें पुत्र झाला. त्याला महर्षि जातूकर्ण्य असेंही म्हणत. त्या जातूकर्ण्य महर्षीचे वंशज ब्राह्मण झाले.

नाभागो दिष्टपुत्रोऽन्यो कर्मणा वैश्यतां गतः ॥

—श्री० भा० स्कं० ९ अ० २ श्लो० २३

मनूच्या दिष्ट नामें पुत्राचा नाभाग (दुसरा) या नांवाचा पुत्र होता, तो आपल्या कर्मानें वैश्य झाला.

नाभागादम्बरीषोऽभून्महाभागवतः कृती ॥ स्कं० ९।४।१३
विरूपः केतुमान् शम्भुरम्बरीष सुतास्त्रयः ॥
विरूपातपृषदश्वोऽभूत्तत्पुत्रस्तु रथीतरः ॥ १ ॥
रथीतरस्याऽप्रजस्य भार्यायां तन्तवेऽर्थितः॥
अंगिरा जनयामास ब्रह्मवर्चस्विनः सुतान् ॥ २॥
एते क्षेत्रे प्रसूता वै पुनस्त्वांगिरसाः स्मृताः ॥
रथीतराणां प्रवराः क्षत्रोपेता द्विजातयः ॥ ३ ॥

——श्री० भा० स्कं० ९ अ० ६

मनूच्या नभग नामें पुत्राचा नातु महाभागवत राजर्षि अंबरीष. त्याला तीन पुत्र झाले. त्याच्या विरूप नामक पुत्राचा पृषदश्वा, त्याचा पुत्र रथीतर; रथीतराला संतान नव्हतें म्हणून अंगिरा ऋषीनें, रथीतराच्या भार्येच्या पोटीं नियोग पद्धतीनें पुत्र उत्पन्न केले. हे सर्व ब्राह्मण झाले. हे रथीतराच्या स्त्रीला झाले म्हणून ह्यांना रथीतर म्हणतात, व अंगिरा ऋषीपासून झाले म्हणून ह्यांना आंगिरस असेंही म्हणतात. हे क्षत्रियांच्या स्त्रीला झाले असून

ब्राह्मण झाले. रथीतर हा आंगिरस गोत्रांतील भेद असून त्याचे प्रवर 'आंगिरस वैरूप्य पार्षदश्व' असे आहेत.

येथवर केलेल्या विवेचनावरून हें ध्यानांत येईल कीं वर्णसंस्था हा समाजाचा स्वाभाविक विकास आहे. त्यांत ईश्वराचा कांहीं संबंध नाहीं. त्रैवर्णिक हे संस्कृतीनें व वंशानें एकरूप होते म्हणून प्राचीन काळीं या त्रिवर्णांमध्यें अन्न व लग्नव्यवहार परस्परांमध्यें होत असत, आणि वरचा वर्ण खालीं व खालचा वर असेंही होत असे. वर्णांतर करणें यांत कांहीं उच्चनीचपणा वाटत नसावा, कारण जन्माला महत्त्व असें मुळींच नव्हतें. जन्माला महत्त्व येण्याचें कारण चौथा वर्ण जो शूद्र त्याचा समावेश हें होय. हा वर्ग संस्कृति, व वंशदृष्ट्या भिन्न असल्यामुळें त्याचा समावेश केला तरी पुढें अडचण कशी उत्पन्न झाली, जातिसंस्था कशी स्थापिली गेली, त्यांतच अधःपाताचीं बीजें कशीं रुजलीं याचा विचार पुढील प्रकरणांत करतों.

प्रकरण ३ रें

जातिसंस्थेची स्थापना व अधःपातास प्रारंभ

गेल्या प्रकरणांत त्रिवर्ण संस्थेचा विकास कसा झाला हें विशद केलें यापुढें क्रमप्राप्त चौथा वर्ण, पुढें पांचवा वर्ण व कदाचित् सहावा वर्णही व्हावयास पाहिजे होता. परंतु तसें न होण्याचें कारण भिन्नवंशीय शूद्र समावेशानंतर प्रगति खुंटली व जन्माला महत्त्व आलें. त्रैवर्णिकांमध्यें उच्चनीच भाव मुळींच नव्हता असें नाहीं. तो अधिकार, सत्ता, द्रव्य, बल या दृष्टीनें होताच. परंतु वंश व संस्कृति यांचें ऐक्य असल्यामुळें व अन्न आणि लग्नव्यवहार राजरोस होत असत म्हणून तो उच्चनीचपणा पूर्वीं मुळींच जाणवला नाहीं. शूद्रवर्गाला समाविष्ट करून घेतल्यानंतर जन्मजात उच्चनीचपणा जाणवूं लागला व त्यामुळें जातींमध्यें मारकता उत्पन्न झाली.

चातुर्वर्ण्याबद्दल सनातनी समजूत अशी आहे कीं तें अनादि ईश्वरानें उत्पन्न केलेलें आहे. या समजुतीला पोषक म्हणून सनातनी लोक गीतेंतील श्लोक

चातुर्वर्ण्यं मया सृष्टं गुणकर्मविभागशः

हा पुढें करीत असतात. पण गुण तीन आणि वर्ण चार, तेव्हां कोणत्या गुणाच्या योगानें शूद्राची उत्पत्ति झाली, हा प्रश्न येतोच ! गुणांचा विभाग आणि कर्मांचा विभाग केला तरी गुण तीन जसे निश्चित आहेत तसें कर्म अमुकच असें निश्चित नाहीं. पूर्वकर्मानुरूप गुण व पूर्वकर्म यावरून एकजिनसी समाजाची ही अशी व्यवस्था केली असें म्हणावें तर शूद्र वर्गात जाण्याला कोण तयार होणार ? तेव्हां हें ईश्वरानें चातुर्वर्ण्य निर्माण केलें हें विधान तर्कशुद्ध वाटत नाहीं.

एकजिनसी समाजाचा असा विभाग करणारा हा अज्ञात कसा राहिला ? तो कोणी तरी अद्वितीय पुरुष असला पाहिजे. श्रीकृष्णानें ' मया सृष्टं ' असें म्हटलें तरी त्याच्याही पूर्वी श्रीरामचंद्राचे कालीं चातुर्वर्ण्य होतेंच, असे उल्लेख आहेत.

वर्ण आणि आश्रम हा विषय आणि वर्णाश्रमविहित धर्म हा सर्व ठसठशीतपणें स्मृतिग्रंथांत आढळतो. वैदिक वाङ्मयांत हा वर्णाश्रमधर्म मुळींच आलेला नाहीं. पुरुषसूक्तावांचून ऋक्संहितेंत अन्यत्र शूद्र शब्द नाहीं, ऋग्वेदांत दास हा शब्द पुष्कळ वेळां आला आहे हें पूर्वी सांगितलेंच आहे.

त्रैवर्णिकांचे वर्णधर्म आणि आश्रमधर्म पाहिले म्हणजे त्यांत अनेक भेद दिसतात. या भेदांवरून हे पूर्वी स्वतंत्र गट असावेत. कारण प्रत्येक वर्णांतील ज्या निरनिराळ्या चाली, त्यांची उपपत्ति याशिवाय लागत नाहीं. हे तीन गट स्वतंत्र आणि एकवंशीय असावेत व त्यांनीं भिन्नवंशीय शूद्र समाविष्ट करून चातुर्वर्ण्य उत्पन्न केलें हें सयुक्तिक दिसतें.

इतर देशांचे इतिहास पाहिले तर इजिप्त, चीन, जपान, इराण आणि अन्यत्रही चातुर्वर्ण्य होतें असें दिसतें. पण इतरत्र त्याला जातीचें स्वरूप आलें नाहीं आणि हिंदुस्थानांत मात्र जातीचें स्वरूप आलें. चार वर्ण म्हणजेच चार जाती असें जें ठरलें गेलें त्याचें कारण वंशकल्पना हें असावें. वंशाची जपणूक ही सर्वत्र आहे. आज युरोपिअन लोकसुद्धां आपल्या वंशाच्या जपणुकीकरितां अमेरिका, आस्ट्रेलिया व आफ्रिका या प्रदेशांत काय करतात

हें दिसतच आहे. वंश टिकविण्याची बुद्धि सर्वत्र सारखी आहे. आजच्या स्पर्धेचें निरीक्षण केल्यास माझा वंश टिकावा व तुझा टिकूं नये, हेंच त्याचें उत्तर आहे. विशेषतः जेते हे जितांचा वंश अनेक तऱ्हेनें मारून आपला वंश जगविण्याचा अट्टाहास करीत असतात. त्रैवर्णिक हे संख्येनें थोडे पण सुसंस्कृत होते. बहुसंख्य अशा मूळच्या असंस्कृतांचें त्यांना भयच होतें. या लोकांपासून दूर राहून बहिस्त आक्रमणांना तोंड देण्याकरितां त्यांना सुसज्ज राहावें लागे. अनेक मतमतांतरें रिचवून, तत्त्वज्ञानाचे प्रवाह उजळून, सर्वसंग्राहकता कायम ठेवून वंश शुद्ध राखण्याविषयीं त्रैवर्णिकांनीं जी काळजी घेतली ती पाहून कौतुकच वाटतें. पण स्थिति अशी झाली कीं इतकी काळजी घेऊनही वंश शुद्ध राहिले नाहींत. स्त्रीपुरुषांचीं परस्पर आकर्षणें हीं दुर्दम्य असतात. तदनुसार त्रैवर्णिक व शूद्र यांचे उलट सुलट संबंध घडले. प्रजा उत्पन्न झाली. अनुलोमाला अनुमति व प्रतिलोमाचा निषेध केला तरी प्रजा कांहीं थांबेना. म्हणून असंख्य संकर जाती उत्पन्न झाल्या. त्यांमध्यें स्वाभाविक जन्मजात उच्चनीचता उत्पन्न झाली. त्यांना वृत्त्या देऊन त्यांची व्यवस्था लावतां लावतां पुरे वाट झाली, हें धर्मशास्त्रच सांगत आहे.

पाणिनीच्या अष्टाध्यायीवरून तत्कालीन समाजस्थितीवर बराच प्रकाश पडतो. आखुघात हा शूद्राचा त्या काळीं पर्याय शब्दच होता. 'आखुघातः शूद्रः' उंदिर मारणारा अर्थात् ते खाणारा जो तो शूद्र. हा शूद्र अस्पष्ट म्हणजे म्लिष्ट भाषा बोले. शूद्र हे प्रथम त्रैवर्ण्याच्या बाहेर होते. जास्ती संघटण झाल्यावर ज्यांना आंत घेतलें, त्यांना पाणिनी अनिरवसित असा शब्द लावतो. अनिरवसित पूर्णपणें बंदी नसलेले शूद्र होत. यांमध्यें तक्षन्, आयस्कार, रजक, तंतुवाय यांचा समावेश होत असे. निषाद्, चंडाळ, मृतप हे पूर्ण बंदी केलेले म्हणजे निरवसित शूद्र होत. पाणिनीकालीं संकर जाती स्वतंत्रपणें अस्तित्वांत नव्हत्या. ब्राह्मणापासून शूद्रीच्या ठिकाणीं झालेल्या संततीला गौण समजत. इतकेंच नव्हे तर त्रिवर्णांतील परस्पर शरीरसंबंधही गौण मानण्याची प्रवृत्ति होती. शूद्र स्त्री करणाऱ्या ब्राह्मणाला किंवा क्षत्रियाला व वैश्यालसुद्धां 'शूद्राभार्यः' असें कुत्सित नांव ठेवीत. शूद्र स्त्रीपासून होणाऱ्या संततीला कुत्सित व निंद्य समजत. पण त्याची गणना पाणिनी-कालींसुद्धां पित्याच्या वर्णांतच होत असे. एकंदरींत गुराढोरांत पशुवत्

कालक्रमणा करणारा शूद्र त्रैवर्णिकांनीं समाविष्ट करून घेतल्यानंतर वर्णोत्कर्ष पावता झाला. याप्रमाणें शूद्र समावेशानें चातुर्वर्ण्य बनलें तरी लगेच दुसरी एक आपत्ति डोकावूं लागली, ती अशीः—

त्रैवर्णिक लोक शूद्र स्त्रिया करूं लागले. पण त्या कराव्या कीं न कराव्या हा वाद सुरू झाला. आर्य हे गोरे व सुस्वरूप होते; शूद्र हे काळे व कुरूप होते. दोघांच्या नीतिमत्तेंत आणि संस्कृतींत बरेंच अंतर होतें. एक ज्ञानसंपन्न तर दुसरा अज्ञानी, एक तेजस्वी तर दुसरा निस्तेज, अशा या उभय वर्गापासून संतति चांगली उत्पन्न होणार नाहीं, असें वाटून एक वर्ग शूद्र स्त्री कोणतेही प्रसंगीं करूं नये असें म्हणूं लागला. या वर्गांत याज्ञवल्क्य, शंख आणि इतर अनेक स्मृतिकार मोडतात. शूद्र स्त्री तर करूंच नये पण शूद्राच्या रंगाची म्हणजे काळी कन्या वरूं नये (नोद्वहेत् कपिलां कन्यां) एथपर्यंत या तिटकाऱ्याची मजल पोंचली.

शूद्रां शयनमारोप्य ब्राह्मणो यात्यधोगतिम् ॥ ९ ॥

—म० भा० अ० शा० प० अ० ४७.

आपद्यपि न कर्तव्या शूद्रा भार्या द्विजन्मना ॥ ९ ॥

—शंखस्मृति अ० ४

शूद्र स्त्रीच्या निषेधाची मोहीम अशी जोरांत सुरू झाली व एकंदरींत शूद्राविवाह–निषेधाचा मार्ग सर्वांना पटला.

त्रैवर्णिकांतच जोंवर विवाह होते तोंवर पितृसावर्ण्य रूढ होतें. पण हाच नियम लागू करून ब्राह्मणांनीं शूद्र स्त्री केल्यास तिच्या संततीला ब्राह्मण मानावें कीं काय असा मोठा प्रश्न पडला. यासंबंधानें विद्वानांत व धर्मशास्त्रज्ञांत मोठा वादविवाद झालेला आढळून येतो. कांहींचें म्हणणें हें कीं शूद्रस्त्रीच्या मुलाची जात ब्राह्मण व शूद्र यांच्याहून निराळी मानावी. कारण त्यांच्या दोघांच्या वर्णांत व बुद्धिमत्तेंत फारच अंतर आहे. तथापि कांहीं विद्वान् याविरुद्ध होते. कोणी क्षेत्राला महत्त्व देत, तर कोणी वर्णाला देत, तर कोणी बीजाला देत. कोणी म्हणत जन्माला महत्त्व न देतां गुणाकडेच पहा. अशा या ओढाताणींत पितृसावर्ण्य गेलें. अर्थात् निराळ्याच एका व्यवस्थेचा उदय झाला. जरी शूद्रांचें समावेशन त्रैवर्णिकांनीं करून घेऊन चातुर्वर्ण्य स्थापिलें, शूद्राविवाहाचा निषेध केला, शूद्रस्त्रीसंबंध अजिबात बंद

व्हावे अशी दक्षता घेतली; तथापि तें व्यवहारांत उतरलें नाहीं. कारण अनेक शतकांची सवय निराळी होती. समाजाला इष्ट अशी गोष्ट घडत नाहीं असें पाहून धर्मज्ञांनीं दुसरा असा एक कायदा केला कीं शूद्रस्त्रीजन्य अपत्यें मातृसवर्ण समजावीं. या मातृसावर्ण्यांतूनच जातिसंस्थेचा उदय झाला.

पितृसावर्ण्य जर राहातें तर जातिसंस्था उत्पन्नच झाली नसती. किंबहुना अगदीं काटेकोर मातृसावर्ण्य राहातें तरीहि चार वर्णांव्यतिरिक्त जाति दिसल्या नसत्या. परंतु ना पित्याचा वर्ण ना मातेचा वर्ण अशा तिसऱ्याच वर्गांत संतति मोडूं लागली. उच्चनीच भाव प्रखरपणें भासमान होऊं लागला व त्यांतूनच जातिसंस्थेचा उदय झाला.

ही जन्मजात उच्चनीचत्वाची कल्पना समाजाला मारक आहे हें लवकरच तज्ञांच्या ध्यानीं आलें. जन्माला महत्त्व देऊं नये, गुणालाच मान द्यावा अशी घोषणा अनेकांनीं केली. गुणोत्कर्षाकडे लक्ष्य देण्यास त्या वेळच्या शहाण्यांनीं कंठरवानें सांगितलें; हें पुढील उताऱ्यांवरून ध्यानीं येईल.

सत्यं ज्ञानमथाद्रोह आनृशंस्यं तपो घृणा।
तपश्च दृश्यते यत्र स ब्राह्मण इति स्मृतः ॥

——म० भा० शां० अ० १८९ श्लो० ४

ब्राह्मणो हीनवर्णस्य यः कुर्यात् कर्म किंचन।
स तां जातिमवाप्नोति इहलोके परत्र च ॥

——कालहेमाद्रि निर्णयेसिंधौ

यस्य यल्लक्षणं प्रोक्तं पुंसोवर्णाभिव्यंजकम्।
यदन्यत्रापि दृश्येत तत्तेनैव विनिर्दिशेत् ॥

——भा० स्कं० ७ अ० ११

स्वभावः कर्मच शुभं यत्र शूद्रेऽपि तिष्ठति।
विशिष्टः स द्विजातेर्वैविज्ञेय इति मे मतिः ॥

——म० अ० अ० १४३

एतैः कर्मफलैर्देवि न्यूनजातिकुलोद्भवः।
शूद्रोऽप्यागमसंपन्नो द्विजो भवति संस्कृतः ॥ ४६ ॥

——अनु० अ० १४३

ब्राह्मणो वाप्यसद्वृत्तः सर्वसंकरभोजनः ।
ब्राह्मण्यं स समुत्सृज्य शूद्रो भवति तादृशः ॥ ४७ ॥
कर्मभिः शुचिभिर्देवि शुद्धात्मा विजितेंद्रियः ।
शूद्रोऽपि द्विजवत्सेव्य इतिब्रह्माब्रवीत् स्वयम् ॥ ४८ ॥
—अनुशा० अ० १४३

न योनिर्नापि संस्कारो न श्रुतं नच संततिः ।
कारणानि द्विजत्वस्य वृत्तमेव तु कारणम् ॥ ५० ॥
सर्वोऽयं ब्राह्मणो लोके वृत्तेन तु विधीयते ।
वृत्ते स्थितस्तु शूद्रोऽपि ब्राह्मणत्वं नियच्छति ॥ ५१ ॥
—अ० अ० १४३

शूद्रयोनौ प्रजातस्य सद्गुणानुपतिष्ठतः ।
वैश्यत्वं लभते ब्रह्मन् क्षत्रियत्वं तथैव च ॥
आर्जवे वर्तमानस्य ब्राह्मण्यमभिजायते ॥
—स्मृत्यंतरे, सनातनधर्म प्रदीपे

वृत्ते स्थितश्च शूद्रोऽपि ब्राह्मणत्वं स सगच्छति ।
—ब्रह्मपुराण

न कुलं वृत्तहीनस्य प्रमाणमिति मे स्थितिः ।
अंत्येष्वपि हि जातानां वृत्तमेव विशिष्यते ॥ ४१ ॥
—उद्यो० प० अ० ३४

शूद्रोऽपि शीलसंपन्नो गुणवान् ब्राह्मणोभवेत् ।
ब्राह्मणोऽपि क्रियाहीनः शूद्रात् प्रत्यवरोभवेत् ॥
—वनपर्व अ० १८०

चत्वार एकस्य पितुः सुताश्च तेषां सुतानां खलु जातिरेका ।
एवं प्रजानांहि पित्रैक एव पित्रेकभावान्नच जातिभेद ॥
—भविष्यपुराण ब्रा० अ० ४२।४५

तस्मान्न गोश्ववत् कश्चित् जातिभेदोऽस्ति देहिनाम् ।
कार्यशक्तिनिमित्तैस्तु संकेतः कृत्रिमो भवेत् ॥
—ब्रा० अ० अ० ४०।३५

वरील श्लोकांचा क्रमानें अर्थ असा :—

सत्य, ज्ञान, अद्रोह, दया, तप इत्यादि गुण जेथें दिसतात तोच ब्राह्मण होय !

जो ब्राह्मण हीन वर्णाचें कांहीं कर्म करील तो या लोकांत आणि परलोकांतही त्याच वर्णांत मोडतो.

ज्या पुरुषाचें ठिकाणीं जें वर्णप्रकाश (चिन्ह) असेल तो त्याच वर्णाचा समजावा.

ज्या शूद्राच्या अंगचा स्वभाव व कर्म चांगलें आहे तो ब्राह्मणापेक्षांही अधिक जाणावा, असें माझें मत आहे.

हे देवी, कर्मविपाकामुळें न्यून जातींत उत्पन्न झालेला शूद्र जर ज्ञानसंपन्न होईल तर तो सुसंस्कृत मनुष्य द्विज समजावा.

असद्वृत्त, वाटेल तेथें जेवणारा ब्राह्मण हा ब्राह्मण्याचा त्याग करून शूद्र होतो.

हे देवी, शुद्धात्मा, जितेंद्रिय, पवित्र कर्मे करणारा शूद्र द्विजाप्रमाणें सेव्य होय, असें ब्रह्मदेवानें म्हटलें आहे.

जन्म, संस्कार, विद्या व संतती यापेक्षां द्विजत्वाला वृत्त म्हणजे शील हें एकच कारण आहे.

ब्राह्मणाला या जगांत जो मान आहे तो शीलामुळेंच होय. शूद्रसुद्धां शीलयुक्त असेल तर ब्राह्मणत्वाप्रत जातो.

शूद्र योनींत उत्पन्न झालेला मनुष्य जर सद्गुणी असेल तर तो हळूहळू वैश्यत्व व क्षत्रियत्वाप्रत प्राप्त होतो व पुढें हळूहळू सरळ आचरणामुळें तो ब्राह्मण्यही संपादन करतो.

शीलवान् शूद्र ब्राह्मणत्व प्राप्त करून घेतो.

शीलहीन पुरुषाच्या कुळाला कांहीं किंमत नाहीं. त्यापेक्षां खालच्या योनींत जन्मलेले शीलवान् पुरुष श्रेष्ठ होत.

शीलसंपन्न गुणवान् शूद्र ब्राह्मण होतो व शीलभ्रष्ट क्रियाहीन ब्राह्मण शूद्र होतो.

खरें पाहिलें तर हे चार वर्ण म्हणजे एकाच पित्याचे चार पुत्र होत. या सर्वांची जाति एकच आहे. सर्वांचा पिता परमेश्वर हा एक असल्यामुळें

माणसांमध्येंही जातिभेद मानण्याचें कारण नाहीं. म्हणून गाई व घोड्या-प्रमाणें माणसांमध्यें जातिभेद नाहीं. प्रत्येक माणसाला हा जो कृत्रिम जाति-वाचक संकेत चिकटवला आहे, त्याचें कारण कार्यशक्ति हें होय !

भारत, भागवत व पुराणें यांतील वचनें वर दिलींच आहेत. परंतु याहीपेक्षां महत्त्वाची अशी एक कथा वैदिक वाङ्मयांत आहे. त्यावरून शूद्र संततीला कनिष्ठ कसें समजत हेंही दिसतें. अर्थात् त्याबरोबर जन्माला महत्त्व न देतां गुणाला प्राधान्य देण्याची प्रवृत्तिही उघड होते. केवळ शूद्र स्त्रीची संतति म्हणून उपेक्षा करूं नये या दृष्टीनें ही कथा फार महत्त्वाची आहे.

'ऋषयो वै सरस्वत्यां सत्रमासत ते कवषमैलूषं सोमादनयन् दास्याः पुत्रः कितवोऽब्राह्मणः कथं नो मध्ये दीक्षिष्टेति तं बहिर्धन्वोदवहन्नत्रैनं पिपासाहं सरस्वत्या उदकं मापादिति स बहिर्धन्वोद्हलः पिपासया वित्त एतदपो नप्त्रीयमपश्यत् प्रदेवत्रा ब्रह्मणे गातुरेत्विति तेनापां प्रियंधामो-पागच्छत्तमापो नूदायंस्तं सरस्वती समंतं पर्यधावत्तस्माद्धाप्ये तर्हि परिसारकमित्याचक्षते यदेनं सरस्वती समंतं परिससार ते वा ऋषयो ब्रुवन् विदुर्वा इमं देवा उपेमं हवयामहा इति तथेति तमुपाह्वयंत तमपहूयै तदपो नप्त्रीयम् कुर्वत प्रदेवता ब्रह्मणे गातुरेत्विति तेनापां प्रियं धामोपागच्छन्नुप देवानामुपापां प्रियं धाम गच्छत्युपदेवानां जयति परमं लोकं य एवं वेद यश्चैव विद्वानेतदपो नप्त्रीयं कुरुते तत्संततमनु ब्रूयात् सततवर्षीहि प्रजाभ्यः पर्जन्यो भवति ॥ १९ ॥

——ऐतरेय ब्राह्मण द्वितीय पंचिका

"एकदां सरस्वती नदीच्या तीरावर बहुत ऋषी मिळून सत्र (पुष्कळ काळपर्यंत सोमयाग, आप्तोर्याम आदि यज्ञ करणें व यज्ञयागादि क्रिया करून उरलेल्या वेळांत ज्ञानचर्चा करणें.) करीत होते. त्या ठिकाणीं (सत्रांत भाग घेण्याच्या हेतूनें) इलूष नामक ऋषीचा मुलगा कवष आला. तेव्हां तो (कवष) दासीपुत्र म्हणजे शूद्रस्त्रीपासून झालेला, धूर्त, जुगारी अर्थात् ब्राह्मण नव्हे म्हणून त्यास सत्रांत यज्ञदीक्षा कशी द्यावी असा ऋषी विचार करूं लागले. शेवटीं ह्यास दीक्षा देऊं नये असें बहुमतानें ठरवून ऋषींनीं त्याला तेथून दूर घालविलें. ज्या ठिकाणीं पिण्याकरितां पाणीही मिळणार नाहीं अशा सरस्वतीपासून दूरच्या प्रदेशांत त्यास सोडल्यामुळें त्या ठिकाणीं तो

तहानेनें व्याकुळ झाला; पाणी कोठेंही मिळेना. तेव्हां त्या कवष ऐलूषानें 'प्रदेवत्रा ब्रह्मणे गातु' हें अपोनप्त्रीय सूक्त म्हणून देवांची प्रार्थना केली. त्या सूक्तांतील प्रार्थनेनें देव त्याजवर संतुष्ट झाले, व त्यास पिण्याकरितां पाणी मिळालें; इतकेंच नव्हे तर तो कवष ऐलूष देवांना प्रिय झाल्यामुळें सरस्वती नदी आपला प्रवाह सोडून त्याच्या आसमंतात् वाहूं लागली. ज्या प्रदेशांत हा सरस्वतीचा नवीन प्रवाह सुरू झाला तो देश 'परिसारक' या नांवानें प्रसिद्ध झाला. ज्या ठिकाणीं ऋषी सत्र करीत होते, तेथें सरस्वतीचा प्रवाह कोरडा झालेला पाहून ऋषींना आश्चर्य वाटलें; व त्याजबद्दल चौकशी करितांना आढळून आलें कीं, सरस्वतीचा प्रवाह कवषाकडे गेला. तेव्हां ऋषींनीं विचार केला कीं, ज्या अर्थीं देवांनीं कवषाची योग्यता जाणली, त्याअर्थीं आपण त्याला बोलावून आपणांत घ्यावा, व तो ब्राह्मण आहे असें समजून त्याला सत्रांत यज्ञदीक्षा द्यावी. त्याप्रमाणें ऋषींनीं त्याला आदरानें बोलावून व त्याचें ब्राह्मण्य कबूल करून त्याला सत्रांत यज्ञदीक्षा दिली. इतकेंच नव्हे, तर त्यानें म्हटलेलें 'प्र देवत्रा ब्रह्मणे गातु' हें अपोनप्त्रीय सूक्त सर्व ऋषींनीं प्रेमानें म्हणून देवतांची प्रार्थना केली. या सूक्तानें देवांची प्रार्थना करणारा देवांना प्रिय होऊन त्याच्या देशांत विपुल पर्जन्य पडेल व प्रजा सुखी होईल." अजूनही श्रावणीच्या वेळीं हें सूक्त म्हणण्यांत येतें.

वर दिलेली बोधप्रद आख्यायिका आणि विविध ग्रंथांतील वचनें फार उच्च भूमिकेचीं निदर्शक आहेत यांत शंका नाहीं. परंतु जन्मावर जात, जातीला विशिष्ट वृत्ति व आचार अशी सर्व योजना बांधून टाकल्यामुळें या विचारांचा उपयोग कांहीं झाला नाहीं. वंशाच्या जपणुकीकरितांच हें सर्व त्रैवर्णिकांनीं केलें पण पुढें सर्व अनुलोम व प्रतिलोम स्वतःला भिन्न भिन्न वंशीय मानूं लागले आणि समाजांत असंख्य गट अगदीं अलग व तुटकपणें नांदूं लागले. याचा परिणाम असंख्य जाति व पुढें पोटजाति वाढण्यांत झाला, जन्मजात उच्चनीचता उत्पन्न झाली, दुर्बल जातीला प्रबल जातीनें फारच त्रास दिला, व तोच प्रकार सांप्रत चालू आहे.

जातिसंस्थेचा विषय श्रौत वाङमयापेक्षां स्मार्त वाङमयांत अधिक आहे. म्हणून स्मृति व धर्मसूत्रें यावरून जाति कशा वाढत गेल्या हें पाहूं.

कांहींचें म्हणणें असें आहे कीं या भरत खंडांत ही जातिसंस्था वेद-कालापूर्वीपासून आहे. त्याकरतां ते रुद्राध्यायाचा आधार देत असतात. 'नमः क्षतृभ्यः' म्हणजे क्षतृंना नमस्कार असो, असा आरंभ करून संग्रहीतृ, तक्ष, रथकार, कुलाल, कर्मार, पुंजिष्ठ, निषाद्, इषुकृत्, मृगयु, श्वनि अशा जातींना नमस्कार केलेला आहे. क्षतृ म्हणजे क्षत्रिय स्त्रीला शूद्रापासून झालेली संतति (शूद्रात् क्षत्रियायां क्षत्ता) असें म्हटलें आहे. संग्रहीतृ म्हणजे कर गोळा करणारे (Tax collectors), तक्षा म्हणजे सुतार, कुलाल म्हणजे कुंभार, कर्मार म्हणजे लोहार, पुंजिष्ठ म्हणजे फांसेपारधी (पक्षि पुञ्जानां घातकाः) , निषाद म्हणजे कोळी (मासे मारणारे) इषुकृत् म्हणजे बाण मारणारे, धन्वकृत् म्हणजे धनुष्य करणारे, बुरुड, मृगयु म्हणजे पारधी, श्वनि म्हणजे कुत्रे बाळगणारे. अथर्ववेदांत रथकार, कर्मार व सूत हे सांगितले असून (३, ५, ६, ७), तक्षापासून पुञ्जिष्ठापर्यंतच्या जातींचा निर्देश वाजसनेयि संहितेंत (१६, २७) केलेला आढळतो. संग्रहीतृ, क्षत्तृ व सूत हे कारक संहितेंत व उग्र, सूत, क्षत्तृ, संग्रहीतृ हे तैत्तीरीय ब्राह्मणांत (३, ८, ५, १–३) उल्लेखिलेले आहेत.

अत्यंत प्राचीन अशा यज्ञसंस्थेमध्यें कुंभार, सुतार, लोहार, चांभार, दोऱ्या वळणारे, केरसुण्या बांधणारे इत्यादींचा संबंध येत असे. त्यावरून हे वर्ग होते हें उघड होतें. तथापि हे सर्व वर्ग त्रैवर्णिक बाह्यच होते. या सर्व अनार्यांचा समावेश पाणिनी शूद्रामध्यें करितो व त्यांत अनिरवसित व निरवसित असे भेद करितो. आर्य व अनार्य यांचें मिश्रण पाणिनीकालीं झालें नव्हतें म्हणून अंबष्ट, करण, उग्र, वैदेहक, मागध, माहिष्य, पारशव, चंडाल इत्यादि अनुलोम प्रतिलोम संस्कारांचा उल्लेख पाणिनी करीत नाहीं. तसेंच मनूनें सांगितलेले नट, करण, खस, झल्ल, मल्ल हेही अष्टाध्यायींत नाहींत. त्यावरून हें सिद्ध होतें कीं जातिसंस्थेला प्रारंभ शूद्राविवाहानंतर झाला. कारण शूद्र स्त्रीजन्य संततीचें पितृसावर्ण्य नष्ट झालें. धर्मशास्त्र प्रयोजकांनीं पुढें कल्पनेनें असोत वा प्रत्यक्ष असोत अनेक संकर गृहीत धरिले. त्यांना विविध नांवें व विविध वृत्त्या लावून दिल्या व जन्मजात उच्चनीचतेची व अस्पृश्यतेची पक्कड समाजावर चांगलीच बसविली !

आपस्तंबापासून देवलापर्यंतचे धर्मशास्त्रकार जातीबद्दल म्हणतात तरी काय हें पाहिलें पाहिजे. फक्त ८।१० स्मृतिकारांनींच काय तो जातीं-संबंधाचा विचार केलेला आहे म्हणून त्याचा सारांश येथें देतों.

आपस्तंब फक्त चार वर्ण व प्रतिलोमापैकीं चांडाल, पौल्कस आणि वैण यांचा उल्लेख करतो. गौतमानें अंबष्ठ, उग्र, निषाद, दौष्मंत, पारशव हे अनुलोम आणि सूत, मागध, आयोगव, क्षत्ता, वैदेहक व चंडाल हे प्रतिलोम सांगितले आहेत. म्हणजे वर्ण चार, अनुलोम पांच व प्रतिलोम सहा यांचा उल्लेख करून गौतमानें पुढें त्यांची उत्पत्ति दिली आहे. ब्राह्मणीला, ब्राह्मण क्षत्रियादि चार वर्णांपासून ब्राह्मण, सूत, मागध व चंडाल असे पुत्र होतात. क्षत्रिय स्त्रीला अनुक्रमें ब्राह्मणक्षत्रियादिकांपासून मूर्धावसिक्त, क्षत्रिय, धीवर, व पुल्कस असे पुत्र होतात. वैश्य स्त्रीला ब्राह्मणादिकांपासून अनुक्रमें भृज्जकंठ, माहिष्य, वैश्य, वैदेह असे पुत्र होतात. आणि शूद्र स्त्रीला ब्राह्मणादि वर्णांपासून अनुक्रमें पारशव, यवन, करण व शूद्र असे पुत्र होतात. गौतमानें एकंदर सोळा जातींचा उल्लेख केला आहे. पैकीं दौष्मंताला 'दौष्यन्त' व क्षत्त्याला 'क्रत' असेंही दुसरें एक नांव कांहीं प्रतींत आहे. पण गौतमानें वरील अनुलोमांमध्यें 'करणाचा' उल्लेख केलेला नाहीं.

बौधायनानें पहिल्या प्रश्नाच्या आठ व नऊ अध्यायांमध्यें जातिविचार केलेला आहे. परंतु त्या दोन अध्यायांमध्यें एकवाक्यता नाहीं. कांहीं जातींची उत्पत्ति परस्पर विरुद्ध दिसते. तथापि अध्याय नऊमधीलच चर्चा प्रमाण मानून ती येथें आम्ही देतों. बौधायनामध्यें चार वर्णांशिवाय रथकार, अंबष्ठ, सूत, उग्र, मागध, आयोगव, वैण, क्षत्ता, पुल्कस, कुक्कुट व श्वपाक यांचा उल्लेख अधिक आहे, व गौतमोक्त कांहीं जातींचा उल्लेख नाहीं. ब्राह्मण व क्षत्रिया आणि क्षत्रिय व वैश्या यांच्या संततीला ब्राह्मण व क्षत्रियच म्हणावयाचें असें बौधायन म्हणतो. म्हणजे त्यानें पितृसावर्ण्य सांगितलें आहे.

ब्राह्मण व वैश्य यांपासून अंबष्ठ, ब्राह्मण व शूद्रापासून निषाद्, क्षत्रिय व शूद्र या पासून उग्र, आणि वैश्य व शूद्रा यांपासून रथकार होतो, असें अनु-लोमासंबंधानें सांगून प्रतिलोम गौतमाप्रमाणें सांगितले नाहींत. उग्र व क्षत्त्याची स्त्री यापासून श्वपाक, वैदेहक व अंबष्ठा यापासून वैण, निषाद व

शूद्रा यापासून पुल्कस, शूद्र व निषादी यापासून कुक्कुट अशी कांहींची उत्पत्ति दिलेली आहे.

वसिष्ठ धर्मसूत्रांत अध्याय अठरामध्यें चंडाल, वैण, अंत्यावसायी रामक, पुल्कस, सूत, आणि अंबष्ठ, उग्र, निषाद, पारशव इत्यादींचे उल्लेख आहेत. गौतम व बौधायन यांनीं सांगितलेले सर्व अनुलोम वसिष्ठानें दिलेले नसून प्रतिलोम मात्र सहा सांगून त्यांची उत्पत्तीही निराळीच दिलेली आहे ती अशी :—

शूद्र व क्षत्रिया=वैण. शूद्र व वैश्या=अंत्यावसायी.
वैश्य व ब्राह्मणी=रामक. वैश्य व क्षत्रिया=पुल्कस.
क्षत्रिय व ब्राह्मणी=सूत. शूद्र व ब्राह्मणी=चांडाल इत्यादि.

वसिष्ठानंतर विष्णुधर्मसूत्रामध्यें जातिविचार आहे व येथूनच जातींचे धंदे सांगण्याला प्रारंभ झालेला आहे. यापूर्वीं जातींच्या धंद्यांचा विचार ग्रंथांत आढळत नाहीं. विष्णुधर्मसूत्रामध्यें चार वर्णांशिवाय आयोगव, पुक्कस, मागध, चांडाल, वैदेहक, व सूत हे अनुलोम सांगितले असून त्यांचे धंदेही अनुक्रमें रंगावतरण, व्याधता, स्तुतिक्रिया, बहिर्वास व मृतवस्त्रधारण, स्त्रीरक्षा व अश्वसारथ्य असे सांगितले आहेत. अनुलोमांची उत्पत्ति जवळ जवळ पूर्व सूत्रकारांसारखीच सांगितली आहे. अनुलोम संतति मातृसवर्ण समजावी. प्रतिलोमसंतति आर्यविगर्हित समजावी आणि सर्वांचा समान जातीशींच लग्नव्यवहार व्हावा, असें विष्णूचें मत आहे. त्यावरून या कालीं मातृसावर्ण्य रूढ होऊन पितृसावर्ण्य मागें पडलें आणि प्रत्येक जातीचे स्वजातीशींच अन्नलग्नव्यवहार होऊं लागले असें दिसतें.

विष्णूनंतर मनु, याज्ञवल्क्य, औशनस, वृद्धहारीत व वेदव्यास इत्यादींनीं जातिविचार केला आहे. त्यांतील मनूचा विचार बराच विस्तृत आहे. मनूनें सहा अनुलोम दिलेले नाहींत. अंबष्ठ, निषाद, व उग्र असे तीन दिलेले असून ब्राह्मण व क्षत्रिया, क्षत्रिय व वैश्या आणि वैश्य व शूद्रा, यांच्या संततीला त्यानें अनुल्लेखावरून पितृसावर्ण्यांतच घातलेलें आहे. प्रतिलोम पूर्वाचार्यांच्या प्रमाणेंच सांगितलेले नाहींत. मनूनें एकंदर तीन अनुलोम, सहा प्रतिलोम, वीस संकरजाति व चार वर्ण सांगितले असून, सुमारें तेवीस जातींचे धंदे सांगितले आहेत, ते असे :—

१ सैरिंध्र--वेणीफणी करणें, अंगसंवाहन व मृगादि वध.
२ मैत्रेय--सकाळीं घंटा वाजवून राजादींची स्तुति करणें.
३ मार्गव--दास-कैवर्त-(धंदा) नांवाचा धंदा करणें.
४ चर्मकार--चामडी व जोडे यांचा धंदा.
५ अंध्र व मेद--गांवाबाहेर राहून अरण्यपशु मारणें.
६ पांडुसोपाक--बुरुडाचा धंदा.
७ आहिंडिक--बंधनस्थानसंरक्षण.
८ सोपाक--फांशी देणें, वध्यघाती.
९ अंत्यावसायी--डोंबाचा स्मशानांतील धंदा करणें.
१० सूत--अश्वसारथ्य करणें.
११ अंबष्ठ--रोगशांत्यादि चिकित्सा.
१२ वैदेहक--अंतःपुरांतील स्त्रीकार्य.
१३ मागध--स्थल व पथवणिज्या.
१४ निषाद--मासे मारणें.
१५ आयोगव--सुतारकाम (पण कोणी नट व पाथर्वट म्हणतात.)
१६ चंचुमद्रु--अरण्यांतील पशु मारणें.
१७ क्षत्ता, उग्र, पुक्कस--या तीन जातींनीं बिळांतील उंदीर वगैरे मारणें.
१८ धिग्वण--ढोराचा धंदा.
१९ वेण--झांजा, ढोल वगैरे वाजविणें.
२० चांडाल, श्वपच, बहिर्वास, श्वगर्दभधन--प्रेतें पुरणें.

याशिवाय मनूनें सुमारें वीस संकर जाती सांगितल्या आहेत. तसेंच व्रात्य, ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य स्त्री पुरुषापासून उत्पन्न झालेल्या सुमारें पंधरा जाति उल्लेखिलेल्या आहेत.

याज्ञवल्क्य हा मनूनें न सांगितलेले मूर्धावसिक्त, माहिष्य व करण असे अनंतर अनुलोम सांगतो आणि अंबष्ठ, उग्र व निषाद यांचींही नावें देतो. सूत, मागध, वैदेह, आयोगव, क्षत्ता व चांडाल अशीं प्रतिलोमाचीं नावें त्यानें दिलेलीं आहेत. सहा अनुलोम व सहा प्रतिलोम यांशिवाय माहिष्यपुरुष व करणस्त्री यांपासून एक रथकार होतो, असें याज्ञवल्क्य म्हणतो. म्हणजे

चार वर्णाशिवाय तेरा जातींचा उल्लेख याज्ञवल्क्यानें केलेला आहे. याज्ञवल्क्यानंतर पराशरानें कांहीं फारसा जातिविचार सांगितलेला नाहीं. पण दास, नापित, गोपाल व आर्धिक या चौघांची उत्पत्ति तेवढी कोणच्याही स्मृतिकारानें न सांगितलेली, अशी सांगितली आहे. हे चार शूद्र अपवाद म्हणून भोजनास योग्य असें सांगितल्यापैकीं आहेत. वेदव्यास स्मृतीमध्यें तीन जन्मचंडाल सांगितले आहेत. एक शूद्र ब्राह्मणीसंभव, दुसरा कुमारीसंभव आणि तिसरा सगोत्र स्त्रीसंभव. व्यासांनीं शूद्रांचे धंद्यामुळें झालेले दहा प्रकारही सांगितले आहेत, ते असेः—वर्धकी, नापित, गोप, आशाप, कुंभकारक, वणिक, किरात, कायस्थ, मालाकार व कुटुंबी.

व्यासांनीं अंत्यजांचेही बारा प्रकार सांगितले आहेत. प्रथम आंगिरस पांच अंत्यज सांगतो, तर अत्रि सात सांगतो व पुढें व्यास स्मृतींत बारा अंत्यज आले हेंही चिंत्यच होय. लघु आश्वलायन स्मृतीमध्यें माहिषेय, वैकुंठ, वृषलेय अशा जाति व गोळकांचे कुंड व रंड असे दोन भेद सांगितले आहेत. औशनसस्मृति ही फार अर्वाचीन असावी. तीमध्यें बऱ्याच अलीकडील जातींचा निर्देश असून एकंदर अडतीस जातींची उत्पत्ति व त्यांचे धंदे हे या स्मृतींत सांगितलेले आहेत. या अडतिसांपैकीं राजरोस विवाहसंबंधानें झालेल्या जाति अठ्ठावीस असून, चौर्यकर्मानें झालेल्या जाति दहा दिलेल्या आहेत, त्या अशाः–रथकार, पुलिंद, रंजक, चक्री (तेली), भिषक्, कुंभकार निषाद, मणिकार, शूलिक, कटकार, इत्यादि. विवाह संबंध व उघड व्यवहारानें झालेल्या जातिः–सूत, वेणुक, चर्मकार, मागध, चांडाल, श्वपच, आयोगव, ताम्रोपजीवी, सूनिक, उद्बंधक, पुक्कस, रजक, नर्तक, वैदेहक, चर्मोपजीवी, सूचिक, मूर्धावसिक्त, नृप, गूढजातक, अंबष्ठ, पारशव, सूत (उत्पत्ति निराळी), उग्र, सूचक, तक्षक, मत्स्यबंधक, कटकार, व काकवच इत्यादि दिल्या आहेत. विस्तृतपणें जातींच्या उत्पत्तीचा विचार मनु व औशनस, यांनींच केला आहे. परंतु दोघांमध्यें जातींच्या नांवाचा, धंद्याचा व उत्पत्तीचाही मोठाच फरक आहे. त्यावरून मनु व औशनस या दोघांच्या कालीं जी परिस्थिति होती, तिचेंच प्रतिबिंब त्या जातिविचारावर पडलें आहे असें म्हणावें लागतें. मनूनें सांगितलेल्या कित्येक जाति औशनसानें सांगितलेल्या नाहींत. तात्पर्य आज हिंदुसमाजांत दिसणाऱ्या असंख्य जातींचा

उल्लेख धर्मशास्त्रग्रंथांत नाहीं, इतकेंच नव्हे तर सर्व स्मृतिकारांनीं दिलेल्या जातींची बेरीजही साठ व पाऊणशें यांच्यापुढें जात नाहीं. अर्थात् हिंदुसमाजांत आज ज्या जाती दिसतात त्यांची वाढ अगदां अलीकडील आहे व ती ईश्वर-कृत नाहीं हें निःसंशय होय. सर्व स्मृतिकारांमध्यें जाती, त्यांची उत्पत्ति व त्यांचे धंदे यांविषयीं एकवाक्यता आहे, हाही केवळ लोकांचा उगाच भ्रम आहे.

धर्मसूत्रें व स्मृति यांमध्यें एकंदर किती जाती दिलेल्या आहेत, त्यांतील वर्णज जाती किती आहेत याचें ज्ञान व्हावें म्हणून वर्णज जातींची दर्शक एक यादी देतों.

वर्णज जाति

क्रमांक	जाति	पिता	माता	वृत्ति	ग्रंथनाम
१	अन्त्यावसायी	शूद्र	वैश्या	...	वसिष्ठ १८
२	अंबष्ठ	ब्राह्मण	वैश्या	कृष्याजीवी, शस्त्रजीवी चिकित्सा (मनु १०–४७)	मनु. अ. १०
,,	,,	,,	,,	...	याज्ञवल्क्य १
,,	,,	,,	,,	...	बौधायन १, ९
,,	,,	,,	क्षत्रिया	...	वसिष्ठस्मृति १८
३	अवीर	क्षत्रिय	वैश्या (चौर्य)	...	बृ. वि. १६–४
४	आयोगव	शूद्र	वैश्या	रंगावतरण (बृ. वि. १६ काष्ठतक्षणं म. १०–४८	मनु १०–१२
,,	,,	वैश्य	क्षत्रिया	तन्तुवाद्य	औशनसस्मृति ६
,,	,,	शूद्र	वैश्या	...	याज्ञवल्क्यस्मृति अ. १
,,	,,	वैश्य	क्षत्रिया	...	बौधायनस्मृति १ व ९
,,	,,	शूद्र	,,	रंगावतरणं, शिल्पिजीवनम्	अग्निपुराण १५२, १२
५	आवन्त्य	व्रात्यब्राह्मण	सवर्णा	...	मनु १०, २१
६	उग्र	विप्र	शद्रा	नृपस्य दण्डधरः	औशनसस्मृति ६
६	,,	क्षत्रिय	,,	...	याज्ञवल्क्यस्मृति अ. १
,,	,,	,,	,,	गोधादिवधबंधनम् मनु १०–४९	मनु १०, ९

क्रमांक	जाति	पिता	माता	वृत्ति	ग्रंथनाम
६	उग्र	क्षत्रिय	वैश्या	...	वसिष्ठ स्मृति १८
७	कारुष	व्रात्यवैश्य	सवर्णा	...	मनु (१०–२३)
८	कुंभकार	विप्र	वैश्या (चौर्य)	कुलालवृत्ति किंवा नापितवृत्ति	औशनसस्मृति
९	क्षत्ता	शूद्र	क्षत्रिया	गोधादिवबंधनम् मनु १०–४९	मनु १०, १२
,,	,,	,,	,,	...	याज्ञवल्क्यस्मृति अ. १
,,	,,	,,	,,	...	बौधायनस्मृति (१, ९)
१०	क्षत्रिय	क्षत्रिय	वैश्या	...	,, ,,
११	खश	व्रात्यक्षत्रिय	सवर्णा	...	मनु १०, २२
१२	चाण्डाल	शूद्र	ब्राह्मणी	वध्यघातन	बृहद्विष्णु अ. १६
,,	,,	,,	,,	...	औशनसस्मृति ६
,,	चाण्डाल	शूद्र	ब्राह्मणी	...	मनु (१०, १२)
,,	,,	,,	,,	...	याज्ञवल्क्य अ. १
,,	,,	,,	,,	...	बौधायनस्मृति १
,,	,,	,,	,,	...	वसिष्ठस्मृति १८
,,	,,	,,	,,	वध्यघाती मृतचैलधारणम्	अग्निपुराण १५२, ११
१३	झल्ल	व्रात्यक्षत्रिय	सवर्णा	...	मनु १०, २२
१४	द्रविड	व्रात्यक्षत्रिय	सवर्णा	...	,, ,,
१५	नट	व्रात्यक्षत्रिय	सवर्णा	...	मनु १०, २२
१६	निच्छवी	,,	,,	...	,, ,,
१७	निषाद	ब्राह्मण	शूद्रा	आगमविद्याजीवी मत्स्यघात	औशनसस्मृति६ मनु १०,८

१७	निषाद	ब्राह्मण	शूद्रा (चौर्य)	दुष्टमृगहननं मांसविक्रय	औशनसस्मृ तिअ. ६
,,	,,	,,	,,	...	याज्ञवल्क्यस्मृति अ. १
,,	,,	,,	शूद्रा	...	बौधायनस्मृति १, ९
,,	,,	वैश्य	शूद्रा	....	वसिष्ठस्मृति अ. १८
१८	पारशव	ब्राह्मण	शूद्रा	आगमविद्याजीवि मत्स्यघात मनु १०–४८	मनु १०, ८ औशनसस्मृति ६
,,	,,	,,	,,	....	याज्ञवल्क्यस्मृति १
१९	पुल्कस	शूद्र	क्षत्रिया	मद्य विक्रयकारी	औशनसस्मृति ६
,,	पुक्कस	,,	,,	व्याधता	अग्निपुराण १५२, १२
२०	पुष्पध	व्रात्यब्राह्मण	सवर्णा	...	मनु १०, २१
२१	ब्राह्मण	ब्राह्मण	क्षत्रिया	...	बौधायन स्मृति
२२	भूर्जकंटक	व्रात्यब्राह्मण	व्रात्यब्राह्मणी	....	मनु १०, २१
२३	मल्ल	क्षत्रव्रात्य	सवर्णा	.....	मनु १०, २२
२४	मागध	वैश्य	क्षत्रिया	स्तुतिक्रिया, वणिक्पथ म. १०–४७	मनु १०, ११
					बृहद्विष्णु १६
,,	,,	शूद्र	क्षत्रिया	...	,,
,,	,,	वैश्य	ब्राह्मणी	ब्राह्मणक्षत्रियवृत्तित्वं प्रशंसा वैश्यप्रेष्यकर	...
,,	,,	शूद्र	वैश्या	...	बौधायनस्मृति १।९
२४	मागध	वैश्य	क्षत्रिया	...	याज्ञवल्क्यस्मृति
,,	,,	,,	,,	स्तुतिक्रिया	अग्निपुराण १५२–१२
२५	माहिष्य	क्षत्रिय	वैश्या	...	याज्ञवल्क्यस्मृति अ. १

क्रमांक	जाति	पिता	माता	वृत्ति	ग्रंथनाम
२६	मूर्धावसिक्त	विप्र	क्षत्रिया	...	,, ,,
२७	मैत्र	व्रात्यवैश्य	सवर्णा	...	मनु १०, २३
२८	रथकार	क्षत्रिय	(ब्राह्मणी चौर्य	...	औशनसस्मृति ६
,,	,,	वैश्य	शूद्रा	...	बौधायनस्मृति १।९
२९	वाटधान	व्रात्यब्राह्मण	व्रात्यब्राह्मणी	...	मनु १०, २२
३०	विजन्मा	(प्रतिलोम) व्रात्यवैश्या	...	...	मनु १०, २३
३१	वेलपार	शूद्र	क्षत्रिया	...	मनु १०, २३
३२	वैण	,,	,,	...	वसिष्ठस्मृति अ. १८
३३	वैदेहक	वैश्य	ब्राह्मणी	स्त्रीरक्षा, तज्जीवन	बृहद्विष्णु अ. १६
,,	,,	,,	,,	स्त्रीकार्य मनु १०-४७	मनु १०, ११
,,	,,	शूद्र	वैश्या	अजगोमहिषीपालन	...
,,	,,	वैश्य	ब्राह्मणी	...	याज्ञवल्क्यस्मृति
,,	,,	,,	,,	...	बौधायनस्मृति
,,	,,	,,	,,	स्त्रीजीवन	अग्निपुराण अ. १५२, ११
३४	शुण्डिक	विप्र	शूद्रा (चौर्य)	...	...
३५	शैख	व्रात्यब्राह्मण	सवर्णा	...	मनु १०, २१
३६	सात्वत	व्रात्यवैश्य	सवर्णा	...	मनु १०, २३
३७	सूत	क्षत्रिय	ब्राह्मणी	अश्वसारथ्य	बृहद्विष्णु १६
,,	,,	,,	,,	वैश्यवृत्ति	औशनसस्मृति ६

३७	सूत	क्षत्रिय	ब्राह्मणी	...	वसिष्ठ १८
,,	,,	,,	,,	...	याज्ञवल्क्यस्मृति १
,,	,,	,,	,,	...	बौधायनस्मृति १।९
,,	,,	,,	,,	अश्वसारथ्य	अग्निपुराण १५२–११
,,	,,	,,	,,	...	मनु १०–११
३८	सुधन्वाचार्य	व्रात्यवैश्य	व्रात्यवैश्या	...	मनु १०–२३

वर जी वर्णज जातींची यादी दिलेली आहे, त्यांची बेरीज अडतीस भरते. सूतसंहितानामक एक अर्वाचीन ग्रंथ आहे त्यांतील जातींची भर या वर्णज जातींमध्यें घातली तर एकंदर संख्या साठ होते. साठापेक्षां वर्णज जाती मुळींच अधिक नाहींत.

संकर जातींची संख्या सूतसंहितेंतील जातींसह जवळ जवळ अडुसष्ट सत्तर भरते. त्या यादींत अनिरवसित, निरवसित, शूद्र आणि चंडालादि अनेक अस्पृश्य अशा सगळ्यांची भरती झालेली आहे. जुन्या वृत्तीचे सनातनी लोक या सर्व जाती होत्या व आहेत असेंच समजतात. पण पुष्कळ जाती आणि संकर हे काल्पनिक वाटतात. त्याची चिकित्सा करण्याचें हें स्थळ नव्हे. मुख्य विधेय हें कीं शूद्राचा संबंध आल्यापासून अनुलोम, प्रतिलोम संततीची भाषा निघाली, उच्चनीचता उत्पन्न झाली आणि तेथूनच अधः-पातास प्रारंभ झाला. या र्व ओढाताणीमध्यें त्रैवर्णिकांनीं अनार्यांना आणि वरच्यांनीं खालच्यांना, प्रबलांनीं दुर्बलांना बरेंच त्रस्त केलें यांत शंका नाहीं. जन्मजात उच्चनीचतेच्या कल्पनेमुळें शिवाशीव ही समाजांत शिरली आणि प्रत्येक जात आपल्या खालच्या जातीचा अधिक्षेप करूं लागली.

वंशकल्पनेमुळें मूळ उच्चनीचता आली. मुख्य जातींमध्यें आचार, आहार, संस्कार, पारमार्थिक विचार, संप्रदाय, लढाया, उत्पात, क्रांत्या यामुळें अनेक पोटजाती उत्पन्न झाल्या. हे सर्व लहान लहान गट ईश्वर-कृत आहेत अशीही भ्रामक समजूत झाली, आणि प्रत्येक जात दुसऱ्या जातीशीं दुस्वासानें वागूं लागली.

जातिजातींतील या अशा झटापटी चालत असतांना त्रैवर्णिकांनीं विशेषतः ब्राह्मणांनीं संस्कृतीचा प्रसार नेटानें केला, त्याकरितां त्यागही केला, आणि समाजांत एकजिनसीपणा आणण्याचा यत्न केला. ब्राह्मण वर्गाचें या संस्कृतिप्रसाराच्या दृष्टीनें फार महत्त्व आहे. विधर्मी आणि विदेशी आक्रमणें झालीं, मोठे उत्पात झाले, अस्मानी सुलतानी झाली, तथापि ब्राह्मण वर्गानें चिकाटीनें जो अव्याहत संस्कृतिप्रसार केला, त्याचें स्वरूप पुढील प्रकरणांत रेखाटतों.

प्रकरण ४ थें

ब्राह्मणवर्ग व संस्कृतिप्रसार

हिंदु समाजांत सांस्कृतिक दृष्टचा ब्राह्मण हा मुख्य घटक आहे. या ब्राह्मणानें संस्कृतीच्या विकासामध्यें निरनिराळ्या काळीं कोणती कामगिरी केली हें शोधणें फार मनोरंजक आहे. वैदिक वाङमय हा मूळ पाया, त्यानंतर सूत्रें, स्मृति, पुराणें इत्यादि झालीं आणि संस्कृतीचा विकास झाला. आचार, व्यवहार व प्रायश्चित्त हीं सांगणारें जें धर्मशास्त्र तें खरोखरी समाजनियमनाचेंच शास्त्र होय. बौद्ध क्रांतीनें चातुर्वर्ण्यघटित समाजामध्यें मोठीच खळबळ केली असली पाहिजे. बुद्धोत्तर कालांत शक, यवन, हूण, पल्लव इत्यादि जे बाह्य अनेक लोक आले त्यांना आत्मसात् करून घेण्याचा इतिहासही मनोरंजक आहे. हिंदु समाजाला विशिष्ट स्वरूप येण्याला अनेक राजकीय व सामाजिक उलाढाली कारणीभूत झालेल्या आहेत हें निःसंशय होय. हिंदु संस्कृतीच्या उत्कर्षापकर्षाची मीमांसा करणाऱ्यांना आणि जातिभेदाचाही ठाव घेणाऱ्यांना वैदिक वाङमयांतच प्रवेश करावा लागतो. हिंदुसमाजाच्या घटनेचें खरें व शास्त्रीय स्वरूप पाहावयाचें असल्यास यच्चयावत् संस्कृत वाङमय अभ्यासिलें पाहिजे, आणि तेंही वेदकाल, ब्राह्मणकाल, सूत्रकाल, स्मृतिकाल व पुराणकाल असे विविध कालखंड पाडून अभ्यास केला पाहिजे. पण हें सर्व प्रस्तुत छोटचा ग्रंथामध्यें अशक्य आहे. कारण येथें गोवर्धन ब्राह्मणांचें मूळचें सत्‌ब्राह्मण्य समजावें म्हणून त्यांचाच फक्त इतिहास द्यावयाचा आहे. तथापि संस्कृतिप्रचाराच्या दृष्टीनें ब्राह्मणांनीं केवढें कार्य केलें हें येथें थोडें दाखवितों.

आर्यसंस्कृतीच्या चित्रपटांत ब्राह्मण हें पात्र फार महत्त्वाचें आहे. फार प्राचीन कालीं हा ब्राह्मण तापस अवस्थेमध्यें असावा. क्षत्रिय राजे अशा तापसाश्रमाला येऊन भेटत आणि ऋषींचा परामर्श घेत असत. बराच कालपर्यंत ब्राह्मण वर्ग तापस अवस्थेंत होता. तप, विद्या, ज्ञान, योग यांत निमग्न असणाऱ्या या वर्गाची क्षत्रियांना फार जरूर भासूं लागली. क्षत्रियांच्या आग्रहानें व आगमनानें हा वर्ग पुढें राजाश्रित झाला आणि नागर अवस्थेमध्यें

यानें पदार्पण केलें. राजपुरोहित, राजगुरु अशा नात्यानें नागरजीवनावर ब्राह्मणानें बराच सुसंस्कार केलेला दिसतो. ब्रह्म आणि क्षत्र या जोडीनें सहकार्यानें फार मोठी कामगिरी केलेली आढळते. बौद्धक्रांतीनंतर क्षत्रिय हे ब्राह्मणांचा मत्सर करूं लागले. बऱ्याच ब्राह्मणांचा राजाश्रय तुटला, आणि पुन्हा तापस अवस्थेंत जाणें अशक्य झाल्यामुळें ब्राह्मण हा नगरांतून ग्रामांत गेला व समाजाच्या जीवनाशीं तन्मय होऊन त्यानें संस्कृतीच्या प्रसारास प्रारंभ केला. भटाभिक्षुकांनीं पुष्कळ मूर्खपणाच्याही गोष्टी केल्या असतील, पण हें जें संस्कृतिप्रसाराचें कार्य या वर्गानें केलें त्याची योग्यता सर्वांत अधिक आहे.

संस्कृति शब्दाचा अर्थ सुसंस्कृतपणा, प्रगति, उच्चता, उच्च मनः-संस्कार हा आहे. संस्कृत म्हणजे चांगलें केलेलें. जातिराष्ट्रादि संघाचें साकल्य चरित व त्यानें केलेली प्रगति म्हणजे संस्कृति होय ! विकृति हा संस्कृतीचा प्रतियोगी शब्द आहे. म्हणून भाषा, शास्त्र, शस्त्र, धर्म, कला, समाज, ग्रंथ, साधु, दैवतें, यासंबंधानें जे उच्च विचार ती संस्कृति व हलके विचार ती विकृति होय. सिव्हिलिझेशन म्हणजे बाह्य सुधारणा होय. पण बाह्य सुधारणेला मनःसंस्कारांचा जो सुसंस्कृतपणा लागतो, त्यालाच संस्कृति म्हणतां येईल. मानव समाजाच्या विचारजन्य सर्व घडामोडींना सांस्कृतिक इतिहास असें म्हणतां येईल. मानव समाजाच्या जीवनाचीं जीं अनेक अंगें त्या सर्वांगांमध्यें संस्कृति भरलेली असते, इतका हा संस्कृति शब्दाचा व्यापक अर्थ आहे.

ब्राह्मण वर्गानें जाति व उपजातींत गुरफटलेल्या उच्चनीचता व शिवाशिव यांनीं अपवित्र झालेल्या हिंदुसमाजाच्या मनोवृत्तीमध्यें एकदेशाभिमान, एकराष्ट्र, एक भाषा, देवनागरी लिपी, सामायिक इतिहास, संस्कार, सणवार, उत्सव, क्षेत्रें, तीर्थें, पवित्र स्थानें, दैवतें, ग्रंथ, अशा सर्व क्षेत्रांत उच्च मनोवृत्ति उत्पन्न केली; एकरूपता आणली आणि समाजांत एकजिनसीपणा उत्पन्न केला. ब्राह्मण वर्गानें या मोठ्या भरतखंडांत वैदिक वाङमयाबद्दल आसेतुहिमाचलापर्यंत मोठा आदर उत्पन्न केला. वैदिक वाङमय, तन्मूलक संस्कृति याबद्दल भरतखंडाच्या चारी कोपऱ्यांत अशी आस्था उत्पन्न केली कीं मृत समजल्या जाणाऱ्या संस्कृत भाषेंत आज काशीपासून रामेश्वरापर्यंतचे

पंडित दोन दोन तास बोलूं शकतात. संस्कृत भाषासंभव संस्कृतीविषयीं भरतखंडाच्या कोपऱ्यांत जसा आदर उत्पन्न केला तशीच रामायण व भारत यासंबंधींही स्त्रियांत आणि सर्व हिंदु समाजांत पवित्र भावना उत्पन्न केली. स्त्रियांच्या तोंडीं भारत रामायणांतील गाणीं आढळतात. सामान्य जनतेंतसुद्धां भारत रामायणांतील आख्यानें सांगितलीं व ऐकलीं जातात. फार काय, हिंदु समाजाच्या अगदीं अर्धरानटी थरांमध्येंसुद्धां हें रामायण भारत गेलेलें आहे. वैदिक वाङ्मय, भारत, रामायण, संस्कृत भाषा व तज्जन्य संस्कृति याबद्दल जसा आदर उत्पन्न केला गेला तसाच तो भरत खंडांतील सर्व तीर्थें व क्षेत्रें यांविषयीं केला गेला. काशी, रामेश्वर, जगन्नाथ, द्वारका, या चारही दिशांस असणाऱ्या तीर्थांविषयीं कन्याकुमारी ते बद्रिकेदारपर्यंत एकच एक भावना उत्पन्न केली गेली. अयोध्या, मथुरा, माया, यांना जितका मान तितकाच मदुरा व श्रीरंगम् यांनाही मान आहे. गंगा व यमुना या नद्या जेवढ्या पवित्र तितक्याच तुंगा व कावेरी याही पवित्र मानतात. चार धाम, बारा ज्योतिर्लिंगें, सप्तपुऱ्या या सर्वांविषयीं पावित्र्याची एकच भावना ब्राह्मणांनीं उत्पन्न केली.

तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रांत भिन्नत्वात् अभिन्नता, भेदात् अभेद, अनेकत्वात् एकत्व उत्पन्न करून अनेक देव, अनेक पंथ, अनेक आचार यांमध्यें समन्वय उत्पन्न केलेला आहे. हिंदु समाजांतील सर्व पंथ मग ते वेदानुकूल वा वेदविरोधी असोत, त्यांमध्यें वेद हेंच केंद्र त्यांनीं उत्पन्न केलें. शिव, विष्णु, रुद्र, आदित्य, गणपती, राम, कृष्ण, विठ्ठल अशीं अनेक दैवतें असलीं तरी त्यांचा समन्वयानें विचार करण्याचें तत्त्वज्ञान ब्राह्मणांनींच उत्पन्न केलें. अस्तिकाप्रमाणें नास्तिकांना मान दिला. मनुष्यस्वभाव ध्यानांत घेऊन मानव्याच्या विकासार्थ व्यापक व उदात्त दृष्टीनें संस्कृतिप्रसार केला. पाहिजे तो देव भज, पाहिजे तें कर्म कर, पाहिजे त्या साधूस मान आणि वाटेल तें तत्त्वज्ञान ग्रहण कर; पण भक्तींत अहेतुकता, कर्मांत निष्कामता आणि तत्त्वज्ञानांत उदात्तता मात्र असली म्हणजे झालें. असें हें तत्त्वज्ञान समाजाच्या हाडींमाशीं खिळल्यामुळें त्याचा फार उपयोग झाला.

सबंध हिंदु जातीमध्यें एकाच तऱ्हेचें हिंदु व्यवहारशास्त्र आज रूढ आहे. रघुनंदन भट्टाचार्य, जीमूतवाहन, विज्ञानेश्वर या टीकाकारांत जरी

कांहीं मतभेद असले तथापि सर्वांचे प्रमाणग्रंथ एकच आहेत व त्यांचें मूळचें स्वरूप बदलूं न देण्याविषयींचें सर्वांचें धोरण एकच आहे. कायद्याप्रमाणेंच उत्सव, सण, जत्रा इत्यादि एकराष्ट्रीयत्वाचीं बंधनें आहेत. दसरा, दिवाळी आणि होळी हे सण हिंदुस्थानच्या कोणत्या प्रांतांत नाहींत? दिवाळीचा सण असा आहे कीं त्या वेळीं प्रत्येक झोपडींत कांहीं नाहीं तरी एखादी पणती पेटलेलीच दिसते. राखीबंधनाचा महोत्सवही या ना त्या स्वरूपांत सर्वत्र आहे. जगन्नाथाची रथयात्रा, अमृतसरची वैशाखी, कुंभ आणि अर्ध-कुंभ मेळे, श्रीशैल्य मल्लिकार्जुनाची शिवरात्रीची यात्रा, मकराची काशीची यात्रा, या सर्व यात्रा म्हणजे महापरिषदाच होत. त्यांच्या योगानें आपल्या जीवनाचा प्रवाह राष्ट्रामध्यें सतत वाहात ठेवला जात आहे. तात्पर्य, समान वाङ्मय, समान भाषा, समान दैवतें, व्रतें, यात्रा आणि उत्सव अशा या सर्व क्षेत्रांत जी एकरूपता दिसते आणि त्यामुळें हिंदु जातींत जो एकजिनसीपणा आला आहे, तो ब्राह्मणवर्गाच्या संस्कृतिप्रसारामुळेंच होय!

स्थान, इतिहास, आचार, आहार इत्यादि विविध क्षेत्रांत जशी एक-रूपता आढळते तशीच ती वैचारिक, तात्त्विक क्षेत्रांतही उत्पन्न झालेली आहे. सर्व जगांत 'विद्यानाम् अध्यात्मविद्या,' हाच सिद्धांत आहे. त्या अध्यात्म विद्येंत ब्राह्मणांनीं व क्षत्रियांनीं आपलें स्थान अढळ ठेवलेलें आहे. आर्य-संस्कृतीचा तत्त्वज्ञान हा एक अलंकार असून तें लेणें जगाच्या अंगावर चढ-विण्यासारखें आहे. 'सर्वं जगदिदं ब्रह्म' 'अहं ब्रह्मास्मि' आणि 'ममैवांशो जीवलोके जीवभूतः सनातनः' या वाक्यत्रयामध्यें आपलें सर्व तत्त्वज्ञान येतें. हें तत्त्वज्ञान चतुर्विध पुरुषार्थप्राप्तीच्या कोंदणांत बसविलें आहे. चतुर्विध पुरुषार्थप्राप्ति हेंच मानवी इतिकर्तव्य असा आर्यसंस्कृतीचा सिद्धांत आहे. हे पुरुषार्थ प्रत्येक स्त्रीपुरुषानें मिळवावयाचे आहेत; व प्रत्येकाला मिळवितां येतात. 'मनुतेति मनुष्यः' अशी मनुष्याची व्याख्या असून, स्त्री व पुरुष हीं दोन्ही तुल्यबल मानलेलीं आहेत. स्त्रीशिवाय पुरुष असर्व व पुरुषाशिवाय स्त्रीही असर्व म्हणजे अपूर्ण आहे. स्त्रीपुरुष या दोघांमध्यें अमुक श्रेष्ठ, अमुक कनिष्ठ असा संबंध नाहीं. हे दोघे एकमेकांचे पूरक आहेत व एकमेकांना तारक आहेत, असा आर्यसंस्कृतीचा तिसरा सिद्धांत आहेत. विवाहसंबंध हा अत्यंत पवित्र गणला असून विवाहित जोडप्यावर तीन ऋणें फेडण्याची

जबाबदारी ठेवलेली आहे. ऋणत्रय अपाकरण हा आर्यसंस्कृतीचा चौथा सिद्धांत आहे.

देव, ऋषि आणि पितर यांचें ऋण, कर्म, ज्ञान व प्रजा यांनीं फेडावयाचें, असें सांगितलें आहे. कर्तव्यकर्मानें देवांना संतुष्ट करून, ज्ञानानें ऋषींचें तर्पण करून, प्रजोत्पादनानें पितरांना संतुष्ट करणें, हें प्रत्येक माणसाचें कर्तव्य म्हणून सांगितलेलें आहे. तीन ऋणें फेडणें या एकाच वाक्यांत कुटुंब, समाज व राष्ट्र यासंबंधाचीं कर्तव्यें येतात. देशभक्ति, देशकार्य हेंसुद्धां यांतच येतें. वैवाहिक स्थिति म्हणजे गृहस्थाश्रम. कुटुंब हाच समाजाचा मुख्य घटक होय. प्रथम कुटुंब मग समाज आणि राष्ट्र, अशी ही कर्तव्यपरंपरा ओघानें येते. धैर्य, क्षमा, दम, अस्तेय, पावित्र्य, इंद्रियनिग्रह, दैवी संपत्ति, निर्भयता, शील हीं सर्वसामान्य नीतितत्त्वें सर्वत्र रूढ केलीं आहेतच. कर्मफल प्रक्रिया, ईशतत्त्वाचें अमरत्व, सर्वभूतहितैक्य, सर्वभूतहिततत्परता अशीं अनेक तत्त्वरत्नें ब्राह्मणांनीं आतांपर्यंत पुढें मांडलेलीं आहेत.

या संस्कृतिप्रसारामुळें उदात्त दृष्टि आली, जात्युत्कर्ष मानला गेला, खालच्या वर्गानें आपली उन्नति करून घेतली, आणि वरच्या थरांमध्यें जाऊन बसण्याची पात्रता सिद्ध केली! ज्या धर्मशास्त्रांत खालच्या वर्गाविषयीं इतके निर्बंध सांगितले त्यांतच खालच्या वर्गाची म्हणजे शूद्र व चंडालादींची उन्नति कसकशी होत गेली, हें सांगितलेलें आहे. त्याचें विवेचन करण्याचें हें स्थळ नव्हे.

धर्मशास्त्रप्रयोजक, पौराण वाङ्मय आणि अर्वाचीन साधुसंत या सर्वांच्या साह्यानें संस्कृतीचा प्रसार फारच झपाट्यानें झाला. बुद्धक्रांतीनें जरी थोडा पायबंद घातला तथापि इस्लामचा प्रतिकार करतां करतां संस्कृतीचा प्रसारही पुष्कळ झाला. परकीय सत्तेशीं टक्कर देतांना स्वास्थ्य नसल्यामुळें विशेष प्रगति झाली नाहीं, तथापि जी संस्कृति होती ती टिकविली गेली. इंग्रजी राज्यांत ज्ञानाचीं व वाहतुकीचीं साधनें फार वाढल्यामुळें नव्या नव्या कल्पना वेगानें प्रसृत पावत आहेत, आणि सबंध हिंदुसमाज हा ढवळला जात आहे.

ज्ञानाची आजची गति व स्थिति पाहिली, संस्कृतीचा आढावा घेतला तर यापुढें वर्णसंस्थेचें कार्य राहिलें नाहीं, जातिसंस्थेचेंही काम संपलें आहे,

अर्थात् याहून उच्चतर अशा समाजघटनेची आकांक्षा उत्पन्न झाली आहे हें उघड दिसतें. अर्थात् हें कार्य करण्याकरितां ब्राह्मण वर्गानें संघटितपणें पुढें यावयास पाहिजे.

भविष्यकालांत हिंदुसमाजाची पुनर्घटना करण्याकरितां पुष्कळ बुद्धिमंतांप्रमाणें ब्राह्मणांतील विचारवंतही पुढें आले पाहिजेत. हिंदुसमाजांतील जो जो विचार करण्यास समर्थ आहे, तो तो झाडून विचारास आलाच पाहिजे. मग ज्या ब्राह्मणवर्गानें आजवर संस्कृतिप्रसार केला, समाजाला एकरूपता आणली, समाजाचा विचार केला, त्या वर्गानें आपण **सर्व ब्राह्मण एक** या भावनेनें पुढें यावयास नको काय ? पण हाच ब्राह्मण वर्ग जर द्राविड आणि गौड, देशस्थ नि कोकणस्थ असल्या भिकार आणि संकुचित कल्पनेंत गुरफटून बसला तर त्याचेकडून ही कामगिरी होईल काय ? उच्च विचार, उच्च संस्कृति हें जें ब्राह्मणाचें लक्षण तें लुप्त होतां कामा नये. यापुढें आपसांतील पोटजाती वाढविणें, त्यांना तुच्छ लेखणें, त्यांचा छळ करणें, असल्या हीन वृत्तींत ब्राह्मण वर्गानें गुरफटून जातां कामा नये. अशा हीन मनोवृत्तीनें ब्राह्मणांतील जातिजातींत कशीं वैमनस्यें उत्पन्न होतात, कशीं ग्रामण्यें माजतात, आणि एका जातीवर तिच्या दौर्बल्यामुळें कसा अन्याय होतो, हें समजावें व फिरून असल्या हीन कर्मांत ब्राह्मणांनीं पडूं नये, म्हणूनच गोवर्धन ब्राह्मणांचा इतिहास येथें देणार आहे.

बृहन्महाराष्ट्रांतील ब्राह्मणवर्गाला आपल्यांतील पोटजातीमुळें कशी विघटना उत्पन्न होत आहे, त्यामुळें कशी अवनति होत आहे हें समजावें, आणि या ब्राह्मण पोटजाती किती अज्ञानमूलक आहेत याची जाणीव व्हावी म्हणून पंचद्रविड ब्राह्मणांतील पोटजातींची थोडी माहिती येथें देतों.

प्राचीनकालीं चार वेदांचें अध्ययन करणारे ब्राह्मणांचे चार वर्ग असावेत. कारण यज्ञसंस्था जोरांत होती आणि होता, अध्वर्यु, उद्गाता व ब्रह्मा अशा चौघांची यज्ञकर्मांत फार जरूर होती. म्हणून प्राचीनकालीं ऋग्वेदी, यजुर्वेदी, सामवेदी व अथर्ववेदी अशा चौघांमध्यें शरीरसंबंधही होत असत. अध्ययनवैशिष्टयामुळें हे चार वर्ग पृथक् पृथक् निर्माण झाले यांत शंका नाहीं. पुढें भगवान् व्यासांनीं मतिदौर्बल्य पाहून वेदांच्या शाखा केल्या, पुढें एकेका शाखेचें ब्राह्मण अध्ययन करूं लागले. तात्पर्य, शाखावैशिष्टयामुळें ब्राह्मणां-

मध्यें वर्गीकरण झालें. या वर्गीकरणाला श्रौत व गृह्यसूत्रांनीं दृढता आणली. सांप्रत अस्तित्वांत असलेल्या कांहीं ब्राह्मण जातींना कण्व, माध्यंदिन, मैत्रायणी, जाबाल, व चरक अशीं नांवें आहेत, तीं शाखांचींच होत.

भारतीय युद्धापर्यंत वेदमूलक, शाखामूलक व सूत्रमूलक भेद ब्राह्मणामध्यें होते. भारतीय युद्धानंतर ब्राह्मण समाजांत बरींच आंदोलनें झालीं व स्थानवैशिष्टचही उत्पन्न झालें. श्रौत विद्येचा लोप होऊं लागल्यावर स्मार्तकर्माचा उत्कर्ष झाला. पुष्कळ ब्राह्मण लढाया करून राजन्य वर्गावर ताण करूं लागले. या वर्गाला गृहस्थ व गृह्यकर्मे व संस्कार कर्मे करणाऱ्या वर्गाला भिक्षुक अशीं नांवें पडलेलीं दिसतात. एकमेकांबद्दल अनुदारपणाची मत्सरमूलक भाषा जी आज भिक्षुकांबद्दल दिसते तशीच ती वैदिक वाङ्मयांतही आढळते. विश्वामित्र, हरिश्चंद्र, जमदग्नि, वसिष्ठ, बृहस्पति, शुक्र, आंगिरस, आदित्य, आणि याज्ञवल्क्य, वैशंपायन यांच्या तोंडून निघालेले उद्‌गार भिक्षुकी मत्सराचेच द्योतक दिसतात. यावरून पुढें वेद, शाखा, सूत्र, स्थान व पौरोहित्य यामुळें ब्राह्मणांत भेद उत्पन्न झाले, असें दिसतें.

बुद्धोत्तर क्रांतीनंतर आहार, आचार, उपास्य, व परमार्थमत यामुळें ब्राह्मणांत भेद उत्पन्न झाले. पंचद्राविड व पंचगौड हे भेद तर आहारमूलक असून बाराव्या शतकानंतरचे आहेत. ब्राह्मणांमध्यें पूर्वी आडनांवें नव्हतीं. तींही मध्ययुगांत गोत्रावरून पडूं लागलीं. बुद्धोत्तर कालांत शक, यवन, हूण यांच्या उत्पातामुळें पुष्कळसे ब्राह्मण क्षत्रियांच्या आश्रयानें विंध्यपर्वत ओलांडून दक्षिणेस वसाहती करण्याकरितां आले. अशा या पळापळीच्या काळांत जेवढे जेवढे समुदाय एका भागांतून दुसऱ्या भागांत आले तेवढ्यांनीं आपली शुद्धि दृढ राहावी म्हणून स्वसमूहबाह्यांशीं शरीरसंबंध वर्ज केले. यामुळें देशभेदानें ब्राह्मणांतील पोटजाती दृढ झाल्या. मध्ययुगांत या पोटजाती एकोणतीस होत्या असा आधार मिळतो.

सांप्रत बृहन्महाराष्ट्रांत विद्यमान असलेले ऋग्वेदी ब्राह्मण सर्वांत जुने आहेत. विशेषतः दक्षिण महाराष्ट्रांत त्यांची संख्या अधिक आहे. वऱ्हाड, मध्यप्रांत, खानदेश भागांत यजुर्वेदी अधिक आहेत. अगस्तिऋषि ऋग्वेदी होते व त्यांनींच दक्षिणेंत प्रथम ऋग्वेद आणला; आणि गोवर्धन प्रांतांत वसाहत केली असा उल्लेख सांपडतो. ऋग्वेदाच्या शाखा थोड्या व कर्मकांडाशीं

संबंधही बेताचा म्हणून त्यांची संख्या अल्प आहे. ऋग्वेदी ब्राह्मणांत स्मार्त व वैष्णव असे अर्वाचीन संप्रदाय आहेत. ऋग्वेद्यांच्या पाठोपाठ हिरण्यकेशी शाखीय व तैत्तीरीय आपस्तंब शाखीय ब्राह्मण समाज दक्षिणेंत आलेला दिसतो. दक्षिण महाराष्ट्रांत ऋग्वेदी अधिक तर तेलंगणांत तैत्तीरीय आपस्तंब हे अधिक आहेत. हिरण्यकेशीयांमध्यें चित्पावन व देवरुखे यांतील बरेच ब्राह्मण आहेत. बरेचसे चित्पावन व देवरुखे ऋग्वेदीही आहेत.

बुद्धोत्तर क्रांतीनंतर राजगुरु व राजपुरोहित या नात्यानें क्षत्रियांबरोबर अनेक यजुर्वेदी ब्राह्मण दक्षिणेंत आले. यजुर्वेदाचा विस्तार मोठा, शाखाही पुष्कळ म्हणून त्यांचा विस्तारही सर्वत्र आहे. पंचगौडांतील सारस्वत आणि आद्य गौड हे मूळचे यजुर्वेदी असून दक्षिणेंत येऊन ऋग्वेदी झाले आहेत. सामवेदी हे ठाणें जिल्ह्यांत थोडेसे आहेत. अथर्ववेदी हे सातारा जिल्ह्यांत पाचवड, चिंधोलीकडे पूर्वी होते. सांप्रत महाराष्ट्रांत विद्यमान असलेल्या ब्राह्मण जाती नर्मदोत्तर प्रदेश, तेलंगण, गुजराथ व कर्नाटक अशा निरनिराळ्या भागांतून आलेल्या आहेत. गोवर्धन ब्राह्मण हे सर्वांत जुने ब्राह्मण होत. गोवर्धनांचें प्राचीन वास्तव्य नाशिक व लगतचा गोदाकांठ या ठिकाणीं होतें. यादव व तत्पूर्व आंध्रभृत्य या घराण्यांचें पौरोहित्यही या घराण्यांकडे होतें. मुसलमानांच्या स्वाऱ्यांमुळें पुष्कळ परागंदा झालेले ब्राह्मण दक्षिणेंत आले. आद्य गौड सामंतप्रभु यानें याच वेळीं कुडाळ देशांत येऊन वसाहत केली. अल्लाउद्दीनाच्या स्वारीनंतर रामदेवरायाचा मुलगा बिंबराजा याच्या आश्रयानें कित्येक यजुर्वेदी ब्राह्मण उत्तर कोंकणांत घुसले. मोंगलाईंतून कात्यायनीशाखीय नगर जिल्ह्यांत आले. त्रिगर्त देशांतील त्रिगुळ, कर्नाटकांतील सहवासी वैष्णव, जंबुकण्व, किस्ती, पल्लेवाळ वगैरे नेमाडांतून वऱ्हाडांत आले; आणि अगदीं अलीकडे चित्पावन ब्राह्मण शिद्दीच्या त्रासामुळें कोंकणांतून देशांत आले ! तात्पर्य बृहन्महाराष्ट्रांत विद्यमान असलेल्या ब्राह्मण जाती आपत्ति, क्रांति व उत्पात यामुळें एकत्र झाल्या असून त्यांच्यामध्यें जे भेद आहेत ते कृत्रिम, अनीश्वर, व माणसांनीं केलेले आहेत. हे भेद यापुढें ठेवण्याचें मुळींच कारण नाहीं. आज बृहन्महाराष्ट्रांत उपलब्ध असलेल्या पंचद्राविड ब्राह्मण जातींची सामान्यतः वर्गवारी अशी आहे :—

वेद	शाखा	सूत्र	जाति
१ ऋग्वेद	शाकल	आश्वलायन	१ देशस्थ स्मार्त
	,,	,,	२ ,, वैष्णव
	,,	,,	३ सहवासी वैष्णव
	,,	,,	४ चित्पावन
	,,	,,	५ कऱ्हाडे
	,,	,,	६ पद्ये
	,,	,,	७ भट्टप्रभू
	,,	,,	८ देवरुखे
	,,	,,	९ जवळ (खोत)
	,,	,,	१० क्रमवंत
	,,	,,	११ गोवर्धन
२ कृष्णयजुर्वेद	१ तैत्तीरीय	सत्याषाढ	१ चित्पावन
	,,	(हिरण्यकेशी)	१ देवरुखे
	,,	आपस्तंब	१ देशस्थ स्मार्त
	,,		१२ तिरगूळ
	,,		१ गोवर्धन
	२ मैत्रायणी	मानवसूत्र	१३ मैत्रायणी
	३ चरक	वाराह	१४ चरक
	४ तैत्तिरीय	बौधायन	१५ हविक
३ शुक्लयजुर्वेद	१ कण्व	१ कात्यायन श्रौतसूत्र	१६ कण्व
		२ पारस्कर गृह्यसूत्र	१७ जंबूकण्व
२ शुक्लयजुर्वेद	१ माध्यंदिन	,,	१८ माध्यंदिन
	,,	,,	१९ उत्तर कोकणस्थ माध्यंदिन
	,,	,,	२० वाजमाध्यंदिन
	,,	,,	२१ किस्ती
	,,	,,	२२ पल्लेवाळ

	१ कात्यायन		,,	२३ कात्यायन (कास्त)
	१ जाबाल		,,	२४ नार्मदीय
३ सामवेद	१ राणायनी व कौथुमी	१ गोभिल २ दाह्यावण गृह्यसूत्रें १ लाटचायन श्रौत		२५ सामवेदी
४ अथर्वण	१ शौनकी		,, ,,	२६ अथर्वण
४	११	११		२६

प्रांतवार अंदाजीं पंचद्राविड ब्राह्मणांची संख्या :—

मुंबई इलाखा	५०००००
वऱ्हाड मध्यप्रांत	२०००००
निजामचें राज्य	१०००००
ग्वाल्हेर, इंदोर, बडोदें व इतरत्र	२०००००
	१००००००

एकूण दहालक्ष पंचद्राविड ब्राह्मणांची संख्या आहे.

पंचगौड ब्राह्मणांची अंदाजीं संख्या

१ कुडाळ देशकर आद्यगौड ऋग्वेद शाकलशाखा सूत्र आश्वलायन	३५०००
२ सारस्वत ब्राह्मण ,, ,, ,,	६६४९७
३ जुझोतिया माध्यंदिनशाखा कात्यायन व पारस्कर सूत्र	१५००
	१०२९९७

हा एवढा बुद्धिमान ब्राह्मण समाज मत्सर, विघटना आणि अनेकत्व यामुळें दुर्बल झालेला आहे. स्मार्तांनीं वैष्णवांना हिणवावें, वैष्णवांनीं स्मार्तांना अस्पृश्य समजावें; चित्पावनांना कोके, चिपळे, चितेपासून झालेले तर कऱ्हाड्यांना कर्कोटक, तक्षक, मारक असें म्हणावें; देशस्थांना अस्ताव्यस्त म्हणावें, माध्यंदिनांना बुद्धिहीन म्हणावें; गोवर्धनांची गोळक म्हणून टर करावी, तर देवरुख्यावर असाच कांहीं तरी आरोप करावा; असा प्रकार चालू

आहे. कोणी जवळांना तुच्छ लेखतो, कोणी तिरगुळांना दूर लोटतो, चरका-बद्दल विपरीत ग्रह उत्पन्न करतो, व आभिराबद्दल अनुदार बोलतो. एवंच कोणी कोणाशीं मिळून नाहीं, एकजीव नाहीं, त्यामुळें सहकार्य नाहीं. ब्राह्मण परिषदेनें सर्व ब्राह्मणांचें ऐक्य व्हावें म्हणून अकोला येथें यत्न केला. पण चमत्कार असा कीं कांहीं जातींनीं तेव्हांपासून आपापले वेगळे गट केले, म्हणजें संघटनेऐवजी विघटनेसच प्रारंभ झाला. ही गोष्ट अत्यंत अनिष्ट आहे. यापुढें तरी बुद्धिमान अशा ब्राह्मणांनीं ही प्रथा बंद केली पाहिजे.

सांप्रत विद्यमान असलेल्या ब्राह्मणांमध्यें अनेक भेद आहेत. पैकीं स्मार्त, वैष्णव हा भेद उपासनामूलक आहे. सहवासी वैष्णव, चित्पावन, कऱ्हाडे, गोवर्धन, देवरुखे, तिरगूळ व आभीर हे भेद देशभेदमूलक आहेत. जवळ ऊर्फ खोत, किस्ती ऊर्फ रणावट, कात्यायन ऊर्फ कास्त व तिरगूळ हे भेद व्यवसायमूलक आहेत. भट्टप्रभू, क्रमवंत, गोवर्धन, उत्तर कोंकणस्थ माध्यंदिन, वाजमाध्यंदिन हे भेद ग्रामण्यमूलक व मत्सरमूलक आहेत. सामवेदी व अथर्वण हे भेद वेदमूलक असून, माध्यंदिन, आपस्तंब, कात्यायन, जावाल, चरक, मैत्रायणी हे भेद वेदशाखामूलक आहेत. निरनिराळ्या देशांतून आलेल्या ब्राह्मणांमध्यें आचारभेदही पुष्कळ होते. म्हणून आचारभेदामुळें ब्राह्मणजाती निरनिराळ्या झाल्या. तेलंगणांतील ब्राह्मण तिकडील कांहीं आचार घेऊन आले तर कर्नाटकांतील ब्राह्मण मातुलकन्या–परिणयासारखी चाल घेऊन आले. ह्या आचारांचा गुजराथेंतून आणि नर्मदोत्तर प्रदेशांतून आलेल्या ब्राह्मणांच्या आचारांशीं मेळ बसेना. म्हणून देशभेदाला आचार-भेदानें दृढ केलें. देशभेद, आचारभेद, उपास्यभेद, व्यवसायभेद, यांना वज्रलेप करण्याचें श्रेय मत्सरमूलक ग्रामण्यांनीं घेतलें. या ग्रामण्यांतूनच उपा-हासात्मक म्हणी, वाक्प्रचार, दंतकथा, आख्यायिका व ग्रंथ हलाहल विषा प्रमाणें प्रसूत झाले. अर्थात् त्याच्या चटक्यांतच आज प्रत्येक ब्राह्मणजात विशेषत: अल्पसंख्य ब्राह्मण जाती पोळत आहेत. ही स्थिति शोचनीय आहे. ब्राह्मणांनीं यापुढें इतरांना धडा घालून देण्याकरितां एकजीव झालें पाहिजे. सर्व पोटजाती अन्न व लग्नव्यवहार करून एक केल्या पाहिजेत आणि जन्मजात कसलीही उच्चनीचतेची भावना न ठेवतां **आपण सर्व ब्राह्मण एक**, अशी घोषणा केली पाहिजे.

आतां तरी ब्राह्मणी आपणाला । शहाणें करावें ॥

अज्ञानानें आजवर झालें तें पुष्कळ झालें. आतां ज्ञानाचा रवि उगवला, चिकित्साबुद्धि उत्पन्न झाली, अंधश्रद्धा नष्ट झाली, बुद्धिनिष्ठता अधिक वाढली, ज्ञानाचीं साधनें व द्वारेंही वाढलीं, म्हणून या ज्ञानयुगांत ब्राह्मणांनीं शहाणे होऊन इतर ब्राह्मण जातींसंबंधाचे दुष्ट पूर्वग्रह सोडले पाहिजेत, समजुती बदलल्या पाहिजेत, इतरांना आपल्या समान लेखलें पाहिजे व यांतच खरें शहाणपण आहे.

अस्पृश्याचें दुःख हें त्यालाच कळतें. बालविधवेचें दुःख हें इतरांना समजत नाहीं. त्याचप्रमाणें ग्रामण्यानें पोळलेल्या जातींचें दुःख इतरांना कळत नाहीं. 'जावें त्याच्या वंशा तेव्हां कळे' ही म्हण खरी आहे. म्हणून कोणत्याही गोष्टीशीं तादात्म्य पावून विचार करावा. पंचद्राविडांतील ज्या गोवर्धन जातीचें दुःख ज्यामुळें अधिक झालेलें आहे तें कारण समजावें म्हणून त्यांच्या माहितीकडे वळतों.

प्रकरण ५ वें

दंडकारण्यांतील गोवर्धन प्रदेश म्हणजेच अर्वाचीन महाराष्ट्र

सर्व जगांत अत्यंत प्राचीन वाङमय म्हणजे वैदिक वाङमय होय! जगांतील सप्ताश्चर्यांपेक्षां अत्यंत मोठें आश्चर्य म्हणजे ख्रिस्तपूर्व चार हजार वर्षांचें वाङमय आज जसेंच्या तसें पठणपाठण परंपरेनें उपलब्ध आहे हें होय! हें वाङमय म्हणजे मोठा समुद्र आहे. संशोधकांनीं जन्मच्या जन्म घालवून जरी असंख्य रत्नें यांतून बाहेर काढलीं, तथापि या अथांग रत्नाकरांतील रत्नें कधींच संपत नाहींत! हा वेदसागर अथांग असला तरी त्यांतून कांहीं

कांहीं सिद्धांत निश्चित झालेले आहेत. त्यांपैकीं हे सर्व मंत्रद्रष्टे ऋषी उत्तरेस सप्त सिंधूच्या कांठीं आणि गंगा व यमुना यांच्या कांठच्या प्रदेशांत राहात होते हा होय.

वैदिक वाङमय अत्यंत प्राचीन, आणि वैदिक आर्यांची वसाहत उत्तरेस, एवढें निश्चित झाल्यावर आर्यांच्या वसाहती दक्षिणेंत कसकशा झाल्या, दक्षिणेंत हे आर्य कधीं आले वगैरे विचार क्रमानेंच येतात. साधारणतः पद्धत अशी दिसते कीं अग्निहोत्र हें त्या काळच्या संस्कृतीचें मोठें प्रतीक होतें. ब्राह्मण हे अग्निहोत्रपुरस्सर वसाहती करीत असावेत. अग्निहोत्राला तीन अग्निकुंडें लागत व त्यांमधील प्रांताला वेदी म्हणत. या वेदीमध्यें चातुर्वर्ण्यविहीन लोक येऊं लागले म्हणजे क्षत्रिय त्यांचा प्रतिकार करीत. याप्रमाणें आधीं अग्निहोत्र व पुढें त्या निमित्तानें देशाचें आक्रमण या पद्धतीनेंच वैदिक आर्यांनीं उत्तरेकडून दक्षिणेकडे आणि सर्वत्र वसाहती केल्या असाव्यात असें सर्व विद्वानांचें अनुमान आहे. पाश्चात्य संस्कृति आधीं बायबल, मागून तागडी व शेवटीं तलवार अशी प्रसरण पावणारी जशी आज दिसते तशीच जवळ जवळ आर्य संस्कृतीची स्थिति असावी.

वेदकालीन आर्य हे अनादि कालापासून या हिंदुस्थानांतच राहणारे, त्यांचें मूलस्थान हिंदुस्थानच. येथूनच ते जगावर विजिगीषीनें आक्रमण करण्यास गेले असले पाहिजेत. प्राचीन कालीं दक्षिणापथांत म्हणजे दंडकारण्यांत एकंदर मनुष्यवस्तीच कमी असावी असें दिसतें. या अरण्यांत जे मनुष्य-भक्षयक, रानटी लोक रहात, त्यांनाच राक्षस म्हणत. अशा राक्षसांचा निःपात करून ज्या आर्यक्षत्रिय वीरानें अगदीं दक्षिणेपर्यंत दिग्विजय केला व आपल्या संस्कृतीचा झेंडा लंकेच्या पलीकडे नेऊन रोवला, तो वीर म्हणजे दाशरथी रामचंद्र हा होय. या दृष्टीनें रामाचें ऐतिहासिक महत्त्व फार आहे. पण तें पाहणें येथें अप्रस्तुत असल्यामुळें उत्तरेकडून आर्यांची वसाहत दक्षिणेंत कसकशी झाली हेंच थोडक्यांत येथें पाहूं.

आर्यावर्तांतून आर्यांची वसाहत दक्षिणेंत म्हणजे दंडकारण्यांत झाली. गंगा व यमुना यांच्या कांठच्या प्रदेशांत अथवा सरस्वती व दृषद्वती यांच्या मधील टापूंत वेदकालीन आर्य राहात असत, या संबंधानें मतभेद नाहीं. वैदिक

आर्य हे ज्या प्रदेशांत राहात असत त्या प्रदेशाच्या सामान्यतः सीमा पुढील दोन ऋचांवरून निश्चित होतात.

तृष्टामया प्रथमं यातवे सजुः सुसर्त्वा रसया श्वेत्या त्या ।।
त्वं सिन्धो कुभया गोमतीं क्रुमुं मेहत्न्वा सरथं याभिरीयसे ।।

—ऋग्वेद १०।६।७५

यस्येमे हिमवन्तो महित्वा यस्य समुद्रं रसयो सहाहुः ।।
यस्येमा प्रदिशो यस्य बाहू कस्मै देवाय हविषा विधेम ।।

—ऋग्वेद १०।१०।१२१

त्या अशा :—

पश्चिमेस कुभा (हल्लींची काबूल नदी), नदीपासून पूर्वेस गंगानदीपर्यंत आणि उत्तरेस हिमालयापासून तों पश्चिम समुद्रापर्यंत म्हणजे आर्यांची वसाहत पंजाबांत व गंगानदीच्या कांठच्या प्रदेशांत होती. आर्यांचीं प्राचीन वसतिस्थानें धर्मसूत्र व स्मृति यांवरून नामतः भिन्न भिन्न असलीं तरी तीं सर्व उत्तरेकडेच होतीं याविषयीं शंका नाहीं.

गङ्गायमुनयोरन्तरमित्येके ।। २८ ।। बौधायन ।
पश्चात्सिन्धुर्विधरणी सूर्यस्योदयनं पुरः ।
यावत्कृष्णा विधावन्ति तावद्धि ब्रह्मवर्चसमिति ।।३०।। बौधायन ।
सरस्वतिदृषद्वत्योर्देवनद्योर्यदन्तरम् ।
तं देवनिर्मितं देशं ब्रह्मावर्तं प्रचक्षते ।।१७।। मनु अ. २

वरील श्लोकावरून हें सुस्पष्ट दिसतें कीं, गंगा, यमुनेच्या मधील प्रांताला पूर्वी आर्यावर्त म्हणत असत; आणि सरस्वती (पंजाबांतील हल्लींची सरसुटी) व दृषद्वती (सरहिंद प्रांतांतील सांप्रतची चौऊतुंग) या दोन नद्यांच्या मधला अर्थात् हल्लींचा सरहिंद प्रांत हाच होय !

कुरुक्षेत्र, मत्स्यदेश, पंचाल आणि शूरसेन प्रांत यांत आर्यांची वसति पुढें पुढें झाली. म्हणून या देशांसही त्यांनीं ब्रह्मर्षिदेश असें म्हटलें आहे.

कुरुक्षेत्रंच मत्स्याश्च पंचालाः शूरसेनकाः ।।
एष ब्रह्मर्षि देशो वै ब्रह्मावर्तादनन्तरम् ।। मनु २।१९ ।।

कुरुक्षेत्र हें फार प्राचीन काळापासून पवित्र मानलें गेलें आहे. हें कुरु-क्षेत्र म्हणजे हल्लींचें पतियाळा संस्थान व दिल्ली प्रांताचा पूर्वेकडील भाग होय. गीतेंत 'धर्मक्षेत्रे कुरुक्षेत्रे' असा विशेषण विशेष्य भाव दाखविला आहे. वर सांगितलेला ब्रह्मावर्त हा प्रदेश कुरुक्षेत्राचे वायव्य सरहद्दीवर आहे.

ये वसन्ति कुरुक्षेत्रे ते वसन्ति त्रिविष्टपं ।

असें याचें महत्त्व आहे.

यानंतरची आर्यांची वसाहत आर्यावर्तांत झाली. उत्तरेस हिमालयापासून तों दक्षिणेस विंध्याद्रीपर्यंत म्हणजे हिमालय व विंध्याद्रि या दोन पर्वतांमधील प्रदेशांत पुढें आर्यांनीं संपूर्ण वसाहत केली. पूर्वसमुद्रा-पासून पश्चिम समुद्रापर्यंत सर्व प्रदेश आर्यांनीं व्यापला.

हिमवद्विन्ध्ययोर्मध्यं यत्प्राग्विनशनादपि ।
प्रत्यगेव प्रयागाच्च मध्यदेशः प्रकीर्तितः ॥ २१ मनु अ. २ ॥
आसमुद्रात्तु वै पूर्वादासमुद्रात्तु पश्चिमात् ।
तयोरेवान्तरं गिर्योरार्यावर्तं विदुर्बुधाः ॥ २२ मनु अ. २ ॥

हें मनूनें वरील दोन श्लोकांत स्पष्ट केलें आहे. आर्यावर्त म्हणजे आर्यांनीं वेढलेला प्रदेश, असा या शब्दाचा अर्थ अष्टाध्यायी अ. २ पाद ४ सूत्र १० यावरील पातञ्जल महाभाष्यांत दिलेला आहे.

आर्यावर्ताची दक्षिण सीमा विंध्याद्रि. हा पर्वत अतिशय उंच असल्यामुळें तो सूर्याच्या गतीस अडथळा करतो अशी त्या काळीं समजूत होती. म्हणूनच विंध्याद्रिपर्वत ओलांडून दक्षिणेकडे येण्याचें साहस पुष्कळ काळपर्यंत करवलें नाहीं. विंध्याद्रीच्या एका टोंकाला पारियात्र म्हणजे यात्रेची परिसीमा असें जें आर्यांनीं अन्वर्थक नांव दिलें त्यावरूनही या पर्वताचें दुर्लंघ्यत्वच सिद्ध होतें.

मनुष्याची आकांक्षा ही दुर्दम्य असते. हल्लीं जसें गौरीशंकराचें शिखर गांठण्याकरितां धाडसी वीरांचे ताफेच्या ताफे मृत्युमुखांत उड्या घेत आहेत, तद्वतच प्राचीन कालीं विंध्याद्रीला उल्लंघण्याचें कार्य अनेकांनीं केलें असावें. कांहीं कालानंतर अगस्ति ऋषींनीं त्यांत यश मिळविलें व त्यांनीं त्या विंध्याचलाला आपला शिष्यच बनविला. दंडकारण्यांत (दक्षिणापथांत) हल्लींच्या उत्तर महाराष्ट्रांत पहिली वसाहत अगस्ति ऋषींनींच केली !

त्यांनीं दंडकारण्यांत गोदावरीचे कांठीं आपला आश्रम स्थापून दक्षिणेकडे वसाहती करण्याचा मार्ग मोकळा केला. अगस्ति ऋषि हे मोठे तपस्वी, तत्त्ववेत्ते व अद्वितीय धनुर्योद्धे होते म्हणूनच त्यांची वसाहत टिकली, हें सांगावयास नकोच.

प्राचीन काळच्या ऐतिहासिक लेखांवरून या दंडकारण्याला दक्षिणापथ, गोवर्धन, गोपराष्ट्र अशीं नांवें आढळतात. हा प्रांत पूर्वीं भयानक अरण्यानें व्याप्त व हिंस्र पशूंनीं युक्त असाच होता. जुन्या ग्रंथांत सह्याद्रि व गोदावरी नदी हीं दोन्ही दंडकारण्यांत आहेत असें म्हटलें आहे. त्यावरून महाराष्ट्राचें प्राचीन नांव दक्षिणापथ हेंच असावेंसें वाटतें.

दंडकारण्य हें भयंकर अरण्य विंध्याद्रीच्या दक्षिणेस लांबवर पसरलेलें होतें. ह्यांत सह्याद्रि हा लांबट पसरलेला पर्वत व गोदावरी ही नदी होती. ह्या ठिकाणीं मोठमोठाले गगनचुंबित वृक्ष, भयंकर हिंस्र पशूंचा सुळसुळाट, रानवट, जंगली नि भयंकर क्रूर अशा राक्षस आदिकरून रानटी नि मनुष्यभक्षक जातींच्या तुरळक वसाहती होत्या. अगस्त्यमुनि हे अद्वितीय धनुर्योद्धे असल्यानें त्यांच्या अनुष्ठानास विघ्न करणाऱ्या राक्षसांस ते कडक शिक्षा करीत असत; म्हणूनच त्यांचा राक्षसांवर दरारा असे. त्यानंतर दंडकारण्यांत तपानुष्ठानाकरितां गौतम महामुनि, भरद्वाजमुनि व आणखी कांहीं ब्रह्मर्षि आले. राक्षस जातींच्या रानटी व मनुष्यभक्ष्यक लोकांकडून ब्रह्मर्षींच्या तपानुष्ठानांस विघ्नें होत असत.

दंडकारण्याची स्थिति ही वरीलप्रमाणें पूर्वीं फार भयप्रद होती. यासंबंधानें रामायणांत वर्णन आहे. श्रीरामचंद्र पितृआज्ञापरिपालनार्थ वनवासास निघाला; तो विंध्याद्रि ओलांडून दक्षिणापथांत आला.तेथें तपानुष्ठान करणाऱ्या ऋषींनीं त्यास सांगितलें कीं, " राघवा, या मोठ्या भयंकर अरण्यांत राक्षसांचा सुळसुळाट आहे. हे राक्षस व त्यांच्या सारखे दुसरे क्रूर मनुष्यभक्ष्यक रानटी लोक नाना प्रकारचीं सोंगें घेऊन तापसी जनांना फसवितात, आणि त्यांस मारून खातात. तस्मात् हे राघवा, तूं आमचें त्यांच्यापासून संरक्षण कर. इत्यादि वर्णन पुढील श्लोकावरून दिसतें.

वनस्य तस्य संचारं राक्षसैः समभिप्लुतम् ।
रक्षांसि पुरुषादानि नानारूपाणि राघव ॥ १८ ॥

वसन्त्यस्मिन्महारण्ये व्यालाश्च रुधिराशनाः ।
अदन्त्यास्मिन्महारण्ये तां निवारय राघव ॥ १९॥
--वा. रामायण कां. २ स. ११९

तपस्वी मुनींची वरील प्रकारची प्रार्थना ऐकून—

प्रविश्य तु महारण्यं दंडकारण्यमात्मवान् ।
रामो ददर्श दुर्धर्षस्तापसाश्रम मण्डलम् ॥ १ ॥
--वा. रामायण कां. ३ स. १

स्वतःचे पराक्रमावर ज्याचा विश्वास आहे असा तो प्रभु राम दंडकारण्यांत शिरला. त्या महान् घोर अरण्यांत रामानें तपानुष्ठान करणाऱ्या मुनींचे अनेक आश्रम पाहिले. नंतर फिरत फिरत तो अगस्तिमुनींच्या आश्रमांत प्रविष्ट झाला. श्रीरामचंद्रानें अगस्ति मुनींना आपलें वनांत येण्याचें कारण सांगितलें आणि बहुत कालपर्यंत सुखानें राहतां येईल असें रम्य स्थान दाखविण्याविषयीं विनंति केली. तेव्हां अगस्ति ऋषी म्हणाले हे रामचंद्रा–

इतो द्वियोजने तात बहुमूल फलोदकः ॥
देशो बहुमृगः श्रीमान् पञ्चवटयाभिविश्रुतः ॥ १३ ॥
स देशः श्लाघनीयश्च नाति दूरेच राघव ॥
गोदावर्याः समीपेच मैथिली तत्र रम्यते ॥ १८ ॥
—वा. रामायण कां. ३ सर्ग १३

'माझ्या या आश्रमापासून जवळच, चार कोसांचे अंतरावर, गोदावरी नदीच्या कांठीं, पंचवटीनामक रम्य स्थळीं तूं आपला सुंदर आश्रम कर.' तें ऐकून श्रीरामानें सह्याद्रीच्या उत्तर भागाच्या आसमंतात् ज्यांतून गोदावरी नदी वाहत्ये, त्या रम्य अशा गोवर्धन नामें प्रदेशांत पंचवटीनामक स्थळीं आपला आश्रम बांधला.

अगस्ति ऋषींच्या सांगण्याप्रमाणें श्रीरामचंद्रानें गोदावरीच्या कांठीं गोवर्धन प्रांतांत आश्रम स्थापला, आणि तो तेथें सीता व लक्ष्मण यांसह वास्तव्य करूं लागला. तो प्रांत एकंदरींत रामाला फारच चांगला वाटला. कारण तेथें ऋषींचे आश्रम होते व त्यांत वेदघोष चालत असे. त्या आश्रमांचें वर्णन पुढीलप्रमाणें आहे.

बलिहोमार्चितं पुण्यं ब्रह्मघोषनिनादितम् ।
पुष्पैश्चान्यैः परिक्षिप्तं पद्मिन्यासहपद्मया ॥ ६ ॥
फलमूलाशनैर्दान्तैश्चीर कृष्णाजिनाम्बरैः ॥
सूर्यवैश्वानराभैश्च पुराणैर्मुनिभिर्युतम् ॥ ७ ॥
पुण्यैश्च नियताहारैः शोभितं परमर्षिभिः ।
तद्ब्रह्मभवनप्रख्यं ब्रह्मघोष निनादितम् ॥ ८ ॥
ब्रह्मविद्भिर्महाभागैर्ब्राह्मणैरुपशोभितम् ।
तद्दृष्ट्वा राघवः श्रीमांस्तापसाश्रममंडलम् ॥ ९ ॥
अभ्यगच्छन् महातेजा विज्यं कृत्वा महद्धनुः ॥ १० ॥

—वा. रामायण अरण्यकांड स. १

नित्य जप, होम वगैरे कर्मे यथासांग करणारे पुण्यवान् वेदांचें अध्ययन व अध्यापन करणारे सदाचारसंपन्न, फळें, मुळें, कंद इत्यादींवर निर्वाह करणारे, वस्त्रें व कृष्णाजिनें पांघरणारे, ज्ञानवृद्ध, सूर्याग्निसम तेजस्वी, फार दिवसांपासून राहात असणारे असे जे परमश्रेष्ठ ब्रह्मर्षि म्हणजे आर्यावर्तातील ब्राह्मण त्यांचे आश्रम त्या प्रदेशांत म्हणजे वर उल्लेखिलेल्या सह्याद्रीच्या जवळच्या गोदावरी नदीच्या कांठच्या गोवर्धन देशांत सर्वत्र असलेले पाहून, व तो देश, तपस्वी, सद्गुणी व वेदांत चर्चा करणाऱ्या ब्राह्मणांनीं सुशोभित असलेला, वेदांच्या अध्ययनानें निनादित झालेला असा, 'तद् ब्रह्मभवनप्रख्यम्' ब्राह्मणांच्या वसाहतीमुळें प्रख्यातीस आलेला (म्हणजे ब्राह्मणांच्या वसाहतीमुळें ज्याला नामाभिधान प्राप्त झालें असा, अगर ब्राह्मणांनीं वसाहत करून नांव दिलें असा) तो (गोवर्धन) देश रमणीय व फलफुलांनीं समृद्ध असलेला पाहून, तेथें श्रीराम बहुतकाळपर्यंत राहिले. पुढें त्यांनीं ब्राह्मणांना उपद्रव देणाऱ्या राक्षसादि क्रूर जातींचा विध्वंस करून टाकिला, व दंडकारण्य निर्वैर केलें.

वाल्मिकी रामायणांतील वरील उताऱ्यावरून सह्याद्रीजवळच्या गोदावरी नदीकांठच्या प्रदेशांत श्रीरामचंद्र राहिले. त्या प्रदेशाला त्या वेळीं गोवर्धन असें हें नांव असावें. गोवर्धन असें नांव रामायणांत वाल्मिकीनें दिलेलें आढळत नसलें तरी प्राचीन अशीं मत्स्य, मार्कंडेय व वायु इत्यादि जीं पुराणें आहेत त्यांमध्यें या देशाचा गोवर्धन असाच उल्लेख आढळतो.

तो उल्लेख फारच महत्त्वाचा आहे. सर्वांत वायुपुराण हें प्राचीन व कमी प्रक्षेप झालेलें असें समजतात, म्हणून त्यांतीलच उतारा प्रथम देतों.

सह्यस्य चोत्तरार्धे तु यत्र गोदावरी नदी ॥
पृथिव्यामिह कृत्स्नायां स प्रदेशो मनोरमः ॥ ११२ ॥
देशो गोवर्द्धनो नाम सुरराजेन निर्मितः ॥
रामप्रियार्थं स्वर्गोऽयं वृक्षा ओषधयस्तथा ॥ ११३ ॥
भरद्वाजेन मुनिना तत्प्रियार्थेऽवतारिताः ॥
अन्तःपुरवनोद्देशस्तेन जज्ञे मनोरमः ॥ ११४ ॥

——वायुपुराण पूर्वार्ध अ. ४५

सह्याद्रीच्या उत्तर भागाच्या आसमंतात्, ज्यांतून गोदावरी नदी वाहते, तो गोवर्धन नामक देश नैसर्गिक शोभायमानतेनें सर्व पृथ्वीवर अत्यंत रमणीय असा आहे. रामाला संतुष्ट करावें ह्या हेतूनें, त्याच्या पत्नीच्या सुखाकरितां भरद्वाज मुनीनें स्वर्गांतील वृक्षवल्ली त्या प्रदेशांत निर्माण करविल्या. त्या योगानें तें एक मनोहर उद्यानच झालें.

वायुपुराणाइतकेंच मत्स्यपुराण प्राचीन समजतात. त्या पुराणांतही सह्यपर्वताशेजारी गोदावरी नदी व तिच्या कांठचा मनोरम असा गोवर्धन प्रदेश वगैरे वर्णन त्याही पुराणांत आलेलें आहे.

सह्यस्यानन्तरे चैते यत्र गोदावरी नदी ।
पृथिव्यामपि कृत्स्नायां स प्रदेशो मनोरमः ॥ ३७ ॥
यत्र **गोवर्धनो नाम मन्दरो** गन्धमादनः ॥
रामप्रियार्थं स्वर्गीया वृक्षा दिव्यास्तथौषधीः ॥ ३८ ॥
भरद्वाजेन मुनिना प्रियार्थमवतारिताः ॥
स च **गोवर्धनो देशस्तेन** जज्ञे मनोरमः ॥ ३९ ॥

—मत्स्यपुराण अ. ११४

सह्याद्रीच्या जवळचा, ज्यांतून गोदावरी नदी वाहते, तो गोवर्धन नांवाचा प्रदेश, सर्व पृथ्वीवर अत्यंत रमणीय आहे. रामाला संतुष्ट करावें ह्या हेतूनें व त्याच्या पत्नीच्या सुखाकरितां भरद्वाज मुनीनें स्वर्गांतील वृक्षवल्ली त्या देशांत उत्पन्न करविल्या होत्या. त्या योगानें, तो गोवर्धन

नांवाचा मोठा देश सुगंधी पुष्पांच्या व अमृततुल्य फळांच्या समृद्धीनें अत्यंत मनोरम असें जणूं उद्यानच शोभूं लागला.

अशा त्या रमणीय व फलपुष्पांनीं समृद्ध अशा देशांत श्रीरामचंद्र आश्रम बांधून राहिले असें वर म्हटलेंच आहे. मत्स्यपुराणांत वैदर्भ, दंडक, माहिषक, गोवर्धन, अश्मक व रूपवाहित अशीं नांवें आढळतात, हें पुढील श्लोकावरून स्पष्ट होतें.

महाराष्ट्रा माहिषका वैदर्भा दंडकैः सह ॥
गोवर्धनश्चाश्मकाश्च मालवारूपवाहिताः ॥ ४० ॥

——मत्स्यपुराण अ. ११४

यांतील वैदर्भ प्रांत म्हणजे हल्लींचा वऱ्हाड प्रांत होय. माहिषक म्हणजे महिषपुर, मालव म्हणजे माळवाप्रांत, (घाटमाथ्यावरील मावळ प्रांत नव्हे) गोवर्धन म्हणजे नाशिकाच्या आसपास मोठा प्रांत, अश्मक म्हणजे देवगिरी-जवळचा प्रदेश आणि दंडक म्हणजे दंडकारण्यांतील अवशिष्ट भाग; अशा रीतीनें हे देश हल्लीं आपणांस ओळखतां येतात.

वायु व मत्स्य पुराणांमध्यें जसा गोदावरी कांठच्या गोवर्धन प्रदेशाचा उल्लेख आहे तसाच तो मार्कंडेय पुराणामध्येंही आहे.

सह्यस्य चोत्तरेयास्तु यत्र गोदावरी नदी ।
पृथिव्यामपि कृत्स्नायां स च देशो मनोरमः ॥ ३४ ॥
गोवर्धनपुरं रम्यं भार्गवस्य महात्मनः ॥ ३५ ॥

——मार्कंडेय पुराण अ. ५४

सह्याद्रीच्या उत्तर भागांत, गोदावरी नदीच्या कांठीं, महात्मा भार्गव-मुनींनीं गोवर्धनपुर या नांवाचें रमणीय शहर वसविलें आहे; तो गोवर्धन देश सर्व पृथ्वींत मनोरम असा आहे.

येथपर्यंत आर्यांची वसाहत उत्तरेकडून दक्षिणेंत कशी झाली, गोदावरी कांठच्या रमणीय प्रदेशाला गोवर्धन देश, गोवर्धनपुर हें नांव कसें देण्यांत आलें, या देशांत ब्राह्मणांचे आश्रम कसे स्थापले गेले, याचें विवेचन झालें. आतां मध्ययुगांतील इतिहासामध्यें कांहीं आधार सांपडतात ते पाहूं.

मध्ययुगांतील इतिहासावर प्रकाश पाडणारे अधिकृत ग्रंथ म्हणजे डॉ. भांडारकरकृत दख्खनचा इतिहास आणि अलीकडे कुलगुरु चिं. वि. वैद्य-

कृत प्रसिद्ध झालेले मध्ययुगीन भारतादि ग्रंथ होत. प्रथम डॉ. भांडारकरांच्या ग्रंथाधारें गोदावरी कांठच्या प्रदेशाला गोवर्धन, गोपराष्ट्र, गोराष्ट्र हींच नांवें होतीं, अशाविषयीं जे उल्लेख सांपडतात त्यांचा निर्देश करतों.

डॉ. भांडारकरकृत दख्खनचा इतिहास
(ना. वि. बापटकृत मराठी भाषांतर)

पान ८––मार्कंडेय पुराणांत गोवर्धनाला पुर (नगर) म्हटलें आहे. वायु व मत्स्य पुराणांचा आशय पाहतां गोवर्धन हा पर्वत होता असें दिसतें. गोवर्धन ह्याची जी संस्थिति सांगितली आहे, तीवरून हल्लीं नाशकाजवळ त्या नांवाचें जें खेडें आहे तेंच हें असलें पाहिजे. सारांश तीं तीन पुराणें नाशकाशीं, रामाच्या पंचवटीच्या तादात्म्याशीं किंवा अभेदाशीं परिपोषक आहेत अशींच समजलीं पाहिजेत.

पान ३२––अशोकाच्या सत्तेखालीं रॅस्टिक भोज, पेटेनिक चोल, पांड्य वगैरे देश नव्हते. (हे सर्व देश दक्षिणेकडील आहेत. यांचा अंतर्भाव पुढें महाराष्ट्रांत झालेला असावा).

पान २५––दक्षणापथ हेंच पूर्वीं महाराष्ट्राला नांव असावें. महाराष्ट्र हें नांव अर्वाचीन, तें जुन्या पुराणांत आढळत नाहीं.

आरकॅलॉजिकल सर्व्हे ऑफ वेस्टर्न इंडिया नंबर १० या ग्रंथांतील नं. १३ ते २७ पर्यंतचे जे शिलालेख आहेत व ज्यांचा उल्लेख दख्खनच्या इतिहासाच्या मराठी भाषांतराच्या चौथ्या भागांत डॉ. भांडारकरांनीं वरचेवर केला आहे, त्यांत गोवर्धनाचें नांव ४।५ वेळां तरी आलेलें आहे.

नं. २५ जुन्नर येथील शिलालेख––' महाक्षत्र व नहपान राजाधिराज याचा प्रधान यानें एक नवीन तलाव खोदविला व एक वसतिशाला बांधविली. तो प्रधान वत्सगोत्री होता ' हा वत्सगोत्री **ब्राह्मण गोवर्धन असावा.** कारण त्या वेळीं त्या **भागांत वृत्यंशी गोवर्धन ब्राह्मणच होते.**

नं. २६ चा शिलालेख––' नवनरचा अधिपति (नगराचा अधिपति) वासिष्ठी पुत्र पुलभाई हा गोवर्धन येथील आपल्या सर्वाक्षदल नामक प्रतिनिधीस किंवा अधिकाऱ्यास आज्ञा करतो कीं ... दान दिलेलें गाव भिक्षूंना आवडत नाहीं म्हणून दुसरें गांव दान देत आहों. इत्यादि. '

दख्खनच्या इतिहासाचें मराठी भाषांतर (पा. ४१) याच लेण्यांतील पुढील पडवीच्या डाव्या अंगच्या भिंतीवर दुसरा लेख आहे. त्याचा उद्देश पाहतां तें धनकटकाचा अधिपति गौतमीपुत्र शातकर्णी यानें **गोवर्धनांतील** विजय पावलेल्या सैन्याच्या तळावरून त्या **गोवर्धनांतील** आपला प्रतिनिधी (अधिकारी) विष्णुपालितनामा यास लिहिलेलें आज्ञापत्र आहे. त्यांत दान केलेल्या शेताच्या उत्सर्गाविषयीं खुलासा आहे.

पान ४२—याशिवाय सुखवस्तु अशा गृहस्थांचीं धार्मिक कृत्यें ज्यांत लिहून ठेवलीं आहेत असे कांहीं शिलालेख नाशिकजवळच्या लेण्यांत आहेत. **त्यांतही गोवर्धन शब्द** आलेला आहे.

पान ९९—इ. स. २९२ ते ३०२ च्या सुमारास आभिर अथवा गवळी यांचें राज्य असलें पाहिजे. यांच्या राष्ट्राला **गोपराष्ट्र** म्हणत. हें **गोपराष्ट्र** नाशिकच्या **पूर्वेस खानदेशाकडे** असावें. वायुपुराणावरून आभिरांच्या हातीं राजसत्ता सडुसष्ट वर्षें होती असें दिसतें. या अनुमानाला ग्रंथकर्त्यानें रा. ए. सो. मुंबई व्हाल्यूम ७ नं. १५ चा उतारा प्रमाण म्हणून दिलेला आहे.

नाशिक पंचवटी महात्म्य या नांवाचें २० वर्षांपूर्वीं छापलेलें एक लहान पुस्तक आहे. त्यांत पहिल्या पानावर नाशकाजवळ गोवर्धन गांव असल्याचा उल्लेख आहे.

पान १०२—आभिरांनीं कांहीं कालपर्यंत (महाराष्ट्रावर) अंमल केला हें खरें. परंतु तो त्या देशाच्या केवळ एका भागावर होता. गोपाळ किंवा गवळी यांच्या राज्याची दंतकथा आहे. त्यावरून नाशिक व खानदेश यावरच त्यांचें राज्य असावें. आजचा खानदेश व नाशिक हा प्रांत यालाच गोपराष्ट्र आणि **गोवर्धन** अशा संज्ञा कांहीं कालपर्यंत होत्या.

पान ९३—पैठण व तगर याशिवाय नाशिक हें त्या काळीं एक नगर होतें. त्याच्याजवळील एका लेण्यांतील एका शिलाशासनांत तसेंच बेडसे येथील शिलालेखांत त्याचा उल्लेख आहे. त्या नगराच्या म्हणजे **नाशिक शहराच्या आसपासच्या प्रांताला गोवर्धन असें म्हणत.**

वर दिलेल्या उताऱ्यावरून हें सिद्ध आहे कीं, नाशिकाजवळच गोवर्धन नांवाचा प्रांत होता. गोवर्धन पर्वत अद्याप तेथें आहे. डॉ. भांडारकरांनीं मत्स्य, वायु व मार्कंडेय पुराणांनाच प्रमाण मानलेलें आहे. अर्वाचीन महा-

राष्ट्राला पूर्वी दक्षिणापथ हें नांव होतें ; अर्थात् या दक्षिणापथांतच गोवर्धन प्रांत होता.

डॉक्टरांनीं जे शिलालेख उद्धृत केले आहेत त्यांमध्यें गोवर्धन प्रांताचा, गोवर्धन ब्राह्मणांचा, गोवर्धनांतील सैन्याचा, गोवर्धनांतील आपल्या प्रतिनिधींचा, गोपराष्ट्राचा निर्देश स्पष्ट व वरचेवर आलेला आहे. त्यावरून नाशिक शहरच्या आसपासच्या प्रांताला मध्यकालांतही गोवर्धन हेंच नांव होतें, असें सिद्ध होतें.

आतां कुलगुरु चिं. वि. वैद्य यांच्या मध्ययुगीन भारताच्या ग्रंथामध्यें काय आधार मिळतात तें पाहूं.

या ग्रंथकर्त्यांनीं मध्ययुगीन भारत पु. २ पृ. २११ वर गौतमीपुत्र शातकर्णी याच्या आज्ञेसंबंधाचा एक शिलालेख एपिग्राफिका इंडिया यावरून छापला आहे. त्यांत गोवर्धनाचा अमात्य सामक असे स्पष्ट शब्द आहेत. त्यावरून सामक हा गोवर्धन प्रांताचा अमात्य होता हें सिद्ध आहे. तो शिलालेख मूळ प्राकृत व मराठी अर्थासह येथें देतों.

(एपिग्राफिका इंडिया पु. ८ लेखांक २९ पा. ७३

सिधं । गोवर्धने आमचस सामकस देये राजाणितो रओ गौतमीपुतस सातकणिस महादेवीयच जीवसुताय राजमातुय वचनेन गोवर्धने...च सामको अरोगवतवो ततो एवच वतवो एथ अम्हेहि पवते तिरण्टुम्हि अम्हदानें लेणे एतिवसातण पवजितान भिरवून गामे करवडिसु पुवखेंत दत तच खेत... कसतें सोच गामो न वसति एवंसातिय दानि एथ नगर सीमे राजकं खेत अम्हसतकं ततो एतेस पवजितान भिरवूनं तेरन्हुकानं ददम खेतस निवतनसतं तसच रतेस परिहार वितराम अवावेस अन्नोमस अलोणखादस अरठसविनयिक सवजातपरिहारिकच एवेहि न परिहारखिय लोटाय छतो लेखो सवछरे २४ वासान पख ४ दिवस पचमे ५ सुजीविना कटानिबधो निबधो सवघरे २४ गिम्हाण पखे २ दिवसे १० (म. यु. भा. पु. दु. २११).

एपिग्राफिका इंडिया पु. ८ लेखांक २९ पा. ७३ वरील मराठी अर्थ.

"सिद्धि असो. **गोवर्धनचा अमात्य** सामक याला गौतमीपुत्र शातकर्णी राजाची तशीच पुत्रवती राजमाता महाराणी हिची यांची आज्ञा द्यावयाची कीं, सामकाला, सरळपणें आज्ञा कळवून सांगावयाचें कीं, 'आम्ही यातिरन्हु

पर्वतावर पूर्वी लेण्यांत राहणाऱ्या भिक्षूंना करवडि गांवांतील शेत दान दिलें होतें. पण तें शेत आतां नांगरीत नाहींत व गांवांतही वसति नाहीं. असें असल्यामुळें येथें आमच्या नगराच्या सीमेवर असलेल्या शेतांपैकीं शंभर निवर्तनें जमीन तिरन्हु येथील भिक्षूंना देतों, व त्याबरोबर त्यांत कोणी अधिकाऱ्यानें कोणत्याही कारणानें प्रवेश करूं नये, मिठासाटीं त्यांत खणूं नये इत्यादि सर्व प्रकारचे निर्बंध घालितों. हे सर्व निर्बंध व शेताचें दान बरोबर नोंदून ठेवावीं. ही आज्ञा तोंडी दिली."

कुलगुरु वैद्य यांचा दुसरा सर्वमान्य ग्रंथ म्हणजे महाभारताचा उपसंहार हा होय! या ग्रंथांत अर्वाचीन महाराष्ट्राचा म्हणजे ज्या प्रांताला आज आपण महाराष्ट्र समजतों त्याचा उल्लेख नाहीं. म्हणजे महाभारतकाळीं हा प्रांतच नव्हता असें नसून अनेक देश–गोपराष्ट्र, मल्लराष्ट्र वगैरे या महाराष्ट्रांत मोडत असत असें म्हटलें आहे. स्पष्ट कल्पनेकरितां तो विस्तृत उताराच येथें देतों.

चिं. वि. वैद्यकृत महाभारताचा उपसंहार

पृ. ५७९ —" विदर्भानंतर महाराष्ट्राचा विचार सहजच येतो. परंतु सबंध महाभारतांत महाराष्ट्राचें नांव नाहीं. त्यावरून त्याचा जन्मच झाला नव्हता असें मानतां येत नाहीं. विदर्भांत जशी भोजांची वस्ती होती, तशीच महाराष्ट्रांत यादवांची वस्ती त्या वेळीं होती, असें मानण्यास हरकत नाहीं. महाराष्ट्राचे लहान लहान भाग त्या वेळीं होते. त्याला मोठें स्वरूप अद्याप आलें नव्हतें. महाराष्ट्रांतील लहान भागांचीं नांवें महाभारतांत आलीं आहेत तीं रूपवाहित, अश्मक, पांडुराष्ट्र, गोपराष्ट्र व मल्लराष्ट्र हीं होत, असें म्हणण्यास आम्हांस संशय वाटत नाहीं. विदर्भानंतर यांचींच नांवें या यादींत आहेत. त्यांतील राष्ट्र शब्द महत्त्वाचा आहे."

वरील तिन्हीं राष्ट्रें महाराष्ट्रांत अन्तर्भूत झालीं असावींत. गोवर्धन ब्राह्मणांचा वरील गोपराष्ट्राशीं संबंध असावा. गोपराष्ट्रांत राहून गोवर्धन करणारे ते गोवर्धन ब्राह्मण असा अंदाज आहे.

वरील ग्रंथकारानें मध्ययुगीन भारत भाग १ पहिलीं हिंदु राज्यें, पुस्तक २ पा. १६५ मध्यें पुढीलप्रमाणें म्हटलें आहे.

'आर्यांची पहिली वसाहत विदर्भांत झाली. पुढें ते गोदावरीच्या काठानें पैठणापर्यंत पसरले. पैठणाला त्यांनीं प्रयाग बनविलें. गोदावरीच्या कांठचा मुलूख विजयशाली आर्यांना फार आवडला. गोदावरीला त्यांनीं गंगेच्या जोडीस बसविलें. येथील प्रांतांना त्यांनीं राष्ट्र हें नांव दिलें. त्यांचीं नांवें गोपराष्ट्र, पांडुराष्ट्र, मल्लराष्ट्र, अशीं महाभारतांत दिलीं असून हीं तीन व अश्मक मिळून आजचा महाराष्ट्र झालेला आहे."

राजारामशास्त्री भागवत--मराठ्यांसंबंधानें चार उद्गार पा. १४०.

एव्हां जो देश मराठ्यांचा आहे तेथें पूर्वीं गोप या नांवाचे लोक होते. हरिवंशांत गोपराष्ट्र यादवांच्या इतिहासांत आलेलें आहे. (पूर्वीचें गोपराष्ट्र हल्लींच्या महाराष्ट्रांत अन्तर्भूत झालेलें आहे.)

या सर्व प्रदर्शित आधारांवरून असें सिद्ध होतें कीं गोवर्धन देश कोंकणांत नसून प्राचीन काळीं महाराष्ट्राच्या बऱ्याच मोठ्या भागाला गोवर्धन हें नांव होतें. इ. सनाच्या तिसऱ्या चौथ्या शतकानंतर गोवर्धन प्रांताला सांप्रतचें रूढ महाराष्ट्र हें नांव पडलें असावें, असें डॉ. भांडारकरांसारख्या संशोधकांचें मत आहे. व त्याचाच अनुवाद चिं. वि. वैद्य, इतिहासकार सरदेसाई वगैरे करतात.

प्रकरण ६ वें

गोवर्धन ब्राह्मणांचें गोवर्धन प्रांतांत वास्तव्य

गेल्या प्रकरणांत ब्रह्मर्षि देश, ब्रह्मावर्त, आर्यावर्त वगैरे स्थानांचें वर्णन धर्म, सूत्रें व स्मृति यांचे आधारें केलेलें वाचकांस विदित आहेच. त्यांवरून उत्तरेकडून आर्यांतील ब्राह्मण आणि क्षत्रिय हे दक्षिणेकडे वसाहती करते झाले, असें निष्पन्न होतें. दिल्लीजवळ कुरुक्षेत्राच्या लगत गोवर्धन नांवाच्या भागांत गोवर्धन या नांवाचें गांवही आहे. ही माहिती दिल्ली गॅझेटियरमध्यें

सांपडते. उत्तरेकडील या गोवर्धन प्रदेशांतील ब्राह्मणांनीं दक्षिणेंत वसाहत केली व गोदावरी कांठच्या प्रांताला गोवर्धन हें नामाभिधान दिलें, हेंही संभवनीय आहे ; त्याला भविष्यपुराण व ब्रह्मखंड यांत थोडा आधारही सांपडतो.

कर्मभूमिश्च गौर्ज्ञेया श्रुतिरूपा जगन्मयी ।
ब्राह्मणास्तां वर्द्धयन्ति तस्माद् गोवर्द्धना स्मृताः ॥ ९६॥

—भविष्यमहापुराण ३,२५

'कर्मभूमि म्हणजे देश व श्रुतिरूप वेदमूलक सनातन धर्म यांना गो अशी संज्ञा आहे. या दोहोंचें वर्धन करणारे व संरक्षण करणारे जे ब्राह्मण ते गोवर्धन ब्राह्मण होत.'

सह्यस्यानन्तरे चैते यत्र गोदावरी नदी ॥
स च गोवर्धनो देशः सुरराजेन निर्मितः ॥ १ ॥
तस्मिन्वसन्ति ते ह्यार्या ब्राह्मणा वेदपारगाः ॥
गोवर्धना इति ख्याता आर्यावर्तनिवासिनः ॥ २ ॥

—ब्रह्मखंडे

अर्थः—सह्याद्रि पर्वतालगत जेथें गोदावरी नदी वाहते तोच देवराजानें म्हणजे इंद्रानें निर्मिलेला गोवर्धन प्रदेश होय. या प्रांतांत जे वेदपरायण आर्य ब्राह्मण राहतात त्यांना गोवर्धन असें म्हणतात. हे ब्राह्मण उत्तरेकडील आर्यावर्तांत राहणारे होत.

दंडकारण्यांतील गोवर्धन देशांत ब्राह्मण व क्षत्रिय यांच्या वसाहती होऊं लागल्या. दक्षिणेकडून वाली व सुग्रीवांचे राज्यांतून म्हणजे हंपीचे आसपासचे प्रदेशांतून इतर लोक येऊन राहूं लागले. उत्तरेकडून राष्ट्रिक, वैराष्ट्रिक व महाराष्ट्रिक असे क्षत्रिय बुद्धक्रांतीनतर दक्षिणेंत आले. त्यांच्या बरोबर 'राष्ट्रगोपः पुरोहितः' या नात्यानें राजज्योतिषी व राजपुरोहित म्हणून अनेक ब्राह्मण या गोवर्धन देशांत अत्यंत प्राचीन काळीं वसाहत करण्यास आले. तेव्हांपासून तों आजतागायत या दंडकारण्यांत म्हणजे हल्लींच्या महाराष्ट्रांत सर्व ठिकाणीं जोशी, कुलकर्णी, उपाध्याय व धर्माधिकारी वगैरे अधिकार गोवर्धन ब्राह्मणांकडेसच आहेत.

उत्तरेकडून दक्षिणेंत कोणकोणते ब्राह्मण आले या संबंधाची एक यादी शेरिंगसाहेबांनीं प्रसिद्ध केलेली आहे. तिचा उल्लेख गॅझेटिअरमध्यें पाय-

टिपेंत पुष्कळ ठिकाणीं आढळतो. ती यादी आम्हांस पाहावयास मिळाली नाहीं. तथापि त्या यादीवरून कनोजी, तिवारी, गोवर्धन वगैरे ब्राह्मण उत्तरेकडून या गोवर्धन प्रांतांत आले व ते ज्योतिषी, उपाध्ये व धर्माधिकारी या नात्यानें गोवर्धनांत वावरूं लागले यांत शंका नाहीं. गोवर्धन देशांत राहणारे ब्राह्मण म्हणूनच यांना गोवर्धन ब्राह्मण असें नांव पडलें असावें.

माजी सरदार गोपाळ हरी देशमुख यांनीं ऐतिहासिक गोष्टींच्या दुसऱ्या भागांत पा. ३७ मध्यें पाटील व कुलकर्णी या लेखांत असें लिहिलें आहे कीं 'कोंकणस्थ हे मूळचे देशस्थ असून ते परशुरामाचे आज्ञेनें घाटाखालीं आले. कुणबी हे मूळ किष्किंधेस जेथें सुग्रीव व वालीचें राज्य होतें, तिकडे राहत असतांना ते श्रीरामाज्ञेनें दंडकारण्यांत आले. ही दंडकारण्यांत वस्ती करण्याची आज्ञा प्रथमतः श्रीमारुतीस झाली. याचें दर्शक प्रतिगांवीं श्री मारुतीची स्थापना असतें. त्याप्रमाणें सर्व अरण्य वसविल्यावर मागाहून उत्तरेकडून आर्य आले, ते जोशी, कुलकर्णी व भट (उपाध्याय) या रूपानें वसती करूं लागले.

या जुन्या संशोधनापेक्षां अलीकडील संशोधन जास्त साधनामुळें अधिक सप्रमाण मानण्यांत येतें म्हणून इतिहाससंशोधक राजवाडेकृत राधामाधव विलासचंपूच्या प्रस्तावनेवरून पुढील संकलन थोडक्यांत देतों.

वर दंडकारण्यांतील गोवर्धन देशांत वसाहती होऊं लागल्या आणि उत्तरेकडन राष्ट्रिक, वैराष्ट्रिक व महाराष्ट्रिक असे क्षत्रिय दक्षिणेंत उतरले, असें म्हटलें आहे. त्यांचा इतिहास असा दिसतो कीं, बौद्धक्रांतीनंतर हे सर्व क्षत्रिय दक्षिणारण्यांत वसाहत करण्यास निघाले. महाराज ही पदवी धारण करणाऱ्यांना महाराष्ट्रिक म्हणत. एकछत्री सत्तेला महाराज्यें म्हणत. प्रद्योत, शैशुनाग, नंद व मौर्य यांनीं एकामागून एक असें महाराज्य मगधांत केलें. मंत्रपुष्पाचे शेवटीं स्वाराज्यं, वैराज्यं, पारमेष्ठ्यं वगैरे मंत्र उच्च स्वरानें घोषित केले जातात ते या महाराज्याला उद्देशनच असावेत. तात्पर्य मगधदेशाधिपति महाराष्ट्रिक लोक आपले राष्ट्रगोप व राष्ट्रपुरोहित यांसह दक्षिणेंत वसाहतीस आले.

महाराष्ट्रिकाप्रमाणें राष्ट्रिक या नांवाचे दुसरे एक लोक दक्षिणेंत उतरले. हे राष्ट्रिक लोक म्हणजे अशोक ज्यांना राष्ट्रिक असें आपल्या

शिलालेखांत म्हणतो ते होत. हे राष्ट्रिक लोक मगधांतील नसून त्यांचें वास्तव्य कुरुपांचालामध्यें होतें. दंडकारण्यांत या राष्ट्रिकांचीं सात राज्यें होतीं. सातही राज्यांचें एक संयुक्त राष्ट्र म्हणजे मोठें राष्ट्र या अर्थानें महाराष्ट्र असें नांव पुढें पडलें असावें. या सात राष्ट्रांमध्यें गोवर्धन, रूपवाहित, दंडक, अश्मक, माहिषक वगैरेंचा समावेश होतो. तेव्हां राष्ट्रिकांबरोबर पुरोहित या नात्यानें गोवर्धनांत आलेल्या ब्राह्मणांना गोवर्धन ब्राह्मण ही संज्ञा प्राप्त झाली.

बौद्ध क्रांतिकालांत आणखी तिसरे लोक दक्षिण अरण्यांत वसाहती करण्यास आले. त्यांचें नांव वैराष्ट्रिक. हे लोक विराटनामक राजाच्या देशांतले म्हणजे उत्तर कुरु व उत्तर मद्र या देशांतील रहिवासी होत. विराज नामक राजाचें नांव, त्याच्या राज्याला विराष्ट्र म्हणत व त्या राष्ट्रांतील लोकांना वैराष्ट्रिक म्हणत.

राष्ट्रिक, वैराष्ट्रिक व महाराष्ट्रिक हे लोक मगध, कुरुपंचाल व उत्तरकुरु या नर्मदोत्तर देशांतून दक्षिणेंत आले. पैकीं महाराष्ट्रिक हे हिमालयापलीकडे देवांच्या अनुषंगानें राहणारे जे देवयोनी व गणदेव त्यांपैकीं होते. वैराष्ट्रिक हे मूळचे हिमालयापलीकडील लोक होते. आणि राष्ट्रिक हे कुरु पांचालांतील होते. हे सर्व वैदिकधर्मी असल्यामुळें यज्ञयागार्थ त्यांनीं आपले पुरोहित आपल्याबरोबर आणले हें सांगावयास नकोच. सध्यां महाराष्ट्रांत म्हणजे नागपूर, वऱ्हाड, खानदेश, नाशिक, औरंगाबाद, बीड, सातारा वगैरे प्रांतांत यजुर्वेदीय ब्राह्मणांची संख्या बहुतम आहे. त्याच्या खालोखाल ऋग्वेद्यांचा भरणा आहे. अर्थात् त्याच्या खालीं काण्व, मैत्रायणीय इत्यादि शाखांची वस्ती आहे. याचें कारण क्षत्रिय राजांचे पुरोहित त्याच देशांतून आले असले पाहिजेत हें सांगणें नको. महाराष्ट्रांत शुक्लयजुर्वेदी माध्यंदिन ब्राह्मणांची संख्या सर्वांहून जास्त आहे. ऋग्वेदी, काण्व व आपस्तंब ह्यांच्या अल्प संख्येची तुलना माध्यंदिनांच्या प्रचंड संख्येशीं केली म्हणजे महाराष्ट्र हा देश भूरित्वानें माध्यंदिनांचा आहे, असें म्हणणें भाग पडतें. माध्यंदिनांत काण्वांची भर टाकली म्हणजे ही शुक्लयजुर्वेद्यांची संख्या त्याहूनही मोठी होते. शुक्लयजुर्वेद्यांच्या वाजसनेयी संहितेचा मूळ उत्पादक याज्ञवल्क्य असल्यामुळें, तत्प्रणीत धर्मादि सूत्रें त्यांनीं महाराष्ट्रांत वसाहतकाळीं आणलीं.

दक्षिणेंत याज्ञवल्क्यस्मृति प्रमाण धरतात त्याचें मुख्य कारण, महाराष्ट्रांतील शुक्लयजुर्वेदी ब्राह्मणांची बहुतम संख्या व ह्या ब्राह्मणांचे अनुयायी जे महाराष्ट्रिकादि क्षत्रिय त्यांची संख्या वाजसनेय शाखेची अनुयायी आहे, हें आहे. एणेंप्रमाणें भाषेच्या प्रमाणावरून व वेदशाखांच्या प्रमाणांवरून निश्चित झालें कीं महाराष्ट्रिकादि लोक व त्यांचे वाजसनेयादि पुरोहित काश्मीरपासून मगधपर्यंतच्या उत्तर हिंदुस्थानांतील देशांतून बौद्धक्रांति कालांत दक्षिणेंत उतरले.'

(राधामाधवविलास चंपु पा. १६० ते १६७.)

रामायणांत ज्याला ब्रह्मभवन म्हटलें आहे, मत्स्य मार्कंडेय पुराणांत ज्याला गोवर्धनपुर असें म्हटलें आहे अशा या प्रदेशांत उत्तरेकडील क्षत्रियांबरोबर आलेल्या ब्राह्मणांनीं वसाहत केली. त्यामुळें उत्तरेकडीलच नांवें दक्षिणेकडच्या प्रदेशांस मिळालीं असल्यास त्यांत आश्चर्य असें कांहीं नाहीं. कारण ही प्रवृत्ति सर्वत्र दिसते. इंग्रज लोक इंग्लंड सोडून अमेरिका व आस्ट्रेलियांत गेले, तेथें त्यांनीं इंग्लंडांतील शहरांचींच नांवें नवीन वसविलेल्या शहरांना दिलेलीं आहेत. उत्तरेकडील आर्यांनीं गोदावरीला गंगा व प्रतिष्ठानाला दक्षिण काशी अशीं नांवें दिलीं आहेतच. त्याप्रमाणें उत्तरेकडील गोवर्धन प्रांतांतून आलेल्या आर्यांनीं नाशिकच्या आसपासच्या प्रदेशाला गोवर्धन असें नांव दिलें अर्थात् त्या देशांत राहणाऱ्या ब्राह्मणांना गोवर्धन असें प्रादेशिक नांव मिळालें हें क्रमप्राप्तच आहे. दक्षिणेंत अगदीं प्रथम वसाहतीस आलेले ब्राह्मण हे उत्तरेकडील गोवर्धन ब्राह्मणच होत. हेच ब्राह्मण देशावरून पुढें उत्तर कोंकणांत इ. स. ३५० चे सुमारास अष्टाधिकारी वृत्यंशी म्हणून तिकडे गेलेले असावेत. पूर्वीं ब्राह्मणांना ज्योतिषी, उपाध्याय व धर्माधिकारी अशा नात्यानें वृत्ति मिळत असे. हे अष्टाधिकार पुढीलप्रमाणें दिसतात.

जलाधिकारः स्थलाधिकारो धर्माधिकारः कुललेखनंच,
ब्रह्मासनं दंडविधिः प्रयुक्तं पौरोहितं ज्योतिषमष्टमंच ॥ १ ॥

अर्थः—तीर्थावर संकल्प सांगणें, पर्वणीकालीं दान घेणें, पेरणें, मळणें यांचे मुहूर्त सांगून शेतांतून धान्य घेणें, लग्नकार्यें चालविणें, कुलकर्णीपण करणें, वेदविहित मार्गाकडे प्रवृत्ति करणें, प्रायश्चित देणें, उपाध्यायाचें काम करणें आणि ज्योतिष सांगणें असे हे अष्टाधिकार होत.

असे हे अष्टाधिकारी गोवर्धन ब्राह्मण नाशिकच्या आसपासच्या गोवर्धन भागांत होते हें शिलालेखावरूनही सिद्ध होतें.

दंडकारण्यांत प्रथम आर्यांची वसाहत झाली हें वर सांगितलेंच आहे. राष्ट्रिक, वैराष्ट्रिक व महाराष्ट्रिक अशीं क्षत्रिय घराणीं बुद्धोत्तर कालांत दक्षिणेंत उतरलीं. त्यांतील राष्ट्रिकांचे राजपुरोहित व धर्माधिकारी गोवर्धन ब्राह्मण होते. ख्रिस्ति सनाच्या पूर्वी सुमारें ७५ वर्षांपासून तों इ. स. २१८ पर्यंत अंदाजें ३०० वर्षें दंडकारण्यांतील या गोवर्धन प्रांतांत शालिवाहनांचें राज्य होतें. मध्यंतरीं ५०।५५ वर्षें शालिवाहनांचा पराभव करून शक नांवाच्या क्षत्रपांनीं या देशांत राज्य केलें. परंतु कांहीं काळानें शातवाहन कुळांतील गौतमीपुत्र व त्याचा पुत्र पुलुमाई या दोघांनीं क्षत्रियांचा पराभव करून आपलें राज्य पुन्हां त्यापासून घेतलें. शक वंशांतील राजांनीं राज्यव्यवस्था केली त्या वेळेपासून जी वर्षगणना सुरू केली तीच पद्धति पुढें चालून शालिवाहन शक पुढें आला. शालिवाहन वंशांतील राजांनीं व शकवंशांतील क्षत्रपांनीं राज्याच्या भरभराटकालीं गोवर्धन प्रांतांत राहणाऱ्या गोवर्धन ब्राह्मणांना पुष्कळ दानधर्म केलेला आहे. या दानधर्माबद्दलचे शिलालेख नाशिकजवळील डोंगरांमध्यें गुहांमधून लेणीं खोदून कोरलेले आहेत. त्यांपैकीं एका गुहेंतील लेण्यांत चार वेगवेगळे शिलालेख आहेत ते यथाक्रम पुढें दिले आहेत.

ज्ञानकोशकार डॉ. केतकर यांनीं 'प्राचीन महाराष्ट्र' 'या ग्रंथांत शातवाहन पर्वामध्यें नाशिक येथील लेण्यांतील अनेक शिलालेख प्रसिद्ध केले आहेत. त्या शिलालेखांत राजा क्षहरात नहपान याच्या जामाताच्या दानांचा उल्लेख आहे. त्यांत गोवर्धनांचा उल्लेख आहे म्हणून त्यांतील कांहीं लेख स्पष्ट कल्पना यावी म्हणून उद्धृत करतों.

नाशिक येथील लेख नं. १४ आ लेणें नं. १० च्या उजव्या हातचया भितीवर (लुडर्स नं. ११३५)

१ ...... तस क्षत्रपस नहपानस जामा
२ ...... शाकस उषवदातस नेत्यकेसु
३ ...... चेचिणे दाहनूकानगर केकापुरे
४ ... ... अनुगामिम्हि उजेनिय साखाय

५ ... ... तो ब्राह्मणा भुजते सतसाह–
६ ... ... वता ब्राह्मणानं गवां सतस–
७ ... ... भगवता देवान ब्राह्मणानं च दता–
८ ... ... चेत्रसुधे पनरस क्षहरा–
९ ... ... गवां तसहस्रदेनउष–
१० ... ... नदीये वणासय द–
११ ... ... सुवण तिथ चे णयते तस्–
१२ ... ...

भाषांतरः––

" (क्षहरा) त क्षत्रप राजा नहपान याचा जांवई जो शक उषवदात त्याच्या कायम देणग्यांवरच, चेचिणि व दाहनूका, शहर, केकापुर, अनुगामि, उजेनी, शाक या ठिकाणीं (दररोज) १ लक्ष ब्राह्मण जेवतात (व त्या देणग्यांतूनच तीन) लक्ष गाई ब्राह्मणांना दिलेल्या आहेत. (व १६ खेडीं) देवा ब्राह्मणांना दिलेलीं आहेत. चैत्राच्या शुक्ल पक्षाच्या १५ व्या दिवशीं (पौर्णिमेस) उषव (दाता) नें बार्णासा नदींत तीर्थ व पैसे दान केले."

या शिलालेखाचें वरीलप्रमाणें भाषांतर दिल्यावर डॉ. केतकरांनीं स्वतःचे जे विचार मांडले आहेत ते वादग्रस्त आहेत. ' एक लाख ब्राह्मणांस दररोज भोजन देण्याइतकी कायम देणगी काय होती हें सांगतां येत नाहीं. कांहीं भाग झिजून गेला आहे. लेखांतील अपूर्ण विधान पूर्ण करण्यासाठीं पुढील काळें लेखाकडे लक्ष द्यावें लागतें, ' असें ते स्वतः म्हणतात. पण अर्थ करतांना डॉक्टर स्वतः त्या लेखाकडे दुर्लक्ष करितात. लक्ष ब्राह्मण म्हणजे लाखों ब्राह्मण, पुष्कळ ब्राह्मण असाच अर्थ घेतला पाहिजे. डॉ. केतकर पुढें प्रत्येक ब्राह्मणास आठ बायका या राजजामातानें कोठून दिल्या, त्या ब्राह्मणच होत्या कीं ब्राह्मणेतर होत्या, आठ आठ बायका मिळविणारे हे भाग्यवान ब्राह्मण गोवर्धन होते का दुसरे होते, याविषयीं आज खात्रीची माहिती नाहीं व जेवणही कसें होतें हें कळत नाहीं, असें म्हणतात.

काळें लेख नं. १३ (लूडर्स १०९९) लेखाचें मूळ संस्कृत.

(१) सिद्धम् । राज्ञः क्षहरातस्य क्षत्रपस्य नहपानस्य जामात्रा दिनीकपुत्रेण ऋषभदत्तेन त्रि....

(२) गोशत सहस्रदेन नद्यां वार्णशायां सुवर्णतीर्थकरेण देवेभ्यो ब्राह्मणेभ्यश्च षोडशग्रा--

(३) मदेन प्रभासे पूततीर्थे ब्राह्मणेभ्योऽष्टौ भार्याप्रदेन गवां चापि त्रिशतसहस्रम्

(४) दापयित्रा वलूरकेषु लयनवासीनां प्रव्रजितांना चातुर्दिशशंघाय

(५) यापनार्थं ग्रामः करजिको दत्तः सर्वषां (व) र्षावासिनाम् ॥

अर्थः--सिद्धम् राजाक्षहरात नहपान याच्या दिनीकपुत्र उषवदात नांवाच्या जामातानें, एक लक्ष गाई दान दिल्या. वार्णाशा नदीच्या कांठीं सुवर्णतीर्थ केलें, देवांना आणि ब्राह्मणांना सोळा गांवें दिलीं, आठ ब्राह्मणांचीं धर्मार्थ लग्नें करून दिलीं. तीन लक्ष गाई दान दिल्या ! बलूरकाच्या ठायीं लेण्यांत राहणाऱ्या प्रव्रजितांना चातुर्दिश संघाला यापनासाठीं करजिक नांवाचा गांव दिला.

ज्या काळें लेखाकडे लक्ष द्यावें असें डॉक्टर म्हणतात तो हा वर भाषांतरासह दिला आहे. परंतु डॉक्टरांनीं याचें भाषांतरही चुकीचें केलें आहे. दुसऱ्या रकान्यांत 'गोशतसहस्र' असें पद असतांना त्याचा अर्थ तीन लक्ष गाई असा केला आहे; आणि तिसऱ्या रकान्यांत 'त्रिशतसहस्र' असें स्पष्ट असतांना तीनशें गाई असा अर्थ केला आहे. सहस्राचें शतक म्हणजे एक लक्ष व सहस्रांचें त्रिशत म्हणजे तीन लक्ष असा वास्तविक अर्थ आहे. आतां प्रत्येक ब्राह्मणाला आठ आठ भार्या दिल्या असा अर्थ निघत नाहीं. डॉक्टरसाहेबांना हिंदु संस्कृति व हिंदु दानधर्म यांची माहिती नाहीं असें थोडें साहसानेंच म्हणावें लागतें. आपल्या मुलाबरोबर धर्मार्थ मुंजी करण्याची श्रीमंतांमध्यें चाल आहे. त्याचप्रमाणें धर्मार्थ लग्नें करण्याचीही चाल आहे. त्याप्रमाणें '**ब्राह्मणेभ्यः अष्टौभार्याप्रदेन**' असें पद आहे, 'ब्राह्मणाय' असें पद नाहीं. 'अष्टौभार्या' या शब्दावरून आठ कन्यादानें केलीं असाच अर्थ निघतो. गोरगरीब ब्राह्मणांच्या गळ्यांत जर कोणी आठ आठ बायका अडकवूं लागला तर तो धर्म न म्हणतां ती मोठी आपत्तीच आहे, असें म्हटलें पाहिजे. एका ब्राह्मणाला उष्ट्रदान केलें. तो उंट घरांत येईना म्हणून दरवाजा पाडावा लागला. दुसऱ्या एका ब्राह्मणाला एकानें हस्तिदान केलें. त्या हत्तीनें एका दिवसांतच त्या ब्राह्मणाच्या घरची वैरण फस्त करून टाकली. भलतें दान

दिल्यानें असला अप्रयोजकपणा पदरीं येतो. दिनीकपुत्र उषवदात इतका अप्रयोजक खास नव्हता ! !

यापुढील शिलालेख नं. १० (लूडर्स नं. ११३१) पुढें दिला आहे. डॉ. भांडारकर यांनीं दख्खनच्या इतिहासांत बॉम्बे ब्रँच ऑफ दी रा. ए. सो. ज. व्हॉ. ७ याचे आधारें तो दिला आहे. तेथेंही त्याचा अर्थ प्रतिवर्षी तो लक्ष ब्राह्मणभोजन करवी व त्यानें प्रभासतीर्थावर आठ ब्राह्मणांचीं लग्नें आपल्या खर्चानें करून दिलीं, असाच अर्थ केलेला आहे. वाचकांच्या सोयीकरितां तो लेख व त्याचें भाषांतरही येथें देतों.

नाशिक लेख नं. १० चें लेणें. लेणें नं. १०० या पाठीमागील भिंतीवर छताच्या खालीं (लूडर्स नं. १०३१).

(१) सिद्धं राज्ञः क्षहरातस्य क्षत्रपस्य नहपानस्य जामात्रा दिनीकपुत्रेण उषवदातेन त्रिगोशतसहस्रदेन नद्यां वार्णासायां सुवर्णदानतीर्थकरेण देवताभ्यः ब्राह्मणेभ्यश्च षोडशग्रामदेन अनुवर्षं ब्राह्मणशतसाहस्त्रीभोजापयित्रा

(२) प्रभासे पुण्यतीर्थे ब्राह्मणेभ्यः अष्टभार्याप्रदेन भरुकछे दशपुरे गोवर्धन शोर्पारगे च चतुःशालावसधप्रतिश्रयप्रदेन आरामतडाग उदपानकरेण इबा–पारादा–दमण–तापी–करबेना–दाहनुका–नावा पुण्यतरकरेण एतासां च नदीनां उभतोतीरं सभा.

(३) प्रपाकरेण पिंडितकावडे गोवर्धने सुवर्णमुखे शोर्पारगे च रामतीर्थे चरकपर्षभ्यः ग्रामे नानंगोले द्वात्रीशतनाळीगेरमूलसहस्रप्रदेन गोवर्धने त्रिरश्मिषु पर्वतेषु धर्मात्मना इदं लेणं कारितं इमा च पोढियो भटारका अत्रातिया च गतो स्मि वर्षारतुं मालयेहि रुधं उतमभाद्रं मोचयितुं.

(४) च मालय प्रनादेनेव अपयाता उत्तमभद्रकानं च क्षत्रियानं सर्वे परिग्रहा क्रिता ततो स्मि गतो पोक्षरानि तत्र च मया अभिसेको क्रितो त्रीणि च गोसहस्राणि दतानि ग्रामो च दत चानेन क्षेत्रं ब्राह्मणस वाराहिपुत्रस अश्विभूतिस्य हथे कीणिता मुलेन काहापणसहस्रेहि चतुहि ४००० य सपितुसतक नगरसीमाय उतरापराय दीसाय एतो मम लेणे वस––

भाषांतरः––विजय असो ! नहपानाचा जांवई व दिनीकाचा मलगा परोपकारपरायण जो उषवदातनामा त्यानें धर्माच्या स्फूर्तीमुळें हें लेणें व हे हौद गोवर्धनाच्या टेकड्यांत (नाशिक प्रांतांत) खोदावयास लाविले.

उषवदातानें तीन लक्ष गोप्रदानें केलीं. (ब्राह्मणांस तीन लक्ष गाई दान दिल्या). त्यानें पैसे दान केलेले आहेत व त्यानें वाराणसा नदीवर (बारणासाया) घाट बांधविले. (तीर्थेंही केलीं). त्यानें देवांना व ब्राह्मणांना (गोवर्धनांना) सोळा खेडीं इनाम करून दिलीं. तो वर्षभर एक लक्ष ब्राह्मण-भोजन करवी. त्यानें प्रभासतीर्थावर (सोमनाथपट्टण) येथें आठ ब्राह्मणांचीं आपल्या खर्चानें धर्मार्थ लग्नें करून दिलीं. त्यानें भरुकच्छ (भडोच), देशपुर (माळव्यांतील दशपूर), शोर्पारग (वसईजवळचें सोपारें) व गोवर्धन (नाशकाजवळचा प्रांत) या ठिकाणीं आश्रयासाठीं चौकोनी विश्रांतिगृहें (चौसोप्या), वाडे धर्मशाळा बांधल्या, मळे, बगीचे केले. त्यानें विहिरी, तलाव व बाग केलेले आहेत. त्यानें इबा (इबा), पारादा, दमणा, तापी, करबेणा, दाहानुका, या नद्यांवर जाण्यायेण्यासाठीं धर्मार्थ नांवा ठेवल्या आहेत. या नद्यांच्या उभय तीरांवर वाटसरूंच्या सोयीसाठीं त्यानें धर्मशाळा बांधल्या व खर्चाकरितां नेमणुका करून देऊन पाणपोया स्थापल्या. पिंडितकावद, सुवर्णमुख, सोपरिगांतील रामतीर्थ व गोवर्धन या स्थानांतील चरण व परिषद म्हणजे वेदपठणपाठणार्थ ब्राह्मणांच्या शाळा याकरितां नानंगोल गांवीं कांहीं स्थायिक धर्मादाय नेमणुका करून दिल्या. बत्तीस हजार नारळीच्या झाडांचीं खोडें नेमणूक करून दिलीं.

उत्तमभद्र नांवाच्या क्षत्रिय जातीच्या राजास मालय लोकांनीं हल्ला करून पावसाळाभर वेढलें होतें. म्हणून तो उषवदात राजाच्या आज्ञेवरून एके वर्षी ऐन पावसाळ्यांत त्या क्षत्रियांच्या राजास शत्रूपासून सोडविण्याकरितां चाल करून निघाला. नुसत्या आरोळीनेंच ते मालव पळून गेले; व उत्तमभद्राच्या सैनिकांनीं त्यांना कैद केलें. नंतर उषवदात पोष्कराणी येथें गेला, तेथें त्यानें स्नानादि तीर्थविधि केला आणि एक गांव व तीन सहस्र गायी दान दिल्या. एक शेतही पण दान दिलें. तें शेत अश्वीभूत नांवाच्या ब्राह्मणापासून ४००० कार्षापणाला विकत घेतलें होतें. इत्यादि.

डॉक्टर केतकरांनीं दुधातुपाची चंगळ असावी, जेवण कशा प्रकारचें होतें हें कळत नाहीं, असें लिहिलें आहे. खरी स्थिति अशी कीं पूर्वी घरोघरीं गोधन असे. गोरसप्रधान अन्न हेंच मध्यम वर्गांत असे.

आढ्यानां मांसं परमं मध्यानां गोरसोत्तरं । महाभारत उद्योगपर्व.

श्रीमंतांचें अन्न मांसयुक्त, मध्यमांचें अन्न गोरसप्रधान आणि कनिष्ठांचें अन्न तैलप्रधान होतें. चाऱ्याची कमतरता नव्हती, गायींचे कत्तलखाने नव्हते. गोधनाची आवड व अभिमान सर्वांना असे. राजे व महाराजे यांचेजवळ तर गायींचीं मोठमोठीं खिल्लारें असत. सामान्य मनुष्यसुद्धां जन्माला आल्याचें सार्थक म्हणून सहस्त्र ब्राह्मणभोजन करी. मग श्रीमंत आणि राजेलोक हे त्या वेळच्या धार्मिक समजुतीप्रमाणें लक्ष ब्राह्मणभोजन घालीत हें काय सांगावयास पाहिजे ? एकंदरींत डॉ. केतकर यांचीं हीं अनुमानें भारदस्त ग्रंथाला न शोभण्यासारखीं झालीं आहेत, यांत कांहीं शंका नाहीं.

क्षहरात सत्रप राजा नहपान याचा जांवई दिनीकाचा मुलगा जो उषवदात त्यानें ज्यांना दानें दिलीं व ज्यांचीं लग्नें करून दिलीं, ते ब्राह्मण गोवर्धन देशांतील गोवर्धन ब्राह्मणच होते, अशी निश्चिती या वरील शिलालेखावरून निघते. येथें गोवर्धन हा शब्द जसा देशवाचक आहे, तसाच शोर्पारग असा शब्दही देशवाचकच आहे. सोपाऱ्यास आज पानमळ्याचा धंदा करणारे जे सामवेदी ब्राह्मण आहेत त्यांच्या पूर्वजांचा उल्लेख जसा वरील शिलालेखांत आहे, तसाच गोवर्धन देशांत राहणाऱ्या गोवर्धन ब्राह्मणाचाच उल्लेख आहे असें म्हटलें पाहिजे. कारण चिंचणी तारापूर भागांत (उत्तर कोंकणांत) कोंकणस्थ, कऱ्हाडे व माध्यंदिन ब्राह्मण यांची वस्ती अलीकडील आहे. अपरांत माध्यंदिनांना उत्तर कोंकणची वृत्ति गोवर्धनांकडून मिळाली हें स्पष्ट आहे. आज चिंचणीस जरी गोवर्धनांचीं घरें नाहींत, तथापि आसपासच्या भागांत गोवर्धनांचीं घरें आहेत त्यावरून दोन लेखांत उल्लेखिलेले ब्राह्मण हे गोवर्धन व सामवेदी होते यांत शंका नाहीं. चिंचणीलगत सरवली येथें, तारापुरानजीक नांदगांव येथें, आणि चिंचणीच्या आसपास गोवर्धन ब्राह्मणांचीं घरें आहेत त्यावरून वरील सिद्धांताला बळकटी येते.

विद्यासेवक मासिक वर्ष ५ अंक ४ मध्यें शातवाहनकालीन ब्राह्मण या शीर्षकाखालीं बराच मजकूर आहे. उषवदातानें ज्या ज्या ठिकाणच्या ब्राह्मणांना दानें दिलीं, त्यांची यादी पुढीलप्रमाणें आहे.

(१) बार्णासा नदीच्या कांठचे ब्राह्मण

(२) प्रभास तीर्थाचे ब्राह्मण

(३) भरुकच्छ म्हणजे भडोचचे ब्राह्मण

(४) **गोवर्धन येथील ब्राह्मण**
(५) सोपारा येथील ब्राह्मण
(६) इपला कांठचे
(७) पारादा कांठचे
(८) तापी कांठचे
(९) कराबेन कांठचे
(१०) दाहनुका कांठचे, व दाहनुका नगराचे
(११) नानंगोल ग्रामांतले
(१२) पिंडीतकावड येथील चरकांची परिषद
(१३) **गोवर्धन सुवर्णमुख आणि रामतीर्थ** यांच्या सोपारें येथील परिषदा
(१४) पुष्करतीर्थीचे ब्राह्मणयाग, अभिषेक व दानें.
(१५) **चेचिम्ण येथील ब्राह्मण**
(१६) केकापूर येथील ब्राह्मण
(१७) अनुगामी ब्राह्मण
(१८) उज्जनी शाखेचे ब्राह्मण

या याद्यांचें महत्त्व ब्राह्मणांच्या इतिहासाला थोडें थोडकें नाहीं. यांत उत्तरकोंकण आणि गुजराथचा समुद्रकांठ या भागांतील ब्राह्मणांचा उल्लेख आहे. आणि कांहीं उल्लेख ब्राह्मण जातीच्या इतिहासावर प्रकाश पाडणारे आहेत. डहाणूच्या कोणत्या ब्राह्मणांना दक्षमित्र आणि उषवदात यांनीं दानें केलीं होतीं याविषयीं विचार करतां आपणांस असें म्हणावें लागेल कीं, त्या काळांत तेथें कोंकणस्थ किंवा चित्पावन नव्हते. अपरांत माध्यंदिन देखील नव्हते, कारण त्यांच्या आगमनाचा काल यादवराज्य गेल्यानंतरचा आहे. त्यांच्या म्हणण्याप्रमाणें त्यांना वृत्ति गोवर्धनांकडून विकत घेऊन बिंबानें दिली असा आदिलशाहींतील लेख आहे. तात्पर्य या काळांत जे ब्राह्मण होते ते गोवर्धन किंवा सामवेदीच असावेत असें वाटतें.

गोवर्धन ब्राह्मणांसंबंधानें या लेखांच्या योगानें जो प्रकाश पडतो तो येणेंप्रमाणें:—

गोवर्धन नांवाचें एक ब्राह्मणांचें आगर होतें हें स्पष्ट आहे. त्याप्रमाणेंच सोपारा येथील ज्या अनेक प्रकारच्या ब्राह्मणांचा उल्लेख आहे त्यांत 'गोवर्धन येथील ब्राह्मणांची परिषद' असा उल्लेख आहे. त्यावरून असें स्पष्ट होतें कीं, सोपारा शहरामध्यें अनेक ठिकाणचे ब्राह्मण होते, त्यांचे संघ होते, अर्थात् त्या संघांमध्यें गोवर्धन येथून येणाऱ्या ब्राह्मणांचा संघ होता.

इंग्रज सरकारचे पाय येथें स्थिर झाल्यावर त्यांनीं येथें फार दूरदर्शीपणानें समाजांतील विविध जातींची जी माहिती संपादन केली ती फार महत्वाची आहे. त्या माहितीपैकीं नाशिक भागांतील माहिती गोवर्धनांच्या प्राचीनत्वाला बळकटी आणणारी आहे म्हणून ती येथें सादर करतों.

बॉम्बे गॅझेटियर भाग १६ (डेक्कन–नाशिक) पान ४१ मध्यें गोवर्धनांसंबंधीं पुढील उतारा आहे.

Goverdhan Brahmins generally are found in large numbers all over the district (Nasik) and form a seperate caste having their own priest. They are cultivators, but most of them are village accountants. The caste head man is called a Vaidya.... ... ...

From the name Goverdhan, which some of the early cave inscriptions (A. D. 120) use as **a name of Nasik** and from their holding the post of village accountants, it seems that these are the representatives of the **oldest Brahmin settlers at Nasik** (They may perhaps have been called Golaks, Manus's (मनूज) name for the sons of widows, because they continued to allow widow marriage after the later arrived Brahmins had given up the practice).

(ही माहिती रावबहादूर गोपाळ हरी देशमूख यांनीं दिलेली आहे).

वरील इंग्रजी उताऱ्यांतील They may perhaps have been called Golaks.........पासून शेवटपर्यंतचा मजकूर आहे तो रावबहादूर गोपाळ हरी देशमुखांनीं जरी सांगितला असला तरी अप्रमाण आहे. कारण त्याला शास्त्र व इतिहास यांचा आधार मिळत नाहीं. विधवा पुनर्विवाहाला

जरी नारद, वसिष्ठ, पराशर हे अनुमती देतात, तथापि मध्यकालापासून इतर अनेक स्मृतिकारांच्या निषेधामुळें ब्राह्मण व ब्राह्मणसदृश उच्च जाती यांमध्यें विधवाविवाह निषिद्धच मानला गेला आहे. ब्राह्मणांचें अनुकरण म्हणून कित्येक अब्राह्मण जातींनीं विधवावपन स्वीकारलें असून विधवा-विवाहाची आपल्यांत असलेली चालही नष्ट केली आहे. अशा स्थितींत गोवर्धन ब्राह्मणांत ही चाल होती व म्हणून त्याला गोळक म्हटलें असावें वगैरे विधानें चुकीचीं आहेत.

सांप्रतचा गोवर्धन ब्राह्मणसमाज हा सनातनी वृत्तीचा आहे. त्याचा विधवाविवाहाला विरोध आहे. अलीकडे नवीन विचारांमुळें पुष्कळांना विधवापुनर्विवाह पटतो ही गोष्ट स्वतंत्र आहे. जितका समाज अशिक्षित तितका तो रूढिप्रिय असतो. म्हणूनच गोवर्धन ब्राह्मणसमाजाला विधवा-विवाह संमत नाहीं, व आजपर्यंत तसे विवाहही या समाजांत झालेले नाहींत. अद्याप गोवर्धन ब्राह्मण समाजांतील विधवा स्त्रिया पुन्हां विवाह करणें कमी-पणाचें मानतात, आणि सर्व जन्म संन्यस्त वृत्तीनें काढतात ; असें असतांना रावबहादुरांनीं वरील माहिती कोठून आणली न कळे ?

वॉम्बे गॅझेटियर भाग १६ (डेक्कन-नाशिक) पा. २६

The only classes of whose early history any information has been traced are the Goverdhan and yajurvedi Brahmins and the Hill tribes of Thakurs. The fact that **Goverdhan** is an old name for **Nasik** and that the people of this class hold many heriditory accountantships and some village priestships, make it probable that the **Goverdhanas are** the **oldest Brahmin settlers**. They seem to have been onsted by the yajurvedis, the present ruling priestly community.

वरील दोन्ही इंग्रजी उताऱ्यांत गोवर्धनांची माहिती सर्वसामान्य देऊन नाशिकच्या आसपासच्या भागांतील हे सर्वांत जुने ब्राह्मण व मूळचे रहिवासी असाच उल्लेख दोन्ही ठिकाणीं केलेला आहे. नाशिक प्रांताला गोवर्धन हें

पुरातन नांव असून या प्रांतांतील पहिले वसाहत करणारे गोवर्धन ब्राह्मण होत, असेंच येथें सुस्पष्टपणें सांगितलें आहे.

तात्पर्य, गेल्या व या प्रकरणावरून हें सिद्ध झालें कीं महाराष्ट्राच्या उत्तरेकडील भागाचें नांव प्राचीन काळीं गोवर्धन हें होतें. या प्रदेशांत बुद्धोत्तरकाळीं व बुद्धपूर्वकाळीं अनेक क्षत्रिय व ब्राह्मण यांच्या वसाहती झाल्या आणि गोवर्धन प्रदेशांत राहणारे म्हणून गोवर्धन ब्राह्मण असें प्रादेशिक नांव अत्रस्थ प्राचीन ब्राह्मणांना प्राप्त झालें.

प्रकरण ७ वें

उत्तर कोंकणप्रांत व गोवर्धन ब्राह्मण

सह्याद्रीच्या योगानें महाराष्ट्राचे दोन भाग झाले आहेत. त्यांपैकीं पूर्व भागास देश असें म्हणतात व पश्चिम भागास कोंकण हें नांव रूढ आहे. दंडकारण्य हें नांव पूर्वी ज्या भागास होतें, त्या बहुतेक प्रदेशाला हल्लीं महाराष्ट्र म्हणतात. दंडकारण्याचें वर्णन पूर्वी आलेंच आहे. दंडकारण्यांतील एका भागास गोवर्धनदेश असें नांव होतें. या गोवर्धन देशावरून नामाभिधान पावलेले गोवर्धन ब्राह्मण कोंकणांत वसाहतीस गेले. त्या कोंकणच्या विभागाविषयीं व तेथील गोवर्धनांच्या इतिहासाविषयीं प्रस्तुत प्रकरणांत थोडी चर्चा करितों.

कोंकण असें सामान्यतः ज्या भागास हल्लीं म्हणतात, त्यापेक्षां प्राचीन काळीं त्याची मर्यादा दक्षिणेकडे अधिक होती. प्राचीन पद्धतीप्रमाणें कोंकणचे मुख्य विभागः—अपरांत, उत्तर कोंकण व दक्षिण कोंकण असे होतात. अपरांत म्हणजे हल्लींचा ठाणें जिल्हा, उत्तर कोंकण म्हणजे हल्लींचा कुलाबा जिल्हा आणि रत्नागिरी, गोमंतक, कानडा व मलबार यांना दक्षिण कोंकण असें नांव होतें. या सर्व प्रदेशाला शूर्पारक देश असें नांव आहे.

हा सर्व प्रदेश अर्थात् शूर्पारक देश श्रीपरशुरामानें समुद्राला मागें हटवून त्याच्यापासून मिळविला अशी आख्यायिका आहे. म्हणून गोमंतक कानडा, मलबार व कोंकणप्रांत या सर्व प्रदेशाला परशराम क्षेत्र म्हणतात हल्लीं चिपळूणपासून तीन मैलांवर परशराम क्षेत्र आहे; तेथें शेंदोनशें चित्पावन ब्राह्मणांचीं घरें आहेत. त्याविषयीं कथाभाग असा आहे.

भृगुऋषीचा ऋचीक नामक पुत्र होता. त्याला जितेंद्रिय व शांतिसंपन्न असा जमदग्नि नांवाचा पुत्र झाला. त्या जमदग्नीचा पुत्र राम हा सर्व विद्या, धनुर्वेद यांत पारंगत व मोठा शूर व अत्यंत पराक्रमी व तेजस्वी असा होता; त्यानें शंकरांना प्रसन्न करून घेऊन सर्व अस्त्रविद्या व अत्यंत तेजस्वी परशु हीं संपादन केलीं. त्या परशूच्या सामर्थ्यानें तो जमदग्निपुत्र सर्वांना अजिंक्य असल्यानें त्याला परशुराम असेंच नांव पडलें. याच वेळीं हय नांवाच्या क्षत्रिय कुलामध्यें कृतवीर्याचा पुत्र अर्जुन हा तेजस्वी व अतिवलाढ्य असा होता; त्याला श्री दत्तात्रेयाच्या कृपाप्रसादानें सहस्र बाहूंची प्राप्ति झाली होती. त्याचे पुत्र सदैव गर्विष्ठ असून क्रूरपणानें वागत असत. त्यांनीं कार्तवीर्यार्जुनाला न कळूं देतां, जमदग्नीच्या धेनूचें वासरूं चोरून आणलें. तेव्हां त्याकरितां महात्मा परशुरामानें कार्तवीर्यार्जुनाशीं युद्ध करून त्याच्या बाहूंचा छेद करून तो वत्स परत आणला. पुढें एकदां राम समिधा व दर्भ आणण्याकरितां बाहेर गेला असतां, निर्बुद्ध व अज्ञानी अशा सर्व अर्जुनपुत्रांनीं मिळून महात्म्या जमदग्नीच्या आश्रमावर हल्ला करून बाणाग्रांनीं जमदग्नीचें मस्तक शरीरावेगळें करून पाडलें. अशा रीतीनें तपोनिष्ठ व शांतिसंपन्न अशा आपल्या पित्याचा कपटानें वध केलेला सहन न झाल्यामुळें रोषाविष्ट होऊन परशुरामानें पृथ्वी निःक्षत्रिय करण्याची प्रतिज्ञा केली व हातीं शस्त्र घेतलें. अत्यंत क्रुद्ध झालेल्या त्या वीर्यवान् भृगुकुलश्रेष्ठ परशुरामानें कार्तवीर्याचे पुत्र आणि पौत्र या सर्वांचा वध केला व हजार हैहयवंशीयांचा वध करून जे जे क्षत्रिय सांपडतील त्या त्या सर्वांचा वध करून सर्व पृथ्वी जिंकली, आणि दिग्विजयसूचक अश्वमेध यज्ञ करून यज्ञाचे शेवटीं कश्यप मुनींना दक्षिणा म्हणून सर्व पृथ्वी दान दिली. नंतर अध्वर्यू असलेले ते कश्यपमुनि, क्षत्रिय अवशिष्ट राहावेत या उद्देशानें रामाला म्हणाले, 'हे रामा, आतां ही पृथ्वी माझी असल्यामुळें या माझ्या प्रदेशामध्यें तूं केव्हांही

वास्तव्य करितां कामा नये, तर हे महामुने, आतां तूं दक्षिण तीराच्या समुद्रावर जा.'

याप्रमाणें परशुरामानें कश्यपमुनींना सर्व पृथ्वी दान दिल्यावर कश्यपानें परशुरामाला पृथ्वीच्या बाहेर जाण्यास सांगितलें. तेव्हां समुद्रानें त्या जामदग्नि परशुरामाकरितां ज्यांत अपरांत व दुसरे प्रदेश आहेत, असा शूर्पारक देश निर्माण केला व जमदग्निपुत्र परशुराम तत्काळ कश्यपाच्या आधीन असलेल्या या पृथ्वीवरून तेथून निघून गेला व तेथेंच तो वास करून राहिला. त्यामुळें सह्याद्रीपासून समुद्रापर्यंत अरुंद अशी जी लांबच्या लांब कोंकणपट्टी आहे, तिला परशुरामक्षेत्र असें नांव पडलें.

ततः शूर्पारकं देशं सागरस्तस्य निर्ममे ॥
सहसा जामदग्न्यस्य सोपारान्तो महीतलम् ॥ १ ॥

—महाभारत शांतिपर्व अ० ४९

अपरांत देश म्हणजे हल्लींच्या ठाणें जिल्ह्याचा प्रदेश असून त्यासह सर्व कोंकणपट्टीला शूर्पारकदेश असें नांव आहे. या देशाचें मुख्य शहर सोपारें हें होतें. तें ठाणें जिल्ह्यांत वसईजवळ आहे. या शूर्पारकाचें नांव प्राचीन बौद्ध ग्रंथांत तर प्रसिद्धच आहे. पण महाभारतांतसुद्धां पांडवांच्या तीर्थयात्रेच्या वर्णनांत शूर्पारकाचें नांव आलें असून त्यांनीं तेथें यात्रा केली व त्यानंतर त्यांनीं समुद्रकांठचा बराचसा प्रदेश उल्लंघन करून ऋचीक कुलोत्पन्न धनुर्धारी श्रेष्ठ राम याची ती वेदी पाहिली, असें वर्णन आहे. तात्पर्य शूर्पारक क्षेत्र फार जुनें असून तें अपरांतांत मुख्य होतें. हल्लींचें सोपारें हें क्षेत्र असून तें वसईजवळ आहे, हें वर सांगितलेंच आहे.

उत्तरेकडून या शूर्पारकांत आर्यांची वस्ति बरीच प्राचीन काळीं म्हणजे शालिवाहन शकापूर्वी साडेतीनशेंचेही आधीं झालेली असावी. इ. स. १५० चे सुमारास ठाण्याजवळच्या प्रदेशास आर्यदेश असें पेरिप्लसच्या ग्रंथांत म्हटलें आहे. सम्राट अशोकाच्या शिलाशासनांत रास्टिक, पेटेनिक व अपरांत या देशांत धर्मोपदेशक पाठविले असें लिहिलें आहे. या तिहींतील शेवटला म्हणजे अपरांत हा देश म्हणजे उत्तर कोंकण ज्याला म्हणतात तोच होय हें सांगावयास नको. त्याची राजधानी शूर्पारक होती. राष्ट्रिक, वैराष्ट्रिक

व महाराष्ट्रिक या क्षत्रियांपैकीं राष्ट्रिक ऊर्फ रठ्ठे यांचें राज्य उत्तर कोंकणांत होतें. त्यांनींच अपरांत व दंडकारण्यांतही सर्वत्र अंमल बसविला.

राष्ट्रिक ऊर्फ रठ्ठे हे नर्मदोत्तर प्रदेशांतून (मगध, कुरुपांचाल) दक्षिणेंत आले. हे राष्ट्रिक यदुकुलोत्पन्न असावेत असाही तर्क आहे. यादवांचें राज्य द्वारकेस होतेंच. पुढें क्रमानें सौराष्ट्र, परांत (सुरत) व अपरान्त म्हणजे कोंकणांत त्यांची सत्ता स्थापित झाली. पुढें बऱ्याच काळानें म्हणजे इ. स. २५० चे सुमारास मौर्य घराण्यांतील सम्राट अशोक यानें दक्षिणेंत अपरान्त देशावर आपलें प्रभुत्व गाजविलें. वसईनजीक सोपारें येथें अशोककालीन शिलालेख आढळतात, त्यावरून अशोकापूर्वीच अपरांतांत आर्यांची वसाहत झालेली होती हें सिद्ध होतें.

कोंकणाचे प्राचीन विभाग भैरवखंडांतील एका श्लोकांत सांगितले आहेत ते:--

केरलाश्च त्रिलिंगाश्च तथागोराष्ट्रवासिन: ।
कोंकणाश्च कुडालाश्च वरालाटाश्च बर्बरा: ॥

केरल, त्रिलिंग, गोराष्ट्रवासी, कोंकण, कुडाल, वरालाट व बर्बर हे होत. यांत गोराष्ट्रवासी म्हणजे गोपराष्ट्रवासी गोवर्धन ब्राह्मण यांची वसती अशोकपूर्वकाळीं अपरान्तात होती.

ख्रिस्ती सनाच्या आरंभीं कोंकणांत व महाराष्ट्रांत आंध्र देशांतील आंध्रभृत्यांनीं म्हणजे शालिवाहनांनीं राज्य केलें. आंध्र देशांत खाण्याचें मुख्य धान्य साळीचे तांदूळ अद्यापीही आहे व पुरातन कालींही होते. शालिवाहन हें आडनांव धारण करणारें राजघराणें मूळचें आंध्रदेशी होतें हें शालिवाहन शब्दावरून सिद्ध होतें. त्या शालिवाहनांचा अंमल कोंकणांत व देशांत सुमारें ३०० वर्षें होता, यासंबंधाचे निदर्शक असे शिलालेख सांपडतात व नाणींही आढळतात. शालिवाहनाचे वेळेस महाराष्ट्रांत बौद्धधर्म जोरानें चालू होता. बौद्धधर्मानुयायी भिक्षूंकरितां डोंगरांत गुहा करीत व लेणींही कोरवीत असत. भिक्षू लोक समुद्रमार्गानें प्रवास करीत असतां वाटेंत राहण्यासाठीं खाडीच्या तोंडाशीं लेणीं असत. अशीं लेणीं कोंकणांत पुष्कळ आहेत.

ब्राह्मण धर्मही या वेळेस जोरांत होता. ब्राह्मणांसही देणग्या दिलेल्या आहेत. ब्राह्मणभोजनें घालणें व त्यांचीं लग्नें करून देणें, हें त्या वेळेसही मोठें पुण्य समजलें जाई. या वेळीं या देशांत व्यापारही पुष्कळ चालत होता. भरुकच्छ (भडोच), हें व्यापाराचें मोठें बंदर होतें; तसेंच, कोंकणांत सुपारें हेंही व्यापाराचें मोठें ठिकाण होतें. कल्याण, चौल (ता. अलिबाग), मांदाड, महाडजवळचें पाल, जयगड हीं व्यापाराचीं बंदरें होतीं; पैठण, तगर, गोवर्धन प्रदेशांतील नाशिक, गोवर्धन, कऱ्हाड, कोल्हापूर, वगैरे व्यापाराचीं शहरें होतीं (सरदेसाईकृत हिंदुस्थानचा अर्वाचीन इतिहास भा. २ पा. ८).

एकंदरींत हा उत्तर कोंकणप्रांत सुस्थितींत होता. या उत्तर कोंकणांत गोपराष्ट्रांत राहणारे म्हणजे गोवर्धन प्रांतांत मूळ वसाहत करणारे गोवर्धन ब्राह्मण या भागांत येऊन राहिले. अर्थात् उत्तर कोंकणांतील अष्टाधिकारी वृत्यंशी गोवर्धन ब्राह्मणच होते.

महाराष्ट्रांत शालिवाहनानंतर राष्ट्रकूटांचें राज्य झालें. नंतर चालुक्यांची सत्ता सर्वत्र गाजली. इ. स. ७०० च्या सुमारास पुनः राष्ट्रकूटांनीं चालुक्यांचा पराभव करून महाराष्ट्राचें आपलें राज्य परत मिळविलें. या राष्ट्रकूटांतील अमोघवर्ष नांवाच्या राजानें शिलाहार वंशांतील पुल्लशक्ति नामक राजाला उत्तर कोंकण प्रांत तोडून दिला; तेव्हांपासून कोंकणांत शिलाहारांचें राज्य सुरू झालें.

शिलाहारांचीं राज्यें उत्तर कोंकणप्रांतांत, दक्षिणेंत महाराष्ट्रावर अनेक ठिकाणीं होतीं. शिलाहारांचें राज्य तगर या नांवाच्या नगरावर होतें. हें तगर मोठें शहर होतें. तें निजामशाहींतील हल्लींच्या धारूर शहराजवळ असावें. या शिलाहारांचीं पुढें तीन घराणीं होऊन त्यांनीं उत्तर कोंकण, दक्षिण कोंकण व कऱ्हाडापासून कोल्हापुरापर्यंत राज्य केलें आहे. उत्तर कोंकणांत शिलाहारांचा अंमल शालिवाहन शक ११८२ पर्यंत होता असें दिसून येतें. या शिलाहारवंशीय अरिकेसरी देवरायानें शके ९४१ मध्यें जमीन दान दिल्याचा व शके ९४८ मध्येंही दान दिल्याचा ताम्रपट मिळालेला आहे. हा दुसरा ताम्रपट भांडुपाजवळ मिळालेला आहे. कोंकणांतील चौदाशें गांवांचा अधिपति च्छिमणादेवराय यानें सहासष्ट गांवची वृत्ति गोवर्धन ब्राह्मणांस अग्रहार करून दिल्याबद्दलचा हा ताम्रपट आहे. शिलाहारांच्या राजवटींत

उत्तर कोंकणांत नायक या उपनांवाचे गोवर्धन ब्राह्मण संस्थानिक होते व मिटकर व वेखंडे या उपनांवाचे गोवर्धन ब्राह्मण सरदेशपांडे होते; आणि यांजकडे अष्टाधिकारी वृत्तीचा अधिकार होता. नायक यांचे वंशज अद्यापि उत्तर कोंकणांत आपल्या वृत्तीचा उपभोग घेत आहेत.

शिलाहार वंशांत कांहीं राजे विद्याव्यासंगी, कर्तृत्ववान् व दानशूर होऊन गेले. इ. स. ११८७ च्या सुमारास उत्तर कोंकणांत राज्य करणारा अपरार्क नांवाचा राजा फार विद्वान्, धर्मशास्त्रज्ञ, असा होता. या अपरार्कानें याज्ञवल्क्य स्मृतीवर निबंधग्रंथ लिहिला आहे. अनहिलपट्टण येथील सोळोंखी राजे जेव्हां उत्तर कोंकणांत राज्य करीत होते, त्या वेळीं शिलाहार हे त्यांचे मांडलिक होते. ११८२ मध्यें उत्तर कोंकणावर देवगिरीच्या यादवांचें राज्य झालें, आणि शिलाहारांची उत्तर कोंकणांतील सत्ता संपुष्टांत आली.

यादवांचे ताब्यांत उत्तर कोंकण प्रांत गेल्यावर येथें त्यांनीं आपला एक प्रतिनिधि नेमिला. तो ब्राह्मण होता. अर्थात् तो गोवर्धनांतील ब्राह्मण होता. कारण, हा वेळपर्यंत उत्तर कोंकणांत गोवर्धन ब्राह्मणांखेरीज दुसऱ्या कोणत्याही जातींच्या ब्राह्मणांची वस्ती नव्हती. नायक उपनांवाचे गोवर्धन ब्राह्मण येथें संस्थानिक होते; व मिटकरी, वेखंडे हे सरदेशपांडे होते. नायकांचे वंशापैकीं अच्युत नायक ‡ नांवाच्या पुरुषानें करून दिलेलें, शके

‡ वर उल्लेखिलेल्या अच्युत नायकासंबंधीं दोन मतें आहेत. एक असें :—

'इ. स. ७०० चे सुमारास शिलाहार वंशाचे कारकीर्दीत उत्तर कोंकणांत नायक उपनांवाचे गोवर्धन ब्राह्मण संस्थानिक होते; व मिटकरी उपनांवाचे गोवर्धन ब्राह्मण सरदेशपांडे होते. शालिवाहन शक ९४८ मध्यें चिमणादेवराज शिलाहार यानें सहासष्ट गांवांची वृत्ति अग्रहार करून दिल्याबद्दल ताम्रपट आहे. अच्युत नायकाचे वंशज उत्तर कोंकणांत अद्याप वृत्तीचा उपभोग घेत आहेत'

'शके ११८२ मध्यें उत्तर कोंकण प्रांत यादवांकडे गेल्यानंतर त्यानें तेथें आपला जो प्रतिनिधि नेमला, तो गोवर्धन ब्राह्मणच होता. तो उत्तर कोंकणांतील संपन्न व समर्थ असा संस्थानिक असून त्याचें उपनांव नायकच होतें. याच नायकाचे वंशज हल्लीं उत्तर कोंकणांत आहेत;' इत्यादि.

आतां दुसरें मत असें आहे कीं, 'शके ११९४ मध्यें बत्तीस ब्राह्मणांस ओवळें नांवाचें गांव दान दिल्याबद्दलचा ताम्रपट उपलब्ध आहे. या ताम्रपटांत

११९४ मध्यें लिहिलेलें दानपत्र उपलब्ध आहे, तसेंच, रामचंद्र ऊर्फ राम-देव यादवाच्या कारकीर्दींत, त्याच्या आज्ञेनें, त्याचा कोंकणांत अंमल करणारा, भारद्वाज गोत्री कृष्णनायक ब्राह्मण यानें शके १२१२ मध्यें, उत्तर कोंकणांतील ठाण्याजवळील अणजोर नांवाचा गांव, ठाण्यास राहणाऱ्या

ज्या अच्युत नायकाचा उल्लेख आहे, तो उत्तर कोंकणावर पराक्रमी ब्राह्मण सुभेदार म्हणूनच काम पाहात होता. तो सरवरीया जातीचा ब्राह्मण होता, म्हणजे कनोजी होता. त्याच्या आजाचें नांव जल्हण व बापाचें नांव मुग्धी होतें. ' इत्यादि

एकजण अच्युत नायकाला गोवर्धन ब्राह्मण समजतो तर दुसरा कनोजी समजतो. यांत दोन्ही व्यक्ति एक नसाव्यात. कारण एक ताम्रपट शके ९४८ मधील आहे व दुसरा शके ११९४ मधील आहे. एकांत सहासष्ट गांवची वृत्ति दान दिली आहे, तर दुसऱ्यांत ओवळें गांव बत्तीस ब्राह्मणांना दान दिल्याबद्दलचा निर्देश आहे. त्यावरून हे दोन अधिकारी अच्युत या नांवाचे भिन्न भिन्न काळीं असावेत हें संभवतें. शके ९४८ मध्यें चिमणादेवराय शिलाहार याच्या ताम्रपटांतील अच्युत नायक हा गोवर्धनच असावा. कारण त्याचे वंशज अद्याप उत्तर कोंकणांत वृत्तीचा उपभोग घेत आहेत. शके ११९४ मधील ओवळें गांवासंबंधीं जो ताम्रपट आहे त्यांतील अच्युत नायक हा सर-वरीया कनोजी असावा. पण त्याचे वंशज वृत्ति भोगीत आहेत असें दिसत नाहीं. शिवाय अच्युत हें नांव उत्तर हिंदुस्थानी ब्राह्मणांत क्वचित् आढळतें.

श्री नाशिक पंचवटी क्षेत्रवर्णन या नांवाचें गो. बा. वैद्यकृत १९२० सालीं छापलेलें एक छोटें पुस्तक आहे. त्यांतील २।३ उल्लेख महत्त्वाचे वाटतात. ' नाशकाजवळ गोवर्धन गांवीं मुक्कामास असतां ' (पृ.१) ' फार पूर्वीं कनोजी व गोळक यांची वस्ती व वृत्ति या प्रांतांत असावी असा अदमास आहे.' (पृ.८)

या दोन उल्लेखांवरून पूर्वीं गोवर्धन प्रांतांत कनोजी व गोवर्धन असे दोन्ही प्रकारचे ब्राह्मण असावेत असें संभवतें. दोघेही वृत्तिवान होते. पण जोसपण व उपाध्येपण हें अव्याहत चालू ठेवल्यामुळें गोवर्धन तेवढे एतद्देशीय बनले आणि कनोजी ब्राह्मणांनीं वृत्त्या सोडल्यामुळें किंवा सुटल्यामुळें ते या प्रांताचे स्थायिक राहिले नाहींत. झुजोतिया ही लढाऊ जात दक्षिणेंत येऊन महाराष्ट्रीय झालेली आहे. या समाजांतील कांहीं कुटुंबेंही नगर जिल्ह्यांत आहेत. त्या सर्व कुटुंबांत जे वृद्ध असतील त्यांचेकडून माहिती मिळवून संशो-धन करण्यास वाव आहे. इतकें सांगून अच्युत नायक हे दोन असावेत, त्यांतील पहिला गोवर्धन व दुसरा सरवरिया असें नमूद करून पुढें जातों.

दामोदर अग्निहोत्री प्रमुख ४० ब्राह्मणांस दान दिला होता. त्याजबद्दल मोटा ताम्रपट उपलब्ध आहे. त्याचा अंशतः उतारा--

(शा. श. १२१२ विरोधि संवत्सर वैशाख शु. १५ सोमवार)

"श्रीरामानुज्ञया सकलकोकणधरामंडळमनुशासता श्रीकृष्णदेवनायकेन श्रीरामचंद्रदेवस्य आयुरारोग्यैश्वर्याभिवृद्धयर्थ चत्वारिंशत्संख्येभ्यः नानाशाखाध्यायिभ्यः नानागोत्रेभ्यो गोवर्द्धनविनिर्गतेभ्यो ब्राह्मणेभ्यः खाजणवराडीसंबंधः अणजोरग्रामः पल्लिसहितः ससीमापर्यंतः तृणकाष्ठोदकोपेतः सवृक्षमालाकुलः निधिनिक्षेपसहितः चतुराघाटोपेतः हिरण्योदकपूर्वकं प्रदत्तः। अस्य चतुराघाटनानि । पूर्वतो नदी दक्षिणतोपि नदी पश्चिमतोपि नदी उत्तरतो वेलिंग्रामः इमानि चतुराघाटनानि । त एते ब्राह्मणा नामतो गोत्रतश्च निरूप्यन्ते ॥ बहवृचसब्रह्मचारी काश्यपगोत्र दामोदराग्निहोत्री एकः । अपरे एकोनचत्वारिंशत्संख्यांकाः । एते चत्वारिंशद्ब्राह्मणाः ॥ तदेतेषां सान्वय बंधुभिः भुंजतां भुजापयतां । केनापि परिपथा न कार्या ॥ '

श्रीरामदेवरायाचे आज्ञेनें सकल कोंकण प्रांतावर अनुशासन करणाऱ्या सेवक श्रीकृष्णदेव नायकानें श्रीरामदेवरायाच्या आयुरारोग्याकरितां गोवर्धन प्रांतांतून आलेल्या, नाना वेदशाखांचें अध्ययन केलेल्या, नाना गोत्रांच्या ब्राह्मणांना अणजोर हा गांव निधिनिक्षेप, तृण, काष्ठ, उदक, वृक्ष यानें युक्त असा दान दिलेला आहे....(पुढें या गांवच्या चतुःसीमा दिल्या असून, ब्राह्मणांचीं नांवें व गोत्रें दिलीं आहेत.) काश्यपगोत्रि, ऋग्वेदी, अग्निहोत्री दामोदरभट्ट हा एक आणि इतर ३९ मिळून ४० ब्राह्मणांनीं हा गांव आपल्या मुलांभावंडांसह भोगावा. त्यांना कोणीही हरकत करूं नये.

अशाच तऱ्हेचा दुसरा ताम्रपट राष्ट्रकूट वंशांतील अकालवर्ष श्रीकृष्णराज यानें शा. श. ८१० मध्यें करून दिला आहे. उत्तर कोंकणांतील १६०० गांव त्यांच्या ताब्यांत होते. त्यांपैकीं कविड (कवीड) हा गांव ब्राह्मणास अग्रहार करून दिल्याबद्दल त्या ताम्रपटांत उल्लेख आहे.

अशा या प्राचीन ताम्रपटांत आलेल्या ब्राह्मणांच्या नांवांवरून जरी विशेषसा स्पष्ट बोध झाला नाहीं तरी त्यांत एक गोष्ट अगदीं ठळकपणानें दिसून आली आहे ती अशी कीं, ताम्रपटांत ब्राह्मणांचीं नांवें, गोत्रें व शाखा

हीं दिलेलीं असतात. तीं महाराष्ट्रांत हल्लीं विद्यमान असणाऱ्या देशस्थ, यजुर्वेदी, चित्पावन, कऱ्हाडे यांमध्यें नसून महाराष्ट्रांतील व उत्तर कोंकणांतील गोवर्धन ब्राह्मणांत विद्यमान असलेलीं गोत्रें–कात्यायन, कामकायन, शालंकायन, औपमन्यव, वामरथ्य, बालखिल्य हीं आढळून आलेलीं आहेत. अर्थात् हे सर्व गोवर्धन ब्राह्मण होते, यांत शंका राहात नाहीं.

येथवर केलेल्या विवेचनावरून दिसून येईल कीं दंडकारण्यांत वसाहत झाल्यावर उत्तर कोंकणांत आर्यांची वसाहत झाली. शालिवाहनांचें राज्य ख्रिस्तपूर्व ७३ पासून इ. स. २१८ पर्यंत म्हणजे सुमारें ३०० वर्षें महाराष्ट्रांत व उत्तर कोंकणांतही झालें. मध्यंतरीं शक नांवाच्या लोकांनीं ५० वर्षें महाराष्ट्रावर राज्य केलें. शातवाहनांचे वेळीं गोवर्धन हें नांव बऱ्याच मोठ्या प्रदेशाला होतें व तेथें ब्राह्मणांची वसती होती. गोवर्धन देशांतूनच हे गोवर्धन ब्राह्मण उत्तर कोंकणांत व सर्व महाराष्ट्रांत पसरले. शातवाहनांनंतर क्षत्रप, अभीर, राष्ट्रकूट, चालुक्य, अशा घराण्यांचीं राज्यें महाराष्ट्रांत व उत्तर कोंकणांत झालीं. राष्ट्रकूटांच्या कारकीर्दीतील आणि शिलाहारांच्या राजवटींतील अनेक शिलालेखांवरून असें दिसतें कीं त्यांच्या राज्यांत ब्राह्मणांना चांगली मानमान्यता होती. त्यांत गोवर्धन ब्राह्मणचप्रमुख होते.

इ. स. ९७३ नंतर राष्ट्रकूटांचा अम्मल जाऊन चालुक्यांची सत्ता प्रबळ झाली. पुढें यादवांचें राज्य महाराष्ट्रांत व उत्तर कोंकणांत होतें. श्रीरामदेवरायाच्या कारकीर्दींत अच्युत नायक व कृष्णनायक या गोवर्धन ब्राह्मणांकडेच कोंकणचा कारभार होता. या अच्युत नायकानेंच १२७२ मध्यें राजाज्ञेनें ५७ ब्राह्मणांना तीन गांव इनाम दिले. सदरहु दानपत्रांतील माहिती महत्त्वाची आहे. रामदेवरायाचा मुलगा भीमदेव ऊर्फ बिंब यानें उत्तर कोंकणांतील गोवर्धन ब्राह्मणांची वृत्ति पुढें विकत घेऊन ती राजगुरु पुरुषोत्तमपंत कावळे यांना दान दिली. वेदमूर्ति पुरुषोत्तमपंत कावळे हे अपरांतांतील माध्यंदिन ब्राह्मण होते. त्यांचा उपयोग बिंब देवाला व यादवांच्या राज्याला फार झाला होता असें दिसतें. तें दानपत्र समग्र देऊन व त्या संबंधीं थोडी चर्चा करून हें प्रकरण आटोपतें घेतों.

यादव वंशीय बिंबराजानें राजपुरोहित वे. मू. पुरुषोत्तमपंत कावळे यांस दिलेलें दानपत्र शके १२२१ इ. स. १२९९.

हें दानपत्र अस्सल फरमन पर्शियन आणि मोडी लिपींत असून तें वे. रा. रा. पुरुषोत्तम रघुनाथ कावळे पैठणकर हल्लीं वस्ती ठाणें यांजकडेस आहे. याच्या नकलेचा शक हिजरी ११२४ असून शके १६२७ सन १७०५ आहे.

मोडीवरून मराठी बालबोध नक्कल पुढीलप्रमाणें आहेः--

श्रीमंत महाराज राजश्री बिबशहा स्वामी यांणीं आज्ञा केली ऐशिजें, गोविंद मिटकरी सरदेसाई व सरदेशपांडे तालुका मालाड वगैरे पंचत्व पावला. तो निपुत्रिक होता. त्याची बायको चांगुणाबाई तें वतन खुश रजावंदीनें विकूं लागली. मग आपण तिचें रजावंदीनें वतन सरदेसाईपण व सरदेशपांडेपण चोवीस हजार होन (रयाळ) देऊन विकत घेतलें. बितपशील :—

पा मालाड गांव ५७	पा मरोळ गांव या दोनी ताचे नांव साष्ट (साष्टी) ५७	पा माहीम मुंबई (मुंबई) गांव ७
पा उरण भवरगांव ९	पा पंचनद गांव ५५	पा खेरण गांव ४५
पा काम्हणखांच गांव ६५	पा साहेवान गांव ८४	पा मनोरा गांव ८४
पा असेरी गांव ८४	कसवे वसई गांव १२	कसबे सोपारा गांव १६
पा माहीम गांव ८४	पा माव गांव २७	पा तारापूर गांव ३६४
पा सांजे व कामण ५७४		

सदर्हु तालुकिये वगैरे यांस हक्क लवाजिया व रुसूम बितपशीलः--

रुसूमपट्टी १	पछोडी	अंतरपाट १
पाट १	पंचोत्रा १	प्रायश्चित्त १
टिळा १	विडा १	मांडव टक्का १

दरबिघे सालीकुडो, दरगांव दोन बिघे, दर परगणीयास एक गांव शिलोत्तर,
१ इनाम व एक गांव विसापती
१

सदर्हूप्रमाणें वतन समस्त जमीदार बतफशील जैल यांच्या अनुमतें शके (१२२०) बाराशें वीस, शाल्वरी संवत्सर, माघ वद्य त्रयोदशी भृगुवासरीं विकत घेऊन एक वरीस (वर्ष) तीन मास भोगून मग दान द्यावयाच्या उद्देशें अहीनलवाडा पाटण तप्टदगा माहीम बिंबस्थान शिक्का मुकरंदान, चौकीस मुख्य प्रधान माधवराव श्रीनिवास, व सुरनवीस त्रिंबक नारायण, व चिटणवीस चंद्रभानपरभू, व पतंगराव, न्यायाधीश, व श्रीपति दामोदरभाऊ मुजुमदार व कर्णीक शंकर परभू, व तपेदार कर्णीक देवदास परभू देसले जमीदार पा मालाड, देसले कृष्ण देसाई तपे मरोळ, व देसले व माधव देसाई तपे मालाड मौा पोंइसर, व जोये माहतारे तपे मरोळ मौा शाहर, व रामजीत तपे मालाड व मौा येकशाहर, व गोविंद माहातरे तपे मरोळ मौा कोंदवटें, व गोडसानी तपे मालाड मौा अंकूलवली, व कड भोजरावत तपे मरोळ मौा वांदरें, व विठ्ठल महिमानराड तपे मालाड मौा माहीम, व महीदरणे तपे मालाड मौा निलीज व बामठाकूर तपे मरोळ मौा मुंबई गिरीगांव, व येसघर तपे मालाड मौा अरठे, मायेमाहतरे तपे मरोळ मौा उरण, व गोमरावत तपे पंचनद, व रामपाटील व गोविंद राणे तपे खैरणे, व कृष्णाजी कान्होरे तपे आठगांव, शामजी मोहने (तपे) तपे काम्हणखांच, हरजी चौधरी तपे साहेबान, गोविंदजी गार्डगिळे सिंदे कसबे वसई, व बाणराउत, व चांगराउत व येस पाटील कसबे सोपारे, वामन नाईक, हरनाईक, व देवनाईक भाटकुळे, व गोविंद जोशी भुईगांवकर, व मालनाईक नेवाळे, व गोमनाईक वाधाळे तपे मनोरा, व लखमकेणी तपे असरी, कोल-पाटील व रामसातवी तपे माब, व गोविंदनाईक गोळक तपे माहीम, व दामसावे, व गोविंद चौधरी, पीलराऊत तपे तारापूर, व विठोजी शंकर, व हरबाजीराम तपे कालानुसांजे, व माधव राउत व नेवकेणी तपे सांजे, व माधव पाटील, व कानुगोव माहतरे, पाटील व पटवारी समस्तांसहित मजिलीस करुन यांच्या साक्षीनें शके १२२१, प्लवसंवत्सर, वैशाख वद्य (३०) अमावास्या सूर्यग्रहणीं राजेश्री पुरुषोत्तमराउ कावळे पैटणकर, पिते श्रीधरपंत, आजे रघुनाथपंत, वाज-सनी, गोत्र भारद्वाज, कुलदेवता मातापूरनिवासिनी यमाई, हे राजगुरु; यांस

दान दिधलें. हें वतन सदरहूप्रमाणें रुसूम वगैरे हक्क लवाजिमानूपति स्वामीचे पुत्रीं पौत्रीं जातीप्रजाती पाळावें आणि पुरुषोत्तमराउ राजगुरु यांचे पुत्रींपौत्रीं जातीप्रजाती भोगावें आणि स्वामी श्रीमंत महाराज यांनीं स्वमुखें सर्व जमीदार व मोकदमास आज्ञा केली कीं, चहूंमासांच्या अवकाशामध्यें दरगांवीं चहूं दिशांस चार शिळा, सहा हात उंच व दोन हात रुंद रोवाव्या. शिळेवर हें माझें दानपत्र लेहून, कोरल्या अक्षरीं व्यंजन एक न जातां तलाखचा शफत गर्धभावरी वायको ऐशी घालोन आमचे मोर्तबीं पूर्णलेखन मस्तकीं शिक्का घालून तयार करावें. आश्विन मासपर्यंत ज्या गांवीं सिद्ध न जहालें त्या मोकदमास दंड शिरच्छेद, ऐसा इत्यर्थ दानपत्रीं केला. शके १२२१.

कावळे यांना दिलेल्या अस्सल फारशी महजराचें देवनागरी लिपीतील रूपांतर.

काजी महमद कासीम हिजरी ११२४

बमुजिब् हिन्दवी बमोहर महाराजाधिराजा बिम्बशहा बतारीख बिस्तु हस्तुम (२८) जिलहिदा सन् ७०८ फसली, मुताबिक् १२२१ हिन्दवी, आंकी हुकूम महाराजाधिराजा बिंबशहा शर्फ याफ्टकी गोविंदा मिटकरी बूध सरदेसाई व सरदेशपांडचागरी बयक्टेजाय आँवक्ट शुद नामवुर्दा औलाद व अफ्लाद नदास्त, व अहिलियाड बर्यीसम चाङ्गुणाबाई बरजा व रग्बत एक्टजाय फरोक्तन् वतन खुद्द नमूद ईं जानिब अज रजामन्दि आम् मुसंमात्ते बिस्तुचाहार हजार (होन) रयाल दाद : वतन सरदेसाई व सरदेशपाण्डागरी तालुका मालाड वगैरा बतफशील जायेल दरतहत्त खुद्द दर आऊर्द :

(यापुढें कोणच्या भागांतील कोणतीं गांवें व वृत्तीचे कोणते अधिकार हे दिले आहेत. ते वर दिलेल्या मराठी महजराप्रमाणेंच आहेत. यांतील पुढचा भाग तेवढा देतो).

सरदेसाई व सरदेशपाण्डचागिरी तालुके मजबूर वगैरा बग्गवाही व खूशनदी जमिदारान् वगैरा हाजीर मजलीस बतारीख बिस्तु हस्तुम (२८) शहर रमझान सन् ७०८ फसली बतसर्रुफ् खुद्द दर आउर्द ता एक साल बसेह माहा काबीज मुतसर्रीफ शुदाबाद अझाँ येक्तझाय खैरात हरदो वतन मझबूरा दरजाय अहीनलवाडा पाटन तहत् बका माहीम बिम्बस्तान सिक्का मिकीर

निदान चौकी महफील आरास्ता विल मुशाफः माधवराव श्रीनिवास दिवान, त्रिम्बक नारायण शुरनवीस याने मुसतौफी, चंद्रभान परभु चिटिणवीस, पतङ्गराव न्यायाधिश याने मुनसिफ्, श्रीपत दामोधरराव मजमुआदार, शङ्कर परभु कर्णिक, देवदास परभू देसला जमिदार परगणे मालाड, कृष्ण देसाई टपा मरोळ देसला, माधव देसला टपे मालाड मौजे पोयसर, जुही म्हातरा टपे मरोळ मौजे शहर, रामजीत टपे मालाड मौजे एकशहर, गोविंद म्हातरा मौजे कोन्दवटा टपे मरोळ, गोडसानी मौजे अङ्कोली टपे मालाड, कडुभूज रावत साकीन मौजे वान्दरा टपे मरोळ, विठ्ठल महिमानराव साकीन मौजे नरसापूर टपे मरोळ, हैबतराव दामोधरराव साकीन मौजा टपे मालाड, महिधरना साकीन मौजे मल्ह : टपे मालाड, बामठाकूर साकीन मौजे मुम्बई गिरगांव टपे मरोळ, येस घरत साकीन मौजे अरठा टपे मालाड, माही म्हातरा साकीन टपे आंठगांव, शामजी भोना साकीन टपे कामनखांच, हरजी चौधरी साकीन टपे संजान, गोविन्दजी गाडगीळे सिन्ध्या साकीन कसबे वसई, बान रावत चाङ्ग रावत व येसजी मुकादम साकीन कसबे सोपारा, गोविंद नायक जोशी साकीन भयगांव, रामधर नायक व विठुनायक मानकोला, मालनायक निवालया, कोमनायक साकीन मनोरा लखम केणी साकीन टपा असेरी, कोलमुकदम व राम सातनवी साकीन टपे माहा, गोविन्द चौधरी पीलरावत साकीन टपा तारापूर, विठोजी शङ्कर हिरजीराम साकीन टपे कालान सांजे, माधुरावत व जिवकिनी साकीन टपे सांजे, माधव मुकदम कानुगोयान् व वेपारीयान् व महाजनान् व मुक्कदमान् वगैरा बरतबक् नविस्ता सदर हाजी-बुदन् व वीलमुशाफा इनहाँ बतारीख बिस्तुहस्तुम (२८) शहर झिल्लेहिजा सन् ७०८ फसली बरोज खुसूफ व पुरुषोत्तमराव वल्द श्रीधर पण्डित इनबे रघुनाथ, पण्डित कोम ब्राह्मण, कावळे, साकीन पैठण राजगुरु यानें उस्ताद राजा जिहत्त अज्मजझील ई हरदो वतन बतरीके खैरात दाद ई हरदो वतन अज औलाद व अफलाद व दर अक्काम् ई जानिब बहरकसे की बाशद बराज-कर्द व इन्जा : साजद् व नामबुर्दा अज अवलाद व अफलाद व अक्वाम खुद ई राकाबिज् व मुतसरिफ बुदा बजमयत्त खात्तिर् व तमानियत्त् दिलदरदुबाय तरकी उमर व दौलत मायान् मशघूल्ह बुदा व गुझरान् व ई जानिब् अझ् जबान मुबारक् खुद्द व जमिदारान् व मुक्कदमान् तालुके मजकूर व ताकीद

इर्शाद नमूद की बामीयाद चाहर महा दर हर देह व चाहर सङग एक गझ अरज व सेह गझ तवील कायम नमूदः ईनें विस्ता खैरात बराँ बेनविसद् व दिगर कसम दरझेर खरजन्कः वर आवुर्दः वर बमैय मुर्त्तब्यव सिक्का तयार बकूनद् मवाफिक् वादा जायेकी तयार नशवद् मुक्कदम् आँज्या मतावन् यामकतूल खाहद्द शुद् तहरीर. तारीख शहर सदर सन् इल्हे :

वरील दानपत्राचे दोन्ही 'उतारे उत्तर कोंकणांतील प्राचीन गंगातीरस्थ शुक्लयजुर्वेदी ब्राह्मण' या ग्रंथांतून घेतलेले आहेत. या ग्रंथाचे कर्ते ना. वि. वैद्य पुरंदरे पुणतांबेकर हे असून ग्रंथ शके १८०६ मध्यें छापलेला आहे. या ग्रंथांत हें दानपत्र फारशी, मराठी, इंग्रजी, व फारशीचें देवनागरींत भाषांतर अशा चार स्वरूपानें आहे. ही भाषांतरें परस्परांशीं ताडून पाहिलीं तर त्यांत विसंगति दिसते. मूळ महजरांत गोविंद मिटकर याचे ज्ञातीचा मुळींच उल्लेख नाहीं, पण दानपत्र लिहितांना उपस्थित असलेल्या गृहस्थांत हे गोविंद-नाईक गोळक तपे माहीम असा गृहस्थ मराठी रूपांतरांत नं. ३२ वर घातलेला आहे. तथापि त्या इसमाचें नांव अस्सल फारशी महजरांत व त्याचे देव-नागरी नकलेंत मुळींच नाहीं. त्यांत गोविंद नांवाचे पांचच गृहस्थ दिसतात. परंतु मराठी रूपांतरांत गोविंद हें नांव सहा वेळां आलें आहे. मराठीवरूनच इंग्रजी रूपांतर झालेलें दिसतें. कारण इंग्रजी रूपांतरांत गोविंद हें नांव सहा वेळां आलेलें आहे. मात्र गोविंद नाईक गोळकाचा अनुक्रम इंग्रजी रूपांतरांत सद-तिसावा आहे आणि मराठी रूपांतरांत त्याचें नांव तेहेतिसावें येतें.

मूळ फारशी महजरांत कावळ्यांच्या शाखा, गोत्र, कुलदेवता वगैरेंचा उल्लेख नाहीं. तो असणें त्या प्रसंगीं योग्य होतें. परंतु मराठी रूपांतरांत मात्र वेदमूर्ति पुरुषोत्तमपंत कावळे यांचें वर्णन शाखा सूत्रासह व देवतेसह अधिक व अघळ पघळ दिलेलें आहे.

उत्तर कोंकणांतील वृत्ति पूर्वी गोवर्धनांकडे होती, ती विकत घेऊन बिंबराजानें पुरुषोत्तमपंत कावळे यांना दिली. अशी परंपरागत समजूत आहे व कागदपत्रही आधारादाखल सांपडतात. परंतु प्रत्येक गांवीं चार प्रमाणें १६२४ गांवच्या शिवेवर रोवलेल्या ६४९६ शिलांतून एखादी शिला तरी पुढें मागें उपलब्ध झाली पाहिजे.

शिवाय संशोधकांच्या दृष्टीनें आणखी कांहीं वादग्रस्त मुद्दे पुढें येतात. (१) देवगिरीच्या रामदेवराव जाधवास भीमदेव ऊर्फ बिंबदेव नांवाचा मुलगा होता काय ? (२) त्या बिंबदेवाचें उत्तर कोंकणांत राज्य होतें काय ? (३) बिंबानें पुरुषोत्तमपंत कावळ्यांना दिलेल्या दानपत्राशिवाय बिंबाचे वेळचें आणखी एखादें दानपत्र अगर शिलालेख उपलब्ध आहे काय ? (४) बिंबानें दान दिलेल्या वृत्तीच्या गांवांची संख्या १६२४ येते. रावबहादूर पाध्यांनींही बिंबाख्यान व कौस्तुभ चिंतामणि या ग्रंथाचे आधारें १६२४ खेड्यांचीच संख्या मान्य केली आहे. बिंबानें आपल्या अधिकारांत असलेल्या सर्व खेड्यांची वृत्ति विकत घेऊन गुरूस दान केली हें उघड आहे. परंतु ठाणें जिल्ह्यांतील एकंदर १८४४ गांवांपैकीं १२०० गांवांची वृत्ति आज गोवर्धन ब्राह्मणांकडे आहे. मग हीं १६२४ गांवें कोणतीं असाही प्रश्न येतो.

वरील आक्षेपांना क्रमानें उत्तरें देतां येतात. रावबहादूर पुरुषोत्तम बाळकृष्ण जोशी यांनीं 'उत्तर कोंकणचा इतिहास' या आपल्या अधिकृत ग्रंथांत बिंबाचें अस्तित्व सिद्ध केलें असून, उत्तर कोंकणांत त्याचें राज्यही होतें हें साधार मांडलें आहे. श्री. पाध्ये यांनीं हेमाडपंताच्या चरित्रांत बिंबाख्यान व महिकावतीची बखर यांच्या प्रामाण्याविषयीं जरी संशय प्रगट केला आहे, तथापि बिंबाचें अस्तित्व त्यांनीं मान्य केलेलें आहेच (पा. १४८–१५२). तेव्हां बिंबाचें अस्तित्व नव्हतें असें म्हणतां येत नाहीं. बिंबाबद्दल जेवढी माहिती मिळावयास पाहिजे तेवढी मिळत नाहीं, एवढेंच त्यांचें म्हणणें आहे.

हेमाडपंतचरित्र प्रकरण ५ पा. २३२ ते २४० पर्यंत बिंबदेवासंबंधीं श्री. के. आ. पाध्ये यांनीं बरीच माहिती दिली आहे. तथापि बिंबदेवाचे वेळचा शिलालेख व ताम्रपट उपलब्ध नाहीं, असें पा. २३२ वर म्हणतात. शिवाय याचे कारकीर्दीबद्दल ऐतिहासिक पुरावा म्हणण्यासारखा नाहीं व याच्या राज्याबद्दल विश्वसनीय हकीगतही मिळत नाहीं, असें ग्रंथकार म्हणतो.

प्रश्न जो वादाचा आहे, तो बिंबाच्या अस्तित्वाचा नाहीं, किंवा बिंबानें विकत घेऊन दिलेल्या वृत्तीच्या दानासंबंधानेंही नाहीं; तर श्री. पुरंदरे यांनीं त्या चोपड्यांत गोवर्धनांना हीनत्वदर्शक असा जो मजकूर लिहिला आहे त्यासंबंधीं आहे. पण तें चोपडें ५० वर्षांपूर्वीचें जुनें आहे. त्या वेळेच्या समजुती व अपूर्ण माहिती यांचा त्यांत समावेश आहे म्हणून त्या चोपड्याला

आतां महत्त्व देण्याचें कारण नाहीं. कारण रावबहादूर जोशी व श्री. पाध्ये यांच्या अलीकडे प्रकाशित झालेल्या ग्रंथांत त्या कोत्या समजुतींना मुळींच वाव दिलेला नाहीं, हें भूषणास्पद आहे!

बिंबराजानें १६२४ गांवांची वृत्ति दान दिली, पण दानपत्रांत लिहिलेल्या आज्ञेप्रमाणें ६४९६ शिलांपैकीं जर कांहीं शिला सांपडतील तर फार उत्तम होणार आहे. म्हणजे संशोधनास पुष्कळ वाव आहे यांत शंका नाहीं. अपरांतांतील माध्यंदिनांनीं जी वृत्ति व जी उदार दृष्टि अलीकडे स्वीकारली आहे, तीच वृत्ति इतरांनींही स्वीकारावी. अपूर्ण माहिती, विपरीत ग्रह व अज्ञान यांमुळें गोवर्धनापैकीं जे स्वतःस गोलक म्हणवीत असतील किंवा कांहीं लोक त्यांना तसें म्हणत असतील तर तें उभयतांचें अज्ञान आहे, अशी समंजस भावनाच इतरांनीं दाखविली पाहिजे. असो.

बिंबानें दिलेल्या वृत्तीच्या गांवांची संख्या १६२४ येते, आणि ठाणें जिल्ह्यांतील १८४४ गांवांपैकीं १२०० गांवांची वृत्ति आज गोवर्धनांकडे आहे हें कसें? या प्रश्नाचें उत्तर अगदीं साधें आहे. बिंबराजानें चोवीस हजार होन देऊन जेवढ्या गांवांची वृत्ति विकत घेतली व दान दिली तेवढ्यांचाच उल्लेख महजरांत आहे. त्यावरून १६२४ गांवांबाहेर गांवेंच नव्हतीं व गोविंद मिटकरी सरदेसाई व सरदेशपांडे यांचेशिवाय दुसरे कोणी वृत्यंशी गोवर्धन ब्राह्मण नव्हते असें मुळींच सिद्ध होत नाहीं. शिवाय ठाणें जिल्ह्यांतील आज असलेलीं व पूर्वीं असलेलीं गांवें यांमध्येंही अंतर असण्याचा संभव आहे. तात्पर्य या सर्व आक्षेपांची वजावाट करितां उत्तर कोंकणांत यादवांच्या राज्यापूर्वीं व राज्यामध्यें सर्वाधिकारी वृत्यंशी गोवर्धन ब्राह्मण होते व त्यांचेपासून ती वृत्ति विकत घेऊन अपरांतांतील माध्यंदिनांकडे आली, एवढी गोष्ट सिद्ध आहे.

प्रकरण ८ वें

ग्रामण्यांचा उद्भव व छळ

गेल्या तीन प्रकरणांत गोवर्धन ब्राह्मणांची जी साधार ऐतिहासिक माहिती दिली आहे, त्यावरून देशावर व कोंकणांत गोवर्धन ब्राह्मण हे इतर सर्व ब्राह्मणांपेक्षां फार प्राचीन कालापासून अष्टाधिकारी वृत्यंशी धर्माधिकारी म्हणून राहात आलेले आहेत हें अगदीं स्पष्ट आहे. अशा या प्राचीन ब्राह्मण वर्गाला अलीकडील काळांत बराच छळ सोसावा लागला हें सत्य कटु असलें तरी सांगणें भाग आहे. हिंदु समाजांतील जातींची मारकता जन्मजात उच्च-नीचतेच्या कल्पनेमुळें उद्भवली आहे, हें पहिल्याच प्रकरणांत सांगितलें आहे. ब्राह्मण जातींमध्येंही परस्पर द्वेष व मत्सर अशाच कारणामुळें रुजत आलेला आहे.

मनुष्यस्वभाव सर्वत्र सारखा या दृष्टीनें अर्थमूलक भिक्षुकी मत्सर हा ब्राह्मणांमध्यें उद्भवतो. पुढें या भिक्षुकांना कनवटीला लावणारे कांहीं गृहस्थ भेटतात आणि एका शाखेंतील गृहस्थ आणि भिक्षुक असे सहवीर्य होऊन दुसऱ्या शाखेचा मत्सर करूं लागतात. मत्सर करण्यामध्यें मोठेपणा व अर्थप्राप्तीचीं साधनें वगैरे आपल्याच हातांत असावीं हा हेतु असतो, हें अगदीं उघड आहे. चित्पावन ब्राह्मण देशावर आले, ते व्यवस्थित वागून छाप बस-वितात असें पाहिल्यावर देशावरील पूर्वींच्या ब्राह्मणांनीं त्यांचा मत्सर सुरू केला, ग्रामण्यें उपस्थित केलीं आणि हे प्रेतापासून उत्पन्न झालेले कसले तरी विचित्र लोक आहेत अशी हूल उठवून दिली ! त्रिगर्त देशांतील ब्राह्मण महा-राष्ट्रांत येऊन पानमळे लावून स्वतःच्या श्रमानें संपन्न झाले. त्यांच्या संपत्तीचा हेवा इतर ब्राह्मणांना वाटला आणि त्यांना तिरगुळ, किडे मारणारे अतएव हीन ब्राह्मण असें म्हणून कमी लेखण्याचा यत्न केला. रणावट ब्राह्मण हे व्याजबट्टा करीत व हप्ते बांधून देत. त्या हप्त्यांना खिस्त असें म्हणतात. रणावटांची सावकारी ज्यांना पाहवली नाहीं, त्यांनीं त्यांना किस्ती व ख्रिस्ती ब्राह्मण म्हणण्यास कमी केलें नाहीं. गोवर्धन ब्राह्मणाविषयींही अगदीं असेंच झालें आहे.

मध्यकालांत महाराष्ट्रांत व कोंकणांत चालुक्य, राष्ट्रकूट, यादव, होयसल इत्यादि अनेक क्षत्रियांचीं लहानमोठीं राज्यें सर्वत्र होतीं हें निर्विवाद आहे. अशा या क्षत्रिय राजांच्या आश्रयानें हे गोवर्धन ब्राह्मण सर्वत्र पसरले आणि पुरोहित, जोशी आणि ज्योतिषी अशा पेशानें राहूं लागले. प्रथम प्रथम या गोवर्धनांना राजाश्रय होता, आणि ते चारी वेदांचें अध्ययन करीत असावेत. कांहीं कालानंतर महाराष्ट्रांत यजुर्वेदी ब्राह्मणांची संख्या जास्त वाढली व त्यांनीं आपल्या पूर्वींच्या म्हणजे गोवर्धन ब्राह्मणांच्या वृत्त्या आपल्या चातुर्यानें मिळविल्या. आपलें वर्चस्व सदैव राहावें म्हणून गोवर्धनांविरुद्ध असा ग्रह आपापल्या यजमानांच्या मनामध्यें उत्पन्न केला. पूर्वचालुक्य, उत्तर-चालुक्य, राष्ट्रकूट, जाधव, यादव यांची सत्ता कमी झाल्यानंतर पेशव्यांची सत्ता वाढली. पेशव्यांनीं आपल्या चित्पावन बंधूंना पौरोहित्य दिलें. चित्पावन ब्राह्मण पूर्वी बराच कालपर्यंत अपंक्त होते. त्यांना पुढें प्रतिनिधींनीं पंक्ति-पावन केलें. कांहीं काल चित्पावन भिक्षुक व यजुःशाखीय देशस्थ व ऋग्वेदी देशस्थ यांमध्येंही मत्सरमूलक ग्रामण्यें उद्भवलीं. पेशवाईतील बराचसा भाग ग्रामण्यानें भरला होता, हें त्या वेळचीं शंकराचार्यांचीं आज्ञापत्रें पाहिलीं असतां दिसून येतें. मूळच्या गोवर्धनांना प्रथम यजुर्वेद्यांनीं मागें टाकलें, यजुर्वेद्यांवर देशस्थ ऋग्वेद्यांनीं मात केली. चित्पावनांनीं सर्वांना मागें सारून आपलें घोडें पुढें दामटलें. या अशा झटापटीच्या काळांतच गोवर्धन ब्राह्मणांना इतर ब्राह्मणांनीं '**गोळक**,' असें नांव देऊन त्यांना अधर्म संतति ठरवून त्यांचा इतका छळ केला कीं 'पेशवाई जर कां आणखी कांहीं वर्षें राहाती तर गोवर्धन ब्राह्मणांचें नांवही राहातें ना' असे उद्गार कै० वा० राजारामशास्त्री बोडस यांना आपल्या ग्रंथांत काढावे लागले.

साधारणतः शके १७४० पूर्वी गोवर्धन ब्राह्मणांस 'गोळक' म्हणून संबोधण्याची प्रथा नव्हती. शिलालेखांत श्रीमंत पेशव्यांचे निवाडयांत व डायऱ्यांत आणि श्रीमत् शंकराचार्यांचें आज्ञापत्रांत गोवर्धन ब्राह्मण, गोवर्धनस्थ ब्राह्मण, गोवर्धन अशा तऱ्हेचा ह्या ब्राह्मणांचा उल्लेख आहे. परंतु पुढें व विशेषतः पेशवाईच्या उत्तरार्धांत अधर्म संततिवाचक 'गोळक' हें नांव इतकें रूढ झालें कीं सरकारी कागदोपत्रीं जरी 'गोवर्धन ब्राह्मण' म्हणन उल्लेख होत असे

तरी व्यवहारांत त्यांना 'गोळक' म्हणून हीन लेखण्याची प्रथा दृढ होत गेली व ब्राह्मण वर्गांतील हा एक कनिष्ठ भाग मानला जाऊं लागला.

क्षत्रिय राजांच्या राजवटींत मुसलमान बादशहांचे अमदानींत आणि पेशवाईचे पूर्वार्धांत गोवर्धन ब्राह्मणांस न्याय मिळाला. पण पुढें वर दाखविल्याप्रमाणें त्यांचा द्वेष होऊं लागला आणि ब्रिटिश अमदानींत छापण्याची कला निघाल्यानंतर जे ग्रंथ प्रसिद्ध झाले, उदाहरणार्थ, पुरंदऱ्यांचा 'कोंकणांतील शुक्ल यजुर्वेद्यांची खरी माहिती' पुणें वर्णन, रामभाऊ गुंजीकरांचें सरस्वती मंडळ, इतिहास संशोधक राजवाड्यांचे लेख, वगैरे. त्यांत 'गोवर्धन' असें लिहून पुढें कंसांत 'गोळक' तर कोठें कोठें फक्त 'गोळक' असें लिहून त्या जातीबद्दल जनतेची दिशाभूल केली गेली. ह्याचा परिणाम ह्या जातींचा अत्यंत द्वेष होण्यांत झाला. तो इतका कीं, अन्नोदक व्यवहार तर दूरच असो, पण स्त्रियांतूनही त्यांचा स्पर्शही असह्य झाला. ज्या ठिकाणीं हा समज अल्प असे व इतरांच्या मदतीशिवाय चालेना तेथें होत असलेला अपमान ह्या लोकास सहन करणेंच भाग पडे. परंतु उत्तर कोंकणसारखे भागांत जेथें गोवर्धन व चित्पावनांच्या वृत्त्या बरोबरीनें असत, तेथें गोवर्धनांनीही बहिष्काराची प्रतिक्रिया सुरू केली व ते चित्पावनांचाही तितकाच विटाळ मानूं लागले. एकंदरींत अपमानाच्या भीतीनें गोवर्धन समाज इतर ब्राह्मण समाजापासून फटकून राहूं लागला. चित्पावन व यजुर्वेदी भिक्षुकांच्या वृत्त्या असल्यानें त्यांचेकडून गोवर्धनांचा द्वेष वृत्तिमूलक केला गेला असा गोवर्धनांचा अनुभव आहे. इतर ब्राह्मण समाजाचा ह्याप्रमाणें संबंध सुटल्यामुळें खालच्या वर्गाशीं निकट संबंध येणें क्रमप्राप्तच झालें! आणि भिक्षुकी वृत्त्या खेडेपाड्यांतूनच असल्यानें गोवर्धन ब्राह्मणांमध्यें आचारमालिन्य स्वाभाविकच आलें. अक्षरशून्य जरी त्यांच्यांत क्वचितच आहेत तरी विद्याभिरुचि कमी झाली! आणि 'कुग्रामवस्ती,' 'कुलहीनसेवा,' अशी स्थिति झाल्यानें प्रगति खुंटली व अत्यंत दारिद्र्य आलें!! तथापि अशाही परिस्थितींत त्यांनीं आपली वेदविद्या व वैदिक संस्कार व ब्राह्मण्य कायम राखिलें आहे. ह्याचें सर्व श्रेय त्यांच्या पिढीजाद चालत आलेल्या पुरोहित, ज्योतिषी व जोसपणाच्या वृत्त्यांस आहे. खेड्यापाड्यांतून राहणाऱ्या व मान्य समजल्या जाणाऱ्या ब्राह्मणांचे आणि गोवर्धन ब्राह्मणांचे आचारविचार बहुतेक सारखेच आहेत. शहरांत राहणारे व नोकरीधंदा

करणारे गोवर्धन ब्राह्मण हे इतर ब्राह्मणांप्रमाणें पुढारलेले आणि सुधारलेले असेच आहेत.

गोवर्धन ब्राह्मणांची निकृष्ट अवस्था होण्याला अनेक कारणें असली तरी त्यांतील मुख्य कारण म्हणजे अधर्म संततिवाचक गोळक हें नांव आणि तज्जन्य बहिष्कार हें होय ! अर्थात् याबद्दलचा दोष इतर मान्य ब्राह्मणांकडे आहे यांत शंका नाहीं. हा दोष इतर ब्राह्मणांकडे कसा येतो याची कल्पना यावी म्हणून कांहीं उदाहरणेंच देतों.

१४९० मध्यें उत्तर कोंकणप्रांत मुसलमानांचे हातीं होता. त्या वेळेपासून देशस्थ ब्राह्मण उत्तर कोंकणांत वसाहतीस येऊं लागले. तेथें सर्व वर्चस्व गोवर्धनांचें आहे असें पाहून त्यांनीं यजमानांचीं मनें गोवर्धनांविषयीं कलुषित करण्याचें मंथराकार्य चालू केलें. कुलाबा जिल्ह्यांतील पेण या गांवची वृत्ति अष्टाधिकारी वृत्त्यंशीं वेखंडे या गोवर्धन ब्राह्मणाकडे प्राचीन काळापासून होती. आसपासच्या ८४ खेड्यांवर वेखंडे यांचा धर्माधिकार चाले. वेखंड्याचे पदरीं नोकर असलेल्या देशस्थ ब्राह्मणानें पुढें बाळा जोशी व यादव जोशी यांना ग्रामण्यें उत्पन्न करून रडकुंडीस आणलें. प्रथम बाळा जोशी यानें आंग्रे सरदाराकडे दाद मागितली परंतु कांहीं उपयोग झाला नाहीं. शेवटीं त्यानें पेशवे सरकारकडे दाद मागितली. श्रीमंत नानासाहेब पेशव्यांनीं योग्य न्याय करून बाळ जोशी यास शा. शके १६६४ स. १७४२ मध्यें जें अभयपत्र दिलें तें असें आहे.—

(मूळ पत्राची आवृत्ति)

वेदमूर्ती राजश्री बाळ जोशी बिन् यादव जोशी वेखंडे **गोवर्धन ज्योतिषी** धर्माधिकारी उपाध्ये वस्ती पेण गोसावी यांसी :—

पो ।। सदाशिव चिमणाजी नमस्कार, सु ।। सलास आर्बेन मया व आलफ प ।। साकसें येथील वृत्ति तुमची असतां वे. रा. **विश्वनाथ जोशी** बिन् मोर जोशी याणी कानोजी आंगरे यांचे कारकीर्दीत **कलह मांडिला त्याचा** निर्गम कुलाबियाचे मुकामीं जाला तें तुम्हीं सरकारांत येऊन जाहीर करावें तें न केलें सबब हालीं तुम्हांस हुजूर आणोन करार केले असत याची उठावणी करून वृत्तीचा उपभोग करीत जाणें. जाणिजे. छ. २७ माहे जिल्हेज ।। हुजूर

लेखन सीमा

याप्रमाणें योग्य न्याय दिला तरी विश्वनाथानें वृत्तीचे कामीं बाळा जोशी यास त्रास देण्यास कमी केलें नाहीं. अनेक जातींतील यजमानांना अनेक निमित्त सांगून व बाळा जोशी यांची निंदा करून त्यानें उपाध्येपण पुनः वळकाविलें. शेवटीं पुन्हां बाळा जोशी यानें फिर्याद केली. त्यामुळें सरकारांतून देशाधिकारी यास आज्ञा आली कीं बाळा जोशी यासच अष्टाधिकार देववावे. (हे कागद पेणकर ना. चिं. जोशी, वेखंडे याजपाशीं आहेत).

शा. श. १६६९ इ. स. १७४७ त श्रीमंत नानासाहेब पेशवे यांनीं देशाधिकारी यास लिहिलेलें आज्ञापत्र येणेंप्रमाणें:--

(अस्सल बरहुकूम नक्कल)

राजमान्य राजेश्री रघुनाथ हवालदार व कारकून प ॥ पेण पंचमहाल गोसावी यासी :--

सेवक सदाशिव चिमणाजी नमस्कार सु. समाज आर्बेन मया व आलफ वेदमूर्ति बाळ जोशी बिन् यादव जोशी वेखंडे गोदर्वन वृत्यंशी प. साकसे यांणीं हुजूर येऊन विनंति केली कीं, परगणे मजकूर येथील ज्योतिषपण व उपाधीक (उपाध्यायपण) धर्माधिकारणादि वतन आपलें आहे, त्यास इतर ब्राह्मण व प्रभु वगैरे यांनीं कार्यप्रयोजन केलें तर आपल्यासच बोलावून आपले हातें कार्य प्रयोजन चालवित नाहींत. ब्राह्मणांकडे व प्रभूंकडे कार्य प्रयोजन जालें तर घटिका इत्यादिक ज्योतिषपणाचें प्रयोजन व उपाध्यीक आपण चालवीत आलों. सोनार, कासार, व शूद्र जाति देखील वगैरे यांचे घरीं कार्यप्रयोजन जालें तर तेथेंही सर्व अधिकार आपणच चालवितों. ऐसें असोन सांप्रत ब्राह्मण व प्रभू, सोनार, व कासार दुसरे ब्राह्मणाकडून कार्य चालवून आपले वृत्तीचा लोप करितात. त्यास येविशीं राजश्री मानाजी आंगरे याजकडून निर्वाह होऊन पत्र भोगवटिया करितां त्यांणीं दिल्हे आहे. त्यास सरकारचें पत्र असलियानें नवदिगर कोणी करणार नाहीं. सुधामत प्रत चालवितील म्हणन त्यावरून राजश्री मानाजी आंगरे यांचेकडे निर्गम होऊन पत्र दिल्हें आहे, त्याचा अर्थ ध्यानास आणिलातो. त्याजमध्यें निर्वाह कीं, **ब्राह्मण, प्रभू, सोनार, कासार वगैरे यांजकडील कार्य प्रयोजन गोवर्धन ब्राह्मण चालवीत आले आहेत.** त्याजप्रमाणें याणीं चालवावें. ऐसी चाल कल्याण व भिवंडी (जि. ठाणें) प्रांतांतही आहे. म्हणून मशार निल्हेचा पत्रार्थ आहे. जोशी

मजकूर यांणीं ताकीद पत्रें नेलींच आहेत. ऐसें असोन जे यांचे वृत्तीचा लोप करतील त्यांस ताकीद करून सुधामतप्रमाणें चालविणें. **ब्राह्मण, प्रभू, सोनार व कासार यांजकडील कार्य प्रयोजन वे. रा. बाळ जोशी गोवर्धन ब्राह्मण हे चालवितील. या अन्वयें पूर्वी चालत आलेला दाखला** पाहून ताकीद करून चालविणें. ब्राह्मण, प्रभू, सोनार, कासार यांनीं याजवितरिक्त कार्य चालविलें तर त्याची क्षमा होणार नाहीं. येविशीं ताकीद करणें. या पत्राची नक्कल घेऊन असल पत्र भोगवटियास परतोन देणें. जाणिजे. रा॥ छ २८ जमादिलावर प॥हुजूर

लेखन सीमा

हें ताकीद पत्र फार स्पष्ट आहे. त्यावरून गोवर्धनांचें पौरोहित्य ब्राह्मणापासून खालच्या वर्गापर्यंत सर्व हिंदु समाजामध्यें चालत होतें व इतर ब्राह्मणांचेही हेच उपाध्ये होते हें उघड होतें.

वृत्त्यपहाराच्या तंटयांतूनच परनिंदाव्यंजक शब्द बाहेर पडतात व तेच पुढें रूढ होतात. उत्तर कोंकणामध्यें माध्यंदिनांची जशी वृत्ति होती तशीच गोवर्धनांचीही होती. किंबहुना गोवर्धनांचीच वृत्ति बिंबराजामार्फत माध्यंदिनांकडे आली हें पूर्वीं सांगितलेंच आहे. तथापि अपरांतांतील माध्यंदिनांनीं गोवर्धनांना "गोळक" असें संबोधण्यास कमी केलें नाहीं. गोवर्धनांपुढें गोळक हा शब्द जणु स्पष्टार्थवाचकच म्हणून जेथें तेथें लिहिण्याची प्रथा पडली. पुरंदरे यांनीं जो उत्तर कोंकणांतील माध्यंदिनांचा इतिहास लिहिला आहे. त्यांत अनेक वेळां गोळक हा हीनत्वदर्शक शब्द अज्ञानानें लिहिला आहे. पण आपल्याच ग्रंथाच्या परिशिष्टामध्यें पान ८० वर पेशव्यांच्या आज्ञापत्रांत गोवर्धन शब्द आहे, याकडे त्यांनीं दुर्लक्ष केलें आहे. त्या सनदेंत प्रारंभीं व शेवटीं **गोवर्धन ब्राह्मण हे शब्द** सूर्यप्रकाशाइतके स्पष्ट आहेत. वाचकांच्या निश्चितीकरितां ती सनदच येथें अक्षरशः देतों:—

अखण्डित लक्ष्मी अलंकृत राजमान्य राजश्री रामजी महादेव नामजाद प्रांत साष्टी, गोसावी यांसी :—

सेवक बाळाजी बाजीराव प्रधान नमस्कार. सुरन तिसा आर्बैन मया व अलफ (शके १६७०) पळशे ब्राह्मण व **गोवर्धन ब्राह्मण वतनदार** प्रांत मजकूर यांणीं कसबे पुणें येथील मुकामीं हुजूर येऊन विनंती केली कीं, आपण पुरातन वतनदार, उपाध्येपण व जोशीपण आपलें आहे.

श्रीमंत कैलासवासी आपासाहेबीं साष्टी प्रांत फत्ते केला. ते समयीं आपण भयास्तव परागंदा होऊन मुंबई प्रांतीं गेलों होतों. श्रीमंतांचे दर्शनास यावें त्यास आम्ही फिरंगाणचे राहाणार, या राज्याची स्थितरीत ठावकी नाहीं. भयानें दर्शनास न आलों. वसई व वेलापूर येथील जोशी उपाध्ये हजर होते. त्यांचीं वतनें चालतात आणि आम्ही समयीं नव्हतों याजकरितां आमचीं वतनें सरकारांत अनामत करून कमाविसीस सरकारचा गुमास्ता ठेविला. त्यास वसई फत्ते ते समयीं श्रीमंत ठाणीयास आले; तेव्हां आमचे दोघे तिघे जण ब्राह्मण येऊन श्रीमंताचे चरणांजवळ अर्ज केला कीं, आम्ही गरीब, आमचीं वतनें सरकारीं अनामत ठेविलीं अहेत, तीं स्वामींनीं कृपाळू होऊन आमचीं आम्हांस द्यावीं; त्यावरुन श्रीमंतांनीं आज्ञा केली कीं, सांप्रत पुण्यास जावयाची उतावळी आहे; पुढें खासा स्वारी या प्रांतीं होईल, तेव्हां मनास आणून तुमचीं वतनें तुम्हास दिलीं जातील; म्हणून आज्ञा केली होती. त्यास श्रीमंत आपासाहेब कैलासवासी जाहले. यामुळें आमचीं वतनें तशींच राहिलीं. त्यास अलीकडे चारपांच वर्षें आम्ही हुजूर अर्ज करावयासीं येतों; स्वामींनीं कृपाळू होऊन आमचीं वतनें आम्हांस द्यावीं म्हणून अर्ज केला, व येविसी आम्ही प्रांा मजकूराचे पाटील, म्हात्रे आणून गांवगंन्ना चौकशी करून जोशी, उपाध्ये पुरातन खरे वतनदार होते, त्याप्रमाणें कदबे लेहून घेतले आहेत, म्हणून विनंति केली. **त्याजवरून पळशे व गोवर्धन** हे गरीब, यांजवर कृपाळू होऊन प्रांत मजकूरचे पाटील म्हात्रे यांणीं कदबे लेहून दिले आहेत. त्याप्रमाणें पळशे व गोवर्धन मजकूर यांचीं वतनें यांस उपभोग करावयासीं आज्ञा केली असे.

देहे झाडा बितपशील :—

२७ ता । तुर्भे	१४ ता । ठाणें	पैकीं वजा अमानत
२३ ता । मालाड	५ ता । घोडबंदर	वारीसदार नाहींत सबब जोशी
२४ ता । मरोळ	४ ता । धारावी	उपाध्येपण सरकारी देहे...
१ को । वांदरें	——	सुमार:—
——	२३	१३ ता । तुर्भे
८५	——	८ ता । मालाड
	१०८	१४ ता । मरोळ
		३ ता । ठाणें
		——
		३८

बाकी निसबत वतनदार देहे–सुमार

१४ ता । तुर्भे
२५ ता । मालाड
१० ता । मरोळ
१ को । वांदरें
—
५०

११ ता । ठाणें
५ ता । घोडबंदर
४ ता । धारावी
—
२०
—
७०

यांसीं नांवनिशी जोशी, उपाध्ये

रामभट्ट व नागेशभट्ट गांव :—

५ ता. ठाणें को। मजकूर
पाखाडचा
१ चरई
१ सिद्धेश्वर
१ पांचघर
१ कोलवड
१ हजवड
—
५

५ गांव निम्मे
ता। मरोळ
१ मौजे मुलुंड
१ मौजे चांदर
१ मौजे ठाणें
१ मौजे भांडूप
१ मौजे कोन्हेरी
—
५
१ मालवडी
—
६

विनायक पंडित गांव :—

ता. ठाणें
१ मौजे चेन्दणी
१ मौजे नवपाडा
१ को ठाणें. पाखाडचा
१ माहागिरी
१ राहवड
१ भोगेत
—
३

गांव निम्मे

बापूभट
१ मौजे कावसरे ता। ठाणें
गांव १

केरभट गोवर्धन
१ मौजे वाडवली ता। ठाणें
गांव १

कृष्ण उपाध्ये, गांव
५ ता मरोळ
१ मौजे व्याहाड
१ मौजे गुणगांव
१ मौजे साई
१ मौजे पसपवली
१ मौजे पवई
५

१ मौजे तुळशी ता मालाड
६

शंकरभट्ट
ता ठाणें गांव
१ मौजे बाळखूम
१ मौजे माजिवडे
२

शंकरभट्ट व रामभट्ट
ता तुर्भे गांव:—

१ मौजे बरेलें	१ मौजे माणखूर्द
१ मौजे वाडवली	१ मौजे मांडाळे
१ मौजे देवनेरे	१ १ को। तुर्भे
१ मौजे अणीक	१ मौजे नानाळे
१ मौजे वाणव	१ मौजे नारिवली
५	५

१०

गोविंदभट्ट गोवर्धन
ता ठाणें गांव
१ मौजे वोवळे
१ मौजे चेने
१ मौजे हेरिवड
३

धांगभट्ट
१ मौजे तुर्भे कोलशेत
ता ठाणें गांव १
माधव जोशी
-॥- मौजे वरसावें
ता चेण निम्मे गांव
ता घोडबंदर
-॥- मौजे काशी
-॥- को। मजकूर
१
१॥

दामुल जोशी यांचा आईकडील आजा नारायण नाईक निपुत्रिक. याणें लेकीचे वंशास दामुल जोशी यासी दिले
गांव.
-॥- मौजे वरसावें ता ठाणें
१ ता घोडबंदर

प्रोसम्भट्ट शामभट्ट
१ मौजे चेंबूर ता। तुर्भे गांव १
गोपाळभट व बापूभट
१ मौजे माहूल ता। तुर्भे गांव १

-।। मौजे काशी
-।। को। मजकूर
१
१।।

शिवराम जोशी गांव
१ मौजे मिरे ता। घोडबंदर
१ मौजे दहीस ता। मालाड
२

धाकंभट्ट
मौजे वेसावें ता। मालाड
।।. कालवड गांव
बेंड फाटक. गांव
२ ता। मालाड
१ मौजे आळसें
१ मौजे मरसें
२
४ ता। धारावी
१ मौजे उतन
१ मौजे गोराई
१ मौजे मनोरी
१ मौजे डोंगरी
४
६

रामनाईक गोवर्धन
५ ता। मालाड गांव:-

विठ्ठल नाईक याचा पुत्र वेठ नाईक ता। मालाड गांव
१ मौजे कान्दवली
१ मौजे मालवणी
१ मौजे दारवली
१ मौजे चारखोप.
४

गोविंद नाईक व जीवन नाईक कावळे
वामन नाईक गांव:—
२ ता। तुर्भे
१ मौजे जुहूं
१ मौजे आंधेरी
२
११।। ता। मालाड
१ का। मालाड
१ मौजे वलनई
१ मौजे दिंडोसी
१ मौजे कुरार
१ मौजे चिंचोली
१ मौजे गोरेगांव
१ मौजे आरें
१ मौजे वेसारें
१ मौजे पहाडी

१ मौजे सिदवली	१ मौजे मोगरे
१ मौजे हेरीवली	१ मौजे माजास
१ मौजे नागाठणें	।। मौजे वेसावें
१ मौजे कणेरी	खेरीज कालवड निम्मे
१ मौजे एकसर	११।।
५	

रणसोड नाईक वस्ती वसई १ का। वान्दरें व दांडें
ता। घोडबंदर गांव,
१ मौजे भाइंदर
१ मौजे मुर्धे
२

येणेंप्रमाणें असामी वीस यांस देहे बाहात्तर पैकीं सत्तर गांव व पाखाडयांपैकीं दोन गांव यांचीं वतनें यांस द्यावयाचीं करार केलीं असत. तर जोशी उपाध्येपण फिरंगी यांचे अमलांत सुधामत चालत होतें. त्याची चौकशी करून पूर्वी चालत आल्याप्रमाणें हल्लीं ई॥ छ १५ मोहरमापासून सदर्हू असामीचे जोशी उपाध्येपण चालवणें. सदर्हू वतनसंबंधें **पळशे व गोवर्धन** जोशी उपाध्ये यांजकडे सरकारची नजर करार केली रुपये २००१ यासीं मुदती:—

१००० सालमजकुरीं अखेर सालीं घेणें
१००१ पेस्तर सालीं सन खमसैनांत अखेर सालीं घेणें.
२००१

येणेंप्रमाणें दोन हजार एक रुपये करार केला असे. सदर्हू मुदतीप्रमाणें वसूल घेणें. याखेरीज अडतीस गांव आहेत, त्यांस वारिसदार कोणी नाहीं. सबब जोशी व उपाध्येपण सरकारांत ठेविलें असे. तरी सरकारचे गुमास्ते ठेवून जोशी उपाध्येपण चालविणें. छ ६ मोहरम. बहुत काय लिहिणें

लेखन सीमा

गोवर्धन ब्राह्मण हे अखिल हिंदु जातींचें पौरोहित्य करतात म्हणून त्यांना 'अब्राह्मण' हीन असें समजूं लागले असें कोणी म्हणतात; परंतु प्रत्येक मान्य व निरपवाद जातींतील ब्राह्मणसुद्धां ग्रामयाजक वा गांवजोसपण करीत

असतात, मग त्यांना कां अब्राह्मण समजूं नये? तशी वस्तुस्थिति नाहीं. ग्राम-जोशी हे बहुतेक ज्योतिषी असतात तेव्हां नेहमीं पत्रिका करितांना वर्तुळ काढण्याचा यांना सराव असतो, त्यावरून गोल काढणारे ते गोलक असें नांव पडलें असावें असा एक हास्यास्पद तर्क कोणी करितात. पण याही आक्षेपाला उत्तर वरीलच आहे. कारण कोंकणस्थ, देशस्थ, कऱ्हाडे, देवरुखे, यजुर्वेदी इत्यादि सर्व ब्राह्मणांमध्यें चांगले विद्वान्, ज्योतिषी आहेत व तेच वृत्यंशी अष्टाधिकारीही असतात. मग अशा या सर्वांना गोलक हें आडनांव कां पडलें नाहीं. निदान पूर्णांतून पूर्ण वजा करणारे व शून्यांत शून्यें मिळविणाऱ्या या ब्राह्मणांना पूर्ण ब्राह्मण असें नामाभिधान प्राप्त व्हावयास हवें होतें, परंतु तेंही घडलें नाहीं. तेव्हां वरील तर्क संभवत नाहीं.

ग्रामस्थ सर्व जातींच्या पुरोहिताला ग्रामयाजक व ग्रामजोशी म्हणतात ग्रामचंडाळामध्यें त्याची गणना केली आहे. कांहीं ठिकाणीं याला अब्राह्मण म्हटलें आहे. परंतु तो अर्थवाद आहे.

आब्राह्मणास्तु षट्-प्रोक्ता ऋषिणा तत्त्ववेदिना ।
आद्योराजभृतस्तेषाम् द्वितीयः क्रयविक्रयी ॥
तृतीयो बहुयाज्यः स्यात् **चतुर्थो ग्रामयाजकः** ।
पंचमस्तु भृतस्तेषां ग्रामस्य नगरस्य च ॥

—वनपर्व अ. २००

अन्यत्र जीं निष्फल दानें म्हणून सांगितलीं आहेत त्यांत ग्रामयाजकाला दिलेलें दान निष्फळ ठरतें असें म्हटलें आहे. (ब्रह्मवैवर्त, प्रकृतिखंड अ. २७) हें सर्व जरी खरें असलें तरी त्यावरून गोवर्धनांनाच हीन कां समजण्यांत यावें हें समजत नाहीं. फार कशाला धर्मशास्त्रांत चिकित्सक म्हणजे वैद्य, गवई, नाक्षत्रजीवी म्हणजे ज्योतिषी यांना अपंक्त समजावें. श्राद्धाला वर्ज्य ब्राह्मणा-मध्यें यांचा निर्देश आहे. एकंदर वर्ज्य ब्राह्मणांची यादी काढली तर ती ७२ भरते; तेव्हां या बाहात्तर जातींना गोळक हें नांव कां आलें नाहीं व गोवर्धनां-नाच का लावलें याचें कारण वृत्तिमूलक मत्सर, द्वेष व असूया हेंच होय.

प्रकरण ९ वें

गोळक शब्दाची चिकित्सा

गोवर्धन ब्राह्मणांचें प्राचीनत्व, अष्टाधिकाराची वृत्ति, पौरोहित्य, दानपत्रांतील उल्लेख, अग्निहोत्राचे निर्देश, देशावरील व कोंकणांतील विविध शिलालेखांत व ताम्रपटांत त्यांच्या संबंधानें असलेले अधिकार हे सर्व लक्षांत घेतल्यानंतर गोवर्धन ब्राह्मणांचा छळ गोळक या नांवानें कां व्हावा हें समजत नाहीं. ज्यांचें सत्‌ब्राह्मण्य वेदविद्या, अग्निहोत्र, ब्राह्मणापासून अंत्यजादि सर्व जातींचें पौरोहित्य इत्यादि प्रमाणानें आरशासारखें स्वच्छ आहे, त्यांचा छळ गोळक या नांवानें व्हावा, याचें कारण, मत्सर, अज्ञान आणि असूया हेंच होय ! ज्या हीनत्वदर्शक नामामुळें अनेक ग्रामण्यें उद्‌भवलीं व त्या जातीचा छळ होऊन तिची प्रगति खुंटली; त्या नांवाची चिकित्सा प्रस्तुत प्रकरणीं करण्याचें योजिलें आहे.

सांप्रत पंचद्राविड ब्राह्मणांमध्यें अठ्ठावीस तीस पोटजाती आहेत. त्यांची माहिती मागें प्रकरण तीनमध्यें आम्हीं दिली आहे. ज्या गोवर्धन जातीला गोळक असें म्हटलें जातें, तें नांव श्रुति, स्मृति ग्रंथांत जातिवाचक म्हणून कोठें आलें आहे कीं काय हें आतां पाहूं.

श्रौत व सौत्र वाङ्मयांमध्यें आज विद्यमान् असलेल्या ब्राह्मण जातींचीं नांवें कुठेंच नाहींत. श्रुतिकालीं व सूत्रकालीं वेदमूलक, शाखामूलक व सूत्र-मूलक भेद ब्राह्मणांमध्यें होते. देशस्थ, कोंकणस्थ, कऱ्हाडे, गोवर्धन, आभीर, तिरगुळ, सहवासी वगैरे देशवाचक नांवें त्या वेळीं मुळींच नव्हतीं. सह्याद्रि खंड, ब्राह्मणोत्पत्ति मार्तंड, शतप्रश्न, कल्पलता, पांक्तापांक्तार्थ–दीपिका असल्या या अर्वाचीन ग्रंथांमध्येंच हीं सर्व नामें आहेत. हे ग्रंथ तर्कदुष्ट असल्यामुळें त्यांचें प्रामाण्य मानणें मोठें धोक्याचें आहे. सारांश अलीकडील पौराण व निबंधग्रंथ आणि प्राचीन श्रौत व सौत्र ग्रंथ हे सोडून देऊन फक्त 'धर्मशास्त्रं तु वै स्मृतिः' या न्यायानें स्मृतिग्रंथामध्यें ब्राह्मण जातीसंबंधींचा विचार काय आहे, हें पाहणें योग्य होईल. धर्मशास्त्र प्रयोजकामध्येंसुद्धां गौतम, बौधायन, वसिष्ठ, आपस्तंब, विष्णु, उशन, शंख, लिखित, मनु,

याज्ञवल्क्य, पाराशर, संवर्त, बृहस्पति, वेदव्यास, दक्ष इत्यादि प्रमुख आहेत सूतसंहिता या नांवाचा ग्रंथ बराच अलीकडील अतएव प्रक्षिप्त दिसतो. त्याचा धर्मशास्त्रग्रंथांमध्यें समावेश करणें इष्ट नाहीं असें कोणी म्हणतात सूतसंहितेसारखे ग्रंथ धर्मशास्त्रांत ढकलणें हें थोडें अयोग्यच होईल. राहतां राहिले धर्मसूत्रकार आणि मान्य स्मृतिकार. त्या ग्रंथांचे आधारें गोळक जातीचा विचार करणें योग्य होईल.

गोळक हा शब्द प्राचीन अशा आपस्तंब, गौतम, बौधायन, वसिष्ठ इत्यादि धर्मसूत्रांत नाहीं. हा शब्द प्रथम मनुस्मृतीमध्यें आलेला आहे; व त्याचाच अनुवाद लघु आश्वलायन, लघुशातातप, बृहस्पति इत्यादि स्मृतिकारांनीं आणि मेधातिथि, कुल्लुकभट, मिताक्षराकार, अपरार्क इत्यादि टीकाकारांनीं केलेला आहे. गोळक शब्द उच्चारणारे स्मृतिकार व त्याचा अनुवाद करणारे टीकाकार हे या शब्दाचा उच्चार व्यक्ति म्हणून करतात, जाती म्हणून करीत नाहींत, हें ध्यानांत ठेवण्याजोगें आहे. ज्या ज्या स्मृतिकारांनीं व टीकाकारांनीं संकर जातीचा उल्लेख केला आहे आणि ज्यांनीं संकर जातींचे व्यवसाय सांगितले आहेत त्यांमध्यें गोळक ही जात नाहीं. मागें तिसऱ्या प्रकरणाच्या शेवटीं आम्हीं वर्णज जातींची यादी मुद्दाम विस्तारानें दिली आहे. त्या यादीमध्यें हें नांव नाहीं. संकर जातींमध्यें या जातीचें नांव असण्याचें कारणच नाहीं. तेव्हां तेथेंही हें नांव नाहीं. वर्णज जाती आणि संकर जाती सांगणाऱ्यांनीं जातींचीं नांवें नुसतीं सांगितलीं आहेत असें नाहीं तर नांवांशेजारींच त्या जातीची वृत्ति म्हणजे व्यवसायही सांगितला आहे. व्यवसायाशिवाय जाती राहूं शकत नाहीं. जात टिकण्याला व ती इतरांपासून निराळी राहण्याला, निराळी वृत्ति, निराळा व्यवसाय असावा लागतो. तसा निराळा व्यवसाय कोणत्याही स्मृतींमध्यें व सूत्रांमध्यें गोळकाला उद्देशून सांगितलेला नाहीं, त्यावरून गोळक ही जाती नसून तो शब्द व्यक्तिवाचक आहे हें सिद्ध होतें.

गोळक हा शब्द व्यक्तिवाचक आहे यासंबंधानें कांहीं आधार देतों.

गोलको विधवायां च निषिद्धः स्यात् कलौस्मृतः ॥

—लघुआश्वलायन अ. २१ श्लो० १५

उक्तो नियोगोमनुना निषिद्धः स्वयमेव तु ॥

—बृहस्पति

मनु अध्याय ३ श्लो. १७४ (याचात्र अनुवाद याज्ञवल्क्य १।२२२) यावर टीका करतांना मेधातिथि म्हणतो,

नियोगोत्पन्नौ संस्कृतौ कुंड गोलकौ
केचित् आहुर्द्विजैर्जातौ कुंड गोलकौ ॥

अर्थः—विधवापुत्र गोळक हा कलियुगांत निषिद्ध आहे. मनूनें नियोग सांगितला तरी तो कलियुगांत निषिद्ध आहे. नियोगानें उत्पन्न झालेल्या पुत्राला गोळक समजत. कुंडगोडक हे नियोगोत्पन्न होत. हे संस्कारार्ह आहेत असें कांहींचें म्हणणें आहे.

साधारणतः मनूची री सर्व स्मृतिकार व मेधातिथीची री सर्व निबंधकार ओढीत असतात. त्यावरून हा शब्द व्यक्तिवाचकच ठरतो.

धर्मशास्त्रप्रयोजकांनीं ज्या ठिकठिकाणीं संकरज जाती म्हणून सांगितल्या आहेत, त्या वास्तविक होत्या असें समजणें हेंही थोडेंसें साहसाचेंच वाटतें. कारण संकर जातींचा विस्तृत विचार करणारी जी औशनस स्मृति तिजमध्यें एकंदर अडतीस जाती धंद्यांसह सांगितल्या आहेत. त्यांतील विवाहसंबंधानें झालेल्या जाती २८ असून बाकीच्या १० जाती चौर्यकर्मानें झाल्या आहेत, असें तो म्हणतो. समाजांत चोरून मारून संतति होते हें खरें. पण ही संतति चौर्यकर्माचीच असें समजायचें कसें ? समजण्याला जर मार्ग नाहीं व तशा भिन्न भिन्न संस्था होत्या असे उल्लेख नाहींत, त्यांवरून स्मृतिकारांनीं दिलेले हे संकर संशयास्पदच वाटतात. कांहीं संकर हे स्मृतिकारांनीं अज्ञानानेंच दिलेले दिसतात. निरनिराळ्या राष्ट्रांतील व निरनिराळ्या प्रदेशांतील ज्या जातींची माहिती स्मृतिकारांना नव्हती त्या राष्ट्रस्वरूपी व प्रादेशिक जातींना यांनीं अज्ञानानें संकर जाती असें म्हटलेलें आहे. या संकर जाती म्हणजे मागध, वैदेह, पुक्कस, पुलिंद, आवंत्य, वाटधान, सात्वत, आंध्र, द्रविड इत्यादि होत. मदगु, मेद, कैवर्त, चांडाल या जातीसुद्धां मूळच्या प्रादेशिकच असाव्यात. तसेंच राजकार्यनियुक्त अधिकारी पुरुषांना ज्या सूत, उग्र, प्रत्येनस करण अशा संज्ञा असत, त्या संज्ञावाचक व्यक्तींनाही मनूचे नांवावर कोणीतरी संकर जाती म्हणून दडपून दिलेलें आहे.

उपनिषद् कालीं राज्यकार्यधुरंधर अधिकाऱ्यांचीं सूत, उग्र, करण, प्रत्येनस वगैरे नांवें होतीं हें बृहदारण्यक उपनिषदामध्यें आढळतें.

'तद्यथा राजानमायान्तमुग्राः प्रत्येनसः सूतग्रामण्यौऽन्नैः पानैरावसथैः प्रतिकल्पन्तेऽयमायात्ययमागच्छतीत्येवँ हैवंविदं सर्वाणि भूतानि प्रतिकल्प्यन्त इदं ब्रह्मायातीदेमागच्छतीति ॥ ३७ ॥ तद्यथा राजानं प्रयियासन्तमुग्राः प्रत्येनसः सूतग्रामण्योऽभिसमायन्तेवमेवेममात्माऽन्नमन्तकाले सर्वे प्राणा अभिसमायन्ति यत्रैतदूर्ध्वोच्छ्वासी भवति ॥ ३८ ॥

—बृहदारण्यकोपनिषद् चतुर्थोध्याये तृतीयं ब्राह्मणम् ॥

'ज्याप्रमाणें देशांत फिरण्याकरितां येणाऱ्या राजाकरितां अन्न म्हणजे भक्ष्यादि पदार्थ, पान म्हणजे पिण्याचे पदार्थ व आवसथ म्हणजे उतरण्याच्या जागा, तंबू वगैरे यांची व्यवस्था त्या त्या ठिकाणचे राजाचे अधिकारी व सेवक म्हणजे उग्र, प्रत्येनस, सूत, ग्रामणी हे करितात, व राजाची स्वारी येणार येणार म्हणून सर्व लोकांस आगाऊ कळवितात ; त्याप्रमाणें सर्वांस जाणणारें हें ब्रह्म येणार येणार म्हणून त्याकरितां हीं पंच महाभूतें शरीरादि साधनांची तयारी करून ठेवितात.' ॥ ३७ ॥

'त्याचप्रमाणें राजा जावयास निघाला असतां, पूर्वोक्त हे अधिकारी व सेवक उग्र, सूत, प्रत्येनस व ग्रामणी हे राजापुढें एके ठिकाणीं जमतात ; तद्वत् आत्मा शरीरांतून जावयास निघाला असतां, सगळे प्राण त्याच्यापुढें एकत्र जमतात. म्हणूनच अंतकाळीं प्राण्यास ऊर्ध्व श्वास लागतो.' ॥ ३८ ॥

ह्यांत, उग्र, प्रत्येनस, सूत व ग्रामणी ह्या चार कामदारांचा उल्लेख आहे. उग्र म्हणजे अपराध न घडूं देणारे अर्थात् कोतवाल व त्याचे शिपाई (सांप्रत ह्यांना पोलीस अशी संज्ञा आहे.) प्रत्येनस म्हणजे अपराध्यांना शिक्षा देण्याचा अधिकार असलेले (सांप्रत ह्यांना मॅजिस्ट्रेट म्हणतात), सूत म्हणजे रथकार वगैरे, (सांप्रत ह्यांना इंजीनियर म्हणतात) व ग्रामणी म्हणजे गांवचा अध्यक्ष; ह्यांतील सूत, उग्र या अधिकारी विशेष शब्दांना, स्मृतिकारांनीं वर्णसंकर जातिवाचक बनविलें आहे! तसेंच, 'करण' ह्या लेखकवाचक नांवालाही संकर जातित्वांत ढकललें आहे ! ! तात्पर्य राष्ट्रस्वरूपी आणि अधिकारवाचक नांवांचा उल्लेख संकरजाती म्हणून करणें हें

स्मृतिकारांचें अज्ञान आहे आणि त्याला मान्यता देणें हें त्याहीपेक्षां गाढ अज्ञानाचें दर्शक आहे.

गोळक हा शब्द मनूनें प्रथम अध्याय ३ श्लोक १५६ मध्यें व पुढें अ. ३ श्लो. १७४

परदारेषु जायेते **द्वौ सुतौ** कुण्डगोलकौ।
पत्यौ जीवति कुण्डः स्यान्मृते भर्तरि गोलकः ॥१७४॥

या ठिकाणीं योजला आहे.

परस्त्रीच्या ठिकाणीं कुंड व गोळक हे दोन पुत्र होतात. नवरा जिवंत असतांना व्यभिचारानें जो पुत्र होतो त्याला कुंड म्हणतात व नवरा मेल्यानंतर विधवेनें उत्पन्न केलेल्या पुत्राला गोलक म्हणतात. आतां येथें असा प्रश्न येतो कीं कुंड आणि गोलक हे दोन पुत्र मनूनेंच कुठले काढले. मनुपूर्वकालीं झालेल्या प्राचीन धर्मसूत्रकारांनीं बारा प्रकारचे पुत्र सांगितलेले आहेत. त्यांमध्यें या दोघांचा अन्तर्भाव सहज होतो. शिवाय बारा पुत्रांपैकीं दत्तक व औरस सोडून दिल्यास बाकी सर्व पुत्र धर्मसंततींत येऊं शकत नाहींत. मग त्या दश पुत्रांच्या दहा जाती न होतां एकट्या गोळकाचीच जात कां व्हावी? व गोळकाचाच सहोदर जो कुंड त्याच्या जातीचा मागमूसही कां नसावा?

आपस्तंब, बौधायन, वसिष्ठ आणि गौतम इत्यादि जे मान्य धर्मसूत्रकार त्यांनीं बारा प्रकारचे पुत्र सांगितलेले आहेत ते असेः—

पुत्रा औरसक्षेत्रजदत्तकृत्रिम गूढोत्पन्नापविद्धारिक्थभाजः ॥ ३० ॥
कानीन-सहोढ-पौनर्भव-पुत्रिकापुत्र-स्वयंदत्त-क्रीता-गोत्रभाजः ॥ ३१ ॥
—गौतम अ. १० प्र. ३

औरस, क्षेत्रज, दत्तक, कृत्रिम, गूढोत्पन्न अपविद्ध, कानीन, सहोढ, पौनर्भव, पुत्रिकापुत्र, स्वयंदत्त आणि क्रीत असे हे बारा पुत्र होत. औरस व दत्तक हे दोन पुत्र सर्वांना माहीत आहेत. इतर पुत्रांची माहिती वाचली म्हणजे कसेंसेंच वाटेल असे आजचे संस्कार आहेत. स्वस्त्रीच्या ठिकाणीं दुसऱ्यानें उत्पन्न केलेला पुत्र क्षेत्रज होय! (यांतच कुंडाचा समावेश होईल.) दिलेला तो दत्त, पुत्र गुणांनीं असलेला तो कृत्रिम, जो आपल्या घरांतच गूढपणानें उत्पन्न झाला (नवऱ्याला न कळतां व्यभिचारानें उत्पन्न झाला) तो गूढज, आईनें जन्मानंतर टाकलेला तो अपविद्ध होय! (हाही कुंडामध्यें

समाविष्ट होईल.) कौमार अवस्थेंत झालेला तो कानीन, विवाहकालीं वधु गरोदर असल्यामुळें उदरस्थ पुत्रासह विवाह होतो तो पुत्र सहोढ होय ! पुनर्भूं म्हणजे पुनर्विवाहित विधवेनें जारकर्मानें उत्पन्न केलेला तो पौनर्भव होय ! (याचा समावेश गोळकामध्यें होतो.) मुलगी जांवयाला देतांना तिला होणारा पहिला पुत्र माझा अशा करारानें घेतलेला पुत्र पुत्रिकापुत्र होय ! आईबापांनीं टाकल्यामुळें अनाथ स्थितींत जो एकाद्याला येऊन चिकटतो तो स्वयंदत्त, व पैसे देऊन जो विकत घेतला जातो तो क्रीतपुत्र होय ! या बारा पुत्रांपैकीं क्षेत्रज, गूढज, अपविद्ध, पौनर्भव इत्यादि पुत्र व्यभिचारोत्पन्न आहेत. या प्रत्येकाची निरनिराळी जात स्मृतिकारांनीं सांगितलेली नाहीं ; आणि पूर्वीं हे बारा प्रकार असतांना हल्लीं या जाती विद्यमान कां नाहींत? मग एकट्या गोळकाचीच जात धूमकेतूप्रमाणें अकस्मात् कशी बरें उत्पन्न झाली ? आणि कुंडाच्या जातीचा तर पत्ताच लागत नाहीं अशा या स्थितीवरून गोळक ही जातच नाहीं, तो व्यक्तिवाचक शब्द आहे. अर्थात् गोवर्धन हे गोळक नाहींत हें निःसंशय होय !

मुसलमानी अमदानींत विधवा संतति जातिबहिष्कृत मानीत ; इतकेंच नव्हे तर अशी संतति धर्मकृत्यांत असंव्यवहार्य समजत असत. मुसलमानी अमदानींत शके १४५० मध्यें होऊन गेलेले पैठणचे साधु श्रीएकनाथमहाराज यांनीं आपल्या भागवतामध्यें पुढील उल्लेख केला आहे.

‘ उखरीं पेरिलें बीज, कां गोलक आवंतिला द्विज ’

— एकनाथी भागवत अ. १६ श्लो. ४३ ओ. ३०४.

अर्थः—“ ज्याप्रमाणें खडकाळ जमिनींत बीं पेरलें तर तें वृथा जातें, तद्वतच विधवेच्या मुलाला ब्राह्मण म्हणून आमंत्रण दिलें तर तें वृथा होतें. ”

यावरून हें उघड होतें कीं त्या काळीं हिंदु समाजांत अधर्म संतति धर्मबहिष्कृत मानली जात होती. अर्थात् धर्माधिकारी असलेल्या षट्कर्में करणाऱ्या वृत्त्यंशीं गोवर्धन ब्राह्मण ज्ञातींत विधवा संततीचा शिरकाव झाला असेल, असें म्हणणें हें अत्यंत असमंजस व निखालस खोटें आहे. श्रीएकनाथांना गोवर्धन ब्राह्मणांची माहिती होती, पण ते त्यांना गोळक समजत नसत. वर जो गोळक म्हणून उल्लेख आहे, तो गोवर्धन ब्राह्मणासंबंधीं नाहीं. तेथें द्विज म्हणून त्याचा उल्लेख आहे. त्रैवर्णिकांना द्विज ही संज्ञा आहे, द्विज म्हणजे

केवळ ब्राह्मण नव्हे. वेदाचा अधिकार त्रैवर्णिकांना आहे. म्हणून ते उपनयनार्ह आहेत. गोळक संतति ही त्रैवर्णिकांमध्यें उत्पन्न होत असली पाहिजे. कारण 'गोळकाला द्विज म्हणून बोलावल्यास' असें म्हटलें आहे. गोळक ही त्रिवर्णांतील संतति. ती संस्कारार्ह होती व ती त्या त्या वर्णांतच मुरून जात असली पाहिजे.

अधर्म संतति ही तुरळकच असते. एकादी व्यक्ति असलीच तर श्राद्धादि प्रसंगीं आणि इतर धर्मकर्म प्रसंगीं त्या संततीला गौण मानीत एवढें निश्चयानें म्हणतां येतें. गोळकांची वेगळी जात होती हें वरील उल्लेखावरून सिद्ध होत नाहीं. श्राद्धीय प्रकरणांत वर्ज्य ब्राह्मणांमध्यें गोळक शब्द आलेला आहे. हा शब्द जातिवाचक नसून व्यक्तिवाचक आहे व त्याचाच निषेध वरील ओवींत केलेला आहे.

गोळकासंबंधानें तो अब्राह्मण असा एक गैरसमज आहे. पण मनूचा गोळक हा शब्द ब्राह्मणवाचक आहे. प्रत्यक्ष मनूनें यांना द्विज म्हटलेलें आहे. द्विज म्हणजे त्रैवर्णिक. कुंड आणि गोळक या व्यक्ती अधर्म संतति म्हणून द्विजाधम असतील, पण द्विज नाहींत असें कसें म्हणतां येईल? कारण श्राद्धाला कोणते ब्राह्मण बोलावूं नयेत हें सांगतांना कुंड गोळकांचा निर्देश केला आहे (मनुस्मृति अ. ३ श्लो. १५६ व अ. ३ श्लो. १६७). सत् द्विजानें निंद्याचारी ब्राह्मणांना बोलावूं नये असा येथें विधि आहे.

एतान्विगर्हिताचारानपाङ्क्तेयान्द्विजाधमान् ।
द्विजातिप्रवरो विद्वानुभयत्र विवर्जयेत् ॥ १६७ ॥

वरील श्लोकांत द्विजातिप्रवर हे शब्द महत्त्वाचे आहेत. कुंड गोलकांना मनु शूद्र समजत नाहीं. तो त्यांस ब्राह्मणच मानतो. मात्र हा शब्द जातिवाचक नसून व्यक्तिवाचक आहे हें उघड आहे.

सूतसंहिता हा ग्रंथ प्रमाण मानणें धोक्याचें आहे हें पूर्वी सांगितलेंच आहे. अ. १२ मध्यें कुंड व गोलक यांची उत्पत्ति हा ग्रंथकार देतो, पण वृत्ति देत नाहीं. वृत्तीशिवाय जाति राहते कशी? कुंड ही जात जर मुरून गेली तर गोळक तरी निराळी कां राहावी? भिन्न वृत्तींशिवाय गोळक जातीचें अस्तित्वच कठीण दिसतें. तेव्हां हें लिहिणें असंबद्ध आहे.

ज्याचें दुःख तें त्यानें लोकांपुढें मानणें तें अत्यंत इष्ट होय. गोवर्धन ब्राह्मण समाजानें आपलें दुःख जगाच्या वेशीवर टांगण्याकरितां 'संजीवन,' या नांवाचें मासिक कांहीं वर्षे चालविलें होतें. त्यांत वेदशास्त्रसंपन्न पं. पांडुरंगशास्त्री पालधे यांनीं धर्मशास्त्राधारें गोळक या शब्दाची जी मीमांसा केली आहे आणि गोवर्धन हे मुळींच गोळक कसे नाहींत, हें साधार व तर्कशुद्धपणें मांडलेलें आहे. म्हणून पं. पालधेशास्त्री यांचें तें संजीवनांतील विवेचन अक्षरशः येथें देतों.

'**यत्किंच मनुरवदत्तद्भेषजम्**' असें मनुवचनाला प्रामाण्य आहे, म्हणून प्रथम मनुस्मृतींतील गोळक शब्दाचा विचार करूं **मनुस्मृति, अ. ३ श्राद्ध प्रकरणांत परिवेत्ता, परिवित्ति, दीधिषुपति** या शब्दांबरोबर कुंड व गोळक हे शब्द दिलेले आहेत. या मागील पुढील श्लोकांचा व शब्दांचा संदर्भ पाहिला तार,

गोळक हा व्यक्तिवाचक शब्द आहे असेंच दिसतें. मनुस्मृति अ. ३ श्लो. १५६ पाहा;

भृतकाध्यापको यश्च भृतकाध्यापितस्तथा ।
शूद्रशिष्यो गुरुश्चैव वाग्दुष्टः कुंड गोलकौ ॥

धर्मशास्त्रसंग्रह नांवाच्या ग्रंथांत या श्लोकाचा अर्थ दिला आहे, तो 'वेतन देकर पढनेवाला, शूद्रका शिष्य, वेतन लेकर पढानेवाला शूद्रका गुरु, सदा कठोर बोलनेवाला, **पिताके जिते हुए** जारसे उत्पन्न **पुत्र, पिताके मरजानेपर जारसे** जन्म हुए पुत्र.'

धर्मशास्त्रसंग्रहाच्या कर्त्यानें, कुंड व गोळक व्यक्तिवाचक शब्द समजूनच हा खरा अर्थ दिला आहे. मनुस्मृति अ. ३ श्लो. १७४ पाहा.

परदारेषु जायेते द्वौ सुतौ कुंडगोलकौ ।

परस्त्रीच्या ठिकाणीं कुंड व गोळक असे दोन पुत्र होतात. ह्यांत '**द्वौ सुतौ**' असे शब्द आहेत, हे विशेष महत्त्वाचे आहेत. स्वस्त्रीला होणारा तो औरस पुत्र, आणि परस्त्रीला कुंड व गोळक अशा प्रकारचे क्षेत्रज पुत्र होतात; १७६ व्या श्लोकांत,

तौ तु जातौ परक्षेत्रे प्राणिनौ

परस्त्रीला होणारा हा कुंडपुत्र, अगर गोळकपुत्र परक्षेत्रांत झालेला प्राणी अर्थात् व्यक्ति (म्हणजे जाति नव्हेत) जन्मास येतात असेंच म्हटलें आहे.

यावरून, मनुस्मृतिकारानें गोलक शब्द वर दर्शविलेल्या कुंड, दीधिषुपति, वाग्दुष्ट या शब्दाप्रमाणेंच व्यक्तिवाचक असाच दिला आहे, हें उघड आहे.

याज्ञवल्क्यं विना मनु :

म्हणजे 'याज्ञवल्क्य स्मृतीवाचून मनूचें प्रामाण्य नाहीं' म्हणून याज्ञवल्क्य स्मृतीचा आधार पाहूं.

रोगी हीनातिरिक्तांङ्गः काणः पौनर्भवस्तथा ।
अवकीर्णी कुंड गोलौ कुनखीश्यावदन्तकः ॥ २२२ ॥

—याज्ञ. स्मृति. आचाराध्यायः श्राद्धप्र.

'रोगी, विकलांग, एकाक्ष, पुर्नविवाहित स्त्रीचा पुत्र, ब्रह्मचर्य न पाळलेला, व्यभिचारिणी स्त्रीचे पुत्र; वाईट नखांचा व काळ्या दांतांचा' हे ब्राह्मण श्राद्धाला वर्ज्य करावे. या उल्लेखावरून पौनर्भव, कुंड व गोळक हे व्यक्तिवाचकच शब्द आहेत हें सिद्ध होतें.

याज्ञवल्क्य स्मृतीवरील अपरार्क नांवाच्या विस्तृत व विद्वत्ताप्रचुर टीकेंत या २२२ व्या श्लोकावर विवरण करितांना, कुंड गोळक या शब्दांचा अर्थ सांगून पुढें स्पष्ट म्हटलें आहे ;

'क्षेत्रज पुत्रविषयमेतत्' (अपरार्क, पृ. ४४५ आनंदाश्रमप्रत) ह्या अपरार्क टीकेचा कर्ता, उत्तर कोंकणांत राज्य करणाऱ्या, ठाणें येथील शिलाहार वंशांतील अपरार्क ऊर्फ अपरादित्य (शके ११०९) हा होय. या शिलाहार वंशांतील राजांनीं गोवर्धन ब्राह्मणांस दानें व वृत्ति दिल्याबद्दल ताम्रपट उपलब्ध आहेत.

मनूनें नवव्या अध्यायांत १२ प्रकारचे पुत्र सांगितले आहेत, त्यांत क्षेत्रज पुत्र सांगितला आहे. क्षेत्रज पुत्र दोन प्रकारचा आहे, असें पराशर स्मृतींत स्पष्ट म्हटलेलें आहे. 'कलौ पाराशरा स्मृताः ।' कलियुगांत पराशर स्मृति विशेष प्रमाण आहे, म्हणून पराशर स्मृतींतील गोळक शब्दाची छाननी करूं.

ओघवाताहृतं बीजं यस्य क्षेत्रे प्ररोहति ।
स क्षेत्री लभते बीजं न बीजी भागमर्हति ॥ २२ ॥
तद्वत्परस्त्रियः पुत्रौ द्वौ सुतौ कुंड गोलकौ ।
पत्यौ जीवति कुंडस्तु मृते भर्तरि गोलकः ॥ २३ ॥

औरसः क्षेत्रजश्चैव दत्तः कृतिमकः सुतः ।
दद्यान्माता पिता वापि स पुत्रो दत्तको भवेत् ॥ २४॥
——पराशर स्मृतिः अध्याय ४

स्वतःच्या विवाहित स्त्रीला झालेला तो औरस पुत्र आणि आईबापानें दुसऱ्यास दिलेला जो दतक पुत्र; हा कृत्रिम आहे. त्याचप्रमाणें एकाचें बीज दुसऱ्याच्या क्षेत्रांत पडून क्षेत्रज संतति उत्पन्न होते. क्षेत्रज पुत्र हा पर पुरुषापासून झालेला असतो, तथापि त्याजवर त्या स्त्रीच्या नवऱ्याचीच सत्ता असते. त्या स्त्रीचा पति जिवंत असतां झालेला तो कुंड पुत्र व स्त्रीला पतिमरणोत्तर झालेला तो गोळक पुत्र असा दोन प्रकारचा क्षेत्रज पुत्र होतो.

क्षेत्रज पुत्र हा सवर्ण म्हणजे त्या स्त्रीच्या नवऱ्याच्याच जातीचा आहे. याज्ञवल्क्य स्मृतीवर विज्ञानेश्वराची '**मिताक्षरा**' नांवाची टीका आहे. याज्ञवल्क्यस्मृति, व्यवहाराध्याय, दायविभाग प्रकरण, श्लोक १३२ वरील मिताक्षरा टीकेंत,

सवर्णा दत्तकक्षेत्रजादयस्ते सत्यौरसे चतुर्थांश हराः ॥
असवर्णाः कानीन गूढोत्पन्न सहोढजपौनर्भवाः ॥

असें म्हटलें आहे. म्हणजे दत्तक पुत्राप्रमाणें क्षेत्रज पुत्र अर्थात् कुंड व गोळक हे सवर्ण म्हणजे त्या स्त्रीच्या नवऱ्याच्या वर्णाचे होत. आणि कानीन, गूढज, सहोढज, व पौनर्भव हे त्या स्त्रीच्या नवऱ्याच्या वर्णाचे नाहींत, म्हणजे असवर्ण होत. यास्तव ज्या अर्थी कानीन आदि असवर्ण म्हटलेल्या पुत्रांच्या जाती उपलब्ध नाहींत, त्या अर्थी सवर्ण म्हटलेल्या क्षेत्रज पुत्राच्या कुंड अगर गोळक ह्या जाती असूं शकणार नाहींत, हें सिद्धच झालें. अर्थात् गोळक ही जात नाहीं ; म्हणून गोळक हें नांव कोणत्याही जातीस लावणें, म्हणजे **कोणत्याही जातीला गोळक म्हणणें हें धर्मशास्त्राच्या विरुद्ध आहे.** आश्वलायन स्मृतींत तर स्पष्टच म्हटलें आहे कीं, **गोळक हें जातीचें नांव नाहीं.**

माहिषेयश्च वैकुंठो वृषलेयश्च गोलकः ।
निन्द्याश्च तेहि लोके स्युः कथं जातीस्तदोच्यते ॥
——आश्व. स्मृ. प्र. २१ श्लो. ३

' माहिषेय, वैकुंठ, वृषलेय व गोळक हे वाईट प्रकारचे म्हणजे निंद्य पुत्र आहेत. हीं जातींचीं नांवें नाहींत.'

अगदीं अलीकडील निबंध ग्रंथ, ज्या ग्रंथांना आम्ही धर्मशास्त्राचा मान देतों ते, निर्णयसिंधु, धर्मसिंधु, प्रयोगपारिजात, स्मृत्यर्थसार, शूद्रकमलाकर हे सर्व ग्रंथ पाहिले, तरी असेंच स्पष्ट दिसून येतें कीं, **गोळक हें कोणत्याही जातीचें नांव असूं शकणार नाहीं.**

एवमेव द्विजैर्जातौ संस्कार्यौ कुंडगोलकौ । '

--प्रयोग पारिजात व ब्रह्मपुराण

कुंड व गोळक या पुत्रांचे उपनयनादिक संस्कार करावे. म्हणजे ते सवर्ण अर्थात् द्विज आहेत.

जार जातः सवर्णायां कुंडो जीवति भर्तरि ।
मृते तु गोलको नाम **जातिहीनौच तौ स्मृतौ** ॥ --यमः

कुंड व गोलक हे सवर्ण स्त्रीला झालेले क्षेत्रज पुत्र आहेत. **त्यांच्या वेगळ्या जाती होऊं शकत नाहींत.**

मिताक्षरायां कुंडगोलकौ यथार्ह संस्कार्यौ इत्युक्तं ।
तत्क्षेत्रज पुत्रपरं । --धर्मसिंधु व निर्णयसिंधु

कुंड व गोळक हे क्षेत्रज पुत्र आहेत, म्हणून त्यांचे उपनयनादिक यथोचित संस्कार करावेत ; कारण ते सवर्ण आहेत. असेंच विज्ञानेश्वरानें मिताक्षरेंतही सांगितलेलें आहे.

स्मृतिकौमुदींत व आदित्य पुराणांत सांगितलें आहे:--

कुंडस्तु जीवतो ज्ञेयो मृतानामथ गोलकः ।
जातिहीनः स मातॄणां ग्राहयेत् कर्मनामनी ।
योज्यो देवपुरे राज्ञा वर्णसंकर भीरुणा ॥

' कुंड व गोळक ह्या जाती नाहींत. कुंड व गोलक पुत्र हे मातेच्या वर्णाचे समजावेत ; यांस नामें मातेचीं असावीत, म्हणजे अमकीचा मुलगा असें म्हणावें. वर्णसंकराची भीति बाळगणाऱ्या राजानें त्यांस देवळांतील झाडलोट, पूजा वगैरे करण्यास लावावें. '

धर्मशास्त्रांतील या सर्व आधारांवरून असें स्पष्ट सिद्धच होतें कीं, कोणत्याही धर्मशास्त्राच्या ग्रंथांत **गोळक हें कोणत्याही जातीचें नांव सांगितलें नाहीं.**

तसेंच, **गोवर्धन ब्राह्मणांस गोळक म्हणण्यास धर्मशास्त्राचा बिलकुल आधार नाहीं.** म्हणजे शास्त्रप्रामाण्याच्या आधारानेंच, गोवर्धन ब्राह्मण हे गोळक नाहींत, असेंच सिद्ध होतें. अतएव, गोवर्धन ब्राह्मणांस गोळक म्हणणें हें धर्मशास्त्राच्या विरुद्ध आहे.

संस्कृत भाषेंतील शब्दांचे अर्थ सांगणारा अमरकोश हा ग्रंथ आपण पाहिला तरीही असेंच दिसून येईल कीं, वर लिहिलेले कानीन, कुंड व गोळक अशा प्रकारचे पुत्र त्या वंशांत उत्पन्न झालेले असूनही, त्यांची वेगळी जात न बनतां, त्यांस व त्यांचे वंशास क्षत्रियच म्हटलेलें आहे.

कानीनस्य मुनेः स्वबांधव-वधू-वैधव्य विध्वंसिनोनप्तारः
खलु गोलकस्य तनयाः कुंडाः स्वयं पांडवाः ।

'मत्स्यगंधा नांवाच्या कोळयाच्या मुलीला, लग्न होण्यापूर्वींच पराशर ऋषीपासून व्यास महर्षि झाले. अर्थात् **व्यास कानीन पुत्र** (कुवारपणीं झालेला मुलगा) होय. त्या व्यासापासून, त्या मत्स्यगंधेच्या (सत्यवतीच्या) दुसऱ्या मुलाच्या स्त्रीला, पतिनिधनानंतर, **पंडु** व **धृतराष्ट्र** हे दोन **गोळक** (विधवेला परपुरुषापासून झालेले) **पुत्र** झाले. ह्या गोळक पुत्रांपैकीं पंडुराजाच्या कुंति व माद्री ह्या दोन्ही स्त्रियांना पंचदेवांपासून पंच **पांडव** हे **कुंड** (पति जिवंत असतां परपुरुषापासून झालेले) **पुत्र** झाले. म्हणजे हा वंशवृक्ष पुढें लिहिल्याप्रमाणें झाला.

कानीन
व्यास

गोलक धृतराष्ट्र — कौरव **क्षत्रिय**

गोलक पंडु — **कुंड** पांडव
१ धर्म २ भीम ३ अर्जुन ४ नकुल ५ सहदेव
अभिमन्यु
क्षत्रियवंश

आणि हे व यांचे सर्व वंशज अस्सल क्षत्रीयच म्हणून महाभारतकारानें लिहिलें आहे. 'भारतं पंचमो वेदः' महाभारत हा पांचवा वेद आहे, असें याचें प्रामाण्य आहे. अर्थात् ह्यावरूनही अशा तऱ्हेच्या पुत्रांची गोळक अगर कुंड किंवा कानीन ही जात मानण्यास पूर्वापार प्रघात नाहीं, हेंच सिद्ध होतें.

श्रीमद्भागवत ग्रंथांत भरद्वाज मुनींची उत्पत्ति अशीच सांगितलेली आहे.

'अन्तर्वत्न्यां भातृपत्न्यां मैथुनाय बृहस्पतिः ।
प्रवृत्तो वारितो गर्भं शप्त्वा वीर्यमवासृजत् ॥ ३६ ॥
तं त्यक्तुकामां ममतां भर्तृत्यागं विशङ्किताम् ॥
नामनिर्वचनं तस्य श्लोकमेनं सुरा जगुः ॥ ३७ ॥
मूढे भरद्वाजमिमं भरद्वाजं बृहस्पते ।
यातौ यदुक्त्वा पितरौ भरद्वाजस्ततस्त्वयम् ॥ ३८ ॥
चोद्यमाना सुरैरेवं मत्वा वितथमात्मजम् ।
व्यसृजन्मरुतो बिभ्रन् दत्तोऽयं वितथेऽन्वये ॥ ३९ ॥

"बृहस्पतीचा भाऊ उतथ्य, याची पत्नी ममता ही गरोदर असतां बृहस्पति तिजशीं चौर्यरति करण्यास प्रवृत्त झाला. तेव्हां गर्भानें त्याला प्रतिबंध केला असतां, बृहस्पतीनें गर्भाला शाप देऊन बलात्कारानें आपल्या वीर्यापासून गर्भस्थापना केली. पुढें बृहस्पतीपासून ममतेस पुत्र झाला. पति आपला त्याग करील या भीतीनें ममतेनें त्या मुलाला टाकून देण्याचा विचार केला. तेव्हां बृहस्पति तिला म्हणालाः—'मूढे (द्वाजं) एकाच्या स्त्रीच्या पोटीं दुसऱ्यापासून जन्मलेला हा (कुंड) मुलगा आहे, याचें तूं पालनपोषण कर.' त्यावर ममता म्हणाली, 'बृहस्पते हा मुलगा द्वाज (आपणां दोघांपासून अधर्मानें झालेला) आहे, सबब तूंच ह्याचें पालनपोषण कर.' असें म्हणून त्या मुलाला तेथेंच टाकून त्याचे आईबाप निघून गेले. त्या मुलाचें नांव भरद्वाज असें पडलें. ममतेनें तो व्यभिचारापासून झालेला पुत्र टाकून दिला, तेव्हां मरुतांनीं पाळला, व भरतराजाच्या स्वाधीन केला. ह्या **भरद्वाजाचा** पुत्र **गर्ग**" **भरद्वाज** व **गर्ग** यांपासून झालेलीं **भारद्वाज** व **गार्ग्य** हीं गोत्रें **सर्व ब्राह्मणांत** आहेत.

एकंदर या सर्व विवेचनावरून व आधारसिद्ध प्रमाणांवरून सिद्ध होतें कीं, कुंड अगर गोळक ह्या प्रकारची संतति झाली असतांही त्यांची

वेगळी जात मानण्याचा पूर्वापार प्रघात नाहीं. म्हणजे गोळक हें नांव जातीस देतां येत नाहीं. धर्मशास्त्राच्या कोणत्याही ग्रंथाधारें, प्राचीन परंपरा पाहिली तरीही **गोवर्धन ब्राह्मणांस गोळक म्हणण्यास आधार नाहीं.** ''

पं. पालयेशास्त्री यांचें वरील विवेचन नीट लक्षांत घेतल्यानंतर पं. राजारामशास्त्री भागवत यांचे ७५ वर्षांपूर्वी प्रसिद्ध झालेले मननीय विचार वाचकांना पटतील. त्यांचे सडेतोड व तर्कशुद्ध विचार देऊन हें प्रकरण पुरें करतों.

राजारामशास्त्री भागवत व गोवर्धन ब्राह्मण

(मराठ्यांसंबंधानें चार उद्‌गार या पुस्तकावरून)

पृ. १०७ :—

गोवर्धन, कुडाळे, देवरुखे हीं नांवें कोंकणांतील त्या त्या नांवावरून पडलेलीं, त्या पक्षीं ही सर्व मंडळी देशावरून आलेली असण्याचा संभव नाहीं.

उत्तर कोंकणांत गोवर्धन ब्राह्मण प्रसिद्ध आहेत. गोवर्धन हें कानेरीचीं लेणीं आहेत, त्याच्या जवळच्या डोंगराचें प्राचीन नांव. गोळक हा गोरक्ष शब्दाचा अपभ्रंश. गोवर्धन व गोरक्ष म्हणजे गाई वाढविणारे व रक्षिणारे. 'मृते भर्तरि गोलकः' असा अमरकोशकारानें अर्थ दिला आहे. पण त्याचा व गोरक्ष शब्दाचा अपभ्रंश जो गोळक त्याचा मुळींच संबंध नाहीं. वसईजवळ काश्मिरें म्हणून गांव आहे त्याचा काश्मिराशीं जो संबंध लागेल त्याला लोक काय म्हणतील ! आग्री लोकांचा आंग्र्याशीं संबंध लावला तर कसें दिसेल ! अमरकोशकारानें गोळक शब्द दिला आहे, तो जातिविशेषवाचक दिलेला नाहीं. जर तो जातिविशेषवाचक शब्द अमरकोशकारास अभिमत असता तर तो निःसंशय संकीर्ण जातींत आला असता. असें असतां या जातिविशेष-वाचक गोळक शब्दाचा (गोरक्षाचा अपभ्रंश गोळक याचा) 'मृते भर्तरि गोलकः' या व्यक्तिविशेषवाचक शब्दाशीं संबंध लावणें, हें वडाची साल पिंपळास लावण्यासारखें निदान आम्हांस भासतें. (पृ. १०२ ते १०४)

प्रकरण १० वें

गोवर्धन ब्राह्मण हे मुळींच गोळक नाहींत

गेल्या प्रकरणांत गोळक हा शब्द व्यक्तिवाचक कसा आहे, गोळक ही जाति असणें कसें असंभवनीय आहे, स्मृतिकारांनीं दिलेले अनेक संकर कसे संशयास्पद आहेत, वगैरे मुद्यांचें विवेचन केलें. प्रस्तुत प्रकरणांत गोवर्धन ब्राह्मण जाति ही मुळींच गोळक कशी नाहीं याचा विचार कर्तव्य आहे.

प्रथम हें लक्षांत ठेवलें पाहिजे कीं गोवर्धन ब्राह्मण हा शब्द प्रादेशिक असून लक्षणानें तो जातिवाचक झाला आहे आणि गोळक हा शब्द व्यक्ति-वाचक आहे. जाति ही व्यापक असून व्यक्ति ही व्याप्य असते. व्यक्तींत जातीचा समावेश होत नाहीं, म्हणून गोळक ह्या व्यक्तिनामानें गोवर्धन जाति व्यापली जाणें शक्य नाहीं. गोवर्धन ब्राह्मण हे कसे गोळक नाहींत, हें पुढील विवेचनावरून ध्यानांत येईल.

प्राचीन काळापासून महाराष्ट्रांत गोवर्धन ब्राह्मण हे जोशी, उपाध्ये व धर्माधिकारी आहेत. ब्राह्मणांचे सर्व कर्माधिकार गोवर्धनांत पूर्वापार चालत आले आहेत. अर्थात् ब्राह्मणादि सर्व जातींच्या लोकांकडून दक्षिणा व दान घेण्याचा अधिकार गोवर्धन ब्राह्मण समाजाला आहे ; या एकच गोष्टीवरून गोवर्धन ब्राह्मण हे अधर्मसंतति नाहींत, व ते मूळचेच ब्राह्मण आहेत ही गोष्ट सूर्यप्रकाशाइतकी स्पष्ट आहे; धर्मशास्त्रग्रंथांत स्पष्ट लिहिलें आहे कीं :—

अध्यापनमध्ययनं यजनं याजनं तथा ।
दानं प्रतिग्रहं चैव ब्राह्मणानामकल्पयत् ।

—मनु अ. १ श्लो. ८८.

इज्याध्ययनदानानि वैश्यस्य क्षत्रियस्य च ।
प्रतिग्रहोऽधिको विप्रे याजनाध्यापने तथा ॥

—याज्ञवल्क्य अ. १ श्लो. ११८.

कर्मविप्रास्य यजनं दानमध्ययनं तपः ।
प्रतिग्रहोऽध्यापनं च याजनं चेति वृत्तयः ॥

—अत्रिसंहिता श्लो. १३.

अध्यापनं चाध्ययनं याजनं यजनं तथा ।
दानं प्रतिग्रहश्चेति षट्कर्माणीतिचोच्यते ॥

—हारीत स्मृ.१।१८.

द्विजातीनामध्ययनमिज्यादानं ब्राह्मणस्याधिकाः प्रवचनयाजन प्रतिग्रहाः ॥

—गौतम स्मृतिः १०।१.

षट् कर्माणि ब्राह्मणस्य ।
स्वाध्यायाध्ययनमध्यापनं यजनं याजनं दानं प्रतिग्रहाश्चेति ।.

—वसिष्ठ स्मृतिः अ. २।१३।२०

यजनं याजनं दानं तथैवाध्यापनक्रिया ।
प्रतिग्रहं चाध्ययनं विप्रकर्माणि निर्दिशेत् ॥

—शंखस्मृतिः अ. १ श्लो. २.

द्विजाति म्हणजे ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य यांचीं, वेद शिकणें (अध्ययनं) यज्ञयाग व इतर धर्मकर्में करणें, (इज्या किंवा यजनं), दान करणें (दानं) हीं तीन कर्में आहेत. आणि ब्राह्मणांचीं हीं तीन कर्में असून (प्रवचनं किंवा अध्यापनं) वेद शिकविणें व धर्म सांगणें, (याजनं) यज्ञ व धर्मकर्में करविणें म्हणजे जोशीपण व उपाध्येपण सर्व जातींकडे करणें, आणि (प्रतिग्रहः) दान व दक्षिणा घेणें, हीं तीन कर्में करणें ही ब्राह्मणांची वृत्ति आहे. ब्राह्मणांखेरीज इतरांना ही वृत्ति नाहीं, असा याचा भावार्थ आहे. अर्थात् ज्याला धर्मशास्त्रांचें ज्ञान आहे, असा कोणीही विचारी व ज्ञाता साहजिकच असेंच सांगेल कीं, हिंदु धर्मशास्त्राप्रमाणें ब्राह्मणावाचून अन्य जातींना धर्मकर्में चालविण्याचा व दान, दक्षिणा घेण्याचा अधिकार नाहीं ; व कोणत्याही जातीचे हिंदु धर्मीय गृहस्थ, ब्राह्मणावाचून अन्य जातीच्या मनुष्याला जोशीपण करूं देणार नाहींत, आणि ब्राह्मणांखेरीज अन्य जातीयाला दान, दक्षिणा देणार नाहींत.

तात्पर्य, दानाधिकार व जोशीपण, उपाध्येपण करणें हें ब्राह्मण्याचें द्योतक आहे. म्हणजे ज्या अर्थीं गोवर्धन ब्राह्मण समाजाला जोशी उपाध्येपण करण्याचा म्हणजे पौरोहित्याचा व दानदक्षिणा घेण्याचा अधिकार आहे, त्या अर्थीं हा समाज ब्राह्मण आहे. आणि ज्या अर्थीं हे ब्राह्मण आहेत, त्या अर्थीं ते गोळक नाहींत, अर्थात् अधर्मसंतति नाहींत हा सिद्धांत आहे.

तसेंच ज्या अर्थी, शातवाहनांनीं व तदुत्तरकालीन राष्ट्रकूटांनीं गोवर्धन ब्राह्मणांस जमिनी दान केल्या, शिलाहार व यादव या स्वधर्मपालक क्षत्रिय राजांनीं या ब्राह्मणांना दानें केलीं, व यांच्या कारकीर्दीत वृत्ति दान दिल्या आणि तेव्हांपासून तों आजतागायत महाराष्ट्रांत बहुतेक ठिकाणीं, ब्राह्मण आदि सर्व वर्णांकडे गोवर्धन हे जोशी उपाध्येपण करीत आहेत, त्या अर्थी हे ब्राह्मण आहेत ; व म्हणूनच हे गोळक नाहींत. कारण विधवेपासून व्यभिचारानें झालेल्या संततीला वृत्तिदान कोणी करील हें संभवनीय तरी आहे काय ? अशा दानानें कोण पुण्य संपादन करणार ? आणि आजपर्यंत अशा पापजन्मी लोकांकडून ब्राह्मण, क्षत्रियादिकांनीं धर्मकृत्यें कशीं करून घेतलीं ? ह्यावरूनच गोवर्धन ब्राह्मण हे अधर्म संतति खास नाहींत.

गोवर्धन हे ब्राह्मण आहेत काय ? हा प्रश्नच मुळीं असमंजस आहे. कारण गोवर्धन हे ब्राह्मण म्हणवून घेणाऱ्याकडे पौरोहित्य करतात, ज्योतिष वृत्ति करतात, पत्रिकापूजन करतात, स्मृतिप्रोक्त सर्व षट्कर्में करतात ; त्यावरून व व्यवहार व धर्मशास्त्रदृष्टया ते ब्राह्मण आहेत. दान घेण्याचा अधिकार हा फक्त ब्राह्मणानाच आहे. विधवेपासून व्यभिचारानें झालेल्या संततीला वृत्तिदान, अग्रहारदान कोणी करील काय ? अशा दानानें पुण्यप्राप्ति होईल काय ? जन्मजन्मांतरीं जीं पातकें नष्ट करण्याकरितां जीं धर्मकर्में करावयाचीं असतात तीं अशांच्याकडून कोणी करून घेईल काय ? औरस, दत्तक पुत्राप्रमाणें कुंड व गोळक हे पुत्रच होत. कुंडाची जर जात नाहीं तर गोळकाची तरी कशी असणार ! आणि गोळकाची जर असेल तर कुंडाची जात कां असूं नये ? तात्पर्य कुंड आणि गोळक या व्यक्ती जरी असल्या तथापि त्या बहिष्कृत म्हणून बाजूलाच असणार. त्यांना षट्कर्मांचे अधिकार, पौरोहित्य, जोसपणाचीं वतनें, अष्टाधिकार वगैरे कधींही मिळणें शक्य नाहीं. हे अधिकार त्यांना स्वराज्यांत मिळाले, ते त्यांनीं वापरले, मान्यतेनें ते वागले, राजे, महाराजे व श्रीशंकराचार्य यांनीं त्यांना मान्यता दिली यावरून गोवर्धन हे निःसंशय ब्राह्मण होत.

गोवर्धनदेशस्थ ब्राह्मणांना द्वेषानें व मत्सरानें कित्येकांनीं गोळक असें म्हणण्यास प्रारंभ केला व ते व्यभिचारोत्पन्न आहेत, असेंही भासविण्यास कमी केलें नाहीं. विधवेच्या पोटच्या संततीला गोळक असें म्हटलेलें आहे. पण तशा

गोळकाला समाजानें दूरच ठेवलें असलें पाहिजे व धर्मकर्मांतून बहिष्कृतही केलें असलें पाहिजे. कारण आज धार्मिक बाबतींत जेवढा सैलपणा आलेला आहे, तेवढा पूर्वी कधींच नव्हता. आज गोवर्धनांची संख्या कमींत कमी तरी दहा बारा हजार आहे. बृहन्महाराष्ट्रांत त्यांना अष्टाधिकार, पौरोहित्य वगैरे गांवोगांवच्या धर्माधिकारी म्हणून वृत्त्या आहेत. त्या सर्व वृत्त्या ज्या कालांत मिळाल्या तो काळ लक्षांत घेतला तर अधर्म संततीला हे असले धर्माधिकार देणें मुळींच शक्य नव्हतें हेंही लक्षांत ठेवलें पाहिजे.

गोवर्धनांना वृत्त्यंशीं धर्माधिकारी बनविणारे कोणी तरी लुंगेसुंगे नव्हते. तर शिलाहारवंशीय क्षत्रिय होते. त्या शिलाहार वंशांतील अपरादित्य नांवाच्या राजानें याज्ञवल्क्य स्मृतीवर अपरार्क नांवाची विस्तृत व विद्वत्ताप्रचुर टीका ११०९ मध्यें लिहिली आहे. तसेंच ज्या यादव वंशाकडून या गोवर्धनांना ताम्रपट मिळालेले आहेत त्या यादवांचा प्रधान हेमाद्रि नांवाचा धर्मशास्त्रज्ञ पंडितप्रकांड होता, हेंही ध्यानांत ठेवलें पाहिजे. तात्पर्य धर्माभिमानी, धर्मज्ञ, क्षत्रियकुलावतंस अशांनीं ज्या गोवर्धन ब्राह्मणांना दानें दिलीं, वृत्ति उपभोगूं दिल्या पौरोहित्य करूं दिलें, त्या अर्थी गोवर्धन ब्राह्मण हे सत्ब्राह्मण आहेत, ते गोळक मुळींच नाहींत, त्यांच्यावर तो आरोप आहे, तो मत्सर व द्वेषमूलक आहे, यांत मुळींच शंका नाहीं.

इतर शाखांच्या भिक्षुकांवाचून गोवर्धन ब्राह्मणांचें अडत नाहीं; कारण गोवर्धनांमध्यें नित्यनैमित्तिक कर्मे करणारे वृत्त्यंशी पुरोहित ब्राह्मण पुष्कळ आहेत. जेव्हां गोवर्धन भिक्षुक नसतात, तेव्हां इतर शाखेचे भिक्षुक गोवर्धनांचीं कामें करतात. विशेष प्रसंगीं गोवर्धन भिक्षुकाबरोबर इतर शाखीय भिक्षुक सहकार्य करतात. ज्या भागांत ज्या वेदाचे अनुयायी गोवर्धन ब्राह्मण आहेत त्या भागांत गोवर्धनांचे धर्माधिकारीही आहेत. इतर शाखीय ब्राह्मणांप्रमाणें गोवर्धनांना षट्कर्माचे सर्व अधिकार आहेत. ते गेलीं दोन हजार वर्षांपासून चालू आहेत, त्या अर्थी ते ब्राह्मण आहेत व त्यांना अधर्म संतति समजणें हा अन्याय आहे.

गोवर्धन ब्राह्मण चारी शाखांचे अनुयायी आहेत. सांप्रत ऋग्वेद शाकलशाखा, आश्वलायन सूत्र; कृष्ण यजुर्वेद तैत्तिरीय शाखा, बोधायन सूत्र; अशा दोन्ही शाखांचे गोवर्धन ब्राह्मण उत्तर कोंकणांत आहेत. या दोन्ही

शाखांमध्यें कोंकणस्थांप्रमाणें परस्पर शरीरसंबंध होतात. खानदेशांत ऋग्वेदी व शुक्ल यजुर्वेदी अशा दोन्ही शाखांचे गोवर्धन ब्राह्मण आहेत. कृष्णातीर प्रांत, गंगातीर प्रांत, वऱ्हाड व मोंगलाईंत फक्त ऋग्वेदीच गोवर्धन ब्राह्मण आहेत. अर्थात् हे सर्व आश्वलायन सूत्री आहेत. चित्पावनांमध्यें ज्याप्रमाणें आश्वलायन व हिरण्यकेशी शाखा असूनही त्यांत भेद नाहीं; कारण परस्पर शरीरसंबंध होतात त्याचप्रमाणें गोवर्धन ब्राह्मणांतही ऋग्वेदी आश्वलायन व कृष्ण यजुर्वेदी बौधायन यांमध्येंही भेद नाहीं. कारण त्यांचेही परस्पर शरीरसंबंध होतात. उत्तर कोंकणांतील गोवर्धन ब्राह्मणांचे आणि गंगातीरस्थ व कृष्णातीरस्थ गोवर्धन ब्राह्मणांचे परस्पर शरीरसंबंध होतात. ऋग्वेदी आश्वलायन व यजुर्वेदी माध्यंदिन यांमध्यें इतर ब्राह्मणांप्रमाणें शरीरसंबंध होत नाहींत. परंतु अकोला ब्राह्मण परिषदेपासून इतरांप्रमाणें या शाखेंतही असे विवाह हळूहळू होऊं लागलेले आहेत.

उत्तर कोंकणांतील सामवेद्यांचें उपाध्येपण ज्या वेळीं गोवर्धन ब्राह्मणांकडे होतें, त्या वेळीं स्वशाखेबरोबर सामवेदाचें अध्ययनही गोवर्धन ब्राह्मणांना करावें लागे. त्या वेळीं त्यांना त्रिवेदी म्हणत. त्रिवेदीचा अपभ्रंश तिवाडी–तिवाड. पुढें सामवेदीयांची वृत्ति गोवर्धनांनीं विकल्यामुळें उत्तर कोंकणांत दोन शाखांचेच गोवर्धन ब्राह्मण राहिलेले आहेत. चित्पावनांतील तैत्तीरीय हे हिरण्यकेशी असून सत्याषाढ सूत्राचे अनुयायी आहेत. परंतु गोवर्धनांमधील तैत्तीरीय ब्राह्मण हे बौधायन सूत्राचे अनुयायी आहेत. त्यावरून चित्पावनांचा व गोवर्धनांचा मुळींच संबंध नाहीं हें स्पष्ट होतें.

अधर्म संतति ही प्रत्येक वर्णांत व प्रत्येक जातींत होणें शक्य आहे. तेव्हां प्रश्न असा कीं, ब्राह्मण वर्णांतील प्रत्येक पोटजातीमध्यें गोळक असावयास पाहिजे होते! व चित्पावन गोळक, कऱ्हाडे गोळक, ऋग्वेदी देशस्थ गोळक, कण्व गोळक असे २८।३० जातींचे गोळक पुत्र असावयास पाहिजे होते, व तितक्या जातीही हव्या होत्या, पण चमत्कार असा कीं, ज्यांना गोळक म्हणून संबोधिलें जातें ते गोवर्धन ब्राह्मण फक्त ऋग्वेदी व यजुर्वेदी देशस्थच कां असावेत? यावरून पंचद्राविड ब्राह्मणांपकीं ऋग्वेदी देशस्थ आणि यजुर्वेदी देशस्थ ब्राह्मणांतच व्यभिचार बोकाळला होता व इतरांत तो नव्हता असें समजावयाचें कीं काय? किंवा सर्व ब्राह्मणांतील सर्व अधर्म संतति एक

करून तिला गोळक हें नांव दिलें कीं काय ! किंवा गोवर्धन ब्राह्मणसमाज म्हणजे भिन्नभिन्न ब्राह्मण जातींनीं उत्पन्न केलेल्या अधर्म संततीचा अजबखाना अथवा सर्व जातींतील घाण साठविण्याची जागा तर नव्हती ना ? गोवर्धन ब्राह्मण हे नष्टवीर्य झाल्यामुळें आपली संख्या येन केन प्रकारेण वाढविण्याची हांव तर त्यांना सुटली नव्हती ना ? सत्तेच्या जोरावर या ब्राह्मणवर्गाला पंढरपूरचें त्या काळचें ऑर्फनेज तरी ठरविलें नसेल ना ? या प्रश्नांचीं सयुक्तिक उत्तरें मिळणें शक्य नाहीं. कारण त्याला सत्याचा यत्किंचितही आधार मिळत नाहीं. ना व्यवहार, ना इतिहास, ना धर्मशास्त्र असलें निराधार विधान करून गोळक ही एक जाति होती व गोवर्धन ब्राह्मण हे गोळक आहेत असें समजणें हें निंद्य व अत्यंत लांछनास्पद आहे.

प्रचलित निर्बंधांनीं पूर्व स्मृतिकारांप्रमाणें 'जबरी संभोग' व जारकर्म हे अपराध ठरविले आहेत व त्याबद्दल न्यायालयांत दादही लावून घेतां येते. परंतु श्रेष्ठ ब्राह्मण जातींमध्यें ही प्रवृत्ति दिसत नाहीं. कारण असली लाजिरवाणी गोष्ट षट्कर्णी न होऊं देण्याचीच प्रवृत्ति समंजस वर्गामध्यें असते. न्यायालयांत या तऱ्हेचे दावे येत नाहींत, त्यावरून संयमशील समाज झाला आहे असें थोडेंच समजावयाचें ? अधर्म संतति ही बहुतेक आईबापांच्या जातींतच पचते व तेंच होणें स्वाभाविक आहे. पूर्वीच्या काळांत धर्मनिष्ठा, शंकराचार्यांचा दंडक, लोकभीति वगैरे सर्व जाज्वल्य होतें. ग्रामण्याचें व बहिष्काराचें भय लोकांना फार वाटत असे. अशा वेळीं जारोत्पन्न विधवा संतति राजरोसपणें इतरांनीं गोवर्धनास देणें व त्यांनीं ती स्वीकारणें हें अशक्यप्राय होतें; कारण संतति देणारा व घेणारा हे दोषी ठरतात. त्यांना बहिष्काराच्या दंडचापुढें चळचळां कापावें लागे आणि शंकराचार्यांच्या पुढें नाकधुऱ्या काढतां काढतां पुरेवाट होई. यास्तव गोवर्धन ब्राह्मणांविषयीं कांहीं तरी तर्कट उभारणें व गोवर्धनांना गोळक ठरविणें हें शुद्ध आत्मघातकीपणाचें आहे.

स्वधर्मी राजशासनांत गोळक जात बनणें शक्य होतें असें कोणी म्हणतात. पण पूर्वी विधवांना आतांसारखें स्वातंत्र्य नव्हतें. सतीची चाल होती. चौर्यकर्मानें गर्भधारणा झाल्यास विषप्रयोग करीत; अशा आख्यायिका ऐकूं येतात. एका विधवेला असा पुत्र झाला असतां त्या मायलेकांना पुरंदरच्या किल्ल्यांत

कडक बंदोबस्तांत ठेवल्याचा उल्लेख वा. कृ. भावेकृत 'पेशवेकालीन महाराष्ट्र' पा. २९१ मध्यें आहे. अशा कडक बंदोबस्ताचा उद्देश समाजांत दहशत बसावी आणि अशी संतति वाढूं नये असाच असला पाहिजे हें उघड आहे. इतक्या उपर एकादी व्यक्ति उघडकीस आलीच तर ती बहुतेक खालच्या जातींत मिसळण्याचा संभव अधिक. कुंड संतति तर उघडकीस येऊंच शकत नाहीं. विधवा संतति ही गफलतीनें त्याच जातींत मिसळते, किंवा कोणास तरी देऊन टाकीत हेंच खरें. तात्पर्य अशा संततीची वेगळी जात बनत नाहीं हें उघड आहे.

आज ब्राह्मणांमध्यें विधवांचे पुनर्विवाह होतात. पण त्यांच्या संततीची जात वेगळी बनलेली नाहीं. ब्राह्मणांतील अधर्म संतति आज उघडकीस येतच नाहीं. हें वर सांगितलेंच आहे. आज तशी संतति उघडकीस आल्यास अनाथाश्रमाकडे रवानगी होते. तशी सोय पूर्वी नव्हती. म्हणून ती संतति त्या त्या जातींतच मुरे. ब्राह्मणांतील अधर्म संततीची वेगळी जात बनली अगर बनते असें म्हणणें हें त्या वर्णाच्या उच्च संस्कृतीला काळिमा फासण्यासारखें आहे.

कोणत्याही समाजांत अधर्म संतति कितीही नियम घालून दिले तरी ती होणें अपरिहार्य आहे. अधर्म संतति ही केव्हांही राजरोस विवाहसंबंधानें होणारी नसते. अशा संततीला ती उघडकीस आल्यास मान्यता मुळींच मिळत नाहीं, ती संतती बहिष्कार्यच ठरते. अशा बहिष्कृत व्यक्ती कांहीं दिवस बाजूस राहून खालच्या जातींत मिसळत असाव्यात. यासंबंधानें ज्ञानकोशकारांचें म्हणणें विचारार्ह वाटतें, तें असें:—

"हल्लीं अधर्म संततीला जे अधिकार नाहींत त्यांतील मुख्य हा कीं त्याला कोणाचेंही वारस होतां येत नाहीं. कारण तो कोणाचा संबंधीं नसतो. कोणतेंही पूर्वजाचें बीज त्याच्या ठिकाणीं धरतां येत नाहीं. हा मनुष्य जसा कोणाचा वारस नसतो, तसेंच पोटच्या मुलांखेरीज याचेही कोणी वारस नसतात. अशा माणसांनीं जर एकादी जमीन खरेदी केली व त्याला संतति नसली तर ती जमीन मृत्युपत्र वगैरे नसल्यास मूळ मालकाकडे जाते. अधर्म संततीला पौरोहित्य व धर्मकार्य करण्याचा अधिकार मिळत नाहीं." (ज्ञा. को. वि. ६ पृ. १५१)

हिंदुसमाज जातिबद्ध असल्यामुळें अधर्म संततीस जातींत स्थान मिळत नाहीं. अशी प्रजा निराळी राहते; पण ती बहुशा खालच्या जातींतच मुरून जाते. ब्राह्मण स्त्री व ब्राह्मण पुरुष यांपासून झालेली अधर्म संतति बहुतेक ब्राह्मणांतच मुरून जाते. संतति निराश्रित असेल तर स्वाभाविकच ब्राह्मण समाजांत अपमानानें राहण्यापेक्षां खालच्या जातींत मिसळणें तिला बरें वाटतें व तेंच मनुष्यस्वभावास धरून आहे.

उपनामाच्या सादृश्यावरून अन्य ब्राह्मण जातींतील माणसें गोवर्धनांत शिरलीं असतील व तसें होण्याचें कारण त्यांचा जन्म विधवेपासून झाला असावा असा जो तर्क आहे त्याचा थोडा विचार करूं. केवळ उपनामाच्या सादृश्यावरून जर कोणी कांहीं विधान करील तर तें फार धोक्याचें होईल. सांप्रत हरिजनांमध्येंसुद्धां लघाटे, खापर्डे, खांडेकर, चिपळूणकर अशीं ब्राह्मणां-सारखीं आडनांवें आहेत. त्यावरून उलट सुलट कोणतेंही अनुमान काढलें तथापि तें तर्कदुष्टच होतें.

कोंकणस्थांचीं मूळ घराणीं साठ, गोत्रें चौदा व उपनांवेंही साठच आहेत. पण हल्लीं कोंकणस्थांमध्यें ३५० पेक्षां जास्त आडनांवें झालेलीं आहेत. याचें कारण असें कीं निरनिराळे व्यवसाय एका कुलांतील पुरुष करूं लागले म्हणजे तीं व्यवसायवाचक आडनांवें जडतात. उदाहरणार्थ गोखले हें मूळ आडनांव. पण गोखल्यांचींच रास्ते, बिनीवाले हीं आडनांवें पुढें व्यवसायामुळें उद्भूत झालीं. स्थलांतरामुळेंही आडनांवें बदलतात. मूळ स्थानापासून दुसरीकडे कोणी गेल्यास तो अमुक गांवचा अशा अर्थानें त्या गांवापुढें 'कर' प्रत्यय लागून तें त्याचें नांव पडतें. चिपळूणकर, दिवेकर, खाडिलकर इत्यादि. आंगच्या गुणामुळें, पराक्रमामुळें नांवें बदलतात व त्यामुळें आडनांवांची संख्या वाढते. आतां चित्पावनांचीं कांहीं आडनांवें इतर जातींत आहेत याचें कारण एकच असूं शकेल असें नाहीं. उदाहरणार्थ दिवेकर हें आडनांव सोनार, सारस्वत ब्राह्मण, देशस्थ व कोंकणस्थ ब्राह्मण अशा सर्वांमध्यें आहे.

मोठ्यांचें अनुकरण करण्याची प्रवृत्ति समाजांत सर्वत्र असते. बौद्ध धर्माचा जोर होता तेव्हां पुष्कळ लोकांनीं बौद्ध धर्माचा स्वीकार केला. मुसलमानी अमदानींत पुष्कळ लोक मुसलमान झाले. त्याप्रमाणें चित्पावन हे भाग्यरवीच्या प्रखर तेजानें तळपत असतां अनुकरण म्हणून आणि बरो-

वरीचे आहोत असें दाखविण्याकरितां चित्पावनांतील कांहीं आडनांवें इतरांनीं घेतलीं असतील हें संभवतें. जी जात लोकांपुढें असते, जी व्यक्ति लोकांच्या डोळ्यांत भरते, तिचेंच अनुकरण समाज करीत असतो. कोंकणस्थांतील आणि देशस्थांतील कांहीं आडनांवें गोवर्धन ब्राह्मणांमध्यें दिसतात, तेवढ्या-वरून चित्पावनांतील व देशस्थांतील अधर्म संतति या गोवर्धनांत प्रविष्ट झाली असें म्हणतां येणार नाहीं. उलट पक्षीं गोवर्धनांतीलच कांहीं ब्राह्मण महत्त्वाकांक्षेनें येनकेनप्रकारेण कोंकणस्थ देशस्थांत शिरण्याकरितां आपापलीं आडनांवें बदलते झाले, असें म्हणणें जास्त सयुक्तिक दिसतें. हिंदु समाजाचा धार्मिक इतिहास पाहिला तर कोणत्याही काळीं अधर्म संततीला बहिष्कृतच मानीत असत आणि ती संतति फार तर खालच्या जातींत समाविष्ट होत असे, असें म्हणतां येतें.

कांहीं आडनांवांची आतां चिकित्सा करूं.

बिवलकर:---गोवर्धन ब्राह्मणांत हें आडनांव उत्तर कोंकणांत असलेल्या वृत्तिवान् घराण्याचें आहे. यांचेकडे चाळीस गांवची जोशीपणाची व उपा-ध्यायाची वृत्ति शिलाहारापासून चालत आलेली आहे. पण यांचें मूळचें उपनांव बेवुलकर असें आहे. शके १६९१ मध्यें लिहिलेल्या ऐतरेय ब्राह्मणाच्या पोथीवर लेखकानें बेवुलकर उपनांव लिहिलें आहे. बेवुलकर यापासून बिवलकर असें झालेलें आहे. कोंकणस्थांतील बिवलकर आडनांवाशीं याचा कांहीं संबंध नाहीं. कारण कोंकणस्थ बिवलकर काश्यप गोत्री व गोवर्धनांतील बिवलकर पाराशर गोत्री आहेत.

खरे:---यांचें मूळचें उपनांव खटाटे असें आहे. हे पंचमहालचे जोशी. या खटाटे घराण्यांत पुष्कळ नामांकित ज्योतिषी होऊन गेले. एकाचा लौकिक असा कीं त्यानें वर्तविलेलें ज्योतिष अक्षरशः खरें ठरे. त्यावरून खरे जोशी असें नांव पडलें. पुढचा जोशी हा शब्द गेला व खटाट्याचे खरे झाले. कोंकण-स्थांतील खरे कौशिक गोत्री व गोवर्धन ब्राह्मणांतील खरे वासिष्ठ गोत्री आहेत. तेव्हां कोंकणस्थांतील खऱ्यांचा व गोवर्धनांतील खऱ्यांचा अर्थाअर्थी कसलाही संबंध नाहीं. खटाटे व खरे हे गोवर्धन ब्राह्मण होत.

मंडलीक:---यांचें मूळ आडनांव पांचाले असें असावें. हे पंजाबांतून आलेले आहेत. बृ. आ.उ. मध्यें पांचालांचा उल्लेख दोन तीन ठिकाणीं आहे.

छांदोग्यामध्येंही उल्लेख आहे. पांचाल देशांतून आलेले म्हणून पांचाले असें आडनांव प्रचलित झालें. पुढें गोराष्ट्रांतील (गोरठप्रांत) पंचमहालाचे जोशी उपाध्ये यांनीं त्यांना एका महालाची वृत्ति दिली. तेव्हांपासून मांडलीक वृत्यंशी म्हणून यांना मांडलिक नांव पडलें. मांडलिकाचें मंडलिक. कोंकणस्थ मंडलिक विष्णुवृद्ध गोत्री आहेत, तर गोवर्धन ब्राह्मणांतील मंडलीक भार्गव गोत्री आहेत.

कोंकणस्थांतील साठे वासिष्ठ गोत्री आहेत तर गोवर्धन ब्राह्मणांतील साठे आडनांव लिहिणारा उपमन्यु गोत्राचा आहे. फाटक व पाठक या दोन नांवांतच भेद आहे. कोंकणस्थ फाटक कौशिक गोत्री आहेत तर गोवर्धनांतील पाठक सांख्यायन गोत्री आहेत. देशस्थ भालेरावांचें गोत्र कौंडिण्य आहे तर गोवर्धन ब्राह्मणांतील भालेरावांचें गोत्र वासिष्ट आहे. देशस्थांतील आवटे काश्यप गोत्री आहेत तर गोवर्धन आवटे श्रीवत्स, वत्स, वामरथ्य व भार्गव इत्यादि गोत्रांतले आहेत.

आडनांवांच्या सादृश्यावरून कोंकणस्थ देशस्थांतील व्यभिचारजन्य संतति गोवर्धन ब्राह्मणांत मिसळली असें येनकेनप्रकारानें ठरविणें म्हणजे वडाची साल पिंपळास लावण्यासारखेंच हास्यास्पद आहे. वसईजवळ जें काशीमिरे म्हणून गांव आहे, त्याचा काश्मिराशीं आणि आग्री लोकांचा आंग्र्यांशीं संबंध जोडणें कै. राजारामशास्त्री भागवत यांचे मतें जितकें बाष्कळ-पणाचें आहे, तितकेंच आडनांवांवरून अनुमानें काढणें असंबद्धपणाचें आहे.

देशस्थ, कऱ्हाडे, चित्पावन जातींत असलेलीं अनेक आडनांवें गौड सारस्वत, दैवज्ञ, कायस्थ, मराठे, आगरी, कोंकणस्थ, वैश्य, कुणबी, अस्पृश्य इत्यादिकांमध्येंही आहेत. या सदृश्य आडनांवांवरून इतक्या विविध जातींच्या व्यक्ति कोंकणस्थ देशस्थादि जातींत शिरल्या असें मानावयाचें कीं काय? तात्पर्य आडनांवांवरून विशेषतः सादृश्यावरून कोणतेंही अनुमान काढणें भयप्रद आहे.

आडनांवांवरून कोणतेंही विधान करणें कसें असमंजस आहे याविषयीं पं. पालयेशास्त्री यांचें संजीवन मासिकांतील विवेचन चांगलेंच मार्गदर्शक आहे. तें असें:—

"आडनांवांविषयीं ऐतिहासिक दृष्टया विचार केला तर आपणांस असें दिसून येईल कीं, प्राचीन काळीं ब्राह्मणांना आडनांवें नव्हतीं. प्राचीन

लेखांतून जेथें जेथें ब्राह्मणांचा उल्लेख आलेला आहे, तेथें तेथें ब्राह्मणाचें नांव, गोत्र, शाखा आणि विशेष स्पष्टीकरणार्थ राहण्याचा देश इतकाच उल्लेख आढळून येतो. मोठमोठ्या प्राचीन ग्रंथकारांनीं आपापल्या ग्रंथांचे शेवटीं आपलें कुलवर्णन देतांना त्यांत आडनांव लिहिलेलें आढळत नाहीं. ब्राह्मणांच्या नांवाबरोबर, गोत्राचें नांव हल्लींच्या आडनांवासारखें लिहिण्याचा पूर्वसंप्रदाय दिसून येतो. '**लौगाक्षि भास्करः**' '**सौत्रायणि गार्ग्यः**' '**सुकेशा भारद्वाजः**' यांत लौगाक्षि, सौत्रायणी व भारद्वाज हीं गोत्राचीं नांवें आडनांवांप्रमाणें वापरलेलीं आहेत असें दिसून येतें. महाराष्ट्री भाषा प्रचारांत आल्यानंतर या गोत्रवाचक शब्दांचीं अपभ्रष्ट रूपें प्रचारांत येऊन प्रथम आडनांवांचीं पूर्वरूपें उत्पन्न झालीं असावीं असें दिसतें. अर्थात् त्याजबरोबरच गुणवाचक शब्दांचा उपयोगही नांवाबरोबर करीत असावें असेंही ठरतें. पुढें दहाव्या, अकराव्या शतकांत मराठी भाषा लिहिण्यांत आल्यावर गांवाचें नांव, धंद्याचें नांव ह्यांचाही उपयोग नांवाबरोबर होऊं लागून आडनांवास हल्लींचें स्वरूप प्राप्त झालें आहे.

ज्या आडनांवांपुढें 'कर' प्रत्यय आहे, तीं बहुतेक नांवें गांवावरूनच पडलेलीं आहेत, असें दिसतें. उदाहरणार्थ, बिवलकर हें आडनांव, बेऊल जि. ठाणें या गांवावरून पडलेलें आहे. त्याचप्रमाणें **पेरलेकर, खडकतकर, यवतकर, निगडोळकर** हीं व असलीं सर्व नांवें गांवांवरूनच पडलेलीं आहेत, यांत शंकाच नको. या नियमालाही अपवाद आहे. 'कर' प्रत्यय शेवटीं असलेलीं कांहीं नांवें निव्वळ गुणांवरून पडलेलीं आहेत. उदाहरणार्थ **रत्नाकर, प्रभाकर, दिनकर** हीं नांवें गुणवाचक आहेत. तसेंच 'कर' प्रत्यय शेवटीं नसूनही कित्येक नांवें गांवांवरून पडलेलीं आहेत. उ. **पालये** हें आडनांव '**पालें**' जि. कुलाबा या गांवावरून पडलेलें आहे. पालये यांच्या पूर्वजांपैकीं ४।५ पिढ्या पूर्वींच्या पूर्वजांच्या सह्या असलेल्या लेखावर त्या लोकांनीं आपलें उपनांव '**पालेकर**' असें लिहिलेलें आढळतें. अर्थात् पालेकर याचें **पाले, पालये** अशीं रूपें बनलेलीं आहेत असें सिद्ध होतें.

कांहीं आडनांवें पूर्वींच्या गोत्रवाचक शब्दांचीं अपभ्रंशानें झालेलीं रूपें आहेत. '**पैंगलः**' या गोत्रवाचक नांवावरून पिंगळे हें आडनांव पडलें. त्याचप्रमाणें '**खेटाटः**' या ऋषिवाचक नांवावरून खटाटे हें नांव प्रचारांत

आलें. '**लौगाक्षि**' या गोत्रवाचक नांवावरून **लोकेश** हें नांव पडलें. त्याचप्रमाणें 'एकखंडा' यावरून **वेखंडे**, '**घोटमुख:**' यापासून **घोडके**, '**सांभारा:**' यापासून **सांबरे** किंवा **सांबारे**, '**कौवलय:**' यापासून **कुवर** (रलयोः सावर्ण्य) आणि '**लवस्तम्ब:**' यापासून **लवाटे** हीं व अशींच दुसरीं उपनामें गोत्रवाचक ऋषींच्या नांवांवरून प्रचारांत आलेलीं आहेत.

जोशी (ज्योतिषी), **उपाध्ये**, **पाध्ये** (उपाध्याय), **कुलकर्णी** (कुल लेखनं), **पाटील** (शास्ता), **पाठक**, **देसाई** (देशस्वामी), **पांडे** (पंडित), **भूकम्र** (भू–पृथ्वी, कम्र–प्रेमळ), **धाते**, **विधाते**, **दीक्षित**, **पंडित आणि वैद्य** हीं व असलीं दुसरीं सर्व उपनामें निव्वळ गुणांवरून म्हणजे आंगचे गुण अगर विद्वत्ता किंवा धंदा यांवरून प्रचारांत आलीं आहेत.

त्रिवेदी (तिसऱ्या म्हणजे सामवेदाचा अध्यापक) या नांवापासून **त्रिवाडी** किंवा **तिवाड** हें उपनांव प्रचारांत आलेलें आहे. देवगिरी येथील सिंधणदेव यादवाचा शा. श. ११७१ या वर्षाचा एक ताम्रपट उपलब्ध आहे; त्यांत बागेवाडी येथील जमिनी निरनिराळ्या गोत्रांच्या व आडनांवाच्या सुमारें बत्तीस ब्राह्मणांस दान दिल्या आहेत. त्यांत **प्रभाकर त्रिवाडीचा मुलगा दामोदर त्रिवाडी** यांचें नांव आहे. त्रवाडी असें गुर्जरांत आडनांव आहे, पण तें वत्स व भारद्वाज गोत्रांतील आहे. पण ताम्रपटांतील त्रिवाडी याचें हें नांव दक्षिणी असून त्याचें गोत्रही आमच्या ब्राह्मणांतील असल्यानें, हा **दामोदर प्रभाकर त्रिवाडी** हा **गोवर्धन ब्राह्मणच** याविषयीं शंका नाहीं. तसेंच **नारायण पाध्ये** याचा मुलगा **रुद्रभट** याचेंही नांव सदहू ताम्रपटांत आहे. याचें गोत्र **मौद्‌गल्य**, **शाखा आश्वलायन** म्हणून हा माध्यंदिन नसून **गोवर्धन ब्राह्मणच** यांत शंका नाहीं.

कोणत्याही जातींत आडनांवें पडण्याचीं कारणें अशीं आहेत, (१) **गांवावरून** किंवा (२) **गुणांवरून** म्हणजे (अ) आंगचा विशेष गुण, अगर (आ) धंद्याचा वाचक, अथवा (इ) **शारीरगुणदर्शक**, किंवा (ई) शारीरिक व्यंग यांपैकीं कोणत्या ना कोणत्या तरी कारणानें सर्व जातींत आडनांवें पडलेलीं आहेत.

जशीं इतरांचीं तशींच गोवर्धन ब्राह्मणांचीही आडनांवें, उपनांवें वर लिहिलेल्या कारणांवरून पडलेलीं आहेत, असेंच दिसून येतें. 'कर' प्रत्यय

शेवटीं नाहीं, इतक्यावरून तें आडनांव गांवावरून पडलेलें नव्हे, असें सिद्ध होणार नाहीं. हें उदाहरणानें सिद्ध करून दाखविलें आहे. आणखीही विचार केला तर आपणांस असें आढळून येईल कीं, आज दक्षिणेकडील देशस्थांमध्यें 'कर' प्रत्ययाशिवाय **गांवाचेंच नांव आडनांव** समजण्याचा संप्रदाय सर्वत्र असलेला आपण पाहतों. '**कृष्णशास्त्री उप्पिन बेट्टगिरी**' '**शंकर-शास्त्री होसरित्ति**' '**श्रीशंकराचार्य डॉ. कूर्तकोटी**' या नांवांतील 'उप्पिन–बेट्टगिरी' 'होसरित्ति' 'कूर्तकोटी' हीं गांवांचींच नांवें, आडनांवें म्हणून लिहिलेलीं आहेत.

कऱ्हाडे, चित्पावन, गोवर्धन, गौड किंवा सारस्वत, देशस्थ, देवरुखे आदि महाराष्ट्रांतील ब्राह्मण जातींत व कायस्थ, मराठे वगैरे क्षत्रिय जातींत गांवाचेंच नांव आडनांव पडलेलें आहे, अशीं पुष्कळ उदाहरणें दाखवून देतां येतील आणि म्हणूनच पुष्कळशीं आडनांवें अनेक जातींत तींच तींच अशीं आढळतात.

उदाहरणार्थ—आगटे कऱ्हाड्यांमध्यें आहेत तर **आगटीकर** चित्पा-वनांत आहेत. **आखवेकर** कऱ्हाडे तर **आखवे** चित्पावन आहेत. **सावरेकर** कऱ्हाडे, तर **सावरकर** चित्पावन आहेत. **गांगलकर** कऱ्हाडे तर **गांगल** चित्पा-वनांत आहेत. कऱ्हाड्यांत **चिंदरे** हें आडनांव आहे, तर **चिंदरकर** गौडांत आहे. जावडेकर या आडनांवाचे कऱ्हाडे आहेत, जवळे किंवा जावळेकर या आडनांवाचे कायस्थ आहेत, व जावळे असें माध्यंदिनांमध्येंही आडनांव आहे. दाभोळे कऱ्हाड्यांत, तर दाभोळकर हे गौड व सारस्वतांत आहेत. देवधरकर कऱ्हाडे तर देवधर चित्पावन आहेत. बेंदरकर कऱ्हाड्यांत आहेत, तर बेंदरे जसे चित्पावनांत, तसे कायस्थांतही बेंदरे आहेत. राजवाड-कर किंवा राजिवडेकर हें आडनांव कऱ्हाड्यांमध्यें तसेंच, कुडाळ देशस्थ गौडांमध्यें आहे, तसेंच राजवाडे हे चित्पावनांत आहेत; रेडे कऱ्हाड्यांत, तर रेडकर सारस्वतांत आहेत. वाळवे कऱ्हाडे तर, वाळवेकर देशस्थ आहेत. तेव्हां हीं असलीं नांवें मूळचीं गांवावरूनच पडलेलीं आहेत, याविषयीं शंकाच नको.

आचार्य, आंबेकर, उपाध्ये, ओळकर, कर्वे, कानडे, कानिटकर, काळे, केळकर, गोरे, जोशी, डोंगरे, टोळे, देव, धामणकर, पटवर्धन, पोतदार, फणसे,

भट, भागवत, भाटे, मंडलीक, लवाटे, वैद्य, भोगले, शेवडे, गौचे, श्रीखंडे वगैरे कऱ्हाडयांत असलेलीं हीं सर्व आडनांवें कोंकणस्थांत म्हणजे चित्पावनांतही आहेत. दिघे, फणसे हीं कायस्थांत असलेलीं आडनांवें कऱ्हाडयांमध्येंही आहेत. बेंद्रे हे कुडाळ देशस्थांत, तसे कऱ्हाडयांमध्येंही आहेत. आपटे, आचार्य, उपाध्ये, काळे, गोरे, कानडे, डोंगरे, जोशी, देव, भाटे, वैद्य, हीं देशस्थांत असलेलीं आडनांवें चित्पावनांत आहेत. कोरडे हें कायस्थांत असलेलें आडनांव देशस्थांतही आहे. आचार्य, काळे हीं **दैवज्ञांत असलेलीं आडनांवें** देशस्थ, कऱ्हाडे व चित्पावनांतही आहेत. मांडे हें आडनांव मराठ्यांत तसेंच देशस्थांत व गोवर्धनांतही आहे. तानवडी, शहाणे हीं कोंकणस्थ वैश्य यांत असलेलीं आडनांवें, देशस्थांमध्यें आहेत. पातकर हे वैश्यवाणी यांचें आडनांव कऱ्हाडयांत आहे. निंबाळकर मराठे, तसे निंबाळकर कऱ्हाडे आहेत. गीत, मदन, पितळे हीं दैवज्ञांत असलेलीं आडनांवें, देशस्थांमध्येंही आहेत. इकडील **आगरी लोकांत असलेलें डोंगरे** हें आडनांव देशस्थ, कऱ्हाडे व चित्पावनांतही आहे. तसेंच, भोपे हें आगरी जातींत असलेलें आडनांव, देशस्थांतही आहेच. एवंच आडनांवांच्या सादृश्यावरून कांहींच ठरविणें शक्य नाहीं.

ब्राह्मणांतील ज्या पोटजाती सापवाद मानल्या जातात त्या बहुतेक वृत्त्यंशी धर्माधिकारीच आहेत. अर्थात् या सर्व ब्राह्मणांमध्यें जो द्वेष आहे तोही वृत्तिमूलकच आहे. प्रत्येकाच्या उत्पत्तीच्या कथा सह्याद्रिखंडापासून अर्वाचीन ग्रंथापर्यंत विचित्र व तिरस्कारार्ह अशाच दिलेल्या आहेत. इतर जातीच्या उत्पत्तिकथा जर असंभाव्य वाटतात, तर याच जातीची उत्पत्ति-कथा संभाव्य कां वाटावी? हाही प्रश्न आहे—गोवर्धन ब्राह्मणाशीं राजरोस अन्नव्यवहार होत नाहीं म्हणून या जातीची उत्पत्ति शंकास्पद आहे असें जर कोणी म्हणेल तर तीही चुकी आहे. कारण मान्य समजल्या जाणाऱ्या प्रत्येक जातीबद्दल पूर्वीं असे गैरसमज होते व पंक्तिव्यवहारही होत नसत.

चित्पावन कोंकणस्थ ही आज मान्य समजली जाणारी ब्राह्मण जाति आहे. पण तिची उत्पत्ति सह्याद्रिखंडांत प्रेतापासून दिली आहे. तर कुठें कोळयांचे केलेले हे ब्राह्मण असें म्हटलें आहे. हे ब्राह्मण जेव्हां देशावर आले, तेव्हां यांचें तोंड पाहणेंही अपशकून समजत, व पंक्तिव्यवहार तर होतच नसे. याविषयीं लोकहितवादी म्हणतात :—

"पूर्वी घाटावरील देशस्थ ब्राह्मण, चित्पावन ब्राह्मणांचे पंक्तीस जेवावयास बसत नसत, पण ज्या वेळेस श्रीनिवास परशुराम पंडित प्रतिनिधि यांचे मुलाची कऱ्हाडजवळ कोळे गांवास मुंज झाली, त्या वेळेस बाळाजी विश्वनाथ यांस पेशवेपद प्राप्त झालें होतें ; म्हणून त्यांणीं प्रतिनिधींची पंगत आपली मैत्री जाणून सर्व ब्राह्मणांकडून एकी करविली. आणि तेव्हांपासूनच कोंकणस्थ व देशस्थ पंक्तिव्यवहारांत एक झाले."

वरील हकिकतीवरून चित्पावन हे पूर्वी संव्यवहार्य नव्हते व अलिकडे ते झाले हें सिद्ध आहे. ऋग्वेदी देशस्थ व यजुर्वेदी आणि यजुर्वेद्यांतील पोट-जाती यांमध्येंही परस्पर कांहीं कमी गैरसमजुती नव्हत्या. पूर्वकालीं दळण-वळणाचीं साधनें कमी, अज्ञान व भोळेपणा अधिक यामुळें ते मत्सर वाढतही गेले. पण अलीकडे ते सर्व नष्ट झालेले आहेत. देवरुख्यांसंबंधानेंही अशाच खुळचा समजुती होत्या. म्हणे देवरुख्याच्या पंक्तीस भोजन केलें कीं दारिद्रच येतें. पण अलीकडे दारिद्रयाचीं कारणें समजूं लागलीं, देवरुख्यांशीं दारिद्रयाचा कांहींही संबंध नाहीं अशी निश्चिति झाली व सर्व व्यवहार त्यांच्याशीं होऊं लागले.

कऱ्हाडयांसंबंधानें तर किती विपरीत समजूत होती हें पहा !

स्कंद उवाच ।

महादेव विरुपाक्ष भक्त्याभीष्टप्रदायक ॥
कथयस्व महादेव काराष्ट्र ब्राह्मणोद्भवम् ॥ १ ॥

महादेव उवाच ॥

श्रृणु पुत्र प्रवक्ष्यामि चेतिहासं पुरातनम् ॥
काराष्ट्रो नाम देशश्च **दुष्टदेशः** प्रकीर्तितः ॥ २ ॥
तद्देशजाश्च विप्रास्तु **करहाटाभिधानतः** ॥
पापकर्मरता नष्टा **व्यभिचारसमुद्भवाः** ॥ ३ ॥
खरस्य ह्यस्थि योगेन रेतः क्षिप्तं विभावकम् ॥
तेन तेषां समुत्पत्तिर्जाता वै पापकर्मिणाम् ॥ ४ ॥
पूर्णे तु नवमे मासि विधवागर्भ गोलकः ॥
शिशुर्जातस्तदारभ्य खरसंभव–गोलकः ॥ १५ ॥

गरदायाश्च तुष्टचर्थं गरलव्रतमाचरत् ।
तस्य वंशे समुद्‌भूता गरदा ब्राह्मणाधमाः ॥ १६ ॥
गोलका इति विख्याता नामत्रयसमन्विताः ।
करहाटाभिधे क्षेत्रे कृष्णातीरे गता यतः ॥ १७ ॥
भिन्ना ज्ञातिः साऽभवद्वै करहाटभिधानतः ॥
एक वेदाधिकारस्तु ऋग्वेदं सम्यगभ्यसेत् ॥ १८ ॥

—स्कंदपुराण, सह्याद्रिखंडे शेषधर्म अ. १

अर्थः—स्कंद महादेवाला म्हणाला 'हे विरुपाक्ष महादेवा, कऱ्हाडे ब्राह्मणांची उत्पत्ति मजला सांगा.'

महादेव म्हणतात, 'पुत्रा तुला पुरातन इतिहास सांगतों तो ऐक. कऱ्हाड नांवाचा जो देश आहे, तेथील ब्राह्मणांस कऱ्हाडे असें म्हणतात. हे पापकर्मी, नष्ट असून ते व्यभिचारानें उत्पन्न झालेले आहेत. खर म्हणजे गाढव, त्याच्या हाडापासून उत्पन्न झालेले म्हणून त्यांना खरहाडे ऊर्फ कऱ्हाडे म्हणतात. नऊ महिने पूर्ण होतांच, त्या विधवा स्त्रीच्या गर्भांतला तो गोलक—खरसंभव गोलक—या नांवाचा पुत्र झाला. त्याच्या वंशांत, जे अधम ब्राह्मण उत्पन्न झाले, ते तीन नांवांनीं प्रसिद्ध आहेत. विष देणारे म्हणून गरद, विधवेच्या पुत्रापासून झाले म्हणून गोळक आणि कृष्णाकांठच्या कऱ्हाड प्रांतांत राहिले म्हणून कऱ्हाडे. याप्रमाणें ब्राह्मण ही वेगळी जात झाली आहे. हे फक्त एक ऋग्वेदाचाच अभ्यास करतात. यांचीं बावीस गोत्रें आहेत."

सह्याद्रिखंडासारख्या ग्रंथांत जीं वरील घाणेरडीं विधानें केलीं आहेत, तिकडे ब्राह्मणांनीं आतां दुर्लक्ष केलें आणि कऱ्हाडेचित्पावनांशीं अन्नलग्नव्यवहार चालू करून **आपली विचारशक्ति प्रगट केली**. हेंच धोरण वचनप्रामाण्यवाले जे कट्टर सनातनी आहेत, त्यांनीं यापुढें ठेवलें पाहिजे. रूढिनिष्ठांना ऐतिहासिक दृष्टि नाहीं, विवेचक बुद्धि नाहीं, एवढा मोठा समाज अधर्म संतति गणणें किती अविचाराचें आहे, याचा ते विचार करीत नाहींत. म्हणूनच त्यांच्याकडून गोवर्धनांना गोळक समजण्याचा अधर्म होत आहे.

गोळक संतति चोहोंकडे उत्पन्न होणें शक्य आहे. गोळकांनीं महत्त्वाकांक्षेनें गोवर्धन हें प्रादेशिक नांव धारण केलें असें जर मानलें तर त्यांची वस्ती सर्व महाराष्ट्रभर असावयास पाहिजे होती. कारण 'मृते भर्तरि गोलकः' हें

मनुवाक्य सर्वत्र आहे. अर्थात् अधर्म संततीही सर्वत्र उत्पन्न होणें साहजिक आहे. पण वस्तुस्थिति अशी कीं गोवर्धनांची वस्ती सर्व भागांत नसून नाशिक, नगर, पूर्वपश्चिम खानदेश, उत्तर कोंकण यांमध्यें अधिक आहे. मुंबई, पुणें, सातारा, कर्नाटक, सोलापूर, मोंगलाईंतील कांहीं भाग, वऱ्हाडांत फक्त अकोला व बुलढाणा या भागांत यांची वस्ती विरळ विरळ आहे. नाशिक जिल्ह्याला लागून आसपासच्या प्रदेशांत गोवर्धन ब्राह्मणांची वस्ती अधिक असण्याचें कारण हेंच कीं, प्राचीन काळीं हे गोवर्धन ब्राह्मण अगस्ति ऋषींच्या वसाहतीपासून याच भागांत होते. येथूनच हे ब्राह्मण क्षत्रिय राजांच्या आश्रयानें जोशी व पुरोहित या नात्यानें ठिकठिकाणीं गेले. राजाश्रय होता तोंपर्यंत त्यांचें सर्व ठीक होतें. राजाश्रय सुटल्यावर वृत्तिमूलक द्वेष उत्पन्न झाला. वृत्तिवानांना उपजीविकेकरितां सर्व अपमान सहन करावा लागला व म्हणूनच ते त्या त्या भागांत टिकून राहिले. ज्या भागांत गोवर्धनांच्या वृत्त्या आहेत, तेथें त्यांची वस्ती जास्त आहे ; व जेथें वृत्त्या नाहींत, तेथें ते विरळ विरळ आहेत. नाशिक व खानदेश भागांत गोवर्धन ब्राह्मण वृत्तिवान आहेत, पण वऱ्हाड आणि मध्यप्रांतामध्यें हे ब्राह्मण वृत्तिवान नाहींत. म्हणून त्यांची वस्ती त्या भागांत विरळ विरळ आहे. वऱ्हाड व मध्यप्रांतामध्यें माळवी, नार्मद, चरक इत्यादि ब्राह्मण वृत्तिवान आहेत. या भागांत आणि बडोदा, धार, ग्वाल्हेर वगैरे भागांत गोवर्धनांचीं कुटुंबें तुरळक तुरळक आहेत. त्याचें कारण हे लोक नोकरीपेशानेंच तिकडे गेले आहेत हें होय !

गोवर्धन ब्राह्मणांची संख्या दिवसेंदिवस कांहीं वाढत नाहीं. इतर ब्राह्मण जातींतील व्यभिचार बंद झाले आहेत, असें म्हणतां येणार नाहीं. ती व्यभिचारोत्पन्न संतति गोवर्धनांत मिसळून त्यांची संख्या खरोखरी वाढावयास पाहिजे होती ! गोवर्धनांची संख्या तर वाढत नाहीं, अशा अधर्म संततीची एखादी निराळी जात बनलेली आढळत नाहीं, तेव्हां या संततीची काय व्यवस्था होत असावी ? हल्लीं परधर्मी राजशासनामध्यें जर वेगळी जात होऊं शकत नाहीं, तर पूर्वीं स्वधर्मी राजशासनामध्यें अधर्म संतति उघडकीस येऊन तिची वेगळी जात बनून ती कित्येक हजारांपर्यंत वाढणें, हें संभवतें तरी कसें ?

स्मृतिकारांनीं वर्णज व संकरज जातींच्या दिलेल्या उत्पत्त्या काल्पनिक दिसतात, विश्वासार्ह वाटत नाहींत, असें आम्ही पूर्वी प्रकरण नऊमध्यें दाखविलेंच आहे. आज सर्वतोमुखी गाजलेला जो चंडाल शब्द त्याची उत्पत्तिः—

ब्राह्मण्यां शूद्रात् जातश्चंडालः सर्वधर्मबहिष्कृतः ।

अशी दिली आहे. हा चंडाल धर्म बहिष्कृत आहे. सबंध हिंदुस्थानांत अस्पृश्यतानिवारणाचा प्रश्न चांगला घोळत आहे. त्यामुळें सबंध चंडालांची मोजदाद झालेली आहे. हिंदुस्थानांत पंचद्रविड व पंचगौड मिळून ब्राह्मण फक्त दीड कोट आहेत, आणि ते हिंदुस्थानांतील कांहीं विशिष्ट देशांतच अधिक आहेत. जेथें ब्राह्मण जास्ती तेथें चंडाल कमी व जेथें ब्राह्मण वस्ती कमी तेथें चंडाल अधिक अशी स्थिति खरोखरी असावयास पाहिजे होती. पण तसें नाहीं! हिंदुस्थानांतील सर्व भागांत अस्पृश्यांची वस्ती कांहीं प्रमाणांत सर्वत्र सारखी आहे. यावरून हें स्मृतिकारांचें विधान अत्यंत अविश्वासार्ह आहे. यासंबंधीं आर. सी. दत्त यांनीं Civilization in the Buddhist age ह्या ग्रंथांत पुढीलप्रमाणें म्हटलें आहे.

"Let us next turn to Chandalas of Bengal. They too form a solid body of people numbering a million and a half; and inhabiting mostly the South-Eastern districts of Bengal. They are patient and hardworking, and unrivalled in boating and fishing; and landlords like to have them as tenants for bringing waste and marshy lands under cultivation. But nevertheless the Chandalas are a soft, timid and submissive race. There is a marked family likeness, both physical and mental, among the Chandalas, which shows them to be one distinct race.

"And how was this race formed? Manu has it that they are the issues of Brahman women who yielded themselves to the embraces of sudras. As the number of Brahmans in South-Eastrn Bengal was never very large in olden times, and does not in the present day come to even

a quarter of a million in the districts named above, it is difficult to account for the presence of a million Chandalas in those districts on manu's theory. Shall we suppose that fairskinned Brahman Desdemonas habitually bestowned their hands on swathy Sudra swains ? Shall we suppose that beautious but frail Brahmin girls were seduced from their parents–by the hundred thousand–by gay Sudra Lotharios intent on creating a new caste ? And shall we further suppose that children begotten of such unions thrived and multiplied in marshes and fishing villages, amidst toil and privations, more than true–born Brahman children basking in the sunshine of royal favour and priestly privileges ! We have only to state such suppositions, to show their uttered absurdity ; and with these suppositions Manu's theory of mixed castes is brushed aside to the region of myths and nursery tales ! common sense will tell every reader who knows anything of the Chandalas of Bengal that they were the primeval dwellers of South–Eastern Bengal and lived by fishing in its numerous creeks and channels, and they naturally adopted the religion, the language and the civilization of the Hindus when the Aryans came and colonised Bengal."

"सारांश, आतां बंगालमधील चांडाळासंबंधानें विचार करूं. बंगालमध्यें चांडाल जातीच्या लोकांची संख्या सुमारें पंधरा लक्ष असून त्यांची वस्ती बंगालच्या आग्नेयीकडील भागांत पसरलेली आहे. हे लोक सोशिक व मेहेनती असून होडया चालविण्यांत व मासे धरण्यांत त्यांचा हात कोणी धरूं शकणार नाहीं. पडित व ओसाड जमिनी लागवडीस आणण्याचे कामीं त्यांची प्रसिद्धी आहे. तथापि ते स्वभावानें फार नरम व भित्रे आहेत. सर्व चांडाळांमध्यें एक प्रकारचा शारीरिक व मानसिक सारखेपणा दिसून

येतो. मनु म्हणतो कीं, ब्राह्मण स्त्रिया व शूद्र पुरुष यांच्या संबंधापासून ही जात निर्माण झाली. परंतु आग्नेयीकडील बंगालमध्यें ब्राह्मणांची वस्ती पूर्वीं फारशी नव्हती. आणि आजमितीसही त्या भागांतील पांच जिल्ह्यांतील ब्राह्मण लोकसंख्या अडीच लाखांहून अधिक व्हावयाची नाहीं. मग हे दहा लाखांहून अधिक चांडाळ तेथें कोठून आले ? ब्राह्मण तरुणींना शूद्रांशीं शरीरसंबंध करण्याची तेथें खोडच लागली होती असें समजावयाचें कीं काय ? कीं शूद्रांनीं ब्राह्मणकन्या फुसलावून नेण्याचा सपाटाच लावला होता, अशी कल्पना करावयाची ? ज्या ब्राह्मण स्त्रिया स्वतःच्या जातींत राहिल्या त्यांची संतति राजाश्रयाचें सुख व जातिवर्चस्वाच्या सवलती असतांनाही वाढली नाहीं आणि ज्यांनीं शूद्र पुरुषांशीं संबंध केला त्यांची संतति मात्र दलदलीच्या प्रदेशांत नाना प्रकारच्या विपत्ति भोगाव्या लागत असतांही इतकी पुष्कळ वाढली असेंही मग समजावयास नको कांय ? या कल्पना सकृद्दर्शनींच अप्रयोजक वाटणाऱ्या आहेत. वर्णसंकरासंबंधाच्या मनुस्मृतींतील उपपत्ति कल्पितच समजल्या पाहिजेत. बंगाल्यांत आर्यांची वसाहत होण्याच्या पूर्वीं तेथें असलेली चांडाल ही एक जात होती व त्या जातीचे लोक मासे मारून निर्वाह करीत असत. पुढें आर्यांनीं त्यांना जिंकल्यावर त्यांनीं आर्यांचा धर्म, भाषा, संस्कृति यांचा स्वीकार केला. असेंच सारासार विचार करतां म्हणावें लागतें."

चंडालासंबंधीं दत्तबाबूंनीं प्रदर्शित केलेले विचार खरोखरीच तर्कशुद्ध आहेत. तीच तर्कशुद्धता गोळक शब्दाकडे दाखविली पाहिजे. गोवर्धन ब्राह्मणास मन्वादि स्मृतींतील गोळक शब्दाची व्याख्या लावून वचनप्रामाण्याच्या दिमाखानें त्यांना अधर्म संतति ठरविणें म्हणजे आपल्या ब्राह्मण जातीलाच काळिमा फासण्यासारखें आहे.

खानदेशामध्यें गोवर्धनाशिवाय आभीर, मैत्रायणी, ऋणावट वगैरे वृत्तिवान ब्राह्मण पोटजाती आहेत. या सर्वांचा मत्सर इतर ब्राह्मणांकडून होतोच. पण या जाती परस्पर मत्सर करून पर्यायानें इतरांस साह्य करितात. या भागांत गोवर्धन ब्राह्मणांना परसाई म्हणून संबोधण्यांत येतें. मूर्धावसिक्त या ब्राह्मण जातीला सध्यां खानदेशांत ब्राह्मणजाई असें म्हणतात. ब्राह्मण व शूद्रा यांचेपासून झालेल्या पारशव जातीला खानदेशांत पारसई

म्हणतात. बाणभट्टानें हर्ष चरित्रांत आपल्या पारशव बापाचा उल्लेख केला आहे. यावरून कोणी कोणी खानदेशांतील गोवर्धन ब्राह्मणांना ते परसाईची वृत्ति करतात म्हणून पारशव असें म्हणतात, तेंही अज्ञानाचें द्योतक आहे.

'मृते भर्तरि गोलकः' या वचनानें ब्राह्मणांतील विधवा संतति म्हणून एका समाजाला एका भागांत गोळक म्हणावयाचें व त्याच गोवर्धन समाजाला दुसरीकडे ब्राह्मण व शूद्रा यांची संतति समजून 'पारशव' असें म्हणून परसाई म्हणजे पारशव असें अनुमान बांधावयाचें, हें अत्यंत मूर्खपणाचें आहे. परसाई हा शब्द उत्तरेकडून आलेला आहे. नर्मदेच्या खोऱ्यांत गांवोगांवच्या ग्रामोपाध्यांना आजही परसाई म्हणतात. हा परसाई नारमदेव, जंबु, माळवी, गुजराथी, गोवर्धन वगैरे ब्राह्मण जातीचा असतो. नेमाडामध्यें आणि खानदेशांतही परसाईपणाची वृत्ति धारण करणारीं अनेक ब्राह्मण जातींचीं घराणीं आहेत, त्यांत प्रमुखतः गोवर्धन हे आहेत. परसाई शब्द हा पुरस्वामी शब्दापासून बनला असावा. गोस्वामी याचा अपभ्रंश गोसाई, त्याचप्रमाणें पुरस्वामी याचा अपभ्रंश परसाई होणें संभवनीय आहे. पुरस्वामी म्हणजे पुरांतला ब्राह्मण पुरोहित व धर्माधिकारी असा संभवतो. मद्रासेकडे ब्राह्मणाला स्वामी म्हणण्याचा प्रघात आहे. लिंगायतांत अय्यालाही स्वामी म्हणतात. स्वामी हा शब्द प्रभुत्ववाचकच आहे. अर्थात् पुरस्वामित्व करणाऱ्या या वर्गाचा मत्सर पारशव शब्दाशीं संबंध जोडून करण्यांत येऊं लागला हेंच संभवनीय दिसतें.

हिंदु समाजांत प्रत्येक जातीनें इतर जातीला हीनत्वदर्शक नांव ठेवण्याची प्रथा कायम आहे. माळव्यांत गेलेले मराठे तिकडील ब्राह्मणांना रांगडे ब्राह्मण म्हणतात. त्याचप्रमाणें परसाई जो मूळ हक्कदार भिक्षुक त्याला पारशव समजून हीन ठरविण्याचा यत्न चालू झाला. परसायाला जे ब्राह्मणत्वाचे अधिकार आहेत व जी वृत्ति आहे, ती पारशवाला कशी प्राप्त होणार? परसाई म्हणजे परसोयी दुसऱ्याची सोय करणारा असाही तर्क संभवतो. कारण या ग्रामोपाध्याला गांवांत येणाऱ्या उच्चवर्णीय अधिकाऱ्यांची खानपानाची व राहण्याची व्यवस्था करावी लागते. यामुळें अधिकाऱ्याशीं संघटण होऊन वशिल्यानें जर कांहीं कामें होत असतील तर तें सहन न होणाऱ्यांना पारशव म्हणून मत्सर करणें बरें वाटतें. परसाई-

पणाची वृत्ति ही खानदेशाशिवाय मध्यप्रांत, बडवाणी संस्थान व नेमाडातही आहे. ग्रामजोशी ऊर्फ परसाई याला इनामें आहेत. त्यांत चौधरी इनाम, कुलकर्णी इनाम, परसाई इनाम, असे भेद आहेत. क्वचित् प्रसंगीं ब्राह्मणेतरही परसाईपणाची वृत्ति करतो. पण त्याला ब्राह्मणाचे पौरोहित्याचे अधिकार नाहींत. क्वचित् दारिद्र्यामुळें परसायाची वृत्तीही दुसऱ्याकडे गेलेली आहे. पण अधिकाऱ्यांची सोय करण्यापलीकडे त्या वतनाबरोबर त्याला इतर कोणतेही हक्क मिळालेले नाहींत. होळकर स्टेट, बडवाणी स्टेट यांमध्यें गांवचा भिक्षुक म्हणजेच परसाई असे स्पष्ट उल्लेख आहेत. जोसपणाच्या वृत्तीसारखीच ही एक वृत्ति आहे. म्हणून परसाईपणाचें वतन हें दूषणास्पद नसून भूषणास्पदच आहे.

इंग्रजी अंमलांत बहुतेक वतनें बुडालीं. तथापि उदरनिर्वाहाचा धंदा म्हणून कांहीं लोकांनीं तो चालू ठेवला, इतकेंच ! बडवाणी स्टेटमध्यें १९०८ सालीं सेटलमेंटचे नियम करण्यांत आले, त्या वेळीं विद्यमान वतनदाराचे हक्क काय आहेत, याची चौकशी होऊन परसायाचा शेर कायम करण्याचा ठराव झाला, तो ठराव असा :—

'देह हाजामें बनाम * * वल्द * * कोम......... परसाई है । और गांवके खेडूओंसे फीहल सेरअनाज अदाब का पाता है । यह परसाई उनका प्रोहित समझा जाता है । किसान अगर चाहे यह अदाब बतोर धर्मके देवे इसमे स्टेटकी कोई रोक नहीं है ।'

अर्थ—'मौजे मजकूर मध्यें नांव —बापाचें नांव —जात—हा परसाई आहे. गांवांतील प्रत्येक औतामागें १ शेर धान्य धर्म म्हणून दरसाल त्यास मिळतें. हा परसाई त्यांचा पुरोहित आहे. शेतकरी धर्म म्हणून त्याला धान्य देतील. त्याला संस्थानची हरकत नाहीं.' बडवाणी संस्थानांत सर्व गांवांना असा वतनदार परसाई असतो. सबंध संस्थानांत गोवर्धन ब्राह्मण वतनदार परसाई २।३ असतील बाकी सर्व इतर ब्राह्मण आहेत.

ब्राह्मण पुरुष आणि शूद्र स्त्री यांच्या संततीला विदुर अथवा कृष्णपक्षी म्हणून मानलें जातें. स्मृतींतील पारशव तो हाच असावा. त्याला आधार देण्याची आवश्यकता नाहीं. पारशव व परसाई यांचा अर्थाअर्थीं कांहीं संबंध नाहीं. परसाई ही जात नाहीं. गोवर्धन ब्राह्मण हे परसाईपणाची वृत्ति करतात, म्हणून पारशव अथवा विदुर जातीचे ते मुळींच नाहींत.

खानदेशांत गोवर्धनांना उद्देशून गोळक असा शब्द वापरण्यांत येत नाहीं. त्यांना इकडे गोवर्धन आणि परसाई अशाच नांवानें संबोधितात. गोवर्धन ब्राह्मण स्वतःस गोवर्धन, गोरधन, परसाई, गोर असेंच म्हणवून घेतात. गुजराथेंत उपाध्यायाला गोर म्हणतात. उत्तर हिंदुस्थानांतही उपाध्यायाला गोर म्हणण्याचा प्रघात आहे. गांवगोर म्हणजे ग्रामोपाध्याय. हे गांवगोर गोवर्धन ब्राह्मण असून त्यांचीं कांहीं ठिकाणीं वतनेंही आहेत.

कांहीं कांहीं गांवांत गोवर्धन ब्राह्मणांची भिक्षुकी, कुलकर्णी व पाटिलकीची वृत्ति आहे. एखादे वेळीं या तीन वृत्त्यांना तो तीन गुमास्तेही नेमतो. भिक्षुकीकरितां एक गुमास्ता ब्राह्मण नेमला तर पाटिलकी व कुलकर्णी यांकरितां ब्राह्मणेतर गुमास्ताही नेमला जातो. चारपांच गांवचे वतनदार असल्यास ते भिन्न भिन्न शाखीयांना गुमास्ते म्हणून नेमतात. हे गुमास्ते पुढें मालकाशीं जमेनासें झालें म्हणजे निंदाव्यंजक शब्दानें अन्नदात्याची निंदा करतात आणि कुत्सित नांवें समाजामध्यें रूढ करतात. परसाईचा पारशव करण्यामध्यें हे असलेच लोक उत्साहानें भाग घेत असतात, हेंही ध्यानांत ठेवलें पाहिजे.

येथवर दिलेल्या अनेक आक्षेपांच्या उत्तरांवरून गोवर्धन ब्राह्मण हे गोळक असणें कसें अशक्य आहे आणि हे ब्राह्मण प्रादेशिक गोवर्धन या नांवानें कसे नांदत आले आहेत याची वाचकांना स्पष्ट कल्पना येईल. अर्थात् त्यांचे तोंडून **सुद्धां गोवर्धन हे मुळींच गोळक नाहींत** असे उद्गार वाहेर पडतील.

प्रकरण ११ वें

श्रीमत् शंकराचार्य व पंडित प्रकांड हेमाद्रिकृत गोवर्धनप्रशस्ति

गोवर्धन ब्राह्मण ही एक प्रादेशिक जात आहे, ती सत्‌ब्राह्मण जात आहे, गोळक या शब्दाशीं तिचा कसलाही, कोणताही यत्किंचितही संबंध पोंचत नाहीं, हें निरनिराळ्या आक्षेपांचा परामर्श घेऊन गेल्या प्रकरणांत विशद केलें, त्यावरून वाचकांच्या ध्यानीं येईल. गोवर्धनांच्या सत्‌ब्राह्मण्या-बद्दल जीं अनेक प्रमाणें आतांपर्यंत दिलीं, त्यांपेक्षां अधिक बलवत्तर प्रमाणें म्हणजे श्रीमत् शंकराचार्यांचीं पीठें आणि मोठमोठ्या विद्वानांकडून मिळालेलीं प्रशस्तिपत्रें हीं होत. प्रस्तुत प्रकरणांत श्रीमत् शंकराचार्यांचीं आज्ञापत्रें आणि हेमाद्रिसारख्या महापंडितानें दिलेलें प्रशस्तिपत्र देऊन त्या आधारें काय प्रकाश पडतो, हें दाखवावयाचें आहे.

पुढें दिलेल्या शृंगेरीमठ, करवीरमठ, मूळबागल वगैरे मठांतील जीं आज्ञापत्रें व ज्या वृत्तीबद्दलच्या ज्या सनदा आहेत त्या आरवी येथील श्री. त्र्यंबक विष्णु धर्माधिकारी यांचेकडून अगदीं अस्सल मिळालेल्या आहेत. या सनदांतील व्यक्तींचीं नांवें ध्यानांत यावीं म्हणून थोडी वंशावळ देतों.

- नरहर
  - लक्ष्मण
    - गदाधर
      - अनंत
        - विष्णु
          - त्र्यंबक
    - महादेव
      - विनायक
        - नारायण

शके १६८१ मधील सनद धर्माधिकाऱ्यांचे मूळपुरुष जे लक्ष्मण नरहर त्यांचे नांवची आहे. या सनदेंत लक्ष्मण नरहरला धर्माधिकार देऊन शृंगेरी पीठानें समस्त गोवर्धनांनीं लक्ष्मण नरहरचे सांगण्याप्रमाणें चालावें अशी ताकीद दिली आहे.

पुढचें आज्ञापत्र शके १७०७ मधील असून तें करवीर मठाचें आहे. त्यांत गोवर्धन ब्राह्मणांकडे हव्यकव्य प्रसंग, याज्ञिक वगैरे पूर्वापार पद्धतीप्रमाणें करण्याबद्दल ताकीद दिली आहे.

शके १७५८ मधील श्रीशंगेरी पीठाची सनद मालाड येथील प्राचीन गोवर्धनस्थ ब्राह्मण आश्वलायन शाखीय गौतम गोत्रोत्पन्न त्रिप्रवराध्यायी पिंगळे यांचे नांवाची आहे. या सनदेंत सात पिढ्यांचा उल्लेख केला असून चार वर्ण व अठरा जातीचे,आठ्ठेचाळीस संस्कार करण्याच्या मानाचा,दानाचा व दक्षिणेचा अधिकार आचंद्रार्क दिलेला आहे. यास सरकार अगर मठस्थ कोणीही हरकत करूं नये अशीही आज्ञा आहे. ही सनद फारच महत्त्वाची आहे.

शके १७७० मधील सनद शृंगेरी पीठाची असून ती विनायक महादेव उपाध्ये यांचे नांवची आहे. हा विनायक महादेव वर दाखविलेल्या लक्ष्मण नरहरचा नातू होतो. या आज्ञापत्रांत विनायक महादेवचे अधिकार स्पष्ट केले आहेत. विनायक महादेवाला प्रायश्चित्ताचे व निग्रहाचे अधिकार दिले होते हें उघड होते. या आज्ञापत्रांत आप्पाजी भगवंत जोशी, कुलकर्णी यांचें नांव आहे. हा आप्पाजी भगवंत व याचा भाऊ हरी भगवंत असे दोघे बंधुबंधु होते. हे दोघे त्र्यंबक विष्णु धर्माधिकारी (आज विद्यमान असलेले) यांच्या मातोश्रीचे चुलते होत. त्यांचा अश्वीस एक मोठा वाडा आहे. वंशज कोणी नाहीं. येथें प्रसंगानें हरी भगवंताची जी माहिती मिळते तेवढी देतों.*

---

* पेशव्यांचे कारभारी त्रिंबकजी डेंगळे यानें नाशिक क्षेत्राची फारच दैना उडविली असा उल्लेख नाशिक–पंचवटी वर्णन नामक पुस्तकांत आहे. (हा लेखक गोवर्धन हें नाशकाजवळ गांव होतें असेंही लिहितो.) डेंगळे हे निमगांव जाळी येथें राहात. त्यांचे उपाध्ये हरी भगवंत गोवर्धन ब्राह्मण होते व त्यांचें वजन फार असे! अश्वीस हरी भगवंताचा वाडा आहे. अश्वीचें धर्माधिकारी घराणें व इतर गोवर्धन मंडळी हरी भगवंताच्या आप्ता-

शके १७७५ मधील करवीर मठाचें आज्ञापत्र मलकापूर येथील विनायक महादेव भट उपाध्ये यांचे नांवचें आहे. त्यांत अग्रतांबूल, द्विगुण, दक्षणा, बहुमान वस्त्र वगैरे अधिकार त्यास दिलेले आहेत.

यापुढील सनद शके १७८५ मधील संस्थान मठ करवीर येथील असून ती विनायक महादेवभट उपाध्ये गोवर्धन यांचे नांवची आहे. या सनदेंत आजापासून म्हणजे लक्ष्मण नरहर पासून चालत आलेले अधिकार कायम केलेले आहेत. शिवाय करवीर मठाचे आज्ञेखेरीज शंगेरी, कुडलगी, हंपी, वगैरे मठांकडून कोणी आल्यास पाद्यपूजा वगैरे करूं नये असें म्हटलें आहे. शके १७८६ मधील सनद पुन्हां विनायक महादेव याचेच नांवची असून देशमुख देशपांडयांना विनायक महादेवचे कामास व्यत्यय न येईल असा बंदोबस्त करणेस लिहिलें आहे.

शके १७८९ मधील सनद चिंतामणभट व अमृतभट यांचे नांवची आहे. या सनदेचे आधारें त्यांना खानदेशांतील जोसपणचा अधिकार दिला आहे.

शके १८०१ मधील सनद नारायण विनायक व अनंत गदाधर अग्निहोत्री व उपाध्ये यांचे नांवची श्रीमुळबागल मठाची असून तींत गोवर्धन शाखीय ब्राह्मणांचा धर्माधर्म पाहण्याचा अधिकार दिलेला आहे. या सनदेंतील

मध्यें आहेत. हरी भगवंतानें नाशिक क्षेत्राची जी दैना उडविली व क्षेत्रस्थ भिक्षुकांचा जो छळ केला त्यामुळें त्यानें सर्वांचा द्वेष संपादिला. हरी भगवंत हा दुसऱ्या बाजीराव साहेबांच्या कारकीर्दींत होता. या वेळेस गोवर्धनांच्या छळास प्रारंभ झालेलाच होता. त्यांत हरी भगवंताच्या अत्याचारानें आगींत तेल ओतल्यासारखें झालें असावें, आणि गोवर्धनांना **गोळक,** हें नांव चिकटविण्यांत आलें असावें. हरी भगवंताचा ओझरता उल्लेख 'पेशवेकालीन महाराष्ट्र' पान १८६ मध्यें आहे.

नाशिक पंचवटी क्षेत्रवर्णनाचा लेखक कनोजी व गोळकांची वृत्ति पूर्वी या प्रांतांत होती असें म्हणतो. पण अधर्म संतती गोळकांना वृत्ति असणें शक्य नाहीं. अर्थात् त्या वेळचे वृत्तिवान् ब्राह्मण गोवर्धनच होते. लेखकाचें विधान अप्रमाण दिसतें.

अग्निहोत्री हे शब्द विचार करण्याजोगे आहेत. अब्राह्मणामध्यें अग्निहोत्री आणि दशग्रंथी वैदिक मिळणें शक्य नाहीं.

शके १८३५ मधील सनद आदिपीठ शृंगेरी येथील असून ती वामन काशिनाथ जोशी गोवर्धन ब्राह्मण यांचे नांवची आहे. हे जोशी पश्चिम खानदेशांत राहात असत. त्यांना या सनदेचे आधारें त्या भागांतील एकंदर हिंदुवर्ग प्राणिमात्राचे ४८ संस्कार करण्याचे अधिकार चंद्रसूर्य असेपर्यंत दिलेले आहेत.

हीं आज्ञापत्रें क्रमानें पुढें दिलीं आहेत :—

श्रीविद्याशंकर

शिक्का

श्रीमत्परमहंसादियथोक्तबिरुदांकितशृंगेरीसिंहासनाधीश्वर-श्रीमच्छंकराचार्यान्वय-संजाताभिनवश्रीविद्यानरसिंहभारती स्वामीकरकमलसंजाताभिनवश्रीविद्याशंकरभारतीस्वामी—कृतनारायणस्मरणानि.

स्वस्ति श्रीनृप शालिवाहन शके १६८१ प्रमाथीनाम संवत्सरे माघसीत प्रतीपदात्दिनी हरी गुरुभक्तपरायण राजमान्य राजश्री बाबाजीपंत देशपांडे पाा चांदवड परम भक्तोत्तम याप्रती

विशेषस्तु तुमचें कल्याण इच्छित श्रीमद्भूमंडल सिरोरत्न ××× दक्षिण वाराणसी करवीर क्षेत्रीं छात्रसभासमवेत श्रीनिकट राहिलों असों. तदनंतर वोा राजश्री लक्ष्मण नरहरभट उपाध्ये गोवर्धन यांनीं मठीं येऊन विदित केलें कीं समस्त गोवर्धनांची पुरोहितकी आपली, त्यासी ज्ञातिधर्म सोडून कोण्ही गृहस्थ अशास्त्रें वर्तताती. एकाकरतां सर्वांचे द्वेश होतो. ऐसियासी श्रीस्वामी जगद्गुरु आहेत. गोवर्धनानीं कोणे विचारें वर्तावें कोणकोण धर्म चालवावे ऐसे धर्मशास्त्रीं पाहून आज्ञा कर्तव्य ते करावी. ऐसी मठीं येऊन बहुता प्रकारें विनंती केली. यावरून धर्मसभा करून शास्त्रसंमत निर्णय पाहोन निर्णयपत्र दिलें असे. तरी निर्णयपत्राप्रमाणें याची वर्तणूक करवावी. ज्ञातीलोप होऊन अशास्त्रें वर्तताती कोणासही उत्तम नव्हे. शास्त्रयुक्त चालावें यांत उत्तम आहे. याविसी आपण सर्वसुज्ञ आहेत, गोवर्धनांत कोणी स्वधर्म वर्तत नसतील त्यासी वोा लक्षमण नरहरभट सांगतील त्याप्रमाणें शासनयुक्त करून स्वधर्म चालवावे. अधर्म वर्तणूक सृष्टींत नसावी. यांत आपण सुज्ञ आहेत

कोण्ही ब्राह्मण निर्णयपत्राप्रमाणें याची वर्तणूक चालो न देत आव्हेर करतील त्यासी ताकीद करून निर्णयपत्राप्रमाणें चालवावें. शास्त्रसंमत निर्णय जाहला आहे. शास्त्र न विचारतां अव्हेर न करावा हें होय. महाल येथील कमाविसदार वगैरे यासी आज्ञा पत्रें देऊन याची वर्तणूक निर्णयपत्राप्रमाणें चालती करावी सुज्ञाप्रती विशेष लिहिणें काय असे.

| शिक्का |

* * * *

श्रीशंकराचार्य मठ करवीर यांचें एक आज्ञापत्र शके १७०७ चें आहे. त्यांत मलकापूर, शिरोळे, विशाळगड व कऱ्हाड भागांतील ब्राह्मणांना रा. भुजंग नाईक, व्यंकोबा नाईक व यादोबा नाईक गोवर्धन यांचेकडे पूर्वापार वहिवाटीप्रमाणें याज्ञिक प्रसंग व हव्यकव्य करण्याविषयीं ताकीद दिलेली आहे.

॥ श्री ॥

| शिक्का कर्नाटकी भाषेंत |

श्रीमत्परमहंसपरिव्राजकाचार्यवर्य–पदवाक्यप्रमाणपारावारपारीण–यमनियमासनप्राणायामप्रत्याहारध्यानधारणासमाध्यष्टांगयोगानुष्ठान-निष्ठतपश्चक्रवर्त्यनाद्यविछिन्नगुरुपरंपराप्राप्तषड्दर्शनस्थापनाचार्यव्याख्यानसिंहासनाधीश्वर-सकलवेदार्थप्रकाशकसांख्यत्रयीप्रतिपालक-सकलनिगमागमसारहृदयषण्मतस्थापनाचार्य–सकलबिरुदावलीविराजमानश्रीचक्रनगरोद्धारकर्ता – वैदिकमार्गप्रवर्तक – सर्वतंत्रस्वतंत्रादिराजधानीश्रीविद्यानगरमहाराजधानीकर्नाटकसिंहासनचक्रवर्ती — प्रतिष्ठापनाचार्य–श्रीमद्राजाधिराजगुरुभूमंडलाचार्य-तुंगभद्रातीरनिवासऋषिशृंगपुरवराधीश्वरशृंगेरीश्रीविरुपाक्षश्रीविद्याशंकरदिव्यश्रीपादपद्माराधकश्रीनृसिंहभारतीस्वामीगुरुकरकमलसंजातोद्भवशृंगेरीश्रीविरुपाक्षश्रीबाळकृष्णाख्य विश्वरूपभारतीस्वामिभिः

स्वस्ति श्रीसंवत १८९२ तथानपशालिवाहन शके १७५८ दुर्मुखनाम संवत्सरे महामांगल्यप्रदमासोत्तमे मासे कार्तिक शुद्ध ५ भानुवासरे श्रीमत्प्रशस्त गीर्वाणगणजेगीयमान श्रीमद्यजनादि षट्कर्मनिरत श्रीमदुपचारणसेवाधुरीण दानधर्मपरोपकारदिगंत प्रसिद्ध सकलतत्त्वावबोधकवैशेषिकतर्कव्याकरणादि-षट्शास्त्रप्रसंगीकृत हरिगुरुभक्तिपरायणतत्पर सकलगुणसद्गुणाभरणभूषित स्वामिकार्यधुरंधर मुख्यसंस्थानाभिमानी नीतिकार्यसंपन्न अस्मदाचार्य प्रेम-प्रियशिष्य उत्तर कोंकण तालुके साष्टी मौजे बोरोली येथील ब्राह्मणक्षेत्री वैश्यशूद्रादि अष्टादशजातीय गृहस्थेषु कृतविचरित श्रीनारायणस्मरणपूर्व काशिष: विलसन्तुतराम्.

सांप्रत श्रीमद्भगवत्पादपूज्य श्रीमच्छंकराचार्य गुरुपीठ आसेतुहिमाचल पर्यंत प्रसिद्ध पीठपूजा विषयिणी भक्ति: भवजल तारण कारणमेवतत् इतोप्य-धिक श्रेयसां वृद्धचर्थं कसबे मालाड येथें स्वारी आली तेव्हां ज्योतिषी उपाध्ये जातीवाले बोलावून चौकशी करून याचे वंशपरंपरागत हाच वतनदार जाणून श्रीमठाहून श्रीमुखआज्ञा सादर केली जाते जे–ऋग्वेदांतर्गत आश्वलायन शाखाध्यायी गौतमगोत्रोत्पन्न त्रिप्रवराध्यायी शामज्योतिषी तत्पुत्र राम-ज्योतिषी तत्पौत्र भिकंभट ज्योतिषी व चांगज्योतिषी तत्पुत्र गोविंद ज्योतिषी तत्पौत्र बाबा ज्योतिषी उपनाम पिंगळे **प्राचीन गोवर्धनस्थ वास्तव्य मौजे मजकूर** सदर्हू तक्षिमा दोन याचे वतन पुत्रपौत्रवंशपरंपरा चालवावयाकरितां चार वर्ण अठरा जातींचे घरांत अष्टाचत्वारिंशति संस्कारांत ज्योतिषी उपाध्येपणाचे मान, दान, दक्षिणा, सत्कार यांस देत असावें. यास सरकार अथवा मठस्थ कोणी अथवा ग्रामस्थ व दरकदार व रयत वगैरे याणें हरकत न करितां आचंद्रार्कपर्यंत भूयो भूयो पालनीयो भवद्भिः ॥ स्वदत्ता द्विगुणं पुण्यं परदत्तानुपालनम् । परदत्तापहारेण स्वदत्तं निष्फलं भवेत् । इदं पत्र शासनं सर्वेषां मान्यतरं भूयात् ॥ धर्मसंस्थापनायां सर्वेषु साभिमानपुर:सरेषु धर्म-विचारणा कर्तृषु विशेष किं लेखनं इतोप्यधिकश्रेय : इति नारायणस्मृति: ।

सही (कानडी)

शिक्का

श्रीशंकर

शिक्का

श्रीमत् परमहंस परिव्राजकाचार्यवर्य गुरु परंपराप्राप्त सकल बिरुद-सहित श्रीमत् शृंगेरी श्रीशंकर भारतीस्वामी मुखकमल नि:श्रित श्री धुंडिराज देशाधिकारिभि: अस्मद् अत्यंत प्रिय शिष्य समस्त गोवर्धन उपाध्येसहित मंडली विषयेकालत्रयविरचिताशिश्य ×× सुतरांकीलक संवत्सर शके १७७० वा।। १३ पावेतो मु।। मौजे उंबरी बाळापूर येथें श्रीशिवपूजेकरून आनंद निरभरीत असो. विशेष, तुम्ही सर्वांनीं विनंती केली कीं आमची मागील वहिवाट परंपरा चालत आली ती सोडून अमार्गानें कोणी चालतात ह्यास धर्माप्रमाणें शास्त्रविरुद्ध करून उपाध्येपैकीं व मंडलीपैकीं जे कोणी वर्तणूक करतील त्यास त्यांचे अंगीं दोष लाऊन अपंक्त करावे, येविसी उपाध्ये यांचे नावें पत्र व सर्वत्रांचे नावें एक पत्र असें लिहिलें पाहिजे. वे. विनायकभट बिन महादेव भट उपाध्ये याजला श्री शृंगेरीचें आज्ञापत्र दिलें त्यास कोणी मान्य करतात आणि कोणी मान्य करीत नाहींत. येविसी सर्वत्रांनीं मान्य करण्यास आज्ञापत्र दिल्हे पाहिजे म्हणून विदित केलें. त्याजवरून हें आज्ञापत्र सादर केलें आहे तरी तुम्ही सर्वत्रांनीं पूर्वापार चालत आलें त्याप्रमाणें चालावें. यांत मंडलीपैकीं व उपाध्येपैकीं अमार्गानें चालतील त्यास सदरी सर्वत्राचे विचारानें अपंक्त करून उपाध्ये पैकीं जे मार्गानें चालत असतील त्यांचे हातून हव्यकव्य कर्म चालवावें व अपंक्त जाहालेले धर्माप्रमाणें शुद्ध करण्याचे बुद्धीस येईल तेव्हां शुद्ध करतेसमयीं श्री संस्थानचे अंश जो शक्तिनुसार होईल तो आपाजी भगवंत जोशी कुळकर्णी मौजे अश्वी बु ।। वगैरे गांवचे स्वाधीन उपाध्ये यांचे विद्यमाने देऊन त्यांची पावती उपाध्ये यांचे नांवें घेत जावी आणि श्री संस्थानची स्वारी आली म्हणजे आपाजी भगवंत याजकडून देवावी आणि ब्रह्मदंडाचा अंश व उपाध्ये याचा दंड व ज्ञातिदंड असे ज्यांचे त्यास यथाविभाग देत जावे. नंतर त्यास पंक्तीस घेत जावें. पेशजी शृंगेरी संस्थानचे पत्र विनायक महादेव याणीं आणले त्याचा शिक्का मात्र वंदन करून सदरी लिहिले धर्माप्रमाणें मान्य तीच वर्तणूक करावी.मित्ती मजकूर शके १७७० बहुलेखनेन अलं इत्याशिष्य

शिक्का

मलकापूर येथील विनायक महादेव भट उपाध्ये गोवर्धन यानें संस्थान मठ करवीर यांजकडे गोवर्धन ज्ञातींतील मठाधिपत्याविषयीं अर्ज केला तेव्हां श्रींनीं त्याच्या पितामहापासूनचे कागदपत्र पाहून पूर्वापार वहिवाट जाणून अग्रतांबूल, द्विगुणदक्षिणा व बहुमानवस्त्र वगैरे मठाधिपत्याचे अधिकार त्यास दिले. त्याविषयींचें आज्ञापत्र चै.शु. ६ शके १७७५ चें असून त्यावर करवीर मठाचा शिक्का आहे.

* * * *

श्रीशंकर

शिक्का

श्रीमच्छंकराचार्यान्वयसंजाताभिनव श्रीविद्याशंकर भारतीस्वामीकृत नारायण स्मरणानि

वे॥ राजमान्य राजश्री समस्त गोवर्धन प्रांतानिहाय जिल्हा आमदनगर गोदातीर व प्रांत कोंकण व खानदेश परम सिष्योत्तम यासी विशेषस्तु शके १७८५ रुधिरोदारी नाम संवत्सरे वो॥ राजश्री विनायक महादेव भट उपाध्ये गोवर्धन याणी हुजूर संस्थान मठ करवीर मुक्कामीं येऊन गोवर्धन ज्ञातींतील मठाधिपत्याचें काम पूर्वींपासून आम्हाकडे असोन त्याजबद्दल संस्थानचीं आज्ञापत्रें आहेत तीं अवलोकनांत येऊन वहिवाटीप्रमाणें वर्तणुकीस आज्ञापत्र मिळावें म्हणून विनंती केली. त्यान्ही × × × पूर्वींपासून संस्थानांतून गोवर्धन ज्ञातींत मठाधिपत्याचें काम सदर विनायक महादेव भट याचेकडे त्याचे आज्यापासून असलेचें दिसून आलेवरून हें आज्ञापत्र तुम्हास सादर जाहलें असे. तरी पूर्वींपासून चालत आलेप्रमाणें आग्र तांबूल व द्विगुणदक्षणा व बहुमानवस्त्र वगैरे मठाचा आमेष मशारनिल्हेकडे देत जावा. म्हणजे संस्थानी पावते होईल. मठ करवीरचे आज्ञेशिवाय शृंगेरी व कुडलगी व हंपी मठचे कोणी येतील तर त्यास पूजा द्रव्य न देतां त्याजकडून प्रायश्चित्तादिक कोणी करवूं नये. सदरी लिहिलेल्यास कोणी दिगर वागतील तर त्यास संस्थानचे रीतीप्रमाणें शिक्षा केली जाईल. पूर्वींपासून त्या प्रांतीं मठ करवीर संस्थानचा अधिकार त्याप्रमाणें सर्वत्रांनीं वागावें. संस्थान देवतेच्या स्वारीचे संचार

या प्रांतीं लौकरच आगमन होऊन सर्वत्रास दर्शन घडेल. विशेप लिहिणें तें काय– चैत्र शु. ॥ ६ शेष्टी महानुशासनवरीवर्ति

शिक्का

* * * *

श्रीशंकर

शिक्का

श्रीमच्छंकराचार्यान्वय संजाताभिनव श्रीमत्नरसिंह भारती स्वामी करकंजोद्भव श्रीविद्याशंकर भारती स्वामीकृत नारायण स्मरणानि.

श्रीगुरुभक्तिपरायण राजमान्य राजश्री देशमुख देशपांडे व मोकदम माहालानिहाय यासी विशेषस्तु.

शके १७८६ × × × नाम संवत्सर गोवर्धन जोशी याची वृत्योंप वहिवाटीप्रमाणें तुम्ही देत जाऊन सर्वांकडूनही देववीत जावें येविषयीं हरकत करूं नये. गोवर्धनाचे ज्ञातींतील मठाधिपत्याचें काम वो राजश्री विनायक महादेव भट उपाध्ये याजकडे आहे. सबब त्यास सर्व प्रकार मदत देऊन त्याच्या कामास व्यत्यय न येई असा बदोबस्त ठेवावा. विशेष लिहिणें तें काय –– मार्गशीर्ष वद्य ८ महावार महानुशासनेवरीवर्ति

बारआख ३९ सन
१२७४ फसली

शिक्का

* * * *

शिक्का

॥ श्रीमत्परमहंस परिव्राजकाचार्यवर्य अनेकबिरुदावलिविराजमान श्रीशृंगेरी महासंस्थानस्थित जगद्‌गुरु श्री नृसिंह भारतीस्वामी महाराजांचे पत्राज्ञेवरून आचारव्यवहार काम वहिवाटदार वेदशास्त्रसंपन्न राजमान्य राजेश्री विष्णु गजानन शास्त्री सोनगीरकर एतत्

॥ तालोके मुलतानपुर येथील रहाणार मवजे अनृद येथील क्षत्रिय वैश्य शूद्र विषये आसिर्वाद विशेष तुमचे येथील सकल शुभ कर्मारंभापासून

[illegible]

उ रारत नंबरी यति

जे कर्म येईल त्याचा अधिकार वडलोपार्जित चालत आल्याप्रमाणें व कोणी आपले वर्णाश्रम धर्म सोडून अन्य मार्गांनीं चालेल त्याजला प्रायश्चित देऊन शुद्ध करणें येविषयीचा अधिकार चिंतामण व अमृतभट यांचा आहे. असे असून जर करितां कोणी न मानील तर त्याजला श्री संस्थानांतून शिक्षा होईल. बहुलेखन न. मिति फाल्गुन शु।। १० शके १७८९ प्रभव नाम संवत्सरे मुक्काम सारंखेडे ।

शृंगेरीमठाचा शिक्का

(सही) विष्णु गजानन शास्त्री संस्थान

सदरहुची सनद तपासाकरितां आमचे संस्थानचे अधिकारी यांनीं दिली आहे हे बरोबर आहे. सबब यांत आम्ही जास्त उहापोह करूं शकत नाहीं. सबब मोहोरसही करून वापस दिली आहे. ता. १५।२।१४.

(सही) वामनराव सरसुभेदार शृंगेरी

* * * *

बारनंबर ८५/१८०१ | शिक्का |

श्रीमत्परमहंसपरिव्राजकाचार्यवर्यपदवाक्यप्रमाणपारावारपारीण यम-नियमासनप्राणायामप्रत्याहारध्यानधारणसमाध्यष्टांगयोगानुष्ठाननिष्ठ-तपश्चक्रवर्त्यनाद्यविछिन्नगुरुपरंपराप्राप्तसर्ववेदार्थप्रकाशकसांख्यत्रयप्रति-पालक निगमागमसारहृदयवैदिकमार्गप्रवर्तकसर्वतंत्रस्वतंत्रादिराजधानी-घनगिरी–सिंहासनप्रतिष्ठापनाचार्यश्रीमद्राराजाधिराजगुरुभूमंडलाचार्य-दूर्वासपुरवराधीश्वरतुंगभद्रातीरवासीश्रीगोपालकृष्णचंद्रमौलीश्वरपादप-द्माराधकश्री मुळबागलश्रीकृष्णानंदतीर्थस्वामिनांकरकमलसंजात श्रीम-दभिनवसदानंदतीर्थस्वामिभिः

असमदत्यंतप्रियशिष्य **नारायण विनायक भटजी अग्निहोत्री** आणि **अनंत गदाधर भटजी उपाध्ये** धर्माधिकारी राहाणार मौजे अश्वी तालुके संगमनेर जिल्हा नगर यास आज्ञा करण्यांत येते कीं, तुम्ही आपले शाखेचे ब्राह्मणांचा धर्माधर्म पाहण्याचा अधिकार श्रीसंस्थानांतून मिळावा अशी विनंति केल्यावरून श्रीसंस्थान मर्यादेनुसार आचार, विचार, प्रायश्चित

करणेबद्दल व जो अधर्मानें वर्तन करील त्यास शासन करणेबद्दल हें अधिकारपत्र जिल्हा नगर येथें तुमचे शाखेचे ब्राह्मण असतील त्याकरितां देण्यांत येत आहे. तर अधिकार यथायोग्य चालवून प्रतिवर्षी श्रीसंस्थान सेवेबद्दल प्रत्येक घराकडून येक रुपयाप्रमाणें सेवा घेत जाऊन त्याची चवथाई श्रीसंस्थानांत दाखल करीत जावी अशी आज्ञा आहे. कळावें. कार्तिक वद्य ४ रोज मंगळवार शके १८०१ प्रमाथीनामसंवत्सरे मुक्काम बऱ्हाणपूर. शिक्का

(सही) विष्णु गोपाळ पडळकर

* * * *

नंबर ५५

शिक्का
शंकराचार्य
आदिपीठ
शृंगेरी

१५/१९१४

श्रीमज्जगद्‌गुरु शंकराचार्य महासंस्थान आदिपीठ शृंगेरी—
तर्फे सद्‌गुणैश्वर्यसंपन्न रा. रा. वामनराव बाळकृष्ण देशपांडे सरसुभेदार प्रांत देशाधिकारी संस्थान मजकूर

सकलगुणैश्वर्यसंपन्न रा. वामन काशिनाथ जोशी शाखा याजुष गोवर्धन ब्राह्मण गोत्र पाराशर यांसी ....

मौजे बिलाडी

मौजे वसरेल बांबखेड तालुके शाहादे नंदुरबार जिल्हा पश्चिम खानदेश

यासी आशिर्वाद उपरी विशेष तुमची श्रद्धा, भक्ति, विवेकादि ध्यानांत आणून परम संतोष होत्साता तुम्हांस जोसपण वृत्तीचा भोगवटा व ग्रामस्थ मंडळीचा पुरावा पाहून या संस्थानांतून असें ठरतें कीं, सदरील जोसपणा वृत्तीचे मालक तुम्ही असोन जोसपणा वृत्ती बाब गणपती, वरुण, कलश, नवग्रह व मंडपदक्षणा घेऊन **एकंदर हिंदुवर्ग प्राणिमात्रांचें काम शुभापासून अशुभापर्यंत करावें, सदरी जोसपण वृत्तीचे मालक तुम्ही असोन चंद्रसूर्य असे तोंपर्यंत सदरी उत्पन्नाचा भोगवटा तुम्ही करावा**. यास कोणी शिष्यवर्ग

फाईल
८८
१८०१

श्रीमत्परमहंसपरिव्राजकाचार्यवर्यपदवाक्यप्रमाणपारा
वारपारीणयमनियमासनप्राणायामप्रत्याहारध्यानधार
णसमाध्यष्टांगयोगानुष्ठाननिष्ठतपश्चक्रवर्त्यनाद्यविछि
न्नगुरुपरंपराप्राप्तसर्ववेदार्थप्रकाशकसांख्यत्रयप्रतिपा
लकनिगमागमसारहृदयवैदिकमार्गप्रवर्तकसर्वतंत्रस्वतं
त्रादिराजधानीघनगिरीसिंहासनप्रतिष्ठापनाचार्यश्रीमद्रा
जाधिराजगुरुभुमंडलाचार्यर्ग्वेदिवसिपुरवराधीश्वरतुंगभ
द्रातीरवासीश्रीगोपालकृष्णचंद्रमौळीश्वरपादपद्माराधक
श्रीमुळबागलश्रीकृष्णानंदतीर्थस्वामिनांकरकमलसंजा
तश्रीमदभिनवसद्दानंदतीर्थस्वामिभिः

अस्मदत्यंतप्रियशिष्य नारायणविनायकभटजी अग्निहोत्री आणि अनंत
गदाधरभटजी उपाध्ये धर्माधीकारी राहाणार मौजे आश्वी तालुके संगमनेर
जिल्हानगर यास आज्ञा करण्यात येते की तुम्ही आपले शाखेचे ब्राह्मणाचा
धर्माधर्म पाळाण्याचा अधिकार श्रीसंस्थानातून मिळावा अशी विनंती केल्या
वरून श्रीसंस्थानमर्यादेनुसार आचार, विचार, प्रायःश्चित करणे बद्दल
व जो अधर्माने वर्तन करील त्यास शासन करणे बद्दल हे अधिकारपत्र
जिल्हानगर येथें तुमचे शाखेचे ब्राह्मण असतील त्याकरिता देण्यात येत आ
हे. तर अधिकार यथायोग्य चालवून प्रतिवर्षी श्रीसंस्थानसेवे बद्दल प्रत्ये
क घराकडून येक रुपया प्रमाणे सेवा घेऊन जाऊन त्याचीच वर्षाई श्रीसंस्था
नात दाखल करीत जावी अशी आज्ञा आहे कळावे मिती कार्तिक वद्य ८
रोज मंगळवार शके १८०१ प्रमाथीनाम संवत्सरे मुक्काम ब्राह्मणपुर

व्यत्यय आणील तर श्रीचे दोषास पात्र होईल. तुम्ही अशीच श्रीसेवा निरंतर करून श्रींचा आशीर्वाद घेऊन प्रायश्चित्तभाग श्रीसंस्थानाकडे दरसाल रवाना करावें. इतिशुभं.

मित्ती माघ व॥ ५ रोज रविवार शके १८३५ तारीख १५ माहे २ सन १९१४

(सही मोडींत) वामनराव बाळकृष्ण देशपांडे
सरसुभेदार शृंगेरी

येणेंप्रमाणें पीठस्थ आचार्यांचीं सनदापत्रें पाहिलीं म्हणजे गोवर्धनांच्या ब्राह्मण्याविषयीं कधींही व कांहींही शंका येणार नाहीं. आतां विख्यात पंडित हेमाद्रि यानें शृंगारपूर या नांवाचें गांव गणेश गोवर्धन विश्वामित्र गोत्री याला दिल्यासंबंधाचा जो लेख प्राचीन जीर्ण लेखांवरून काव्यालंकारभूषण विष्णु बाळकृष्ण जोशी कन्नडकर यांनीं संजीवन मासिकामध्यें मोठा संशोधनपूर्वक दिला आहे तो देऊन वाचकांची रजा घेतों.

रा. जोशी यांनीं हा लेख व्यवस्थित, मार्मिक व मुद्देसूद लिहिला असल्यामुळें त्यासंबंधीं निराळें भाष्य करण्याची आवश्यकता नाहीं.

रामदेवराव जाधवांच्या कारकीर्दींत त्यांचे करणाधिप मंत्रि शुक्ल यजुःशाखीय वत्स गोत्री हेमाद्री ऊर्फ हेमाडपंत या राजकार्यविशारद पुरुषाचें नांव विशेष संस्मरणीय आहे.

या हेमाद्रीनें राजाज्ञेनुसार बांधलेल्या देवालयांसच हल्लीं लोक हेमाडपंती कामें म्हणतात.

हेमाद्रीनें 'चतुर्वर्ग चिंतामणी' नामक उत्कृष्ट धर्मशास्त्रविषयक ग्रंथ केला असून 'हेमाद्री' चीं हीं वचनें आज ७०० वर्षांपासून प्रत्यहीं विद्वान् लोकांच्या मुखांत धर्मशास्त्रादि निर्णयसंबंधानें मान्यतापूर्वक येत आहेत, ही लहान गोष्ट नाहीं.

धर्मशास्त्र व आचार आणि 'ब्राह्मण्य–रक्षण' या विषयांवर जसे हेमाद्रीविरचित ग्रंथ आहेत त्याप्रमाणें त्यांनींच अनेक माहितींनीं परिपूर्ण असे इष्टापूर्ति म्हणजे नवीन आड, बाग, घांट, देवालयें, गर्भगृहें, शिवालयें यांच्या स्थापने व रचनेविषयींही ग्रंथ केलेले असून त्यांत शिल्पशास्त्राची अपूर्व माहिती दिलेली आहे.

अशा राजकार्यनिष्णात बहुजन समाजांत व चतुःशाखीय ब्राह्मण वर्गामध्यें त्या वेळीं गोवर्धन ब्राह्मण मंडळींना व त्यांतील विद्वानांना उत्तेजन देऊन आपल्या बरोबरीनें घेऊन त्या वेळचे पुढारी चालत असत. हा पुरावा पहा :—

श्रीमान् देवगिरीश राम नृपसंन्मत्री सुयज्ञेमुदा
हेमाद्री करणाधिपो शिवनदी तीरें शिवार्चारते
विश्वामित्र गणेश वेद विदुषे शृंगारपुरो ददत्
श्रीगोवर्धन ऋग्विधानपठकायेदंसदा नंददम्

* * * *

बाणांक रुद्र शाकेद्बे शृंगार पुरवासिने
गणेश द्विजवर्याय ग्रामदानं समर्पितम्

(प्राचीन जीर्ण लेखांवरून).

वरील दोन श्लोक (हे शके ११९५ मधील आहेत.) ते ज्या कागदपत्रांवरून उधृत केलेले आहेत त्याच ठिकाणीं पण वेगळ्या प्रकारानें आणखी असाही उल्लेख आहे :—

"देवगिरी राजपट्ट शासनानुसरणे न्याय मिळोन शोध व्हावा ऐसाजे टापरग्रामवासी यजुर्वेदी कौसिक गोत्रीय ब्राह्मण यांचा आमचा धर्म, न्याय, कुललेखन मिरास अर्धा भाग पूर्वक्रमें अनादि चालू आधुनिक काळीं त्यांत कौशिक गोत्री व्यत्यय आणू पहाती. ऐशियास दरोबस्त पूर्वापार सारिखे चाले ऐसें करावें. अधर्म न वाढे वृत्ति राहे. हें धर्मकार्य जाणून राजदंडधरासि अनुज्ञा होणें."

(शकाब्द: १२१४ मधुसित)

लिखित :—देविधर गणेश गोवर्धन विश्वामित्र गोत्रोत्पन्न ऋग्वेद पठक ब्राह्मण शृंगारपुरवासीभिः

वर उल्लेखिलेलें दानपत्र व त्यानंतर एक विनंतिरूप पत्र यासंबंधानें आमचीं अनुमानें व शोध पुढीलप्रमाणें आहेत :—

दानपत्राचे वरील दोन त्रोटक श्लोकच तेवढे सांपडतात! त्यांचा भावार्थ असा :—श्रीसंपन्न अशा देवगिरीच्या रामदेवराव भूपतीचा मंत्री श्रीकरणाधिप पंडित हेमाद्रीपंत यांनीं जो एक यज्ञ केला होता त्या

यज्ञोत्सवांत, शिवनदीतीरीं राहून श्रीशंकराची आराधना करणारा असा विश्वामित्रगोत्री वेद जाणणारा व ऋक्विधान म्हणणारा गणेश या गोवर्धन ब्राह्मणास संतोषानें सर्वदा आनंद देणारे 'बाणांक रुद्र शाकेद्वे' म्हणजे ११९५ शकामध्यें शृंगारपुरांतच निवास करणाऱ्याला, त्याला हें शृंगारपूर गांव दान दिलें आहे.

यावरून गणेश गोवर्धन ब्राह्मणाला पंडित हेमाद्रींनीं त्यांची गुण:-संपन्नता जाणून त्यास आपल्या धर्मज्ञ भूपतीकरवीं उदार अंत:करणानें शृंगार-पूर हें गांव इनाम देवविलें होतें.

सदरील यज्ञ कोणता होता व कोठें झाला होता याचा शोध अजून लागत नाहीं. ऋग्विधानज्ञ असा हा गणेश गोवर्धन ब्राह्मण चांगलाच पट्टीचा विद्वान् असला पाहिजे. कदाचित् शिवनदीच्या तीरींच कोठें तरी शिवालयाचे अर्चादि प्रतिष्ठापन कालीं हा यज्ञ होऊन या शिवभक्त ब्राह्मणास हा गांव मिळाला असला पाहिजे. सदरील श्लोकांच्या बाजूनेंही आणखी कांहीं मजकूर आहे पण तो दुर्बोध आहे; व श्लोकपत्रें जीर्ण व भग्न स्थितींत आहेत. त्यामुळें उतरून घेतांना किंवा मुळांतच अक्षरांचीं रूपें बदलल्या-कारणांनीं या श्लोकामध्यें व्याकरणदृष्ट्या प्रयोगांत चुक्या झालेल्या दिसतात.

शृंगारपूर हा गांवही शिवनदीच्या तीरीं कोठें हल्लीं आढळून येत नाहीं. पण वरील श्लोक व दुसरें पत्र हीं दोन्ही विश्वसनीय मानण्यासारखीं आहेत. कारण पत्रांत जी दाद मागितली आहे ती सर्व तक्रार टापरगांव संबंधीं आहे. टापरगांव हें त्या वेळीं असणें शक्य असून शिवनदीच्या तीरीं आतांही आहे तें शके १४९३ च्या सुमारापासून तर सर्व महाराष्ट्र व भरतखंडभर प्रसिद्ध होऊन राहिलें आहे!

जिल्हा औरंगाबाद तालुके कन्नड येथून पश्चिमेस ६।७ कोसांवर शिवनदीच्या तीरीं हल्लीं जेथें जैतापूर व आलापूर म्हणून लहान लहान गांवें आहेत त्यांचेच जवळपास कोठें तरी शृंगारपूर असावें. इतकेंच नाहीं तर, जैतापूरजवळून वाहणाऱ्या शिवनदीच्या उतारापाशील ओघास 'शृंगार ओघ' पूर्वीं म्हणत असल्याची दंतकथा प्रसिद्ध आहे; व त्याच भागांत गांवाची वसती असल्याचीं प्राचीन चिन्हें व खुणा अजूनही दिसून येतात.

त्या वेळीं वरील भागांत शृंगारपूर असेल पण तें कालगतीनें नामशेष झालें असावें. ती प्रसिद्ध देवगिरी, तिचें ऐश्वर्य, तेथले राजे, ते दान करणारे उदार पुरुष, यांचाच जर आज कांहीं प्रत्यक्ष असा मागमूस राहिला नाहीं; तर त्यांत आमचें ऐतिहासिक व धार्मिक स्मारकाचें गांव न राहिल्यास आश्चर्य तें काय ?

पण शृंगारपूर होतें हें खास. शृंगारपुरांतच वडि पार्जित अग्रहारामध्यें राहून तेथून टापरगांवच्या वृत्तीचें काम पाहात असणाऱ्या देविधर ब्राह्मणाचें एक पत्र देवगिरीकडे पाठविलेले मजकुराचें आहे. हा देविधर गोवर्धन ब्राह्मण असून पूर्वोक्त गणेश यांचा मुलगाच होय. अर्थात् वडिलांच्या नंतर म्हणजे गणेश यांच्या काळानंतर शकाब्द १२१४ चे सुमारास देविधरानें देवगिरीच्या यादवांपाशीं टापरगांवचे मिरासीचे कलहांत विनंति केलेली दिसते.

हा कलहाचा संबंध ज्या कौशिक गोत्रीय टापरगांवमधील ब्राह्मणाविषयीं दाखविला आहे त्याविषयीं प्रमाण आढळतें तें, मुहूर्तमार्तंडकार पं. नारायण दैवज्ञ यांनीं आपल्या स्वकृत ग्रंथांत ग्रंथालंकारांतील टीकेमध्यें लिहिलें आहे.

आसीत् सासमणूर नामनगरे श्रीकौसिकस्या
न्वयेऽनंतो वाजसनेयि पूज्य चरणोमाध्यंदिनीयाग्रणीः

शुक्ल यजुर्वेदी माध्यंदिनीय कौशिक गोत्री ब्राह्मण हे टापरगांवीं वृत्तिमान असून पूर्वी यांचे कोणी पूर्वज 'सासमणूर' नामक नगरांत राहात असत. सासमणूर शहर सांप्रत कोठें आहे हें निश्चित होत नाहीं.

शके १२१४ च्या सुमारास कुललेखन वृत्तिसंबंधांत शृंगारपूरकर देविधर गणेश गोवर्धन ब्राह्मण व टापरगांवकर कौसिक गोत्रीय यजुर्वेदीय ब्राह्मण यांच्यांत लढा पडलेला होता. अर्थात् टापरगांवचें कुललेखन कुळकरण मूळचे कौशिक गोत्रीय ब्राह्मण यांचेकडे होतें व ते प्रसिद्ध मुहूर्तमार्तंडकार यांचे पूर्वज होते. यावरून सासमणूर नगर सोडून त्यांना बराच काल लोटला असावा असें दिसतें.

पुढें ही कुललेखनवृत्ति शृंगारपुरकर देविधर यांचेकडे कधींपासून गेली हेंही नीट कळून येत नाहीं. कसें का होईना, पण शुक्ल यजुर्वेदीय कौशिक गोत्रीय ब्राह्मण व गोवर्धन ब्राह्मण या दोघांची मिळून पूर्वीची टापरगांव येथील कुललेखनाची वृत्ति होती हें ठरत आहे.

ज्योतिषवृत्ति मात्र टापरगांव येथील कौसिक गोत्री यांची कटचांची होती अशीं आणखी प्रमाणें आहेत.

शृंगारपूर येथील कुललेखन, ज्योतिष, राजकार्य, ग्रामव्यवस्था, राजदंड, राजद्रव्य म्हणजे जमीनसारा हीं सर्व गोवर्धन ब्राह्मणांकडे होतीं.

पैठणकर एकनाथ महाराज हे श्रीकाशींत आपली श्रीभागवतावरील टीका लिहीत असतांना त्याच कालांत इकडे शिवालय तीर्थाच्या उत्तरेस टापरगांवीं शिवनदीतीरीं श्रीमन्महामहोपाध्याय दैवज्ञ नारायण गुरु हे आपला अद्वितीय मुहूर्तमार्तंड ग्रंथ रचित होते. यास प्रमाण —

तैं शके चौदाशेंश्याण्णव, प्रजापति संवत्सराचें नांव,
चैत्रमास महापर्व, अभिनव रामनवमी ८५.
ते दिवशीं सार्थक आर्ति, रुक्मिणी स्वयंवर समाप्ती,
एका जनार्दनी कृपा स्थिती, ग्रंथ वाराणशीप्रति संपविला. ८६

—श्रीएकनाथ, रुक्मिणी स्वयंवर अ. १८

ख्यात देवगिरेः शिवालयमुदक्तं तस्मादुदक् टापर-
ग्रामस्तद्दसतिर्मुहूर्तभुवनं मार्तंडमत्राकरोत् ॥ १ ॥

——मु. मा. अलंकारप्रकरण.

व्यंकेंद्र प्रमिते वर्षे शालिवाहनजन्मतः
कृतस्तदपि मार्तंडोऽयमलं जयतुद्धतः

शालिवाहन शके १४९३ या वर्षी श्रीनाथांनीं श्रीमद्भागवतांतर्गत रुक्मिणीस्वयंवर हा ग्रंथ लिहिला व त्याच वर्षी आमचे महापंडित नारायण देव यांनीं प्रसिद्ध अशा देवगिरीच्या उत्तरेकडे शिवालय (वेरूळ) व त्याच्याही उत्तरेकडे तापरग्राम (गांव) तेथें राहणारे त्यांनीं मुहूर्तांचें केवळ आगरच असा हा मार्तंड नामक ग्रंथ "व्यंकेंद्र प्रमिते १४९३ वर्षें" ग्रंथ केला आहे. असा उल्लेख स्वतः ग्रंथपरिसमाप्तीचे वेळेस केला आहे.

टापरगांव हा वेरुळच्या उत्तरेस ४।५ कोसांवर व पूर्वोक्त शृंगारपुरापासून १।२ कोसांचे आंतच आहे. शिवनदी ही सांप्रत 'कलंकी' या नांवानें प्रसिद्ध असलेल्या लहान खेटकाजळ महादेवाचे डोंगरांतून गोमुखांमधून उत्पन्न होऊन (येथून इतिहासप्रसिद्ध भास्कराचार्यांचें पाटणा हें व देवीचें जागृत-

स्थान जवळच आहे.) थेट कन्नड (कनकालेश्वर) ब्राह्मी संगमापर्यंत पूर्व-वाहिनी असून तेथून पुढें दक्षिणवाहिनी होऊन हिच्या तीरीं बहिरगांव (संत हिरापुरी १६०८ श.) टापरगांव (नारायणदेव श. १४९३) बोरसर (क्षेम-पुरीं १६५० श.) लक्ष तीर्थी (वेलगंगा-संगम) लासूर (श्रीदेवीदाक्षायणीं) व सावखेड (सामराज नृसिंह क्षेत्र) गोदासंगमापर्यंत हीं वरील व इतर बरींच तीर्थक्षेत्रें पुराणप्रसिद्ध आहेत. याच शिवनदीच्या तीरांवर आपल्या गोवर्धन गणेश देवाचें शृंगारपूर होतें."

रा. वि. बा. जोशी कन्नडकर यांचे वरील लेखावरून हेमाद्रिसारख्या महापंडिताला गोवर्धनांची माहिती होती. त्या वेळीं निंदाव्यंजक दुसरा शब्दही नव्हता आणि गोवर्धनांतील मोठ्या विद्वान् गणेश गोवर्धनाला शृंगार-पूर हें गांव दान दिलें होतें येवढ्या गोष्टी स्पष्ट होतात.

पीठस्थ विविध आचार्यांच्या सनदा, आज्ञापत्रें व आशीर्वाद यांवरून आणि हेमाद्रि पंडितानें दिलेल्या ग्रामदानावरून गोवर्धनांचें ब्राह्मण्य अत्यंत उज्ज्वलपणें प्रकाशित होत आहे. अत्यंत जुन्या हेकट मताच्या माणसांच्या मनांतील किल्मिष घालवून त्यांचीं मनें गोवर्धन ब्राह्मणांविषयीं अत्यंत निर्मल करण्यास प्रस्तुत प्रकरणांतील सर्व आधार समर्थ आहेत असें सांगून हें प्रकरण पुरें करितों.

प्रकरण १२ वें

जुने कागदपत्र काय बोलतात ?

गोवर्धन ब्राह्मण हे खास गोळक नाहींत, हा शब्द अलीकडे त्यांना मत्सरमूलक लावण्यांत आला. अलीकडील कागदपत्रांत आणि छापील चोपड्या-मध्यें गोळक हा शब्द वापरण्यांत येऊं लागलेला आहे, असें जुने कागदपत्र पाहिले असतां दिसून येतें. आम्ही स्वतः या गोवर्धन ब्राह्मणांसंबंधीं सातारा जिल्ह्यांतील आणि खानदेशांतील पुष्कळ जुने अस्सल कागदपत्र पाहिले. सातारा जिल्ह्यांतील कागद श्री. आबासाहेब आलाटे यांचेकडे आणि कै. वा. श्रीमंत लक्ष्मणराव घोडके यांचेजवळचे पाहावयास मिळाले, आणि खान-देशांतील कागदपत्र श्री. भा. र. कुलकर्णी आणि श्री. बा. ना. कुलकर्णी यांचे-कडून पुरविले गेले. हे कागदपत्र काय सांगतात हें पाहण्याजोगें आहे.

सातारा जिल्ह्यांतील कागद

सातारा जिल्ह्यांतील जुनी सनद म्हणजे शके १६४६ मधील आहे. ही सनद श्रीमंत छत्रपती शाहू व परशराम त्रिंबक प्रतिनिधी यांच्या सही-शिक्क्याची आहे. पंचवीस बिघे जमीन इनाम दिल्याचा उल्लेख आहे. त्रिंबक जोशी गोवर्धन ब्राह्मण यांचे वंशजाकडे जोसपणाची वृत्ति अद्याप कायम आहे.

दुसरा कागद शके १६६७ मधील असून तो फार महत्त्वाचा आहे. जुन्या काळीं किल्ल्याच्या बुरुजांत असे बळी देण्याची पद्धत होती. कुडची येथें जो कृष्णा नदीवर रेल्वेचा पूल बांधला त्याच्या पायांतही कांहीं गरोदर स्त्रिया छिणल्या अशा वदंता आहेत. कोकटनूर येथील किल्ल्याच्या बुरुजांत उत्तम ब्राह्मणाची बाळंत बायको बळी दिली गेली व मुलीचे वडील दुर्वास यांचेकडे कलमेश्वर देवस्थानचें उत्पन्न त्यानिमित्त दिलेलें तेव्हांपासून चालू आहे. या दुर्वासांचा सातारा जिल्ह्यांतील गोवर्धनांशीं आप्तसंबंध आहे.

वहे बोरगांव येथील श्रीरामाचें व श्रीमारुतीचें देवस्थान फारच महत्त्वाचें समजतात. त्या रामलिंगाचें पुजारीपण गोवर्धन ब्राह्मणाकडे होतें.

त्यासंबंधांत झालेल्या खटल्याच्या प्रत्येक कागदांत (शके १६८८ पासून १७७९ पर्यंत) गोवर्धन असाच उल्लेख आहे.

छत्रपती शाहू महाराजांची जमीन पट्ट्यानें केल्यासंबंधाचा शके १७५५ मधला कागद, माहुलीच्या क्षेत्रोपाध्यायांच्या जमिनी खंड मक्त्यानें केल्या-संबंधाचे कागद गोवर्धनांचें सत्ब्राह्मण्यच दर्शवितात.

माहुलीचे सुप्रसिद्ध आफळे वैदिक यांची शके १७९१ मधील पावती, इतर देणेघेणेचे व्यवहार, पंढरपूरच्या बडव्यांतर्फे मिळालेली पावती, मलकापूर येथील अनेक ब्राह्मणांच्या सह्या असलेला कागद आणि इतरही सर्व कागद गोवर्धनांचें सद्ब्राह्मण्य परोपरीनें सांगत आहेत. विशेषत: मलकापूर येथील जो शके १८०८ चा कागद आहे, त्यांत इतर समस्त ब्रह्मवृंदाबरोबर गोवर्धन ब्राह्मणांच्या श्रावण्या एकत्र होत असत असें स्पष्ट आहे. सहधर्मानुष्ठानाचा अधिकार अब्राह्मणांना नसतो, तो फक्त ब्राह्मणांनाच असतो हें सांगावयास नकोच. गोवर्धन जर गोळक असते म्हणजे द्विजाधम असते तर त्यांना सहाध्ययन, सहधर्मानुष्ठान इतर ब्राह्मणांच्या बरोबरीनें करण्यास केव्हांही अडचणच पडली असती. असो. हे सर्व पुढील कागद वाचकांनीं चिकित्सक बुद्धीनें वाचावे म्हणून ते येथें क्रमानें शकवार देतों. शके १६०० पासून शके १८०० पर्यंतचे जे उपलब्ध झाले व जे महत्त्वाचे वाटले, तेच पुढें दिले आहेत.

उंब्रज ता. कऱ्हाड येथील वृत्यंशी जोशी धर्माधिकारी दत्तात्रय पांडुरंग वगैरे आहेत. त्यांच्या पूर्वजाला श्रीशाहु छत्रपती यांनीं राज्याभिषेक शक५७ (शके१६४७) सालीं जोसपणाची सनद दिली. त्या सनदेवर छत्रपती शाहू व परशराम त्रिंबक प्रतिनिधी यांचे शिक्के आहेत. त्या सनदेंत त्रिंबक जोशी बिन जान जोशी गोवर्धन ब्राह्मण असें म्हटलें आहे. जोसपणाबद्दल कोर्टी, वडोली व उंब्रज या तीन गांवच्या हद्दींत पंचवीस बिघे इनाम दिलेली जमीन अद्याप त्यांचे वंशाकडे चालू आहे.

मु. कोकटनूर ता. अथणी येथें आनंद नारायण दुर्वास या नांवाचे वतनदार व कुलकर्णी आहेत. त्यांच्या घरच्या महत्त्वाच्या कागदपत्रांत फसली सन ११५५ (शके १६६७) ची एक बखर आहे. तींत मूळपुरुष नारायण या नांवाचा वतनदार कुलकर्णी बेदरच्या बादशाहीपूर्वीपासून होता. बाद-

शहानें कोकटनूर येथें चिरेबंदी किल्ला बांधण्याचें काम चालू केलें. कलमेश्वर देवालयापाशीं किल्ला राहीनासा झाला. '**जातीनें उत्तम ब्राह्मणाची बाळंत बायको मुलासकट त्या ठिकाणीं द्यावें असें भाकणुक दृष्टांत जाहलें**' तेव्हां बादशहाच्या हुकमानें नारायणास बोलावून वतन राखणें असल्यास लेकीस द्यावें असें सांगितलें. तेव्हां नारायणाची मुलगी कोन्नमा ही स्वतः बळी गेली. तेव्हांपासून या बुरुजास कोन्नमा हें नांव असून तेथें अद्याप जत्रा भरते व दिंडीही चालू आहे. कलमेश्वर देवालयास बादशहानें तेव्हां दिलेलें ६०० रु. चें उत्पन्न अद्याप वंशाकडे चालू आहे. आनंद नारायण दुर्वासांची मूळ पुरुषापासून ही तेरावी पिढी आहे. या बखरीवरून गोवर्धन हे उत्तम ब्राह्मण आहेत असें सिद्ध होतें. या दुर्वासांचा सातारा जिल्ह्यांतील गोवर्धनांशीं आप्तसंबंध आहे.

मौजे बहे ता. वाळवें येथें रामदास स्वामींच्या प्रसिद्ध मारुतींपैकीं एक मारुति व जवळच रामलिंग ऊर्फ श्रीरामाचें देऊळ कृष्णानदींत बेटावर आहे. त्या रामलिंगाचें पुजारीपण गोवर्धन ब्राह्मणाकडे आहे. त्या रामलिंगाचे उत्सवाकरितां दिलेल्या जमीनीबद्दल वाळव्याचे तत्कालीन अधिकारी श्रीमंत थोरात यांचे सहीशिक्क्याचें आज्ञापत्र आहे. त्यांत पुजाऱ्यास अनुलक्षून 'गोवर्धन रामदासी' असा उल्लेख केला असल्याचें आढळून येतें; तो असा :—

'आज्ञापत्र राजश्री सिवाजी थोरात तां मोकदमानी मौजे बहे ता। वाळवे सु॥ खमस मया व आलफ रो बाबुबीन आपाजी गोसावी गोवर्धन रामदासी यास' त्याचप्रमाणें गोटखिंडीचे मोकासदार सुभानराव थोरात यांनीं शके १६८८ मध्यें उपरोक्त गोवर्धन पुजारी–बडवे यास ४ बिघे जमीन इनाम दिली. त्या सनदेंत त्यांचा उल्लेख 'रो बाबुबीन आपाजी गोसावी गोवर्धन रामदासी वास्तव्य श्रीक्षेत्र नरसिंहपूर' असा केला आहे.

सदर बडवे घराण्यांतील एका बाईनें आपल्या दिराचें सुतक धरलें नाहीं व रामलिंगाची पूजाअर्चा करून भ्रष्टाकार केला. त्यासंबंधानें गोवर्धन जातीकडे तिच्या पुतण्यानें तक्रार केली. त्या बाबतींत संगम माहुलीच्या समस्त ब्रह्मवृंदांकडे फिर्याद केली. त्या प्रकरणांतील सर्व कागदपत्रांत गोवर्धन ब्राह्मण असेच उल्लेख आहेत. (१) 'जबानी बाळकृष्ण लक्ष्मण बडवे गोवर्धन मौजे बहे पेटा वाळवे शके १७७९.' पुढें १७८० तील एक कागद आहे त्यांतही तोच उल्लेख आहे.

मौजे त्रिपुटी ता. कोरेगांव येथील कुणबाव्याची जमीन रामचंद्र विठ्ठल गोवर्धन यानें श्रीछत्रपति शाहू महाराज यांचेकडून पट्ट्यानें केली. त्याबद्दल १७ रु. ६२॥ रेस हप्तेबंदीप्रमाणें गांव कामगारांस देत जाण्याचा सरकारी शिक्क्याचा ता. ५ जून सन १८३४ (शके १७५५) चा हुकूम आहे.

माहुलीचे क्षेत्रोपाध्ये व इनामदार रामचंद्र केशव प्रभुणे यांची मौजे त्रिपुटी येथील जमीन नारायण आबा गोवर्धन यांचेकडे वहिवाटीस होती तिच्या खंड मक्त्याच्या पावत्या शके १७७४ पासून १७८५ पर्यंतच्या उपलब्ध आहेत. पावत्यांवर रामचंद्र केशव व त्याचा मुलगा गोविंद रामचंद्र या पितापुत्रांच्या सह्या आहेत. नारायण गोवर्धन हा स्वत: शेत कसत नव्हता. त्यानें त्या शेतांत कृष्णा न्हावी व राघो सुतार हे दोन रयत घातले होते.

मु. बहे (बाह्या बोरगांव) ता. वाळवें येथें रामलिंगाचें प्रसिद्ध देवस्थान आहे. त्याचा पुजारी सदाशिव बडवे गोवर्धन हा होता. सदाशिवाच्या पश्चात् त्याची विधवा वेणूबाई हिनें पुत्रसंतान नसल्यामुळें मुलीच्या मुलाला वारस पुत्र करून दिलें. रामलिंगाची पूजाअर्चा अव्याहत चालावी म्हणून मार्तंड आबाजी गोवर्धन यास शके १७७९ फाल्गुन वद्य ९ रोजीं वारसा-पत्र करून दिलें. त्यावर गांवांतील २५।३० प्रमुख ब्राह्मणांच्या सह्या आहेत. श्रीरामलिंगाच्या इनाम जमिनीबाबत जे पुष्कळ कागदपत्र आहेत, त्यांत गोवर्धन ब्राह्मण हाच शब्द सर्वत्र वापरलेला आहे.

माहुलीचे वैदिक व सावकार रघुनाथभट बिन कुशंभट आफळे यांचें ऋण नारायण आबाजी गोवर्धन त्रिपुटीकर यानें काढलें होतें. तें दिल्याची पावती आफळे याच्या सहीची चैत्र शुद्ध १ शके १७९१ सालची आहे. या पावतीवर ऋणकोचे कुलोपाध्याय विठुभट बिन तात्याभट माहुलीकर यांची साक्ष आहे, आणि विनायक विठ्ठल त्रिपुटीकर यांचीही साक्ष आहे. या पावतीवर गोवर्धन ब्राह्मण असें स्पष्ट म्हटलेलें आहे.

चिखली व नाटोली पेटा शिराळें येथील प्रसिद्ध सावकार कृष्णाजी बिन नाथाजी नाईक यांचें कर्ज कृष्णाजी रामचंद्र कुलकर्णी रा. नाटोली यानें काढलें होतें. त्यानें शके १८०१ मध्यें लिहून दिलेल्या कर्जरोख्यांत आपल्या नांवापुढें आडनांव पातळसिद्ध जात गोवर्धन ब्राह्मण वय वर्षें ६० असें लाविलें आहे.

पंढरपूर येथील बडवे यांची इनाम जमीन कालें येथें आहे. ती गोविंद बाबाजी गोवर्धन यांचेकडे लागणीस होती. तिच्या वसुलाची पावती चैत्र व॥ ८ शके १८०४ ची आहे. पावतीवर बडव्यांतर्फे मुखत्यार नागो लक्ष्मण कुलकर्णी कालेकर याचा दस्तुर आहे व पावती ज्याचे नांवें दिली त्याचेपुढें गोवर्धन ब्राह्मण असें लिहिलें आहे.

मलकापूर संस्थान करवीर येथील धोंडभट बिन आप्पाभट जोशी यानें एका प्रकरणीं समस्त ब्रह्मवृंद व गोवर्धन ब्राह्मण यांच्या श्रावण्या एकत्र होत असल्याचा एक कागद श्रावण शुद्ध॥ ६ शके १८०८ चा करवीर मठांत हजर केला आहे. त्यावर मान्यतादर्शक म्हणून मलकापुरच्या समस्त ब्रह्मवृंदांच्या सह्या आहेत.

मौजे नाटोली येथील वतनी जमिनीचा भाडेपट्टा भाऊ बहिरो नाकील यानें शके १८१७ सालीं लक्ष्मण बहिरो कुलकर्णी गोवर्धन याचे नांवाचा दिला आहे.

ता. कऱ्हाड मु. कालें येथील सरकारी वसुलीची खातें चोपडी शके १८३६ पासून सुरू झालेली उपलब्ध आहे. तींत महादू विठू गोवर्धन असा निर्देश आहे.

कालें (कऱ्हाड) भागांतील व गांवांतील बरेच कागदपत्र आम्ही पाहिले. विशेषत: पूर्वापार प्रसिद्ध अशा घोडके, आवारे यांच्या दोन पिढचांचे कागदपत्र पाहिले. या दोन घराण्यांचा शेतीभाती, देणें घेणें हा व्यवहार ब्राह्मण व ब्राह्मणेतर या सर्वांशीं आहे. या व्यवहारांत जे दस्तऐवज, कर्ज-रोखे, हुकूमनामे, भाडेचिठ्या, खंडपट्टे, गहाणखतें, पावत्या इत्यादि कागद झाले, त्यांत चुकूनसुद्धां गोळक शब्द नाहीं. गोवर्धन हाच शब्द सर्वत्र आहे. वरील अनेक कागदपत्रांत लिहिणारे, साक्षीदार, ऋणको या नात्यानें कालें येथील जोशी व कुलकर्णी घराण्यांतील २५।३० ब्राह्मणांचा जसा संबंध आलेला आहे, तसाच कऱ्हाडचे मोकाशी, भागवत, लाटकर, पंढरपूरकर इनामदार, बडवे यांचाही संबंध आलेला आहे. सरकारी कागदोपत्रीं उदाहरणार्थ, शाळा-खातें, सबरजिस्टर कचेरी, दिवाणी व फौजदारी खात्याच्या कागदपत्रांमध्यें गोवर्धन असेंच लिहिलेलें आहे.

मौजें साळशिरंबें, येवती, टाळगांव, तालुके कराड मोजे कुठरे-धामनी ता. पाटण, कसबे परळी-अंबेदरे ता. सातारा, मौजे कांदेपेटा शिराळा, नसरापूर, संस्थान भोर इत्यादि ठिकाणच्या गोवर्धन घराण्यांतील कागदपत्र पाहिले. त्यांत गोवर्धनांव्यतिरिक्त इतर मान्य ब्राह्मणांचा संबंध आला असून त्यांत गोवर्धन शब्दाचाच उल्लेख आहे. विस्तारभयास्तव ती सर्व यादी येथें नमूद करीत नाहीं.

खानदेशांतील कागद

भाऊ रघुनाथ कुलकर्णी मास्तर व बापुराव नारायण कुलकर्णी क्लार्क वडवाणी स्टेट यांचेकडून खानदेशांतील शुक्ल यजुर्वेदी गोवर्धन ब्राह्मणांच्या माहितीचे जे कागदपत्र आम्ही पाहिले त्यांचा सारांश :—

(१) ब्रिटिश अमदानींतील सहीशिक्क्याचे जात गोवर्धन ब्राह्मण असा उल्लेख असलेले इ. स. १८६० चे सुमारापासूनचे कागद आहेत. यांत खरेदी खतें, गहाण खतें, हुकूमनामे, कोर्टाचें किंवा साक्षीचें प्रतिवादीला लागलेलें समन्स, वतनाचे निवाडे, जबान्यांच्या सहीसूद नकला वगैरे शेंकडों सांपडतात. पूर्व व पश्चिम खानदेशांतील जुन्या कागदांमध्यें गोवर्धन ब्राह्मण असेंच लिहिलेलें आहे.

(२) संवत १९१० चें एक शृंगेरी मठाधीशांचें आज्ञापत्र समस्त गोवर्धन ब्राह्मणांची वृत्ति पूर्वापार चालत आली तशीच चालू ठेवण्याबद्दलचें धुळें मुक्कामीं दिलेलें आढळतें.

(३) श्रीमंत तुकोजीराव होळकर यांच्या शिक्क्याचें इनाम जमिनीचा ताबा देण्याबद्दलचें ताकीदपत्र आहे. त्यांतही गोवर्धन ब्राह्मण असें लिहिलें आहे.

(४) मेथी येथील शिलालेख शके ११६७ सालचा यांत कृष्णदेवराव यादव यानें कुरुकौले नांवाचें गांव निरनिराळ्या गोत्रांतल्या १५।२० ब्राह्मणांना दान दिल्याचा उल्लेख आहे. ज्या ब्राह्मणांचा शिलालेखांत वृत्तिवान् म्हणून निर्देश आहे त्यांचीं शिलालेखांतील गोत्रें आणि आज मेथीच्या आसपास असणाऱ्या भिक्षुकी करणाऱ्या गोवर्धन ब्राह्मणांचीं गोत्रें बरोबर जुळतात. लग्नाच्या आधीं उपनयन करणाऱ्या रजपूत वतनदार पाटील व राऊळ घराण्यांची भिक्षुकी गोवर्धन ब्राह्मणांकडे आहे. याच कृष्णदेवरावाचे कोंकणांतही

असेच शिलालेख सांपडतात. त्यांत गोवर्धन ब्राह्मणांचा गोत्रासह निर्देश आहे.

(५) मंदिरें व देवळें यांच्या व्यवस्थेबद्दल गोवर्धन ब्राह्मणांना कांहीं नक्त नेमणुका आहेत. त्या संबंधाच्या सनदा नादरखेडें, पुसनद, बिलाडी, पाऊळदे, बळसाणें वगैरे गांवच्या आढळतात. बळसाण्याला असलेल्या पुरातन देवस्थानाची व्यवस्था गोवर्धन ब्राह्मण घराण्याकडे आहे. तें देऊळ जुनें असल्याकारणानें पुराणवस्तु खात्याच्या देखरेखीखालीं आहे. त्या देवळांत शके १११६ सालीं मोठा यज्ञ झाल्याचा उल्लेख आहे.

(६) गोवर्धन व इतर शाखीय ब्राह्मणांत झालेल्या वृत्तींबद्दल तंटयाचे निकाल जे कोर्टाकडून मिळाले आहेत त्यांत गोवर्धन ब्राह्मण असेच उल्लेख आहेत. बोरगांव येथें सन १९१४ सालीं गोवर्धन ब्राह्मणांच्या वतीनें निकाल मिळालेला आहे. पुढें दिलेल्या सर्व कागदपत्रांत गोवर्धन असाच सर्वत्र निर्देश आहे.

(७) पुढील कागदांत शके १७२३ सालचें लोंढाजी लक्ष्मण गोवर्धन ब्राह्मण याचे नांवचें खरेदीपत्र फार महत्त्वाचें आहे. शके १७५५ मधील पोटहिश्यांच्या माहितीचा कागद लोंढाजी लक्ष्मण हा गोवर्धन ब्राह्मण होता असें स्पष्ट बोलतो. शके १७६२ मधील संभावना दिल्याबद्दलची पावती आणि इतर सर्व कागदपत्र आपापल्या परीनें महत्त्वाचेच आहेत. त्या प्रत्येक कागदांत गोवर्धन ब्राह्मण असेंच म्हटलें आहे. खानदेशांतील कागदांत सर्वांत महत्त्वाचा व प्राचीन म्हणजे शके ११६७ मधील मेथी येथील शिलालेख होय. त्या लेखांतील गोत्रें व आज त्या भागांत असलेल्या गोवर्धन ब्राह्मणांचीं गोत्रें जुळतात हें विशेष महत्त्वाचें आहे. १७२३ मधील खरेदीपत्र मूळ फारसी आहे, त्याचा देवनागरी तरजुमा असा आहे.

व इकरार मशारिलहुम
मुहर करदाह

अल जलाल मुबीन अुल
माबूद अल मुअसीम वदन
अर्रसूल उल मुबीन अल
महमूदखाम अल् भुमते शव
अले शरा काजी महमद
अकबरोद्दीन मसूद

शिक्का

इकरार मोतबर करददं व एतेराफ सही शरई नमूदंद मुखबिरान बा समावा बा खुदहा मुसंमी भीका पटेल वल्द मोहन पटेल इब्न आधार पटेल व झकरू पटेल वल्द नीला पटेल इब्न आधार जरबू हिस्सादारान् इकठ्ठी व मुसंमी लक्षुमन पटेल परशराम पटेल वल्द नानाजी पटेल हिस्सादार दीगर-पट्टी कौम राजपूत व मुसंमात बायजी पटलन जवजे संबलसिंग वल्द पूंजू पटेल हिस्सादार पट्टी सीयूम मिल जुमला सहशर मौजे जातोडा प्रगणा थाळनेर सरकार असिर सूबा खानदेश वरीं वजेके स्वारी कालेराव सुबेदार–मस्तूर आमदा बरायदाना व का अस्पहाना–व जायदादन नबूद अज–जमाबंदी फरदा तमाम मुबलिग मजकूर मोतीराम फौजदार संताजी होलकर गिरपत्ता व दीगर भाला व तीरदार गिरफ्ता दादामजकूर जायदादन्द बाकीन मान्दा व वस्ती...तकाजा भाला कालेराव मशारनिल्हे बदर्जये तमशुदा साहुकारान दर आं वक्ते कर्जहम नमीदाद हमांवजू मामूस गसोम लिहाजा हमां बिरादरान मुक्तफिकक ईं मा शुदा के अज सहिशा चहारम हिस्सादार शरीक मुकर्रर करदां ईं मुबलिगरा इन्फिसाल कुनेम लिहाजा मुबलिग बरऐवज मुबलिग हस्तशद यकशिक्का दांमी के निस्प आं चहारसद सिक्का अे मुजकूर वो दोपाई मुंते बदस्ते **लोंढाजी वल्द लक्ष्मण इब्न धोंडाजी गोरधनकोम करोखतेम** व मुबलिग नमुदेम व कब्ज करदेम मुबलिग मजकूर रा अज... व तसतीम जयूदम कालीपांढरी व चौत मुकर्रर व चहारम हिस्सा बमुजब तपसील जैल

तारीख नवोज दहम जमा दिवसानी दर १२११ फसली सन १२१७ हिजरी मुर्काद्दिसा शके १७२३.

मराठी तर्जुमा

भरंवसा ठेवून करार करून देतों व धर्माप्रमाणें खरें लिहून देतों कीं, आम्ही खबर देणारे व कबूल करणारे स्वत: भिका वल्लद मोहन पाटील वल्लद आधार पाटील व झकडू पाटील वल्लद निला पाटील वाा. आधार पाटील एकंदर हिस्सेदार लक्ष्मण पाटील परशराम पाटील वल्लद नानाजी पाटील दुसरे हिस्सेदार पट्टी जात रजपूत व हिस्सेदार बायजी पाटलीन मर्द संवलसिंग वाा पुंजू पाटील हिस्सेदार पट्टी तिसरी मौजे जातोडें परगणे थाळनेर सरकार असिर सुभेखानदेश कालेराव सुभेदार यांचे स्वारीकडून लिहून आल्यावरून घोडयास दाणाचारा जागा दिली. तमाम नगदी मजकूर मोतीराम फौजदार संताजी होळकर यांनीं पकडले व दुसरे भाला व तिरदार पकडले होते लिहिलेली जागा दिली. बाकी राहूं दिली नाहीं. त्या वेळीं सावकारांनीं कर्जही दिलें नाहीं या कारणामुळें नाउमेद झालों याकरितां आम्हीं सर्व भाऊबंद एकत्र हिस्सेदार एकत्र ठरविले. ऐवजाबद्दल ८०० रुपये देऊं निम्मे ४०० रुपये स्वत: लोंढाजी वल्लद लक्ष्मण इब्न धोंडाजी जात गोवर्धन यांस विकलें व नगदी एकत्र केली व कबजांत घेतली. सदहू गृहस्थाला चौथा हिस्सा काळी पांढरी व चौत कायम करून दिला त्याचा तपशील प्रमाणें.

तारीख १९ जमा दिवसानी सन १२११ फसली सन १२१७ हिजरी शक १७२३.

वरील लोंढाजीचा रामचंद्र व त्याचा पितांबर आज जातोडे येथें वतनदार पाटील आहे.

वरील कागदांत उल्लेखिलेल्या लोंढाजी लक्ष्मणचे नांवचा राजिनामा सुरु सन ११२३ (?) शके १६३५ संवत् १८५८ दुर्मतिनाम संवत्सरे सालीं भिकाजी पाटील वगैरेनीं दिलेला पाटिलकीचा राजिनामा आहे.

लोंढाजी लक्ष्मण पाटील मौजे जातोडे याच्या नांवचा कुलपट्टा सुरु सन १२३४ (शके १७४६) कंपनीच्या शिक्क्याचा आहे. त्यांतही गोवर्धन ब्राह्मण म्हणूनच उल्लेख आहे.

नरडाणें ता। शिंदखेड येथील ग्रामस्थ पाटील मंडळी व कथु बापूजी यांच्या दलाली वगैरे करण्याबद्दल झालेल्या करारपत्रांत काशिराम शिताराम जात गोवर्धन ब्राह्मण असेंच म्हटलें आहे. (१९–८–१८८१) शके १८०३.

(४) सुरू सन १२४३ (शके १७५५) चे मोकदम व कुलकर्णी यांचे वारस निवाडयाची यादी. मौजें जातोडे परगणे थाळनेर ता. चोपडे येथील अस्सल आहे. त्यांत रमाजी रामचंद्र गुमास्ते कुलकर्णी यानें पाठविलेल्या यादींत निरनिराळ्या तक्षिमामध्यें पाटील वतनांतील पोट हिश्यांची माहिती दिली आहे. तीन पाटील रजपूत व एक लोंढाजी लक्ष्मण जात गोवर्धन ब्राह्मण असा उल्लेख आहे. एक भाग लोंढाजी लक्ष्मणनें विकत घेतला आहे. वतन खरेदीची फारशी सनद प्रत्यक्ष पाहिली.

॥ श्री ॥

श्रीमत् परमहंसपरिव्राजकाचार्यत्वादि सकल बिरुदावली
विराजमान श्री विद्याशंकर भारती स्वामी संस्थान शृंगेरी

पावती :—

अस्मत् प्रियशिष्य जयराम गरुड जात गोवर्धन ब्राह्मण शाखा शुक्लयजुर्वेदी गोत्र भारद्वाज, सूत्र कात्यायन, वस्ती राहाणार मोजे पाडळदे यांसी नारायण बावा ब्रह्मचारी यांचा आशीर्वाद. विशेषस्तु आम्हीं श्रीपासून रोटेस पत्र ? घेऊन आल्यानंतर तू जातीनें पुन्हां संभावना दिधली ती पावली ही-पावती लिहून दिली. मिती आश्वीन शु॥ ५ सन १२५० फसली

दस्तुरः—जगन्नाथ हरी कारकून (शके १७६२).

* * * *

समन्स धुळें स्मा. कॉ. मुन्सफ नं. ५६९।१८७६ (शके १७९७).
वादी --दाजी नारायणशेट शिंपी, सोनगीर.
प्रतिवादी--महादेव चिमणभट व दाजी दामोदरभट जात गोवर्धन ब्राह्मण धंदा भिक्षुकी.

देण्याघेण्याचा दावा

फौ. नं. १३ शिंदखेडें
मु. नं. १३ / १८८१ ८ मार्च १८८१ (शके १८०२)

* * * *

शिंदखेडें १७।८।१०.
फिर्यादी--मेघःशाम सखाराम कुलकर्णी.
आरोपी--नारायण सखाराम सराफ.
मुलाचें नांव शाळेंत दाखल करण्याबाबद.

* * * *

सन १८७१ व १८८१ सालच्या खानेसुमारींत वारूड, थांदरणें, गोराणें, खलाणें, होळ येथील भिक्षुकांची जात गोवर्धन ब्राह्मण अशी आहे.

* * * *

राजाराम व्यंकटेश पाटील गोवर्धन यांनीं चोपडचाच्या पाटिलकीच्या कामांत केलेल्या अर्जावर ड्रिस्ट्रिक्ट डेप्युटी कलेक्टर खानदेश यांचा हुकूम आहे कीं, हटकर हेच पाटील वतनदार ठरले आहेत. त्याविरुद्ध गोवर्धन यांनीं आपण वतनदार आहोत असें लिहीलें आहे. पण गोवर्धन वतनदार नसून हटकरांची वहीवाट पाहून त्यांनाच वतनदार ठरविलें आहे. तारीख २६।११।८३ रोजीं निकाल झाला. (शके १८०४).

* * * *

गहाणखत ता. २७।१।१८८४ (शके १८०५).
धनको--दिवाण वा। लक्ष्मण दाजी
ऋणको--गोपाळ बिन मोरेश्वर भट जात गोवर्धन ब्राह्मण रा. दराणे

* * * *

समन्स नं. १९५०।८६ शिरपुर कोर्ट (शके १८०७)
वादी——रामदासमोहन जात शिंपी, शिरपूर.
प्रतिवादी——माधवराव रमाकांत जात गोवर्धन ब्राह्मण,
देण्याघेण्याचा दावा.

* * * *

रेग्युलर मु. नं. ४३९ सन १८९६ (शके १८१७)
फैसला १८९७
ता. ३ नोव्हेंबर.

वादी——

केशव व वामन पांडुरंग जात गोवर्धन ब्राह्मण धंदा ग्रामजोशी.
(बोरगांव, हिंगोणें, जातोडें, उपरपिंड आणि आकडासें गांवचे)
प्रतिवादी——१ माधव नथू ब्राह्मण धंदा मुलें शिकवणें.
२ खुमानसिंग वा। रुपसिंग रजपूत.

माधव नथू हा खुमानसिंग याचे घरीं भिक्षुकी करतो म्हणून फिर्याद होते. परंतु प्रतिवादी नं. १ व २ पुन्हा असें न करण्याबद्दल कबूली देऊन आपसांत समेट होतो.

* * * *

रे. दिवाणी मु. नं. ४११.
वादी——केशव पांडुरंग जात गोवर्धन ब्राह्मण.
प्रतिवादी——हरसिंग गुलबा रजपूत.

प्रकरण १३ वें

विचारांचें नवें वळण व गोवर्धन ब्राह्मणांची सद्यःस्थिति

आजकाल प्रत्येक बाबतीमध्यें मनुष्य बुद्धिनिष्ठ होऊं लागलेला आहे. त्यामुळें प्रत्येक मनुष्याच्या विचाराला नवें वळण लागूं लागलें आहे. ब्राह्मण-ब्राह्मणेतर वाद, स्पृश्यास्पृश्य कलह, हिंदु संघटण अशा विविध आंदोलनांमुळें सुबुद्ध माणसांचीं मनें विवेचक, चिकित्सक आणि सूक्ष्मदर्शक अशीं होऊं लागलीं आहेत. याचें प्रत्यंतर म्हणजे जुन्या अनिष्ट रूढी नष्ट कराव्यात व नव्या रूढी प्रवर्तवाव्यात, असें समाजाला वाटूं लागलें आहे. विधवांवर वपनाची सक्ति करणें हा अन्याय आहे. अस्पृश्यतेचा कलंक धुवून टाकण्यांत माणुसकी आहे. वेदबंदी, स्पर्शबंदी, समुद्रबंदी, व्यवसायबंदी करण्यानें समाजाचा ऱ्हास होत आहे, आणि आपल्याच बरोबरीचे असे जे सांस्कृतिक गट आहेत, त्यांना दूर ठेवल्यामुळें समाजाचें विघटन वाढत आहे ; अशी जाणीव समाजांतील प्रत्येक घटकाच्या सुबुद्ध माणसाला होऊं लागल्यामुळें द्वेष, मत्सर, असूया आणि उच्चनीचत्वाची कल्पना यांचीं टोकें बोथट होऊं लागलीं आहेत. अखिल हिंदु समाजांतच ही खळबळ झाल्यामुळें पंचद्राविड ब्राह्मणांतील सर्व ब्राह्मण जाती, **महाराष्ट्रीय ब्राह्मण म्हणून सारा एक**, अशी संघटणा व्हावी असें चितूं लागल्या आहेत.

चक्रनेमिक्रम हा सर्व सृष्टींत दिसतो. गाड्यावर नाव आणि नावेवर गाडा, चार दिवस सासूचे तर चार दिवस सुनेचे असा सृष्टिक्रम दिसतो. उत्कर्षामागून अपकर्ष, अपकर्षामागून उत्कर्ष होतच असतो. गोवर्धनांचा अपकर्ष एका मर्यादित स्थितीला पोंचल्यानंतर त्या ब्राह्मण समाजांतून गोवर्धन ब्राह्मणांची संशोधनपूर्वक प्राचीन माहिती मांडणारे गृहस्थ पुढें येऊं लागले. त्यांनीं आपापल्या विभागांतील परिषदा भरविल्या. मंडळें स्थापलीं, समाजाचें म्हणून एक मासिक काढलें. वेदशास्त्रसंपन्न पालयेशास्त्री आणि इतर प्रमुख गृहस्थ यांच्या परिश्रमानें पुरातन इतिहास उपलब्ध झाला. ज्ञान-

कोशाच्या निमित्तानें तो इतिहास इतर महाराष्ट्रीय ब्राह्मणांपुढें येऊन जुन्या समजुतीला चांगलेच धक्के मिळाले. ब्राह्मण ब्राह्मणेतर वादामुळें ब्राह्मण संघटनेचा पुरस्कार होऊं लागला, पंचद्राविड ब्राह्मणांतील सर्व पोटजातींच्या इतिहासाचें संशोधन होऊं लागलें. ब्राह्मण मासिक इस्लामपूर, केसरी पुणें, आणि इतर वृत्तपत्रांतून मोठ्या आस्थेनें आणि गंभीरपणानें चर्चा चालू झाली. पंढरपुरांतील विद्वान मंडळींनीं ब्राह्मण्यसंरक्षक परिषद उपस्थित केली, तिला व्यवहार्य, योग्य आणि नवें वळण लावण्याचे कामीं परिणतप्रज्ञ पं. नारायणशास्त्री मराठे आणि इतर सहकारी शास्त्री मंडळी यांचे श्रम फार कारणीभूत झाले. श्री. वासुदेवराव मुंडले संपादक 'ब्राह्मण', ब्राह्मण सभेचे खर्शीकर शास्त्री आणि महादेवशास्त्री दिवेकर या गृहस्थांचेकडून ब्राह्मण संघटणेसंबंधीं खूप जागृति केली गेली. गोवर्धन ब्राह्मणांसंबंधींही उलट सुलट छाननी होऊन तीमुळें गोवर्धनांना आत्मावबोध झाला आणि इतरांचे त्यांच्या संबंधींचे गैरसमज, हीनत्वाची भावना आणि दूषित ग्रह बदलून विचाराला नवें वळण लागलें.

'कालोहि दुरतिक्रमः' काळाबरोबर सर्व जग धांवतें आहे, हें जरी सर्व खरें असलें तथापि कालमान लक्षांत घेऊन योग्य वेळीं धडाडीनें समाजाला सुधारणेची दिशा दाखविण्याचें काम फार कठीण असतें. बृहन्महाराष्ट्राला ही धर्म व समाजसुधारणेची नवी दिशा दाखविण्याचें श्रेय प्रामुख्यानें वांईकर शास्त्री मंडळींना आहे. प्रागतिक मताच्या महाराष्ट्रीय पंडितांना पंढरपुरकरांनीं वाईकर आणि अप्रागतिक पंडितांना पंढरपुरकर अशीं नांवें योजलेलीं आहेत. वाईकर पंडितांच्या प्रागतिक धोरणामुळें १९२५ सालीं भरलेल्या वांई येथील ब्राह्मण परिषदेंत गोवर्धन ब्राह्मणांना बरोबरीचें स्थान मिळालें आणि कार्यकारी मंडळांत गोवर्धन ब्राह्मणांचा एक प्रतिनिधीही घेतला गेला. सन १९२७ सालीं अकोला येथें भरलेल्या बृहन्महाराष्ट्र ब्राह्मण परिषदेच्या संस्मरणीय व प्रचंड अधिवेशनामध्यें पंचद्राविड ब्राह्मणांतील २८।३० पोटजातींमध्यें गोवर्धन ब्राह्मणांचा समावेश होऊन त्यांच्याशीं अन्न व लग्नव्यवहार करण्याचे शास्त्रसंमत निर्णय घोषित करण्यांत आले.

अकोला परिषदेनंतर जरी दुसरें अधिवेशन भरूं शकलें नाहीं, तथापि त्या परिषदेनें जी दिशा दाखविली, ती फार योग्य व व्यापक होती. त्यामुळें

परिषदेंतील ठरावांना अनुसरून सर्व पंचद्राविड ब्राह्मण पोटजातींमध्यें ब्राह्मण-भोजनें आणि शक्य तर विवाहसंबंध घडविण्याचें कार्य सुरू झालें. अकोला, बुलढाणा, संगमनेर येथें इतर ब्राह्मणांबरोबर गोवर्धनांचीं सहभोजनें झालीं. त्यामुळें इतर ब्राह्मणांकडून होणाऱ्या अपमानाची भीति नष्ट झाली आणि ब्राह्मण वर्णांतील आपलें स्थान आपणास मिळालें, असें गोवर्धनांना वाटलें. इतर शाखीय ब्रह्मवृन्द व गोवर्धन ब्रह्मवृन्द यांमधील कल्पनेचा अडसर दूर झाल्याबरोबर सहभोजनें, सहाध्ययन, सहधर्मानुष्ठान हीं तर झालींच, पण अन्तःशाखीय विवाहही होऊं लागले. ऋग्वेदी देशस्थ, यजुर्वेदी देशस्थ या शाखेशीं गोवर्धनांचे विवाहसंबंध झाले. हा मजकूर लिहीत असतांना कोंकणस्थ व कऱ्हाडे यांच्याशीं गोवर्धनांची सोयरीक झाल्याचें पत्र हातीं आलें तें असें :--

डॉ. र. बा. आलाटे यांचे चिरंजीव गोविंदराव आलाटे डी. सी. ई. वॉर्ड ऑफिसर बडोदें गोवर्धन ब्राह्मण यांचा विवाह कु. गंगुबाई पुरुषोत्तम साने, कोंकणस्थ ब्राह्मण यांच्याशीं बडोदें येथें १४।२।३७ रोजीं झाला. तसेंच श्री. व्यंकटराव महाजन नागपूर नांवाच्या गोवर्धन ब्राह्मणाच्या मुलीचा विवाह श्री. लक्ष्मणराव खेर या नांवाच्या कऱ्हाडे वराशीं २५।२।३७ रोजीं झाला. हे असले विवाह निःसंशय अनुकरणीय व अभिनंदनीय होत. विचाराला जें नवें वळण लागलें, त्यामुळें जुन्या रूढीला धक्के देऊन नवे आचार रूढ करण्याचें धैर्य गोवर्धन ब्राह्मणांमध्यें व इतर ब्राह्मणांमध्येंही आलें, हें लक्षांत ठेवलें पाहिजे.

गोवर्धन ब्राह्मण हे वृत्यंशी असल्यामुळें त्यांची वस्ती खेड्यापाड्यांतच अधिक आहे. शहरांत जी सुधारणा होते ती खेड्यांत होऊं शकत नाहीं. असें जरी असलें तरी इतर शाखीय प्रागतिक ब्राह्मण जे खेडोपाडीं असतात, त्यांनीं द्वेष, मत्सर, असूया वगैरे सर्व विसरून गोवर्धन ब्राह्मणाशीं आपले-पणानें वागलें पाहिजे. जन्मजात उच्चनीचत्वाची कल्पना हिंदुसमाजांतून नष्ट झाली पाहिजे, अस्पृश्यतेचा नायनाट झाला पाहिजे, असें जर आतां सर्वांना वाटत आहे, तर मग अगदीं आपल्या जवळचा आपल्या संस्कृतीचा जो गोवर्धन ब्राह्मण त्याला कोणत्याही कारणानें दूर ठेवणें हा अन्याय आहे, हा अधर्म आहे, हें इतर शाखीय समंजस ब्राह्मणांनीं ध्यानांत वागविलें पाहिजे.

गोवर्धन ब्राह्मणांची सद्य:स्थिति

विद्यमान गोवर्धन ब्राह्मण समाज हा बृहन्महाराष्ट्रांत पसरलेला असून एकंदर लोकसंख्या अठरा वीस हजार आहे. गोवर्धन ब्राह्मणांमध्यें वेद व सूत्रें आणि प्रांत भेदाच्या दृष्टीनें किती शाखा आहेत, याची माहिती दहाव्या प्रकरणांत दिलेली आहे. कृष्णाकांठ, गोदाकांट, खानदेश, वऱ्हाड, मोंगलाई, कारवार, बडोदें, धार, देवास, इंदूर अशा सर्व भागांत हे गोवर्धन ब्राह्मण आहेत. पौरोहित्य हा मुख्य धंदा असल्यामुळें यांचें वास्तव्य खेड्यांतच अधिक आहे. खेड्यामध्यें वास्तव्य, पौरोहित्याचा धंदा यामुळें हा समाज शिक्षणांत मागें असणें स्वाभाविक आहे. कुलकरण, पौरोहित्य यांची वतनदारी, आणि पोटापुरतें असलें कीं कांहीं करावयाला नको ही सनातनी वृत्ति, त्यामुळें शिक्षणाकडे प्रवृत्ति कमी. संख्येच्या मानानें सुशिक्षित व विद्वान् माणसें कमी असण्याचें कारण हें होय. तथापि हा समाज निरक्षर आहे असें मात्र नव्हे. जोसपण, पौरोहित्य, शेती, कुलकरण यावर पूर्वी निर्वाह होत होता, म्हणून नव्या शिक्षणाकडे लक्ष नसे. पण आतां परिस्थितीमुळें डोळे लख्ख उघडले असून नव्या शिक्षणाकडे प्रवृत्ति वाढत आहे व कांहीं थोडे कां होईना पदवीधर दिसूं लागलेले आहेत. नोकऱ्या मिळत नाहींत, भिक्षुकी चालत नाहीं, अन्य-शाखीय चळवळ्या भिक्षुकांशीं वृत्तीचे बाबतींत नेहमीं घासाघीस करावी लागते. त्यामुळें अनेक अन्य व्यवसायांत गोवर्धन ब्राह्मण समाज पडूं लागलेला आहे. शहरांत येऊन उद्योगधंदे करण्याची प्रवृत्ति वाढत आहे. पदवीधर, एलएल्. बी. वकील, प्रोफेसर, डॉक्टर, इंजीनिअर पोलीस व मुलकी खात्यांतील वरिष्ठ अधिकारी आणि मास्तर झालेले अनेक लोक गोवर्धन ब्राह्मणां-मध्यें आहेत.

समाजाची सांपत्तिक स्थिति एकंदरींत गरिबीची! शहरी उद्योग व नोकरी करणारीं कांहीं माणसें सोडल्यास इतर समाज खरोखरच गरीब आहे. मिळेल तेवढ्यांतच सुखी राहण्याची अल्प संतुष्ट वृत्ति असल्यामुळें सांपत्तिक स्थिति सुधारत नाहीं. गरीब होतकरू विद्यार्थ्यांस पुढील शिक्षणाची प्रबळ इच्छा असूनही दारिद्र्यामुळें शिक्षण सोडून पोटाचा मार्ग पत्करावा लागतो.

इतर ब्राह्मणांप्रमाणें गोवर्धन ब्राह्मणांतही स्त्री–शिक्षण वाढत आहे. पूर्वी स्त्री-शिक्षणाकडे मुळींच लक्ष नसे. हल्लीं मुलींनासुद्धां सामान्यपणें लिहितां-वाचतां येतें. इंग्रजी शिक्षण घेणाऱ्या स्त्रिया क्वचित् आढळतात. पूर्वी बालविवाह होत, त्यामुळें शिक्षण होत नसे. आतां गोवर्धन ब्राह्मणांत इतरांप्रमाणें आणि कायद्यामुळें प्रौढ विवाह होऊं लागलेले असून त्यामुळें शिक्षणही वाढत आहे. घरोघरीं मुलींना प्राथमिक शिक्षण देण्याची जमल्यास व्ह. फा. शक्य तर ट्रेन्ड मास्तरीण करण्याची प्रवृत्ति वाढत आहे. कांहीं स्त्रिया कोठें कोठें मास्तरणी व मिडवाईफ वगैरे आहेत.

गोवर्धन ब्राह्मण समाजांत बालविधवा आहेत पण इतर ब्राह्मणां-प्रमाणें याही समाजांत विधवा–पुर्नविवाहाबद्दल फारशी सहानुभूति नाहीं. आतांपर्यंत विधवा पुर्नविवाह झालेले नाहींत. विधवा केशवपनाची चाल आहे. शिक्षणाचे अभावीं विधवांची स्थिति शोचनीय आहे. त्यांना शिक्षण देऊन स्वावलंबी बनविण्याकडे प्रवृत्ति वाढत आहे. कारण शहरांतील कांहीं विधवा शिकून स्वावलंबी झालेल्या पाहून इतर विधवांना त्यांच्या अनुकरणाची इच्छा होऊं लागली आहे. दिवसेंदिवस पालकही आपल्या विधवा झालेल्या सुना व लेकींना स्वावलंबी करण्याचा यत्न करीत असल्यामुळें प्रगतीचें पाऊल थोडें तरी पुढें पडत आहे.

राहाणी—उत्तम तऱ्हेची राहाणी ठेवण्यास सांपत्तिक अनुकूलता लागते. गोवर्धन ब्राह्मणांची सांपत्तिक स्थिति देशापेक्षां कोंकणांतच बरी आहे. कोंकणां-तील राहाणीला खर्चही कमी लागतो. देशावरील गोवर्धन ब्राह्मण भाऊ-बंदकी, दुष्काळ, जमिनीची नापिकी, आळस आणि अनास्था अशा कारणामुळें दरिद्री आहे. खाऊन पिऊन सुखी अशीं फारच थोडीं कुटुंबें आढळतील. तथापि पौरोहित्याचे व जोसपणाचे जुने भिक्षुकी संस्कार या समाजांत असल्या-मुळें, राहणी स्वच्छ, साधी व्यवस्थित असते. पुरोहित वर्गाला गलिच्छ राहणी ठेवणें शक्यच नसतें. साधीभोळी ब्राह्मणी व स्वच्छ राहाणी सर्वत्र आहे. सोवळ्या ओंवळ्याचें स्तोम शहरांत कमी झालें असलें तरी खेड्यांत भरपूर आहे. पुणें, मुंबई, अकोला इत्यादि शहरांतील आणि त्याच्या आस-पासच्या भागांतील गोवर्धनांची राहाणी, भाषा आणि चालीरीती इतर ब्राह्मणांप्रमाणें सुधारत आहे. शहरी राहाणीचा परिणाम इतर ब्राह्मणांप्रमाण

गोवर्धन समाजावरही झालेला दिसतो. भाषा, उच्चार, खाद्य, पेय, शिष्टाचार यांमध्यें प्रांतपरत्वें बदल होत आहे. खेड्यांत नैसर्गिक आरोग्य असतें, पण शिक्षणाच्या अभावी त्याचा लाभ इतरांप्रमाणें यांनाही घेतां येत नाहीं.

गोवर्धन समाजांतील धार्मिक कृत्यें बहुतेक स्वशाखीयांकडूनच करविलीं जातात. खेडोपाडीं स्वशाखीय भिक्षुक पुष्कळ आहेत. पण वऱ्हाड, मध्यप्रांत, इंदूर, कारवार, अशा या भागांत आणि कांहीं शहरांमध्येंही स्वशाखीय भिक्षुक नसल्यास अन्यशाखीय भिक्षुक उपनयन, विवाह, अंत्येष्टी, गर्भाधान वगैरे सर्व संस्कार प्रसंगीं करतात. विवाह, उपनयन प्रसंगीं शक्यतों स्वशाखीय पुरोहित बोलावण्यांत येतो. अशा प्रसंगीं दोन्ही शाखेचे पुरोहित सहकार्यानें सहधर्मानुष्ठान करतात. कांहीं ठिकाणीं सहधर्मानुष्ठानानंतर सहभोजनेंही अन्य शाखीयांशीं होतात.

गोवर्धनांची श्रावणी स्वतंत्र होते. तशी सोय नसल्यास ते इतर शाखीयांकडे श्रावणीस जातात. श्रावणीमध्यें गोवर्धन ब्राह्मणांबरोबर इतर शाखीय पुरोहितही केव्हां केव्हां असतात. उदाहरणार्थ बुलढाण्यास वे. मू. कर्वे भटजी कोंकणस्थ व वे. मू. हरिभटजी देशस्थ ग्रामजोशी असे दोघे गोवर्धन पुरोहिताबरोबर संस्कार प्रसंगीं व इतर वेळींही सहधर्मानुष्ठान करतात. अकोल्यास १९०६ सालापासून देशस्थ ऋग्वेदी दीक्षित उपनांवाचे भिक्षुक गोवर्धनाकडे पौरोहित्य करीत. आतां या घराण्यापैकीं कोणी भिक्षुकी करीत नाहीं. ह्यानंतर कांहीं वर्षें वे. रंगभटजी कानडे यांनीं काम चालविलें. पण अलीकडे ५।६ वर्षांपासून आगाशे उपनांवाचे कोंकणस्थ व दुसरे गोपाळ भटजी कोंकणस्थ ब्राह्मण गोवर्धनांकडील धर्मकर्में चालवितात. ह्या सर्व भिक्षुकांनीं लग्नमुंज इत्यादि प्रसंगीं गोवर्धन पुरोहिताबरोबर कामें केलीं आहेत व करतात. वाशीमला कोरान्ने उपनांवाचे देशस्थ ऋग्वेदी भिक्षुक गोवर्धनांचें पुरोहितपणा करीत. आकोट येथें एक तुळशी उपनांवाचे देशस्थ ऋग्वेदी भिक्षुक गोवर्धनांचें पौरोहित्य करीत. सारांश, गोवर्धन ब्राह्मणांस सहधर्मानुष्ठानाची कधींच अडचण पडली नाहीं. जन्मापासून अंत्येष्टीपावेतों सर्व संस्कार व धर्मकर्में इतर शाखीय भिक्षुक चालवितात व विशेष प्रसंगीं गोवर्धन पुरोहिताबरोबरही कामें करतात. इतर शाखीय भिक्षुकांनीं याला कधीं हरकत घेतली नाहीं. गोवर्धनांच्या वेदाधिकाराबद्दल वाद

कधीं उत्पन्न झाला नाहीं. एक दोन प्रसंगीं दोन्ही शाखांच्या भिक्षुकांत फक्त दक्षिणेच्या बाबीबद्दल झगडे झाल्याचें समजतें. गोवर्धन पुरोहित उपस्थित असल्यास पुरोहितपणाच्या बाबी त्यांस मिळतात व सहकार्य करणाऱ्या इतर शाखीय भिक्षुकांचीही योग्यतेनुरूप संभावना केली जाते.

सहभोजन—हें अकोला ब्राह्मण परिषदेपासून निःशंकपणें सर्वत्र होऊं लागलेलें आहे, हें वर सांगितलेंच आहे. गांवोगांवचे जे धार्मिक उत्सव-प्रसंग असतात, अशा वेळीं खेडयांतील भिक्षुकांमध्यें सहभोजनें होतात. खेडयांत जुन्या वृत्तीचे लोक अधिक म्हणून राजरोसपणें अन्नव्यवहार करण्यास लोक भितात. पण कार्यप्रस्थ प्रसंगीं आणि सामुदायिक प्रसंगीं एकत्र जेवण्याचे प्रसंग येतात आणि त्याकडे कोणी लक्ष देत नाहीं. पुणें, मुंबई, अकोला नागपूर, अशा ठिकाणीं आतां राजरोस सहभोजनें होत आहेत. त्याला आत, महत्त्वही फारसें उरलेलें नाहीं. खेडयांतून हा प्रश्न समाधानकारकपणें सुटण्याच्या मार्गास आतां लागलेला आहे. लग्नव्यवहारसुद्धां जेथें आतां होऊं लागले आहेत तेथें भोजनाचा प्रश्न राहिलेलाच नाहीं. श्रीशंकराचार्य मठ शृंगेरी, करवीर, कुंभकोण यांच्या स्वाऱ्या जेव्हां येतात तेव्हां त्यांचेकडून इतर शाखीयांप्रमाणें गोवर्धन शाखीयांची संभावना होते. श्री हे मठीय कार्यक्रमाला इतरांप्रमाणें गोवर्धनांनाही आमंत्रणें देतात. क्वचित् ग्रामजोशी गोवर्धन असेल तर त्याच्याकरितां काम अडतेंही. खानदेशांमध्यें गोळक हा शब्दच रूढ नाहीं. तिकडे परसाई असें गोवर्धन ब्राह्मणांना म्हणतात. त्याचें निराकरण पूर्वीं केलेंच आहे. खानदेशामधील मेथीगांवचा शिलालेख सर्वांत जुना आहे, त्यांत कुरुकौलें गांव त्या भागांतील वृत्तिवान् ब्राह्मणास दान दिल्याचा उल्लेख आहे. त्यांत नमूद केलेल्या गोत्रांचीं घराणीं त्या भागांत अद्याप वृत्तिवान् असल्यामुळें खानदेशांतील गोवर्धनांना आपल्या ब्राह्मण्याची शंका कधींच आलेली नाहीं व येत नाहीं. शिव, विष्णु, देवी इत्यादि अनेक देवतांच्या प्रतिष्ठा सर्व ब्राह्मण व हिंदु यजमानांनीं गोवर्धनांचेकडून करून घेतल्याचे जुने कागद पुष्कळ सांपडतात.

वेदशाखा व सूत्रें—उत्तर कोंकण व खानदेशांत ऋकयजुःशाखेचे गोवर्धन ब्राह्मण असून इतर ठिकाणीं फक्त ऋक् शाखेचेच आहेत. सामवेदी उत्तर कोंकणांत क्वचित् आहेत. ऋग्वेद शाकलशाखा—आश्वलायनसूत्र ; कृष्ण-

यजुर्वेद तैत्तिरीय शाखा–बौधायन सूत्र ; शुक्ल यजुर्वेद माध्यंदिन शाखा–कात्यायन सूत्र; सामवेद छांदोग्य शाखा–गोभिलसूत्र अशीं प्रचलित आहेत.

गोत्रें––अत्रि, आंगिरस, उपमन्यु, औपमन्यव, कपि, कात्यायन, कामकायन, काश्यप, कौंडिण्य, कौशिक, गौतम, गार्ग्य, चंद्रात्रेय, जामदग्न्य, पाराशर, भार्गव, भारद्वाज, मूक, मुद्गल, मैत्र्य, मौन, वत्स, वामरथ्य, वासिष्ठ, विश्वामित्र, लोहित, शालंकायन, शालावत, शांडिल्य, श्रीवत्स, सांख्यायन, हारितस, कृष्णात्रेय, वैंग्य, बालखिल्य, रथीतर, शट, वाधूल इ.

प्रवर––गोवर्धन ब्राह्मणांत त्रिप्रवरी व पंचप्रवरी लोक आहेत.

कर्ते पुरुष––एकंदरींत सर्व भागांत बरेच आहेत. स्थलसंकोचास्तव देतां येत नाहींत.

आडनांवें––प्रभाकर, रत्नाकर, धाते, विधाते, लोकेश, झाडे, वेखंडे, नायक, तिवाडी, अलाटे, भोटगे, राणे, अवारे, दुर्वास, तांबेकर, मंडावले, आवटे, व्यवहारे, रोडे, दिनकर, शूळ, कुवर, दास्ताने, पांचाले, पालये, गरगरे, देसाई, प्रयाग, दास, मटवी, घवी, पिंगळे, पिपळे, कांकडे, भालेराव, भगाड, रोंधे, नाचणे, भालके, खताळ, भट, जोशी, कुलकर्णी, दीक्षित, पंडित, पाठक, टकले, वैद्य, धर्माधिकारी, मुळे, क्षीरसागर, गोसावी, डांगे, रत्न-पारखी, नारळे, महाजन, रेलकर, बिवलकर, भट, पांढरकर, पांडे, चंद्रात्रे अशीं अनेक आडनांवें आहेत.

आहार व स्वभाव––हे ब्राह्मण पूर्ण शाकाहारी आहेत. इतर ब्राह्मणां-प्रमाणें कांहीं व्यक्ति मत्स्याहारी किंवा मांसाहारी अशा या समाजांत आढ-ळल्या तरी त्यामुळें सबंध समाजावर तो आरोप येऊं शकत नाहीं. या समाजावर पूर्वींही प्रवृत्तमांस असा आरोप नव्हता. इतर ब्राह्मणांत न दिस-णारे कोणतेही नवे रोग या ब्राह्मणांत नाहींत. एकंदरींत आरोग्य ठीक आहे. पण स्त्रियांमध्यें बाळंतरोग, क्षयरोग, बालमृत्यु यांचें प्रमाण वाढत आहे. समाजाचा स्वभाव गरीब, श्रद्धाळु व मनमिळाऊ असा आहे. त्याबरोबरच या समाजांत स्वाभिमान, ईश्वरनिष्ठा, पापभीरुत्व हेही गुण आढळतात. औदार्य कमी, कृपणत्व जास्ती याचें कारण द्रव्याभाव व शिक्षणाभाव हें होय !

धार्मिक शिक्षण--पूर्वी प्रत्येक धर्माधिकाऱ्याच्या घरीं वेदशाळा असे. आतां तें मान कमी झालेलें आहे, तरी प्रत्येक धर्माधिकाऱ्याकडे कांहीं मुलें शिक्षण घेत असतात. शिक्षण परंपरेनें मिळतें, इतर शाखीय ब्राह्मणांकडूनही कोठें कोठें याज्ञिक व ज्योतिष शिक्षण घेत असल्याचीं उदाहरणें आहेत. अमृतेश्वर, कुंभाली आणि काजगांव ह्या ठिकाणीं वेदपाठशाळा आहेत. त्यांचेंही शिक्षण हेळसांड न होतां परंपरेनें चालतें. संगमनेर येथें मुलांच्या शिक्षणाकरितां वसतिगृह उघडण्यांत आलें आहे. एकंदरींत संस्कृत शिक्षण कमी आहे.

धर्मकर्में--गोवर्धन ब्राह्मणांचीं धर्मकर्में स्वशाखीय ब्राह्मणांकडून होतात व तीं शाखाभेदाप्रमाणें आश्वलायन, बौधायन, कात्यायन व गोभिल सूत्राधारें होतात. नित्य देवपूजा, संध्या वैश्वदेव होतात. गर्भदानादि अंत्येष्टीपर्यंतचे सर्व संस्कार श्राद्धपक्ष, वास्तुशांत, उदकशांत, श्रावणी, इत्यादि मुख्य धर्मकर्में गोवर्धनांकडे होतात. स्वशाखीय पुरोहित असल्यानें अन्य शाखीयांची जरूरी भासत नाहीं. तथापि सर्वच गांवीं स्वशाखीय पुरोहित असतातच असा नियम नाहीं. तेव्हां इतर शाखीय पुरोहित धर्मकर्में चालवितो. तथापि विशेष कार्य स्वशाखीयांशिवाय होत नाहीं. त्यांत इतर शाखीय ब्राह्मण सहानुष्ठानास असतात व त्यांची योग्य संभावना ही होते. मात्र पौरोहित्याची विशेष बाब स्वशाखीयांकडे जाते. कोठें कोठें श्रावणी स्वतंत्र करण्याची सोय नसल्यास इतर ब्राह्मणांकडे श्रावणीस जाण्याची वहिवाट आहे.

देवदेवता--जेजूरीचा खंडोबा, वांकडीचा खंडोबा, चिंचखेडचा खंडोबा (जिल्हा औरंगाबाद), तुळजापुरची देवी, जोगेश्वरी, वज्रेश्वरी वीरेश्वरी, महालक्ष्मी (कोंकण), कोल्हापुरची देवी, सप्तशृंगी, माहूरची देवी, पाटण्याची देवी (चाळीसगांव तालुका), नांदगांवचा गणपती, वेजराजमाता (बडोदें), व बालाजी हीं मुख्य कुलदेवतें आहेत. उपास्य देवतांमध्यें पंचायतन पूजा आहे. कांहीं ब्राह्मण शिव, विष्णु, गणपति, दत्त, राम या देवतांचे उपासक आहेत. खानदेशांतील वरेच गोवर्धन वारकरी पंथाचे आहेत. मोक्ष गुरूचा उपदेश घेण्याची चाल आहे.

धर्मपंथ व मतें--शांकर अद्वैत मतानुयायी सर्व गोवर्धन आहेत. कांहीं अल्पसंख्याक मध्वमतानुयायीही आहेत. शिवगंगा, शृंगेरी व संकेश्वर येथील

आचार्यांची प्रसंगानुसार पाद्यपूजा होते. शृंगेरी पीठाचें अनुशासन चालतें. चतुर्थाश्रम घेण्यास गोवर्धन मठास म्हणजे जगन्नाथपुरीस जाण्याची चाल आहे. त्या गोवर्धन मठाचा परमहंस सांप्रदाय आहे.

व्रतवैकल्यें व सण––चैत्रागौरी, रामनवमीचा उपवास व उत्सव, हनुमत् जयंती, अक्षय्य तृतीयेचें कुंभदान, दशाहार, वटसावित्रीची पूजा, आषाढी कार्तिकी एकादशी, शनि आणि सोमप्रदोष, शिवरात्रीचे उपवास, महाशिवरात्रीचा उपवास, गाणपत्य, बारा महिन्यांच्या संकष्ट्या व माघ शुद्ध ४ चा कडकडीत उपवास–नागपंचमी, शिवामूठ, मंगळागौरी, नाग-नरसोबा, जिवत्या, बुधबृहस्पति, श्रावण सोमवार, शनिवारचे उपवास, गोकुळाष्टमी, पिठोरी अमावास्या, हरतालिका, ऋषीपंचमी, गणेश चतुर्थी, अनंत व्रत, आश्विनांत देवीचें नवरात्र, सप्तशतीचे पाठ, उपवास, नंदादीप, आश्विनी आदित्यवाराचे उपवास, श्रावण व कार्तिक सोमवारचे उपवास, तुलसीविवाह, वैकुंठ चतुर्दशी, त्रिपुरी पौर्णिमा, मार्गशीर्षांत सटीचें व खंडोबाचें नवरात्र, चंपाषष्ठी, नाग दिवाळी वगैरे बऱ्याच देवता कोंकणांतील असून देवदिवाळीची चाल नाहीं. संक्रांत, रथसप्तमी, दिवाळीचें लक्ष्मीपूजन व फाल्गुनी पौर्णिमेचें होलिकापूजन आहे. खानदेशांत राणूबाईचें व्रत आणि चक्रपूजेचीही रूढि आहे.

पौरोहित्य––पौरोहित्य व जोसपण यांच्या सनदा व आज्ञापत्रें पीठस्थ आचार्यांकडून मिळालीं आहेत. त्यांत अधिकाराचें क्षेत्र व पीठास देण्याचा भाग याचा उल्लेख असतो. पीठाध्यक्ष किंवा त्यांचे प्रतिनिधि आले म्हणजे धर्माधिकारी त्यांची संभावना करतात.

प्रकरण चौदावें

उपसंहार

कोणत्याही समाजांत नवें व जुनें असे पक्ष असतातच. हिंदुस्थानामध्यें सांप्रत नवे विचार फार झपाट्यानें पसरत असल्यामुळें पुराणप्रिय लोकांना अगदीं कसेंसेंच झालें आहे व तसें होणें स्वाभाविक आहे. कोणतीही नवी गोष्ट, नवी सुधारणा आली, त्याला बुजण्याची प्रवृत्ति सर्वत्र असते. पूर्वीं बैल हे टांग्याला, छत्रीला फार बुजत. पण आतांचे बैल मोटारींनासुद्धां बुजत नाहींत! याचें कारण नव्या वस्तूचा परिचय हें होय. चोळीच्या जागीं पोलकें येतांच कांहीं लोक बुजले, मस्तकावर केशकलाप येतांच कांहींना अब्रह्मण्य वाटलें; प्रथम चहा आला तेव्हां त्याबद्दल लोक साशंकच होते. पण आतां वरील प्रत्येक बाबतींत समाज निःशंक झाला आहे, आणि तो विचारानें वागत आहे.

आजपर्यंत 'वचनात् प्रवृत्तिः वचनात् निवृत्तिः' असें सूत्र होतें, पण आतां 'विचारात् प्रवृत्तिः विचारात् निवृत्तिः' असें सूत्र सर्वत्र येऊं लागलेलें आहे. मनुष्य हा विचारशील आहे. तेव्हां जगांत केव्हांही विचाराचाच विजय होतो. जुनीं वचनें सोन्यासारखीं जरी असलीं तथापि जुनें तें सोनें समजणें, आणि जें जें चकाकतें त्याला सोनें समजणें हें गैर होय. सोन्याच्या निघर्षण, छेदन, ताप व ताडन अशा कसोट्या आहेत. त्याचप्रमाणें कोणतीही नवी सुधारणा पारखण्याच्या कसोट्या आहेत. ज्यापासून माणुसकी वाढते, मत्सर व असूया कमी होतात, समाज संघटित होण्याला साह्य होतें आणि जी विचाराला पटते, अशी कोणतीही सुधारणा वेखट अंमलांत आणण्यास विचारी माणसानें मुळींच हयगय करूं नये. या दृष्टीनें जुन्या प्रवृत्तीच्या कट्टर महाभागांना आम्ही असें सुचवितों कीं येथवर दिलेला इतिहास व आक्षेप परामर्श हा लक्षांत घेऊन त्यांनीं यापुढें दुराग्रह सोडून गोवर्धन ब्राह्मणांशीं बरोबरीच्या नात्यानें वागावें.

आतां, जुन्यापैकीं एक वर्ग असा आहे व तो असें म्हणतो, "अहो, गोवर्धन ब्राह्मणच पूर्वीं स्वतःला गोळक समजत असत व आतांही समजतात, त्यास

आम्ही काय करावें? " हें म्हणणें एका दृष्टीनें खरें आहे कारण ज्याला स्वतःचाच आत्मावबोध नाहीं त्याला इतर कोण काय करणार? अस्पृश्य आजपर्यंत 'पायींची वहाण पायीं बरी' असें म्हणून लांबलांबच राहात असत. ब्राह्मणेतरही ब्राह्मणांपुढें ताठपणानें वागण्यास थोडा संकोच करीत. स्त्रिया या कितीही शिकल्या तरी त्या पुरुषापुढें थोड्या हळुवार पडतात. फार काय पण इंग्रज अधिकाऱ्यांपुढें आजपर्यंत एका विशिष्ट मनोवृत्तीनें वागणाऱ्या हिंदी लोकांना आज ते गव्हर्नर, होममेंबर असे मोठे झाले तरी मोठमोठ्या हुद्यावरचे इंग्रज नोकर आपल्या हाताखालीं वागवितांना त्यांचें मन थोडें कचरतेंच. हा सर्व संस्काराचा परिणाम आहे. हे संस्कार ज्ञानानें बदलतात. इंग्रज हे देशाचे नोकर आहेत, संस्थानिक सुद्धां प्रजेचे नोकर आहेत, असें समजणारा पुढारी ताठपणानें वागतो. स्त्रिया काय, अस्पृश्य काय, किंवा एकादा निग्रो काय, ज्ञानाचें सामर्थ्यच असें आहे कीं, तें पूर्वीचे सर्व संस्कार बदलून टाकतें.

मेंढ्याच्या कळपांत वाढलेल्या सिंहाच्या छाव्याची गोष्ट प्रसिद्धच नाहीं काय? पण त्या छाव्याचे संस्कार बदलतांच त्यानें त्या कळपांतील मेंढ्या फस्त केल्या. श्री शहाजी राजे व त्यांचे समकालीन सरदार यांना मुसलमानांचीं दक्षिणेंतील राज्यें चालविण्यांतच मोठेपणा वाटत होता. अव्वल इंग्रजीमध्यें, इंग्रजांच्या खुर्चीला खुर्ची लावून नोकरी करण्यांत कृतकृत्यता मानणारी ती पिढी होती. पण श्री शिवाजी महाराजांना जसें दुसऱ्यांचीं राज्यें चालविण्यापेक्षां आपण स्वतःच राजे व्हावें असें वाटलें, तसेंच आजच्या पिढीला इंग्रजांच्या नोकरींत न राहतां स्वराज्य मिळवून वाटल्यास इंग्रजांना नोकर ठेवावें, असें वाटूं लागलें आहे. श्रीशिवभूपतींना कुणबट, चोर, दरोडेखोर, लुटारू असें वर्ग म्हणणारा कांहीं कमी होता? पण शिवभूपति हे क्षत्रिय आहेत, त्यांचे सर्व संबंधी महाराष्ट्रीय वीर अस्सल क्षात्रतेजानें संपन्न आहेत, अशी घोषणा श्रीसमर्थ रामदासांनीं केली, गागाभट्टासारख्या महापंडितानें वेदोक्त संस्कार करून वेदाधिकार दिल्यावर श्री शिवकालीन परिस्थितीवर त्याचा केवढा बरें प्रभाव पडला! प्रत्येक मराठा मी क्षत्रिय म्हणून रणांगणांत उड्या घेऊं लागला नाहीं काय?

जित व जेते यांच्या संस्कारांमध्यें असा हा फरक असतोच ! जेत्यांनीं दडपलेल्या जितांमध्यें गुलामगिरीची वृत्ति बळावूं लागते. जितांची संस्कृति नष्ट करण्याचा उद्योग जेते सुरू करतात. गोवर्धन ब्राह्मण हे जित नसले तरी इतर प्रबळ ब्राह्मण जातींनीं गोळक या नांवानें त्यांना संबोधून आणि दूर ठेवून दुर्बल केलें आहे. जवळजवळ एक शतकभर या निंदाव्यंजक नांवानें त्या वर्गाची संभावना झाल्यामुळें त्या ब्राह्मणांचा स्वाभिमान नष्ट होऊन आपण गोळक आहोंत कीं काय, असा भ्रम उत्पन्न होण्यास अवसर मिळाला यांत शंका नाहीं, एखाद्याला उगाच चारदोन गृहस्थांनीं कांहीं कांहीं तासांनीं का हो, आजारी आहां काय, तब्येत ठीक दिसत नाहीं, असें सहज म्हटलें तरी-सुद्धां निरोगी माणसाला आपल्याला कांहीं झालें आहे कीं काय, असा संशय उगाचच येतो. गोवर्धन ब्राह्मणांची स्थिति गोळक या शब्दाच्या असकृत् उपदेशामुळें अगदीं अशीच झाली आहे. रूढीच्या दडपणाखालीं प्रतिभावान माणसेंही कशीं चुकतात याबद्दल इतिहास संशोधक राजवाडे व डॉ. केतकर यांचीं उदाहरणें देतों.

एकदां एकाद्या विषयाविषयीं मनांत आढी बसली म्हणजे पूर्वग्रह बदलत नाहींत, संशोधनामध्यें सुद्धां चुका होतात. सुप्रसिद्ध संशोधक राजवाडे यांनीं १९१४ मध्यें भा. इ. सं. मंडळापुढें एक निबंध वाचला. विषय पुणें शहराचें वर्णन हा होता. त्यांत त्यांनीं कसबा पेठेचे व्यापारी शेटे होनप या आडनांवाचे (गोळक) सावकार होते असें म्हटलें आहे. परंतु नाशिक येथील क्षेत्रोपाध्यायांच्या वहीवर शेटे होनप गोवर्धन ब्राह्मण, गोत्र भारद्वाज, ऋग्वेद आश्वलायन रा. पुणें कसबा असा उल्लेख आहे. हा लेख सुमारें ३०० वर्षांचा जुना असून १३।१४ पिढ्या जे जे पुरुष त्या क्षेत्रीं गेले त्यांचाही क्रमवार असाच उल्लेख आहे. शेटे होनपांचे ज्यांच्याशीं शरीरसंबंध झाले व होतात, त्यांपैकीं लकडे या घराण्याकडे पेशवाईपासून उत्तर कोंकणांतील सुमारें ५० गांवांची जोसपणाची वृत्ति आजतागायत अबाधितपणें चालत आली आहे. अशी वस्तुस्थिति असतां पूर्वदूषित ग्रहामुळें कसे अनर्थ घडतात तें सहज ध्यानीं येईल ! आतां आणखी एक उदाहरण पहा !

पुरातत्त्वभूषण राजवाडे यांचेप्रमाणेंच डॉ. केतकरही प्रतिभासंपन्न असे लेखक होऊन गेले पण भारतीय समाजशास्त्र पा. १८७ मध्यें त्यांनींही

गोवर्धन ही ब्राह्मणांची जुनी जात असावी असें संशयास्पद लिहिलें आहे. त्याच ग्रंथांत पा. १८६ वर खत्री जातीबद्दल ते लिहितात कीं, दासी म्हणून हे खत्री अनेक स्त्रिया पदरीं बाळगतात व त्यांच्या संततीला गोळक म्हणतात. गोवर्धन ब्राह्मणांमध्यें अशी चाल मुळींच नाहीं. तथापि डॉ. मजकूर हे गोवर्धनांबद्दल साशंकच होते हें आश्चर्य नव्हे काय ?

अलीकडील एक खोडसाळ यत्न

चरणव्यूहाच्या एका अर्वाचीन भाष्याच्या नांवावर सार्थ चतुर्वेदी शाखा निर्णय या नांवाचा एक ग्रंथ १९२७ सालीं प्रसिद्ध करण्यांत आला. लेखकानें गोळक ही एक ऋग्वेदांतील शाखा असून तिचा त्याग केल्यास शाखारंडत्व येईल असें लिहिलें आहे. हें लिखाण मूळ कात्यायनाच्या चरणव्यूहावर आधारलें आहे. पण मूळ ग्रंथांत अगर त्यावरील भाष्यांत गोवर्धन ब्राह्मणासंबंधाचा उल्लेख नाहीं. चरणव्यूहाच्या उपलब्ध प्रतीमध्यें अथवा त्यावरील भाष्यामध्यें गोळक या शाखेला आधार सांपडत नाहीं. गोवर्धन हें प्रादेशिक नांव असतांना गोळक या नांवाचा शाखाप्रवर्तक एक ऋषि म्हणून संबंध जोडणें हें थोडें विपरित दिसतें. मूळ ग्रंथांत अथवा भाष्यांत मागमूसही नसतांना केलेलें विधान साहसाचें आहे. लेखकानें गोळक हें नांव शाखा व ऋषिप्रवर्तक म्हणून दिलें आहे. ऋग्वेद शाकलशाखांतर्गत गोळक ही एक शाखा आहे, असें लेखक म्हणतो. परंतु गोवर्धन ब्राह्मण हे चतुःशाखीय आहेत. त्याची वाट काय ? गोवर्धन हे केवळ ऋग्वेदीच असते तर गोष्ट निराळी ! ऋग्वेदी आश्वलायन, शुक्ल यजुर्वेदी कात्यायन सूत्री, कृष्ण यजुर्वेदी बौधायन सूत्री, सामवेदी गोभिल सूत्री असे हे गोवर्धन ब्राह्मण आहेत. तेव्हां लेखकाचें विधान निर्मूळ ठरतें.

शौनकोक्त चरणव्यूह व त्यावरील महीदासपंडित भाष्य हे ग्रंथ सर्वत्र प्रसिद्ध आहेत. त्या चरणव्यूहांत गोळक हें ऋषिप्रवर्तक म्हणून नांव नाहीं. चरणव्यूहाच्या मराठी भाषांतरांत गोळक शब्दाचा पत्ता नाहीं. श्रीमत् भागवताच्या द्वादश स्कंदाच्या सहाव्या अध्यायांत वेद व शाखा यांचा विस्तार सांगितला आहे, त्यांतही शाखाप्रवर्तक ऋषि म्हणून गोळक हें नांव नाहीं. वेदशाखांचें परिगणन महार्णवकारांनीं केलेलें आहे. त्यांतही देशपरत्वें ज्या

शाखा सांगितल्या आहेत त्यांतही गोळक हें शाखा व ऋषिवाचक नांव नाहीं. तात्पर्य वेदशाखांचें परिगणन असलेल्या कोणत्याही मान्य ग्रंथांत गोळक शब्द ऋषिवाचक नसतांना ती एक शाखा आहे असें म्हणून शाखारंडत्वाची भीति घालणें हें खरोखरीच अश्लाघ्य आहे. गोवर्धन ब्राह्मण फक्त ऋग्वेदीच नसून चारी वेदांचे अनुयायी आहेत हें कदाचित् या लेखकांना विदित नसावें. नाहीं तर त्यांनीं प्रत्येक वेदांतर्गत गोळक या नांवाची शाखा अस्तित्वांत होती, असें विधान करण्यास कमी केलें नसतें. सार्थ चतुर्वेदी शाखानिर्णय या चोपडयाचें खरमरीत खंडण ७–१२–२७ च्या प्रजापक्षांत पं. पालये शास्त्री यांनीं केलेलें आहेच, यास्तव आतां अधिक लिहीत नाहीं.

गोवर्धन ब्राह्मणांचें अज्ञान, दौर्बल्य आणि इतर प्रबळ जातींची असूया व मत्सर यामुळें या ब्राह्मण समाजाला शेंदीडशें वर्षें फार वाईट गेलीं. परिस्थितीच्या दडपणामुळें गोवर्धन हे स्वतःला गोळक मानूं लागले. सह्याद्रि खंडांतील ब्राह्मण जातींच्या वेडयावांकडया कथा त्याज्य ठरवून कांहीं ब्राह्मण जाती जशा उन्नतीला पावल्या, त्याचप्रमाणें त्या खऱ्यामानून कांहीं अपकर्षाला पोंचल्या. कोठें कोठें चरकांना सुद्धां गोळक हें नांव दिलेलें आढळतें. कऱ्हाडयांनासुद्धां हें नांव सह्याद्रि खंडांत दिलेलें पूर्वीं सांगितलेंच आहे. चरकांतील अध्वर्यूचा राग यजुर्वेद्यांना येत असे. म्हणून त्यांनीं चरकाध्वर्यूंना उभें जाळावें, असें ग्रंथांत लिहून ठेवलें आहे. हे चरक भटके ब्राह्मण येऊन दक्षणा उपटून निघून जात असावेत असें विधान डॉ. केतकर यांनीं 'विद्यासेवक' वर्ष ५ अंक ४ पा. २४ मध्यें केलेलें आहे. खरोखर द्वेषाची ही परिसीमा नाहीं काय ? या मत्सराग्नीमध्यें अनेक जाती होरपळून गेल्या आहेत, यांत शंका नाहीं. म्हणूनच आम्ही हिंदु समाजांतील **विष जें जन्मजात उच्चता व नीचता तें जळून खाक व्हावें**, असें म्हणतों. असो.

गोवर्धन ब्राह्मणांनीं आतां पूर्वींच्या विपत्कालांतील कटुकथा व ग्रामण्यें उकरून काढण्यांत अर्थ नाहीं. अर्थात् अन्य ब्राह्मण जातींनीं त्यांना गोळक या शब्दाचें स्मरणही देण्याचें कारण नाहीं. गोवर्धनांमध्यें जसे अडाणी व रूढिप्रिय आहेत, तसे इतर ब्राह्मणांतही कट्टर सनातनी आहेत. त्या दोघांच्या नादीं लागण्याचें मुळींच कारण नाहीं. एन्जिन खेचील तिकडे डबे जात असतात, त्याप्रमाणें विचारवंताच्या मागें हे सर्व लोक अनिच्छनें कां होईना

ओढले जात आहेत. गोवर्धनांमध्यें जसा आत्मावबोध झाला आहे, तसाच इतर सर्व शाखीय ब्राह्मणांमध्यें समंजसपणाही वाढला आहे. म्हणून पूर्वीच्या समजुती, स्मृती व रूढी यांना पूर्वकालांतच गाढून ठेवून नव्या कालाला योग्य असें वर्तन करणें हेंच श्रेयस्कर आहे. गोवर्धन ब्राह्मण ही महाराष्ट्रांत प्रथम वसाहत करणारी शुद्ध प्रादेशिक ब्राह्मण जात आहे, ही अधर्म संतति नाहीं, गोळक तर मुळींच नाहीं. यापुढें त्यांना तसें समजण्यांत धर्म, सत्य, नीति, पावित्र्य आणि संस्कृति यांना पायांखालीं तुडविण्यासारखें होणार आहे; हेंच शेवटीं सांगून ग्रंथ पुरा करतों.

पं. महादेवशास्त्री दिवेकर यांनीं

लिहिलेलीं आज विक्रीस असलेलीं पुस्तकें

५	गोवर्धन ब्राह्मणांचा इतिहास	मूल्य	१। रु.
१	नवयुग विद्यार्थीधर्म	,,	१ रु.
२	हिंदुसमाज समर्थ कसा होईल ?	,,	१ रु.
३	गीता–प्रदीप	,,	·।।।· रु.
४	ब्रह्मज्ञान व बुवाशाही	,,	१॥ रु.

पत्ता——महादेवशास्त्री दिवेकर,

पो. मिरज (S. M. C.)

रावसाहेब, शाम[illegible] रामचंद्र महाजन,

ताजना पेठ, पो. अकोला (वऱ्हाड).